खरा संभाजी



बेस्ट सेलर

प्रा. नामदेवराव जाधव





श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिवराजते ।
यद् क सेविनो लेखा वर्तते कस्यनो परि ।।

खरा संभाजी

: लेखक :

प्रा. नामदेवराव जाधव

राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांचे वंशज

इतिहास सल्लागार राजा शिवछत्रपती मालिका स्टार प्रवाह वाहिनी

खरा संभाजी :

प्रा. नामदेवराव जाधव
आंबेवाडी नं. १, हिन्दुस्तान कंपनी समोर,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३.
मो. ९८६९९६४९७३७

ISBN : 978-81-910980-3-7

प्रकाशक : रणजितसिंह जगताप
(सरदार गोदाजी जगताप यांचे १३ वे वंशज)

पहिले सिमोल्लंघन : २१ ऑक्टोबर २००७ (विजयादशमी)
दहावे सिमोल्लंघन : १९ फेब्रुवारी २०११ (शिवजयंती)

मुद्रक : आंब्रिनाथ ग्राफिक्स
१३ ए, शुक्रवार पेठ,
आनंद बिल्डिंग, पुणे-२

अक्षर जुळवणी :
विनिमय प्रकाशन

शिवनिधी : २०० होन/-

विनंती : शिवशंभूचरित्राच्या प्रचार आणि प्रसारासाठी वाढदिवस, लग्न, बक्षिस वितरण आणि इतर मंगल प्रसंगी हा ग्रंथ एकमेकांना भेट स्वरूपात द्यावा.

सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात, मावळ मुलुखात स्वराज्याचा निर्मितीचा संकल्प पुर्ण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठीशी हिमालयाप्रमाणे उभ्या राहिलेल्या व समस्त स्त्री वर्गास प्रशासनामध्ये मानाचे स्थान मिळवून देणाऱ्या प्रचंड सामाजिक सुधारणा घडवुन आणणाऱ्या, जाचक रुढी परंपरांना छेद देणाऱ्या व सर्व सामान्य रयतेला स्वातंत्र्याचा महामंत्र देणाऱ्या स्वराज्याची निर्मीती करुन महाराष्ट्राचा इतिहास जागतिक पटलावर नोंद करणाऱ्या थोर मुत्सदी राजकारण, धुरंदर, देशाभिमानी राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्या पवित्र विचारांना समर्पित...

संकल्प

दहा हजार व्याख्यानाच्या माध्यमातून

छत्रपती संभाजी राजे चरित्र

घरा घरा पर्यंत पोहोचविण्याचा

मो. ९८६९६४९७३७

[illegible]


खरा संभाजी या छत्रपती संभाजी राजांच्या जीवनाचे वास्तव चित्र वाचकांसमोर आणणाऱ्या पुस्तकाने एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. साडे तीन वर्षात दहावी आवृत्ती निघणे हीच याची पोच पावती आहे. एखादी कामगार संघटना जशी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी सचोटीने प्रयत्न करते तसाच प्रयत्न खरा संभाजी या पुस्तकाने छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राला न्याय मिळवून देण्यासाठी केलेला आहे. काही विकृत इतिहासकारांनी कलुषीत भावनेने संभाजी राजांची जी बदनामी केली होती त्याचा समाचार घेणारे व त्याच वेळी शंभू राजांचे वास्तव चरित्र दर्शन घडविणारे हे पुस्तक असत्यामुळे वाचकांनी खरा संभाजीला कोणतीही जाहिरात वा प्रसिद्धी माध्यम यांचा पाठींबा नसतानाही प्रचंड प्रतिसाद दिलेला आहे.

काळाच्या ओघात संभाजी महाराजांवर नकली इतिहासकारांनी खूप मोठा अन्याय केला होता. परंतु आता समाजामध्ये चांगली जागृती येत असून प्रबोधनामुळे समाज शहाणा होत असल्यामुळे वस्तुस्थितीच्या मुळापर्यंत जाऊन व्राचक वास्तविकता तपासतात. त्यामुळेच शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजही लोकांच्या श्रद्धा स्थानी आलेले आहेत.

शिवाजी महाराज सिंह होते तर संभाजी महाराज छावा होते. शिवाजी महाराज ५२ कसी सोने तर संभाजी महाराज ५२ कसी सोन्यातून घडलेला अलंकार होय. शिवाजी महाराज स्वराज्याचा पाया तर संभाजी महाराज कळस आहे. छत्रपतींनी स्वराज्य निर्माण केले तर ते राखण्याचे काम संभाजी राजांनी केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी कसे जगावे हे जगाला शिकविले तर संभाजी राजांनी वेळ आली तर स्वराज्यासाठी कसे मरावे हे जगाला आपल्या बलीदानातून दाखवून दिले.

जाणता राजा आपल्या जगण्याने अमर झाला तर शंभू राजा आपल्या बाणेदार मृत्यूने अमर झाला. औरंगजेबाने हताशपणे उद्‌गार काढले, "मारणारा मरून गेला, परंतु मरणारा मात्र त्याच्या निर्भीड मरणाने अमर झाला." ज्याने आपल्या हयातीत स्वराज्याचा एकही किल्ला पडू दिला नाही, आरमारातील एकही जहाज बुडू दिले

नाही, ज्याचा साधा शिपाईही बंड खोरीला उतरला नाही आणि स्वराज्याचा एक हाती कारभार करताना पाच शत्रूशी झुंज देताना ज्याने आतील आणि बाहेरील शत्रूंना पुरून उरताना अनेक लोककल्याणकारी कामे केली आणि मरतानाही औरंगजेबाला या मातीत गाडण्याची प्रेरणा मावळ्यांना सर्वसामान्य रयतेला दिली. त्या शंभू राजांचे खाजगी आणि सार्वजनिक आयुष्यही चारित्र्य संपन्न आणि विद्वत्तापूर्ण असेच होते. म्हणूनच शंभू राजे आणि त्यांचे चरित्र आजही लोकांच्या मनात घर करून आहे. शंभू राजांचे चरित्र प्रेरणादायी नसते तर महाराष्ट्रातील प्रत्येक गावात, गल्लीत, चाळीत आणि प्रत्येक पिढीत लोकांना आपल्या मुलांची नावे संभाजी, शंभू राजे ठेवलेच नसते. पराक्रमी पुरूषाच्या कतृत्वाची त्याच्या चारित्र्याची हीच ती पोहोच पावती या पुस्तकातून आपल्याला पानापानांवर नक्कीच मिळेल.



अनुक्रमणिका

प्रस्तावना

खरा संभाजी हे पुस्तक लिहिण्याचे कार्य गेली अडीच वर्षे टप्या टप्याने अखंडपणे चालू होते. त्यासाठी लागणारी आवश्यक माहिती आणि योग्य संदर्भ मिळाल्यानंतर चिकित्सक बुद्धीने अभ्यास करुन या अगोदर प्रकाशित झालेल्या अनेक मान्यवरांच्या पुस्तकांवर नजर टाकल्यानंतर आपणास खरा संभाजी कळून येतो. गरज असते ती फक्त निकोप दृष्टीकोणाची. याचा अर्थ असा की आता पर्यंत बखरकारांनी जो संभाजी लोकांपर्यंत आणला होता तो पूर्व ग्रहदुषित भावनेने होता.

छत्रपती संभाजी राजांना तीन तीन वेळा कट कारस्थान करुन मारु पाहणाऱ्या व विनासायास अर्धे राज्य मोघलांच्या झोळीत टाकण्याचा प्रयत्न हाणून पाडत राजद्रोहाची शिक्षा म्हणून अष्टप्रधान मंडळातील काही लोकांना देह दंडाची शिक्षा दिली. त्यातील बाळाजी आवजी यांचे वंशज मल्हार रामराव चिटणीस याने सुड बुद्धीने संभाजी राजांच्या मृत्युनंतर जवळपास एकशे बावीस वर्षानंतर लिहिलेली बखर हीच संभाजी महाराजांच्या चारित्र्याची बदनामी करणारी जनीत्री असली तरी संभाजी महाराजांचे विकृत चरित्र रेखाटण्यात कृष्णाजी अनंत सभासदाची बखर ही सुध्दा तेवढीच कारणीभूत आहे.

सभासदाने लिहिलेली बखर सुध्दा संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर जवळपास सात ते आठ वर्षानंतर लिहीली गेली त्यावेळी राजाराम महाराज छत्रपति होते. मोघलांच्या तडाख्यातून सही सलामत रहावे म्हणून मराठ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीकोणातून राजारामांना जिंजी येथे हलविले होते. तेथेच राजाराम महाराजांना खूष करण्यासाठी सभासदाने संभाजींचे विकृत चरित्र लिहून कपोल कल्पीत प्रसंग लिहून संभाजी राजांची जमेल तशी निंदा नालस्ती केली व राजाराम महाराजांकडून जास्तीत जास्त कमाई करुन घेतली.

संभाजी राजांची बदनामी, ज्यांच्या आश्रयाला आहोत त्यांची स्तुती व आपली कमाई या तिहेरी हेतूनेच सभासदाने तशी बखर लिहिली हे आता सिध्द होत आहे. मिळतील त्या पुराव्यानिशी अनेक इतिहास संशोधकांनी चिकित्सक बुद्धीने शोध घेत

संभाजीचा अभ्यास केल्यावर एक वेगळाच संभाजी लोकांसमोर आला आणि तोच संभाजी खरा असल्याचे आता निष्पन्न होत आहे. संभाजी महाराज मोघलांना जाऊन मिळाले, शिवाजी महाराजांवर नाराज होऊन दिलेर खानाकडे गेले, सोयराबाईंना भिंतीत चिनुन मारले, संभाजी तापट होता, बदफैली होता असे जे चित्र निर्माण केले गेले.

त्या सर्व गोष्टींचा समाचार घेताना माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. आणि त्यांची उत्तरे शोधता शोधता खरा संभाजी बाहेर आला. संभाजी महाराज जर स्वराजाच्या विरोधात मोघलांना जाऊन मिळाले तर ते अकरा महिने दिलेर खानाच्या छावणीत राहिल्यानंतर मोघलांनी किती वेळा स्वराज्यावर आक्रमण केले तर एकही नाही. अपवाद फक्त भुपाळ गड तोही मराठ्यांनी पंधरा दिवसात परत घेतला.

शिवाय संभाजी महाराजांना दिलेर खानाच्या तावडीतून पसार होण्यासाठी शिवाजी महाराजांनी केलेली मदत, स्वत: सेनापतीची अथणी परिसरात उपस्थिती, विजापूरकरांची पाच हजारांची फौज, संभाजी महाराजांना मदत करण्याची तत्पर हे सर्व शिवाजी महाराजांच्या आदेशाने घडले नसते तर मोघलांनी संभाजी राजांना संपवलेच असते. दिलेर खानाच्या तावडीतून पसार झाल्यावर मुनासिब चाचा नावाच्या सरदाराबरोबर संभाजी महाराज सर्वप्रथम विजापूर व तेथून पन्हाळ्यावर आले.

शिवाजी महाराजांनी लगेचच त्यांची भेट घेऊन संपूर्ण माहिती घेतली ही एक गोष्ट तर स्वराज्याचा ताळेबंद संभाजी राजांसमोर मांडून राज्यातील गडकोट खजिना शस्त्र, सैन्य सज्जता इत्यादी बाबत संभाजी राजांसोबत सलग चार पाच दिवस केलेली चर्चा व औरंगजेबाच्या भावी आक्रमणाला तोंड देण्याची रणनिती बाबत केलेली चर्चा काय सांगते ? शिवाजी महाराजांच्या योजनेनुसारच ते दिलेर खानाला जाऊन मिळाले.

महाराज कर्नाटक मोहीम आटोपून यायला जवळपास सव्वा दोन वर्षे लागली. तोपर्यंत मोघलांना थोपवून धरण्यासाठी, स्वराज्य बुडविण्यासाठी नव्हे. संभाजी महाराजांना छत्रपती होण्यास अष्टप्रधान मंडळातील लोकांचा विरोध हा त्यांच्या भ्रष्ट कारभारात होता. संभाजी महाराजांनी त्यांच्या अनेक चोऱ्या वेळोवेळी पकडल्या. त्यामुळेच आपले दुकान बंद होणार या भितीने संभाजी राजांची बदनामी केली गेली. संभाजी महाराजांचे ज्या ज्या महिलांसोबत नाव जोडले गेले जी खोटी राळ उठविली गेली याचाही या पुस्तकातून समाचार घेतला असुन या पुस्तकाच्या माध्यमातून संभाजी राजांच्या जीवनात अगदी जवळून काम करणाऱ्या व स्वराज्यासाठी प्राणांचे बलिदान करणाऱ्या अनेक योद्ध्यांचाही परिचय करुन देत आहोत.

निती, रिती, युध्दकला, पराक्रम, मुत्सदेगिरी, दबावतंत्र, या सर्व बाबतीत संभाजी महाराज शिवाजी महाराजांपेक्षाही उजवे ठरतात, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. त्यावर प्रकाश टाकणारे शिवाजी ते संभाजी नावाचे एक वेगळे पुस्तक लिहीत आहे. संभाजी महाराजांबद्दल लिखाण करताना अनेक लेखकांचा त्यांच्या चिकित्सक बुद्धीचा खूपच उपयोग झाला. आत्तापर्यंत लिहिल्या गेलेल्या अनेक पुस्तकांपैकी विश्वास पाटील यांचे संभाजी महाराजांवरील लिखाण हे खूपच खोलवरुन व लोकांच्या विचारांची उंची वाढविणारे वाटले. त्यांच्या संभाजींचा खरा संभाजी लिहिताना इतिहासातील पत्रांचा संदर्भ घेताना खूपच उपयोग झाला. त्याचप्रमाणे ॲड अनंत दारवटकर यांच्याही लेखनामुळे खूपच सहकार्य घेता आले. पुणे महानगरपालिका उपायुक्त ज्ञानेश्वर मोळक यांनी संभाजी महाराजांची अत्यंत दुर्मिळ अशी पत्रे उपलब्ध करून दिली. अनेक वर्षे प्रयत्न करून देखील असे ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध होणे अवघडच असते. त्यामुळे ज्ञानेश्वर मोलक यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. इतर लेखकांची पुस्तके चाळताना जेवढे वेगळे वाटले, विशेष वाटले ते ते चिकित्सक बुद्धीने विचार करुन नवा दृष्टीकोण टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्यातील प्रत्येक प्रसंगाचे गोष्टींचे तटस्थ अवलोकन करुन लिहिण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मी काही खूप मोठा इतिहास संशोधक नाही. त्यामुळे अगोदरच प्रकाशित झालेल्या पुस्तकातून घुसळून घुसळून हे नवनीत बाहेर काढीत आहोत. मी फक्त माझा चिकित्सकपणा व तर्कशास्त्राचा विचार करीत करीत एका एका प्रसंगावर अनेक दिवस अनेक अंगाने सांगोपांग विचार करुन ते लिहीले. विचार करीत असताना अनेक नव-नवीन गोष्टी समोर येऊ लागल्या. त्यासाठी इतर वेगवेगळी जवळपास आठ पुस्तके एका संभाजी या विषयावरच लिहिता येतील एवढे प्रचंड मोठे वैचारींक वादळ आता मनामध्ये चालू असून विचारांची चक्रे त्या दिशेने सतत फिरत आहेत. इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे, डॉ. कमल गोखले, डॉ. जयसिंगराव पवार, दत्तो वामन पोतदार तसेच शिवाजी सावंत, आनंद घोरपडे, या सर्वांनी आणि इतरही काही मान्यरांनी संभाजीच्या खऱ्या चरित्रावर अभ्यास करुन जे लिखाण केले ते ही खूपच कामी आले.

या व इतर सर्वांच्या लिखाणाचा अंतिम विचार करता संभाजी महाराजांचे चारित्र्य व तत्कालीन विरोध करणाऱ्या लोकांची मानसिकता त्यांचे आर्थिक धार्मिक हितसंबंध व समाजावर वर्चस्व ठेवण्याची मानसिकता तसेच एखाद्याने स्वकर्तुत्वावर पराक्रम गाजविला तरी तो आपल्याचमुळे शक्य झाला अशी ऊर बडवी वृत्तीच या

बदनामीला कारण असल्याचे दिसून आले.

संभाजी महाराजांना बदनाम करण्यामागे संभाजी महाराजांनी चालविलेली सामाजिक सुधारणा जातीभेद निर्मुलन, गोर गरीबांची बाजू घेणे, दुसऱ्या धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदु धर्मात घेणे, उत्तरेतून आलेल्या कवी कलशांना अष्ट प्रधान मंडळात सामिल करणे, येसुबाईंना कुलमुखतियार (प्रशासन प्रमुख) करणे, रायप्पा महाराचा भर दरबारात सन्मान करणे, शेतकऱ्यांना दुष्काळात शेतसारा माफ करणे व शिवाजी महाराजांची सर्व कल्याणकारी धोरण कडक स्वरुपात राबवित. त्यामुळेच जी सामाजिक परिवर्तनाची चळवळ सुरु झाली त्यामुळे काही लोकांच्या वर्चस्वाला तर काही लोकांच्या हितसंबंधाला तर काहींच्या सामाजिक खोट्या प्रतिष्ठेला तडाखा बसला आणि त्यामुळेच पेटून उठलेल्या मुठभर लोकांनी संभाजी महाराजांची बदनामी केली असे प्रामाणिकपणे नमूद करावयास वाटते.

शिवाजी महाराजांच्या नावाला काळीमा लागेल असे एकही कृत्य संभाजी राजांच्या हातून घडले तर नाहीच परंतु संभाजी राजांनी खुद्द आलमगीर औरंगजेबाबरोबर खेळलेली जंग अभूतपुर्व अशीच असून त्यातून त्यांचे खरे क्षात्रतेज तळपून निघाले. महाराष्ट्रातील काही वतनदारांनी व सामाजिक परिवर्तनाला विरोध असणाऱ्यांनी संभाजी महाराजांना जिवंतपणे मोघलांच्या तावडीत पकडून देऊन आपला हेतू साध्य करण्याचा प्रयोग केला. परंतु तो यशस्वी झाला नाही.

उलट संभाजी राजांच्या बलिदानाने पेटून उठलेला महाराष्ट्र सलग सत्तावीस वर्ष औरंगजेबाच्या विरुध्द लढला व खुद्द औरंगजेबालाच या मातीत गाडून बदला घेऊनच येथील लोक थांबले. त्यामुळे मोघलांनी महाराष्ट्राचा कारभार करावा अशी मानसिकता असणाऱ्या व आपले उखळ पांढरे करु पाहणाऱ्या मुठभर परंतु बुध्दीमान वतनदारांनीच संभाजी बदनाम केला. संभाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय होता यात शंकाच नाही. परंतु त्याच वेळी त्यांच्या चारित्र्यात कोठेही खोट नाही हे ही तेवढेच सत्य आहे. आणि तसेही जो पाच पाच शत्रुशी अहोरात्र झुंजतो त्याला छाबुगिरी करायला वेळ कोठून मिळणार ? आणि संभाजी जर तसे असते तरी मराठ्यांनी त्यांचे नेतृत्व स्विकार कसे केले असते ?

शिवाय ते छत्रपती झाल्यावर कधीही स्वराज्यात बंडखोरी कोणत्याही कारणाने सैन्याने किंवा एखाद्या सरदाराने केलेली नाही आणि संभाजी राजे जिवंत असेपर्यंत तिनशे साठ किल्ल्यांपैकी एकही किल्ला पडला नाही. किंवा आरमारातील एकही जहाज बुडले नाही हे एका बाजूला तर संभाजी महाराजांच्या नेतृत्वात मराठी फौजा मध्यप्रदेश,

कर्नाटक, तामिळनाडू, बंगाल प्रांतापर्यंत मजल मारत होत्या. संभाजी महाराजांनी दोन वेळा केलेली दक्षिण दिग्वीजयी मोहिम तसेच पोर्तुगीजांचे पूर्ण पारिपत्य व सिध्दीची ठेचलेली नांगी व इंग्रजांना दाखवलेला हिसका तसेच मोघलांना सतत आठ वर्षे सळो की पळो करुन सोडणारा बदफैली किंवा वाईट चारित्र्याचा कसा असू शकतो. या सर्वांचा अभ्यास केल्यावर जो संभाजी आपल्या समोर येतो तो खरा संभाजी.

सह्याद्रीच्या कड्या कपारीत आणि उभ्या महाराष्ट्रभर रात्रीचा दिवस करुन ज्याने संपूर्ण महाराष्ट्र मोघलांच्या तावडीतून शाबूत ठेवला अशा पराक्रमी राजाचे विस्मरण होऊ शकेल एवढा महाराष्ट्र कृतघ्न कधीच होऊ शकणार नाही. छत्रपती शिवाजी राजांच्या प्रत्येक धोरणाची काटेकोरपणे अमंलबजावणी करणारा हा राजपुत्र व्यसनी व बाईल वेडा असूच शकत नाही. याचे अनेक पुरावे उघड झाले आहेत. शिवाजी महाराजांच्या काळची परिस्थिती व संभाजी राजांच्या काळची परिस्थिती यात खूपच फरक होता. शिवाजी राजांच्या काळी महाराष्ट्रावर एखादा अफजल खान किंवा शाहीस्तेखान पन्नास साठ हजारांची फौज घेऊन महाराष्ट्रावर चालून यायचा परंतु संभाजी राजाच्या काळात औरंगजेब बादशहा स्वतः पाच लाख फौजेचा सेना सागर घेऊन महाराष्ट्रावर तुटून पडला असताना साठ सत्तर हजार फौजेनिशी तुटपुंज्या रसदीच्या बळावर व प्रतिकूल परिस्थिती असताना या वादळाचा सामना करणे हे अग्नीदिव्यच होते. शिवाय महाराष्ट्रात वतनदाराच्या फंदफीतरीला उधाण आलेले.

अशा परिस्थितीत साथ देणारे विश्वासू होते ते फक्त सह्याद्रीचे निधड्या छातीचे राखट, दणकट किल्ले आणि खिंडी. जुलै १६८० ते मार्च १६८९ या आठ वर्षात उभ्या महाराष्ट्राने या कर्तुत्ववान युवराजाचे कुशल नेतृत्त्व पाहिले आणि डोळ्याचे पारणे फिटले. हिंदवी स्वराज्य संभाजी राजांच्या हाती सुरक्षित राहू शकते हा शिवाजी राजांचा विश्वास खरा ठरला. नाहीतर एकाच वेळी मोगल, इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी, आदिलशहा या पाच शत्रूंच्या जबड्यातून स्वराज्य सुरक्षित ठेवणे हे किती कठीण काम होते.


परंतू संभाजी राजांच्या आठ वर्षाच्या कालावधीत स्वराज्याचा एकही किल्ला शत्रुच्या ताब्यात गेला नाही किंवा आरमारातील एकही जहाज बुडले नाही. यावरुन संभाजी राजे राज्य करताना किती दक्ष होते व सतर्क होते याची साक्ष पटते. शिवाजी महाराजांनी केलेली दक्षिण स्वारी सगळ्यांनाच माहित आहे परंतु संभाजी राजांनी दोनदा दक्षिणेवर स्वारी करुन तामिळनाडू, केरळ कर्नाटक, हे प्रदेश जिंकले हे ही आता आपण लक्षात ठेवावे.

कावेरीच्या दुथडी भरुन वाहणाऱ्या पात्रात घोडी घालून पाषाण कोट जिंकणारा म्हैसूर वर मराठी झेंडा फडकविणारा, त्रिचणापल्ली आपल्या घोड्याच्या टापाखाली आणणारा युवराज काही लोकांना कावीळ झाल्यामुळे दिसतच नसावा. ज्या शिवाजी राजांचे अन्न खाल्ले त्याच शिवाजी राजांच्या राज्याभिषेकाला विरोध करणाऱ्या महाराष्ट्रातील नतद्रष्टांनीच अष्टप्रधानांनीच शंभु राजांना तीन वेळा जिवंत मारण्याचा कट करावा आणि संभाजी राजांनी त्यांची पुर्वपुण्याई लक्षात घेऊन त्यांना माफ करावे, त्यांना पुन्हा मानाचे पद दिले ही उदारता या बांडगुळ वृत्तीच्या लोकांना दिसत नाही.

शेवटी हे प्रकार थांबले नाही म्हणून काही कारभाऱ्यांना हत्तीच्या पायीच द्यावे लागले. त्यांच्या नातेवाईकांनीच पुढे सुडाची भावना मनात ठेवून संभाजी राजांच्या मृत्यूनंतर खोटा इतिहास लिहून महाराष्ट्राचा हा सुवर्णजडीत इतिहास आपल्या दुषीत लेखणींनी कलंकित करुन पराक्रमी संभाजी राजांच्या चरित्रावर शिंतोडे उडविले व कायमचे बदनाम करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु आता शिक्षण ही विशिष्ट लोकांची मक्तेदारी राहिलेली नसल्याने अनेक लोक अभ्यासपूर्वक संशोधन करुन खरा संभाजी जनतेसमोर आणून पोटभरु इतिहासकारांचे पितळ उघडे पडल्याशिवाय राहणार नाही अशी खात्री वाटते.

संभाजी राजांवर अफाट प्रेम करणारे करोडो लोक या महाराष्ट्र भुमीत असून अनेक सामाजिक संघटना यावर प्रकाश टाकण्याचा व संभाजी राजांच्या कर्तुत्वाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे अभिनंदन करणे क्रम प्राप्त आहे. आपणही सर्व सुज्ञ वाचकांनी आता आपल्या प्रत्येकाच्या घरी संभाजी महाराजांची तस्वीर लावून आणि संभाजी राजांच्या चरित्र्यावरील पुस्तकांना आपल्या घरात स्थान देऊन या विचारांना पुढे नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा "एवढीच अपेक्षा ....!"

संभाजीराजांचे दानपत्र



संभाजीराजांचे संस्कृत दानपत्र

आपल्या प्रभावी वक्तव्याने शत्रूची देखील मते बदलवू शकतो तोच महाप्रबळ होय. विद्या ही तलवारीसारखी आहे. तिचे महत्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून असते. शत्रूशी सामना करणे सोपे असते पण स्वजनांशी युद्ध करणे अतिशय कठीण असते. शासनकर्ती जमात बनणे हेच आमचे उदिष्ट आणि उच्च आकांक्षा असली पाहीजे. जो मनुष्य मरावयास तयार होतो तो कधीच मरत नाही.

- जिजाऊ साहेब



संभाजी राजे जीवन परिचय

- जन्म :- १४ मे १६५७
- किल्ले :- पुरंदर
- आई : मातोश्री सईबाई निंबाळकर
- सईबाई निंबाळकर आणि शिवाजी राजे यांचा विवाह : १६ मे १६४०
- ५ सप्टेंबर १६५९ रोजी मातोश्री सईबाई यांचे निधन
- ३० मार्च १६६५ मिर्जा राजे जयसिंह यांचा पुरंदरला वेढा
- ११ जून १६६५ पुरंदरचा तह; संभाजी राजांना पंच हजारी मनसबदारा;राजकारणात प्रवेश
- १८ जून १६६५ पुरंदरच्या तहानुसार उग्रसेन कछवाह यांचेबरोबर जयसिंहच्या छावणीत दाखल
- सप्टेंबर १६६५ पर्यंत मिर्जा राजे यांच्या छावणीत
- ५ मार्च १६६५ शिवाजी महाराजांबरोबर आग्रा येथे प्रयाण (संभाजी राजे वय ९ वर्षे)
- ११ मे १६६६ आग्रा येथे पोहोचले
- १७ ऑगस्ट १६६६ शिवाजी राजांसोबत आग्रा येथून ऐतिहासिक सुटका
- १२ सप्टेंबर १६६६ शिवाजी महाराज राजगडावर परतले
- २० नोव्हेंबर १६६६ संभाजी राजे राजगडावर सुखरुप पोहचले
- शिवाजी महाराजांचा मोघलांशी शांतता करार त्यानुसार संभाजीराजांना पुन्हा ४,००० मनसब
- ९ ऑक्टोबर १६६७ रोजी औरंगाबादला प्रयाण २७ ऑक्टोबरला पोहोचले
- ४ नोव्हेंबर १६६७ शहजादा आलमची भेट
- ५ नोव्हेंबर १६६७ राजगडाकडे परतीचा प्रवास
- १६७० शिक्षणास प्रारंभ
- २६ जाने. १६७१ राजकारभारांचे धडे स्वतंत्र लेखणीक (सेक्रेटरी) महाराजांनी उपलब्ध करुन दिला

- १६७२ संभाजी राजे यांना १० हजार फौजेचे नेतृत्व बहाल
- १६७५ शिवाजी महाराजांचा फोंडा किल्ल्याला वेढा युवराजही सामील
- १६७५ महाराजांची आदिलशहा मुलखावर स्वारी; संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली गोवळकोंडा व भागा नगरी (हैदराबाद) पर्यंत मराठी लष्कराची मुसंडी हुबळी, रायबाग आणि इतर अनेक बाजारपेठांवर मराठी लष्कराचे छापे.
- १६७४ ते १६७७ युवराजांना दिवाणी कामाचे शिक्षण
- राजमाता जिजाऊंच्या वृद्धपकाळात मुलकी कारभार संभाजी राजांकडे
- २६ जानेवारी १६७१ ते १६७४ युवराजांनी मुलकी कारभार सांभाळला
- १६७७ बुद्ध भुषण ग्रंथ लिहीला
- शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम संभाजी राजे शृंगारपुरात मुक्कामी. धर्नुविद्या अभ्यास व प्रसिध्द ग्रंथ बुद्ध भुषण या संस्कृत ग्रंथाची रचना
- १ नोव्हेंबर १६७६ इतर तीन ग्रथांचे लिखाण १) नाईकाभेद, २) नखशिख, ३) सात सतक (सर्व ग्रंथ हिन्दी भाषेत)
- गागाभट्टांनी समनयन हा ग्रंथ लिहून संभाजीराजांना अर्पण केला. संभाजी राजांचा उल्लेख त्यांनी ज्याच्या तळपणाऱ्या पराक्रमाने दिशा उजळून गेल्या आहेत असा संभाजी राजे यांचा उल्लेख
- मे १६७८ शिवाजी राजे कर्नाटक मोहिमेवरुन परत
- १६७८ दिलेर खानाच्या छावणीत सामिल ११ महिने या कालावधीत मोघलांनी स्वराज्यांवर कोठेही आक्रमण केले नाही अपवाद फक्त भुपाळगड तोही मराठ्यांनी १५ दिवसात परत घेतला.
- २१ डिसेंबर १६७९ दिलेरखानाच्या तावडीतून पसार विजापूरला आश्रय तेथून पन्हाळगडावर
- १३ जानेवारी १६८० दिलेर खानाच्या छावणीतून पन्हाळ्यावर सुखरुप शिवाजी राजे यांची भेट
- ३ एप्रिल १६८० शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन (महाराजांचे वय ५० वर्षे)
- १८ जुन १६८० संभाजी राजे पन्हाळ्यावर राज्य कारभाराची पुर्नबांधणी
- २७ जुन १९८० मातोश्री पुतळाबाईंचे संशयास्पद निधन
- २० जुलै १६८० संभाजी राजे यांचे मंचकारोहण
- ८ सप्टेंबर १६८१ औरंगजेबाचे अजमेरवरुन ५ लाख फौजेसह दक्षिणेकडे कुच

■ १३ नोव्हेंबर १६८१ औरंगजेब बुऱ्हानपुरला पोहोचला तेथे त्यांनी कांजीवरम से काबूल तक ये बंदा यह कुफ्र मुल्क इस्लाम कर देगा अशी शपथ घेतली

■ ३० ऑक्टोबर १६८४ राहुजी सोमनाथ, गंगाधर पंत, मनाजी मोरे, यांना संभाजी राजे यांचे विश्वासू सहकारी कवी कलश यांच्या खूनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी अटक

■ १६८१ संभाजी राजे यांना अनेकवेळा ठार मारण्याचा कट करणाऱ्या अण्णाजी दत्तो आणि कटात सहभागी असणाऱ्यांना देहान्ताची शिक्षा

■ नोव्हेंबर १६८८ रायगडावर कर्मठ ब्राह्मणमंत्र्यांनी मोघल सरदारांच्या तावडीत संभाजी राजांना अडकविण्याचे कट कारस्थान केले.


■ संभाजी राजे यांना पन्हाळ्यावर खबर. फितुरांना शासन प्रल्हाद पंत व इतर सर कारकूनांना महाराणी येसुबाई यांनी कैद केले.

■ १ फेब्रुवारी १६८९ फितुर अष्ट प्रधानांनी आखलेल्या कट कारस्थांना यश

■ संभाजी राजांना मोघलांनी संगमेश्वर येथे कैद केले - २ फेब्रुवारी १६८९

■ ११ मार्च १६८९ संभाजी राजांचे तुळापूर येथे बलिदान

- - - - - - - - - - -



युवराज संभाजी

संभाजी राजांबद्दल फ्रेंच प्रवासी ॲबेकॅरे याने १६७२ मध्ये केलेले वर्णन; संभाजी राजे विलक्षण रुपवान, मजबुत बांधा व सैनिकांच्या आकर्षणाचा केंद्र बिंदु असे केले आहे. ५ सप्टेंबर १६५९ मातोश्री सईबाईंचा मृत्यु झाला. इतिहासकारांच्या मते बाळंतपणापासूनच त्या आजारी पडल्या व त्यातच त्यांचा मृत्यु झाला. पुढे संभाजी राजांना दुध पाजण्यासाठी कापुरहोळच्या गाढे पाटलांच्या सौभाग्यवतींनी दुध पाजण्याची जबाबदारी निभावली.

शिक्षणासाठी शिवाजी महाराजांनी केशव पंडीत व उमाजी पंडीत यांची नेमणुक केली. वेदमुर्ती केशव भट यांनी राजाराम चरितम असा संसकृत ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी संभाजी राजांना सखल शास्त्र विचारशील आणि धर्मज्ञ शास्त्र कोविद व ज्वलंत तेजस संभाजी असे वर्णन केलेले आहे. १६७७ रोजी वय वर्षे २० संभाजी राजांनी संस्कृत भाषेतील बुधभूषण नावाचा राजनीतीपर ग्रंथ लिहिला. वयाच्या ८ व्या वर्षी पुरंदरच्या तहा प्रसंगी मिर्जा राजे जयसिंगांने संभाजी राजांना ५ हजाराची मनसब दिली.

५ मार्च १६६६ रोजी संभाजी महाराजांनी शिवाजी राजांबरोबर आग्र्याला प्रयाण केले आणि ११ मे ला पोहोचले. २ महिने आणि ८ दिवासचा हा खडतर प्रवास त्यांनी बालवयातच केला.

१७ ऑगस्ट १६६६ रोजी शिवाजी राजे युवराज संभाजीसह आग्र्यातून पसार झाले. शिवाजी राजे थेट स्वराज्याच्या दिशेने आले तर संभाजी राजे आग्र्याहून मथुरा आणि मग तेथून २० नोव्हेंबर रोजी रायगडावर पोहोचले. असा धामधुमीचा प्रसंग संभाजी राजांनी अत्यंत अल्पवयात घेतला.

रायगडावर आल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाचा थोरला मुलगा शहा आलम यांच्याशी पुन्हा वाटाघाटी केल्या आणि संभाजी राजांना पुन्हा ४ हजाराची मनसब आणि वऱ्हाड खानदेश या प्रदेशांचा मोकासा मिळाला.

१६७४ शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि १६७५ रोजी पुन्हा

औरंगजेबाशी तह व या तहानुसार संभाजी राजांना तिसऱ्यांद। ६ हजारांची फौज आणि ८० लाखांची मनसब मिळाली.

२६ जानेवारी १६७१ पासून संभाजी महाराजांना स्वतंत्र लेखणीक उपलब्ध करुन देण्यात आला होता तेव्हा त्यांचे वय फक्त वर्षे १४ होते.

१९ सप्टेंबर १६७१ पुर्वीच संभाजी राजांना स्वतंत्र सचिव मिळाला होता. महादजी यमाजी हा संभाजी राजांचा पहिला खाजगी सचिव संभाजी राजांच्या वतीने तो दरबाराचे कामकाज पहायचा. संभाजी राजांनी आपल्या खाजगी सचिवाला दिलेला पगार वार्षिक शंभर होन लिखाणासाठी कागद, शाई व खाजगी सचिवाला मदत करण्यासाठी मदतनिस असे पॅकिजच सचिवासाठी देणारा युवराज संभाजी मॅनेजमेंटचा जनक का ठरु शकणार नाही.

१६७२ पासून संभाजी राजे स्वतंत्रपणे युध्दाच्या आघाडीवर जाऊ लागले १६७२ संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली १० हजारांची स्वतंत्र फौज असल्याचे नोंद ॲबेकारे यानी केली आहे. खंबायत व गुजरात प्रांतावर संभाजी स्वारी करण्याची जबाबदारी शिवाजी महाराजांनी संभाजी महाराजांना दिली.

संभाजी राजे गुजरातवर चालु येणार ही बातमी कळताच त्या ठिकाणचे सरदार व सैनिक पळून गेले अशी नोंद ॲबेकॅरे यांनी केली आहे. यावरुन युवराज संभाजीचा दरारा स्पष्ट होतो. १६७५ रोजी शिवाजी राजांनी फोंडा किल्ला घेतला. या लढाईत संभाजी राजे सुध्दा सामिल होते.

१६७५ शिवाजी महाराजांनी आदिलशाही मुलखावर स्वारी केली होती. संभाजी राजे ही त्यांच्या सोबत होते. याचे वर्णन जॉन फ्रायर याने १६७८ च्या पत्रात केले आहे.

संभाजी राजांच्या नेतृत्त्वाखाली तुकडी गोवळकोंड्याच्या थेट भागा नगरीपर्यंत (गोवळकोंड्याची राजधानी) पोहोचल्या होत्या आणि परतीच्या वाटेवर असताना त्यांनी प्रसिध्द अशा हुबळी रायबाग या बाजारपेठा लुटल्या. त्या वेळच्या इंग्रजी पत्रामध्ये संभाजी राजांचा उल्लेख युध्द सन्मुख राजकुमार म्हणजे युध्दासाठी सदैव तयार असणारा राजकुमार असे वर्णन केले आहे.

१६७४ ते १६७७ संभाजी राजांनी मुल्की आणि दिवानी कारभार पाहिला. मावळ येथील कुलकर्णी जानकी कोंब रंगभट, बिन बाळंभट, हिची मिरासी व शंकरजी भोवर याला करुन दिलेल्या मुलकीचा कागद हे इतिहासाला सापडलेले दोन पुरावे आहेत.

२६ जानेवारी १६७१ ते १६७४ संभाजी राजांनी स्वतंत्रपणे मुलकी कारभार सांभाळला१६७६ रोजी "बुधभूषण" हा राजकारणावरील ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला आणि नाईकाभेद, नखशिख हे शृंगार प्रधान आणि सात शतक (असे तीन ब्रज

भाषेतील हिंदीतील) हा अध्यात्मावरील ग्रंथ वयाच्या ३० व्या वर्षी पूर्ण केला.

औरंगजेबाचा चरित्रकार, ईश्वरदास नागर याने संभाजी स्वाभिमानी होता असे वर्णन केले आहे. गागाभट्टांनी लिहिलेला समनयन हा ग्रंथ संभाजी राजांना अर्पण केला होता.

- - - - - - - - - - -

औरंगजेब आणि संभाजी

छत्रपती संभाजी राजाने औरंगजेबाशी दिलेला लढा किती अवघड होता हे कळण्यासाठी दोघांच्या शक्ती सामर्थ्य यांचा तुलनात्मक अभ्यास झाल्यावर नक्कीच आपणास कल्पना येईल. संभाजी राजांच्या पराक्रमाविषयी व अखंड सावधानते विषयी ही तुलना केल्यामुळे अजिबात शंका रहाणार नाही. औरंगजेबाचा एकूण फौजफाटा जवळपास ३ लाख घोडेस्वार, २ लाख पायदळ व जवळपास १ लाख भर सेवक वर्ग असा सहा लाखांचा हा तांडा औरंगजेबासोबत दक्षिणेत इतिहासात पहिल्यांदाच दक्षिणेवर चालून आला होता.

औरंगजेबाने महाराष्ट्राकडे कूच केली ते वर्ष होते सप्टेंबर - ऑक्टोबर १६८१. तेव्हा बादशहाचे वय होते जळपास ६३ वर्ष आणि बादशहाची जहागिरी काबुलपासून ते बंगाल, आसामपर्यंत. औरंगजेबासोबत जवळपास ३ हजार हत्ती, ५० हजार ऊंट, प्रवास करीत महाराष्ट्रापर्यंत आले. एवढी मोठी फौज पाहिल्यावर खरे तर मोठ मोठे राजे लढाई करण्याअगोदरच शस्त्र टाकून औरंगजेबाला शरण आले असते आणि जगभर ते तसे शरण येतही होते.

शस्त्र सज्जता पाहिली तर औरंगजेबाकडे अव्वल व अवजड अशा ७० मोठ्या तोफा होत्या. तर पितळाच्या धातुपासून बनलेल्या छोट छोट्या व ऊंटाच्या पाठीवरुन डागता येतील अशा जवळपास ३०० तोफा होत्या. तर या तोफा अचुकपणे चालविण्यासाठी उच्च प्रशिक्षित असे इंग्रज, डच, जर्मन, फ्रेंच गोलंदाजही तैनात केले होते आणि औरंगजेबाची आर्थिक ताकद म्हटली तर कुबेरालाही हेवा वाटेल अशी होती. औरंगजेबाच्या बापजाद्यांनी बळकावलेल्या साम्राज्यामध्ये काबुल, कंदाहार, आग्रा, मथुरा, काशी, बंगाल, ओरिसा, माळवा, गुजरात, बऱ्हानपुर, खानदेश असे अनेक समृध्द प्रांत होते.

या सर्वांची तुलना करता संभाजी राजांकडे औरंगजेबाच्या १ पंचम अंशी लष्करी व आर्थिक ताकद नव्हती. शिवाय अनुभवाचा विचार करता औरंगजेब पूर्वी दक्षिणेचा सुभेदार म्हणुन अनेक वर्षे महाराष्ट्रात होता. पुढे दिल्लीच्या व्यस्त राजकारणात त्याची जवळपास २० वर्षे निघून गेली व त्यामुळे तो दिल्लीकडे अडकून

पडला होता व याचा फायदा घेत शिवाजी महाराजांनी पुणे प्रांतापर्यंत मर्यादित असलेले स्वराज्य वेगाने विस्तारत नेले. संभाजी राजांच्या हातात सत्ता आली तेव्हा स्वराज्याच्या विस्तार वेंर्गुला ते ठाणे जव्हार अशी किनार पट्टी तेथून पुढे नाशिक, बागलाणचा काही भाग इकडे पश्चिमेकडे सातारा आणि कोल्हापूर एवढाच भाग त्यातही पुणे प्रांतातील जुन्नर नेहमी मोघलांच्या ताब्यात तर मुंबई इंग्रजांकडे आणि जंजीरा कायमस्वरुपी सिद्धींच्या ताब्यात एवढा छोटासा विस्तार होता स्वराज्याचा. औरंगजेबाच्या साम्राज्याशी नुसती भौगोलिक तुलना केली तरी स्वराज्य औरंगजेबाच्या मुठीएवढे देखील नव्हते.

औरंगजेबाच्या ताब्यात वर नमुद केलेल्या प्रमाणे जवळपास २२ प्रांत होते व एक एक प्रांत स्वराज्याच्या जवळपास तिप्पट आकारमानाचा होता. शिवाय हे सर्व प्रदेश सुपीक व सधन होते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत एवढ्या मोठ्या सामर्थ्यासमोर टिकाव धरणे नव्हे तर उभे रहाणेही अवघड होते. परंतु संभाजी राजांनी ही सर्व समीकरणे मोडीत काढुन इतिहास घडविला. संभाजी राजांचे त्यावेळी वय अवघे चोवीस वर्षाचे होते. तर त्यांच्या जवळ असलेली एकूण फौज घोडदळ व पायदळ जवळपास ६० हजारांच्या आसपास होती तर मराठी लष्करात तोफखानाच नव्हता.

शिवाजी महाराजांनी जाणिवपूर्वक तोफखाना ही संकल्पना जोपासली नव्हती कारण तोफखाना सोबत असला की सैन्याच्या हालचाली मंदावतात व सैन्याच्या मोहरा बदलण्याच्या प्रक्रियेला खीळ बसते. तोफखाना गनीमी लढाया व छापेमारीसाठी उपयोगी पडत नसायचा. त्यामुळे सहाजिकच मराठ्यांकडे तोफखाना नव्हताच फक्त किल्यावर काही प्रमाणात तोफांची बुरुजा बुरुजावर पेरणी केलेली असायची बाकी चालता फिरताच तोफखाना वापरण्याच्या भानगडीत मराठा लष्कर सहसा पडत नसायचे. नातेवाईक व सरदारांचा अमीर उमरावांचा फौजफाटा म्हणताल तर औरंगजेबाचे २ शहजादे, २२ सरदार, ४० नातु, जवळपास ३ हजार अमीर उमराव औरंगजेबाला साथ द्यायला सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात भटकायला जीव द्यायच्या तयारीने उत्तरेकडील ऐश आराम सोडुन आले होते.

संभाजी महाराजांची परिस्थिती खुपच प्रतिकूल होती. अष्टप्रधान मंडळ व सोयराबाईंनी जवळपास तीन वेळा संभाजी महाराजांना ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अखंड सावधानता बाळगल्यामुळे संभाजी राजे या सर्व संकटातून सही सलामत वाचले होते. शिवाय इतरही अनेक घर भेदे स्वार्थासाठी वतनदारीसाठी स्वराज्याच्या मुळावर उठलेले होते. अनेक मराठा आणि ब्राम्हण सरदार अगोदरच वतनाच्या लाचारीखातर औरंगजेबाला शरण गेले होते. त्यांना शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी जप्त केलेली वतने पुन्हा आपल्या नावावर करुन हवी होती.

शिवाजी महाराजांनी वतनदारी पदध्त बंद करुन जनतेला वतनदाराच्या जुलूमातून मुक्त केले होते. संभाजी महाराजांनी शिवाजी महाराजांची परंपरा कायम ठेवली होती म्हणुनच अनेक जहांगिरदार लोक आपली वतने पुन्हा मिळावीत यासाठी औरंगजेबाला जाऊन मिळाले होते. शस्त्रास्त्रांचा विचार केला तर औरंगजेबाकडे त्यावेळेचे सर्वात अत्याधुनिक शस्त्र कारखाने होते. तर संभाजी महाराजांकडे रायगडाच्या पायथ्याशी असलेला छोटा पारंपारिक शस्त्रे तयार करणारा कारखाना होता.

औरंगजेबाच्या कारखान्याशी तुलना केली तर स्वराज्याचा शस्त्र कारखाना म्हणजे ऊंट के मुंह में जीरे के बराबर होता. शस्त्रास्त्रांची, दारुगोळ्यांची गरज ओळखूनच संभाजी राजांनी पुढे कुडाळ, डिचोली येथे शस्त्र कारखाने दारुगोळा बनविणारी दोन केंद्रे बनवीली. औरंगजेबाकडे फितुरांना देण्यासाठी वतन पैसा जहागिरीपासून सर्वकाही होते. परंतु संभाजी राजांकडे कातळ व पोलादी छाती असलेल्या गडकोटा व्यतिरिक्त काही नव्हते. वतनाच्या लाचारीने माणसे विकली गेली.

परंतु स्वराज्याच्या रक्षणासाठी शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ देऊन बांधलले किल्ले मात्र शेवटपर्यंत स्वराज्याशी इमान राखून होते व एवढीच एक गोष्ट संभाजी राजांना अनुकूल असल्यामुळे त्यांनी रामशेज सारखा छोटा टेकडीवजा किल्ला सहा वर्ष झुंजता ठेवला. संभाजी राजांच्या हयातीत स्वराज्यातला एकही किल्ला एवढी ताकद असूनही औरंगजेबाला फितुर झाला नाही कि पडला नाही. शेवटी फंद फितुरीनेच आणि पैशाची अमिषे दाखवुन किल्लेदारांना वतनाच्या खोट्या चिठ्ठ्या देऊन औरंगजेबाने काही किल्ले ताब्यात घेतले. परंतु तेही अल्पावधीतच मराठ्यांनी परत घेतले.

अशी ही झंगड पकड अगदी संभाजी राजांच्या मृत्युनंतरही उभ्या महाराष्ट्रभर चालू होती. परंतु औरंगजेबाला संपूर्ण यश मात्र या महाराष्ट्राने मिळवून दिले नाही व औरंगजेबाला या मातीतच दफन व्हावे लागले. ते संभाजी राजांच्या बलीदानामुळे स्फुर्ती मिळालेल्या बळावरच हा महाराष्ट्र २७ वर्षे औरंगजेबाच्या सेना सागराशी अविरत झुंजला आणि शिवाजी महाराजांचे स्वराज्य कायम ठेवले.

– – – – – – – – – –

संभाजी आणि अकबर

अकबर हा औरंगजेबाच्या अत्यंत लाडक्या राणीचा दिलरस बाणुचा मुलगा परंतु औरंगजेबाचे वागणेच एकूण संशयाचे असायचे. तो सर्वांवर संशय घ्यायचा व लगेचच काटा काढायचा. त्याने आपल्या बापाला व सख्या भावांना यमसदनाला पाठविले होते. त्यामुळे अकबर लाडका असुनही एकमेकांचे पटणे अवघड होते. शिवाय आपण आपल्या जन्मदात्या बरोबर जे केले तेच कार्य आपलाही एखादा मुलगा आपल्या बरोबर करु शकतो अशा प्रकारचा संशय कायम तो मनात ठेवून होता. त्यातच औरंगजेबा विरुध्द राजपुतान्यातील राजपुतांनी उठाव केला व बापाशी बिनसलेल्या अकबराला आपल्या बाजुने ओढले.

दुर्दैवाने फासे उलटे पडले व लढाई न करताच औरंगजेबाने राजपुतांना आपल्या अफवा पसरविण्याच्या अपप्रचाराच्या तंत्रामुळे रणमैदानातून पळ काढावा लागला. त्यामुळे सहाजिकच बंडखोरांना सामिल असणाऱ्या अकबराला आता परांगदा होण्याशिवाय आता पर्याय राहीला नव्हता आणि त्याला आश्रय देण्याची हिम्मत करु शकणारा संपुर्ण हिंदुस्तानात संभाजी राजा व्यतिरिक्त कोणी सक्षम नव्हता. कारण अकबराला शरण देणे म्हणजे औरंगजेबाच्या सामर्थ्याशी टक्कर घेणे, पंगा घेणे. त्यामुळे दक्षिणेत किंवा उत्तरेत अकबराला आश्रय देण्यास कोणी तयार नव्हते म्हणुन तो थेट संभाजी राजांकडे आला व त्याने संभाजी राजांना पत्र पाठवले पत्राचा तर्जुमा काहीसा खालील प्रमाणे होता :-

"अल्लाह तालाच्या मेहरबानीने दिल्लीचे तख्त मला मिळाले तर नाव माझे राहील. परंतु अंमल मात्र संभाजी राजे तुमचाच असेल. आलमगीर बादशहा हा माझा वालीद (बाप) असला तरी तो तुमचा आणि माझा दोघांचा कट्टर दुश्मन आहे हे ध्यानात घ्या. त्यामुळे आपल्या दुश्मनाचा खातमा करण्यासाठी आपण दोघे एक होऊ."

संभाजी राजांनी अकबराला आश्रय देण्यापुर्वी अकबराची पुर्ण माहिती काढून त्याचा अंतस्थ हेतू जाणुन घेतला. परंतु लगेच आश्रय देण्याचे टाळले. १५ ते २० दिवसांनी अकबराकडून शरण मागणारे आणखी एक पत्र राजांना आले. नंतर मात्र शरण मागणारा अकबर असली आहे किंवा नकली याबाबतची पुर्ण शहानिशा करुन

खरोखरच तो आपल्या बापा विरुध्द बंड करुन आल्याची खात्री केल्यावरच त्याला आश्रय देण्याचे कबुल केले. परंतु राजांनी अकबराच्या संपूर्ण हालचाली टिपल्या जातील यासाठी त्याच्या भोवती गुप्तहेरांचे कडेच उभारले होते. राज्य चालविताना तेवढी सावधानता बाळगावीच लागते. परंतु अकबराच्या स्वागत सन्मानात कसलीही कुचराई कमीपणा राजांनी ठेवला नव्हता. एका विद्यमान छत्रपतीने दिल्लीच्या भावी शहंशाहचा केलेला तो सत्कार एखाद्या बड्या राजाला शोभेल अशाच प्रकारचा होता. संभाजी राजे व अकबर हे वयाने जवळपास समानच होते. दोघांचेही वय त्यावेळी फक्त चोवीस वर्षांचे होते. शिवाय अकबर हा ही संभाजी राजा प्रमाणे कुटूंबातील चौथा राजकुमार होता. शिवाय जसे संभाजी राजांच्या मातोश्री राजांच्या लहानपणीच वारल्या त्याच प्रमाणे अकबराची आईही तो लहान असतानाच वारली होती. राजांनी पुर्ण विचारांती शहानिशा करीत अकबराला आश्रय देऊ केला होता. अकबराच्या स्वागताची पुर्ण जबाबदारी हिरोजी फर्जदांवर दिली गेली.

स्वराज्याचे प्रतिनीधी म्हणुन अकबराची भेट झालेली पहिली व्यक्ति म्हणजे हिरोजी फर्जद. याच हिरोजी फर्जदांना फोडून अष्ट प्रधानांनी राजांच्या व सेनापती हंबीरराव मोहित्यांच्या गैर हजेरीत बंड करण्याचा डाव टाकला होता व संभाजी राजांना ठार मारण्याचा बेत आखला होता. तोही अकबराला शरण जाऊन आणि अर्धे राज्य विनासायास त्याच्या झोळीत टाकण्याच्या इराद्यासह. अण्णाजी, सोमाजी व महाराणी सोयराबाई हिरोजी फर्जद या सर्वांनी या कटाची आखणी केली होती व त्यात चिटणीस बाळाजी आवजींना जबरदस्तीने सामिल करुन घेवुन त्यांच्याच हस्ताक्षरात अकबराकडे पाठविण्यासाठी खलीता लिहुन घेतला होता. संभाजी राजे त्यावेळी पन्हाळ्यावर होते व कटाची आखणी रायगडावर झाली होती. ठरल्याप्रमाणे खलिता लिहुन गुप्तपणे अकबराकडे पाली, सुधागड येथे पाठविण्यात आला होता. खलित्यातील मजकुर सर्वसाधारणपणे असा होता

''पातशहा - ए - हिन्दुस्थान अकबरसाहेब,

आपली बहुत किर्ती ऐकली त्याने आम्ही धन्य झालो या आधी आमचे हिरोजी फर्जदबाबा यांच्या साहेब स्वारींशी धोंडशे मुक्कामी गाठीभेटी झाल्या आहेतच. त्या समयी मशारनिल्हे यांनी आमचा विषय आपणाकडे थोड्याशा आड पडद्याने काढला होता. एके काळचे शिवाजीचे आम्ही वफादार सेवक. आज मात्र आम्हास किड्या मुंगीचे जिणे प्राप्त झाले आहे. सुर्यापोटी जसा शनैश्वर, तैसा शिवाजी पोटी संभाजी! या तापट, तामसी, बदफैली मनुष्याने आम्हा एकनिष्ठ सेवकांचे प्राण कंठाशी आणले आहेत. आमच्या पोरकट स्वामीच्या सावलीस कनोजचा तो पापी कलुशा भट रहातो. त्या शाक्त भोंदु मांत्रिकाने तर आम्हा सर्वांना नरकाच्या द्वारी लोटले आहे. खाविंद

मनात आणतील तर या दोघांचा नष्टावा सहज करतील.

सांप्रत या दुष्ट राजास आपल्या बाहुबलाने आपण जिवे धरावे किंवा मारावे पण आम्हास मुक्ती द्यावी! त्याच्या बदली आम्ही आमचे अर्धे राज्य आपल्या टाचेखाली द्यायला तयार आहोत. अगदी शेवटी राजाराम बाळ, मातोश्री व आम्हा कारभाऱ्यांस एखादा छोटा परगणा, गरीब ब्राह्मणांना आणि नेक मराठ्यांना त्यांची तदंगभूत वस्तुसह पुर्वापार वतने पुन्हा लाभावीत. काहीही करुन दिल्लीश्वरांनी आमुच्या संकटात धावून यावे. संभाजींच्या आणि त्याच्या छंदीफंदी छंदोगामात्याच्या जाचातुन आमुचा बचाव करावा. बाकीचे देणेघेणे, उपचार सारे प्रत्यक्ष भेटीतच बोलु''.


अकबराला वाटले संभाजी राजे कदाचित आपली प्रामाणिकता जोखत असतील म्हणुन हा प्रयोग केला असेल. त्यामुळे आपली प्रमाणिकता सिध्द करण्याच्या हेतुनेच अकबराने तो खलिता जसाच्या तसा गुपचुप पणे संभाजी राजांकडे पाठविला होता परंतु संभाजी राजांनी अशी कोणतीही परिक्षा पहाणारे पत्र पाठविले नव्हते हे अकबराला महितच नव्हते.

अकबराचे पत्र गौरवसिंह नावाच्या विश्वासू राजपुताने संभाजी राजांना आणुन सरळ पन्हाळ्यावर हातात दिले आणि कटाचे बींग फुटले. संभाजी राजांना कट करुन जीवंत मारण्याचा हा एकंदरीत कारभाऱ्यांचा हा तिसरा प्रयत्न होता तोही उघडा पडला. आता मात्र कठोर शिक्षे शिवाय पर्याय उरला नव्हता. राजांनी लगेच पन्हाळा सोडला व कटवाले अकबराच्या भेटीसाठी जेथे थांबले होते तेथे सुधागडला वाऱ्याच्या वेगाने निघाले. परंतु संभाजी राजे थेट सुधागडावर येत असल्याचे कटकऱ्यांना चंद्र प्रकाशात दिसले व त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा राजांनी त्यांचा पाठलाग करुन सर्वांना अटक केली. जुण्या जाणत्या लोकांचा विचार जाणुन घेतला व त्यानुसार सर्वानुमते ठरले राजद्रोहाची शिक्षा ही देहांत प्रायश्चित असली पाहीजे नाही तर पुढे आणखीन धोका होणार.

राजाचे जिवीतच धोक्यात येणार असेल तर वादळ जागीच शमवावे लागेल. त्यानुसार कटात सर्व सहभागी असणाऱ्यांना राजांनी धोंडश्याच्या माळावर हत्तीच्या पाई तुडवुन शिक्षा दिली. कटात सहभागी असणाऱ्या पैकी फक्त सोयराबाई वाचल्या कारण त्यावेळी त्या रायगडावर थांबुन होत्या जेणेकरुन कट फसला तर आपण त्यात नव्हतोच असे दाखवायला. परंतु अकबराला पाठवलेल्या पत्रावर सोयराबाईचीही सही होती एवढा पुरावा सोयराबाईचा कटातील सहभाग स्पष्ट करण्यासाठी पुरेसा होता. तरीही संभाजी राजांनी त्यांना आई समजुनच माफ केले. परंतु पुन्हा अशा प्रकारांना खतपाणी घातले जाऊ नये म्हणुन त्यांना नजर कैदेत ठेवण्याचे आदेश देऊन पुन्हा असे काही घडणार नाही याची खबरदारी घेतली.

शेवटी आपण खुप मोठी चुक कारभाऱ्यांच्या नादी लागुन केली व तीन तीन वेळा अशा प्रकारची चुक केल्याचा पश्चाताप होऊन रायगडावर हिरकणी खाऊन आत्महत्या केली. संभाजी राजांनी सोयराबाईंना भिंतीत चीनुन मारले वगैरे सगळ्या कपोल कल्पीत गोष्टी आहेत हे आता सिध्द झाले आहे. सोयराबाईंच्या मृत्युची तारीख इतिहासातील नोंदणी प्रमाणे १६८१ आहे.

- - - - - - - - - -



गोदावरी

अनेक शतकांच्या गुलामगिरीतुन हा महाराष्ट्र मुक्त होत होता. हजारो मराठ्यांच्या बलिदानाने, पराक्रमाने हे हिंदवी स्वराज्य उभे रहात होते. प्रशासकीय अडचणी येऊ नयेत व प्रजेला आपल्या हक्काचा राजा मिळावा या साठी राज्याभिषेक होणे आवश्यक होते. राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांचे हे स्वप्न होते व ते साकार होत होते. वार्धक्यामुळे राजमाता खाली पाचाडला राहात होत्या. त्याही हा अभूतपुर्व सोहळा पाहण्यासाठी गडावर हजर होत्या. सर्व शिलेदार, दरकदार, मेहुणे, पाहुणे यांचा खासा मेळा जमा झाला होता. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार होण्यासाठी किमान लाखभर मनुष्य रायगडावर हजर झाले होते.

याच गर्दीचा फायदा उठवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण हरण करण्याचा व लाख संकटांशी सामना करीत हजारो मावळयांच्या बलिदानाने उभ्या राहीलेल्या स्वराज्याच्या या मंगल सोहळयातच दगाफटका करुन स्वराज्याची संकल्पना राजासहीत मातीत मिळविण्याची योजना याच मातीतील काही नादान रचत होते. ते जातीने ब्राम्हण सरदार होते परंतु कर्माने, मनाने मात्र मोघलाईत होते. वतनाच्या तुकडयासाठी विकली जाणाऱ्यांची त्या अवलादी स्वराज्याच्या मुळावर उठल्या होत्या. तसे यापूर्वीही अनेकदा प्रयत्न करायला या महाभागांनी मागेपुढे पाहीले नव्हते हे वेगळे सांगायला नको.

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानातील सुरनवीस अण्णाजी दत्तो, प्रभुणीकर यांच्या सख्या साडुच्या घरात खुद्द शिवाजी राजांना राज्याभिषेकाच्या दिवशीच ठार मारण्याचा कट शिजत होता. ते पाहुणे म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसुन त्रिंबकराव वाडकर व त्यांचे पुत्र निवासराव हे होते. त्र्यंबक रावाकडे बारा गावची देशपांडेगिरी होती. म्हणजेच ते एक छोटेसे वतनदार होते. पण ते बादशहाची इमाने इतबारे सेवा करुन महत पुण्य पदरात पाडुन घेण्याच्या मानसिकतेचे होते व ते पुण्य त्यांना शिवाजी राजांना संपवुन हाशिल करायचे होते.

याच त्रिंबकरावांच्या घरात नवीन सुनबाई आल्या होत्या तिचे नाव गोदा. गोदाचे माहेर रायगडाजवळचे महाड हे गाव. तीने अनेकदा पाचाड, रायगड पाहीलेले, भेट

दिलेली. त्यामुळे छत्रपति शिवाजी महाराजांबद्दल तिला खुपच आपुलकी होती. ती त्यांना देवच मानत होती. रयतेचा सामान्य जनतेचा प्राण होता तो राजा. महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत होता तो राजा. गोदाची या राजावर बालपणापासुन जिवापाड भक्ती.

गोदाच्या लग्नाला एक महिनाभर झाला असेल. त्य' रात्री काही केल्या गोदुला झोप येत नव्हती. कदाचित तीचे अंर्तमन तिला सांगत असावे, "गोदा तु आज झोपलीस तर स्वराज्याचे प्राण पाखरु उडालेच बघ आणि म्हणुनच तु झोपी जाऊ नकोस. तुझा राजा आणि हे स्वराज्य धोक्यात आलेच म्हणुन समज." झोप येत नव्हती म्हणुन गोदा बिछान्यातुन उठली आणि तीने अंगणात नजर टाकली. अंगणात मशाल जळत होती आणि तिच्या उजेडात कसलीतरी तातडीची गुप्त मसलत चालली होती.

गोदाचा नवरा सासरा व काही अनोळखी माणसे त्या मसलतीत सहभागी होती. सासरे बारा गावचे देशपांडे असल्यामुळे असेल काही तरी महत्वाचे असे समजुन तिने त्याकडे कानाडोळा केला व पुन्हा जाऊन अंथरुणावर पहुडली.मध्यरात्र झाली तरी तिचा नवरा अजुन बिछान्याकडे परतला नव्हता म्हणुन ती पुन्हा उठली व दाराच्या तोंडावर येवुन उभी राहीली. ती मसलत अजुनही चालुच होती आणि कटाचा बेत आखला जात होता. त्यांच्यात कुजबूज चालु होती.

धिम्या आवाजात योजना बनविली जात होती. "उद्याचा राज्याभिषेक हा भोसल्यांचा शेवटचा कार्यक्रम ठरणार आहे. रायगडावर चाळीस एक निधड्या छातीचे धारकरी पोहोचलेत. सकाळीच महाराजांची अंबारी होळीच्या माळावर जाण्याच्या वेळी वाघ दरवाजावरची तोफ पेटवायची आणि शिव प्रभुंचा शेवट करायचा" असा तो बेत होता. तोफ उडताच इशारा होणार होता व रायगडाच्या आजुबाजुच्या झाडीत आडोशाला लपलेले मोघल, त्यांचा तोफखाना बाहेर पडुन रायगडावर हमला करणार होते. एवढा महाभयंकर बेत रचला जात होता. राजासह राजधानी आणि मराठ्यांचे स्वराज्य गिळंकृत करण्याचा.

हे सर्व कानावर पडले आणि गोदा बिचारी अस्वस्थ झाली. काय करावे आणि काय नाही असे तिला वाटु लागले. कसे वाचवु राजाला, मराठ्याच्या पंचप्राणाला ? तीने निश्चय केला व ती सताड परसदाराकडे धावली. तिकडे वाडकरांची पागा होती. त्या पागेतले तिने जीन सामान घेतले व त्या पागेतला सर्वात वेगवान घोडा "पाखऱ्या" तीने आपल्या भरारीसाठी निवडला. वाऱ्याच्या वेगाने तिला ही बातमी रायगडावर पोहोचवायची होती. स्वराज्याचे पंचप्राण वाचवायचे होते.

वेगाने तिचा घोडा पाखऱ्या दौडला आणि पहाटेच्या आसपासच ती पाचाडला येऊन पोहोचली. उजाडेपर्यंत ती गडाच्या चित दरवाजापर्यंत पोहोचली. तेवढयात

तिच्या घरच्यांना याचा सुगावा लागला होता की घरातुन सुन गायब आहे व पागेतला एक घोडाही. त्यामुळे नक्कीच बेत फुटण्याची शक्यता होती म्हणुन त्यांनी पाठलाग करायला एव्हाना सुरुवातही केली होती. गोदा घोड्यावरुन उतरली व वेगाने दरवाजाकडे धावली मोठ्याने ओरडु लागली दार उघडा! दार उघडा!! घात झालाय राजांच्या जिवाला धोका आहे पण पहारेकरी मात्र तिला आत घेईनात. स्वराज्याचा शिरस्ताच होता तो. सुर्योदय होईपर्यंत दरवाजा कोणासाठीही न उघडण्याचा. राजा असला, सेनापती असला तरीही. गडकऱ्यांना सख्त आदेश होता तो. ते बिचारे पालन करीत होते स्वराज्याच्या नियमावलीचे.

गोदाच्या म्हणण्याकडे, अर्जीकडे त्यानी डोळेझाक केली तिच्या कळवळण्याचा काही उपयोग झाला नाही पण निरोप राजांपर्यंत पोहोचविणे व त्यांचे प्राण कोणत्याही प्रकारे वाचविणे हे तीचे कर्तव्य बजावायलाच ती येथपर्यंत आली होती. अशी थोडीच माघार घेणार होती ती. ती चित दरवाजाच्या पश्चिमेकडे सरकली व वर जाण्याचा एखादा मार्ग शोधु लागली. सुदैवाने पावसाळ्यात किल्यावर पडणारं पाणी बाहेर पडण्यासाठी पुसाटीच्या बाजुला एक छोटेसे भोक पाडले होते. गोदाने त्याच अरुंद भोकातुन कसेही वर चढण्याचा निश्चय केला आणि नाना प्रकारे प्रयत्न करुन बिचारी एकदाची त्या अरुंद बिळातुन वर आली.

अनेक ठिकाणी जखमा झालेल्या अंग सोलटुन निघालेले पण त्याची तमा नव्हती. स्वराज्याचे पंचप्राण वाचविणे हे एकच ध्येय तिच्या समोर होते. वर आल्यावर गोदाने पहारेकऱ्यांना विनंती केली कि कोणत्याही परिस्थितीत मला राजांना भेटायचे आहे. महत्वाचा निरोप आहे पण पहारेकरी तिला सोडत नव्हते राजांची भेट होऊ देत नव्हते. तेवढ्यात सर्जा नावाच्या घोड्यावर बसलले जागसुद आणि बंदोबस्ताची तपासणी करीत करीत शंभु राजे तेथे पोहोचले. शंभु राजाबरोबर कवि कलश, ज्योत्याजी केसरकर, रायप्पा ईत्यादी विश्वासु सहकारी होते.

गडावर काही तरी धोका असल्याचा युवराजांना सुगावा लागला असल्यानेच ते रात्रभर जागुन जातीने सर्व पहारे व चौक्या यांची पाहणी करीत होते. शंभु राजांना पहाताच गोदाने तिकडे धाव घेतली व राजांच्या जिवाला धोका असल्याचे सांगितले. सर्वांच्या पुढे बोभाटा होऊ नये म्हणुन शंभु राजांनी त्यांच्या सहकाऱ्यांना गोदाला ताबडतोब सदरेवर घेवुन येण्याचे फर्मावले. तेथे येसुबाई हजर होत्या. त्यांनी गोदुकडुन सर्व हकिकत ऐकली व राजांच्या जिवाला नक्की धोका असल्याचे शंभु राजे, येसुबाई व त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आले. शंभु राजांनी लगेचच सर्वांना आपल्या मोर्चावर पाठवुन बेत हाणुन पाडण्याचा प्रबंध केला. शिवाय कटाचे सुत्रधार वाडकर पिता पुत्रांना

सापडतील तेथुन धरुन आणण्याचा आदेश दिला.

राजांनी गोदुला संरक्षण पुरवीले व निर्धास्त होवुन पुढील कामास लागले. आता गोदु येसुबाईंच्या सोबतीला होती व तीच्या जिवाचा धोका टळला होता अन्यथा कटकऱ्यांनी गोदुला सर्वात प्रथम संपविले असते कारण ती त्या कटाची साक्षिदार होती व तिच्या बोलण्यामुळे सगळा कट उघड झाला असता आणि वाडकर पिता पुत्रांना कडेलोटाची शिक्षाच झाली असती.

आपला बेत फसणार कट उधळला जाऊन आपणास शिक्षा होणार म्हणुन गोदाच्या नवऱ्याने व सासऱ्याने दुसरा कट रचला. शंभु राजांनी गोदुला पळवुन आणले असे बदनाम करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे त्यांनी मोठा कांगावा करुन शंभु राजांना पुरते बदनाम करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. महाराजांपुढे खोट्या अर्जाचा न्याय मागु लागले. जाणत्या राजाने चौकशी करुन न्याय केला जाईल असा शब्द दिला. त्याप्रमाणे स्वराज्याचे मुख्य न्यायधीश काजी मुल्ला हैदर व शंभु राजांच्या सावत्र माता सोयराबाई यांना अनुक्रमे गोदाचे प्रकरण व आत्मघात करुन महाराजांना मारण्याचा कट याची चौकशी करण्याचे काम सोपविले.

दिल्या शब्दाप्रमाणे राजांनी संध्याकाळी दरबार भरवीला व प्रकरणाची सत्यता पडताळुन पाहीली. ज्या गोदाला पळवुन आणल्याचा शंभु राजांवर आरोप होता ती बिचारी शपथ घेऊन सांगत होती. मराठ्यांच्या राजाला मारण्याचा बेत हाणुन पाडण्यासाठी ती स्वत: येथपर्यंत आली होती. शंभु राजांचा यात दुरुनही संबंध लागत नव्हता. मुख्य न्यायाधीश मुल्ला काजी हैदर यांना आपला तपास जाहीर करण्याचा राजांनी आदेश दिला. तसे न्यायधीशांनी आपली केलेली चौकशी दरबारासमोर प्रकट केली.

शंभु राजांच्या माहितीप्रमाणे वाघ दरवाजा जवळ राजांच्या जिवाला धोका होता हे सिध्द झाले होते. कारण त्या ठिकाणी पोहोचलेली दारु आतिषबाजीची नव्हती. शिवाय बारुदखान्याच्या बाजुला काही संशयित लोक फिरत होते. त्यांना गडकऱ्यांनी अडविले असता त्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला. काही कडयावरुन पळता पळता कोसळले, त्यांचा शोध घेतला जात आहे. गडकरी कानोजी यांनीही या गोष्टीची पुष्टी केली.

चौकशी पुर्ण झाली आणि प्रकरणाची सत्यता पटली. शंभु राजे निर्दोष होते. परंतु त्यांच्या चारित्र्यावर केलेला खोटा आरोप मात्र बखरकारांनी त्यांच्या भाळावर कायमचा गोंदविला. स्वराज्याचे पंचप्राण वाचविणारी गोदा बदनाम केली गेली आणि निर्दोष निष्कलंक असलेला राजपुत्र मात्र आरोपीच्या पिंजऱ्यात उभा केला जो गुन्हा


त्याने केलाच नव्हता त्यासाठी. शंभु राजांनी वाडकरांची सुन पळवुन रायगडावर आणल्याचा कांगावा केला होता.

वस्तुतः स्वराज्यातील किल्ला एकदा सुर्यास्त झाल्यावर सुर्योदयापर्यंत कोणत्याही परिस्थितीत उघडला जात नव्हता. मग शंभु राजांनी वाडकऱ्यांची सुन रात्रीची पळवुन आणली तीही स्वतः शिवाजी राजे आणि सर्व सरदार नातेवाईक मंडळी रायगडावर हजर असताना ? नाही शक्य नाही आणि ते संभवतही नाही. शिवाजी राजांचा पुत्र स्वराज्याचा युवराज अशी आगळीक करेलच कशी! स्वराज्यातील दगड धोंड्यांना काट्या कुट्यांना, पाना फुलांना, बुरुजा बुरुजांना, रान वाटांना, पाय वाटांना, याचा ठाम विश्वास होता कारण ते वतनदार नव्हते, जहांगिरदार नव्हते, वतनासाठी चटावलेले लाचार नव्हते. पण माणसांना कोण समजविणार ?

पराक्रमी पुरुषाला बदनाम करण्याचे षडयंत्रे नेहमीच रचली जातात. शंभु राजे याला अपवाद कसे असतील. खैर अनेक शतकानंतर का होईना सत्य बाहेर येतच असते. पराक्रमाला न्याय मिळत असतो, जरी काही लोकांनी जाणिवपुर्वक खोटा इतिहास लिहुन इतिहासाची सुवर्ण पाने फाडण्याचा प्रयत्न केला तरीही.

कारण ती कर्तुत्वाच्या शाहीने व तलवारीच्या पेनाने लिहीलेली असतात. काळाच्या छातीवर आणि नियतीच्या भाळी कोरलेले कतृत्व इतिहासालासुद्धा मिटवीता येत नाही आणि शिवाजी महाराज संभाजी महाराजांच्या बाबतीत त्यांचा पराक्रम लपविणे किंवा त्याला वेगळे वळण देणे हे तर प्रत्यक्ष नियतीलाही चंद्रसूर्य असेपर्यंत जमणार नाही.

- - - - - - - - - -



संभाजीराजांचे संस्कृत दानपत्र

(शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांच्या सौजन्याने)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १० रुधिरोद्गारी (नाम) संवत्सरे, पोष्य बहुल १२ द्वादशी, गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणी राजेश्री विठल शंकर देशाधिकारी, प्रांत जावली यांसी आज्ञा केले ऐसीजे : दत्ताजी केशवजी पिसाळ देशमुख, तर्फ ओरखोर्रे यांसी, कैलासवासी स्वामीनी हक्क, वतन करून दिल्हें आहे. त्याप्रमाणें हें वर्षास मोईनप्रमाणें चालत आलें हल्ली कुसूर देतों म्हणून कळों आलें. तरी हे दिवसांत गनीम कोकणांत पेशक. या प्रसंगें हशमाचा जमाव करावया देशमुख मशारनिल्हेस आज्ञा केली असे व पुढें कितेक काम यांचे हातून घेणें असता, उगेच माणूस दिलगीर करावें आणि स्वामीकार्याचा नाश करावा, हे कोण कारकुनी? हे गोष्टीनें स्वामीचा तरी फायदा? तरी ते कौडीइतकी गोष्ट नाही. ऐसें असतां असें करावयास गरज काय? या उपरी तरी देशमुख एकंदर रंजीस न करणें. त्यांचा हक्क जो सालाबादप्रमाणें चालला आहे, तेणेंप्रमाणें तुम्हींही चालवणें. कसूर काडीइतकी न करणें. पुढें बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहीत. हें नेमस्त समजणें. लेखनालंकार'

राजा शंभुछत्रपती – विठल शंकर देशाधिकारी प्रांत जावली

दताजी केशवजी पिसाळ देशमूख तर्फ ओरखोरे यांसी कै. स्वामीनी हकवतन करून दिल्हे आहे. त्याप्रमाणें मोईन चालत आले. हली कुसूर होतो. तरी हे दिवसांत गनीम कोकणात पेशक. या प्रसंगे हशमाचा जमाव करावया देशमूख माानिल्हेस आज्ञा केली असे व पुढें कितेक काम याचे हातून घेणें असतां उगेच माणूस दिलगीरकरावे आणि स्वामीकार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी. हे गोष्टीनें स्वामीचा तरी फायदा? तरी कौडी इतकी गोष्ट नाही. ऐसे असतां असे करावया गरज काय? याउपरी देशमुख तरी रंजीस न करणें. त्यांचा हक सालाबादप्रमाणे चालवणें. कसूर काडीइतकी न करणें. पुढें बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहीत हें नेमस्त समजणें.
लेखनालंकार.

अष्टप्रधानांचे प्रताप

एके दिवशी शंभूराजांचा यार रायप्पा महार महादरवाजाच्या चौकीवर होता. तेवढ्यात त्याच्यासमोर एक शृंगारलेली सांडणी येऊन उभी राहीली. रायप्पाने चौकशी केली असता कळले की, ते फिरंग्याचे वकील भास्कर ठाकूर आहेत व सुरनवीस आण्णाजी दत्तोंना भेटायला चाललेत, रायप्पाने प्रश्न केला राजे गडावर नाहीत. मग आपण स्वराज्याचे काम असेल तर युवराजांना भेटावे आणि तसा निरोप शंभूराजांना पाठविला की फिरंग्याचे वकील भेटायला आले आहेत. शंभूराजांनी वकीलांची विचारपुस केली. काय काम होते किंवा कसे व या संदूकीत काय आणले आहे. त्यावर वकीलाने सांगितले यात दोन मोठे रत्नहार आहेत गोव्याहून पाठविलेले. आण्णाजी दत्तोंसाठी. कशासाठी म्हणून शंभूराजांनी विचारणा केल्यावर वकील गोंधळला व घडला प्रकार सांगून टाकला.

"काही महिन्यांपूर्वी आमचे वकील थोरल्या महाराजांना भेटायला आले होते. तेव्हा त्यांनी राजांना नजराणा पेश केला होता. पण आण्णाजी व मोरोपंतांना भेटवस्तू आणायला विसरले होते. त्यामुळे नाराज आण्णाजीनी तीन-चार पत्रे पाठवून आमचे वकील रामजीपंतांना दटावले होते कि राजकारभारात कारभाऱ्यांना हाताशी नाही धरले तर मोठीमोठी कामे मातीस मिळतात. म्हणूनच मग त्यांच्यासाठी हे दोन हार पाठविले."

शंभूराजांनी ते दोन हार ताब्यात घेतले व स्वराज्याच्या रत्नशाळेत सरकार जमा केले. ती स्वराज्यांची संपत्ती होती. कोणा व्यक्तीची नव्हती. त्याच दिवशी सायंकाळी आण्णाजी दत्तोंचे धाकटे बंधू सोमाजी दत्तो शंभूराजांच्या भेटीला आले व त्या दोन हारांबद्दल विचारु लागले. सांगितले, "दादांनी काही महिन्यांमागे गोव्याला द्रव्य पाठवले होते दोन रत्नहार घडवायला. ते दोन हारबनून आलेत, परंत चुकून आपणाकडे आलेले आहेत. तेव्हा ते मिळावेत."

यावर संभाजी राजांनी त्यांना सांगितले की,"ते दोन हार सोनार घेऊन आले नाहीत. ते दोन हार फिरंग्याच्या वकीलाने आणले आहेत आणि जर तुमचे असे म्हणणे असेल की तेच ते हार आहेत तर हार पाठवण्यासाठी सोनांरानी वकील पाठवण्याच्या

पद्धती कधीपासुन चालू केल्या? ते गव्हर्नर झालेत का?" सोमाजी दत्तो निरुत्तर होऊन निघून गेले. पण शंभूराजांवर आळ आणण्याचा निश्चय करुनच! राजपूत्राला बदनाम करण्याची संधी सोडायची म्हणजे मूर्खपणाच नाही का? मग ठरल्याप्रमाणे आण्णाजी दत्तोनी आपले दोन रत्नहार संभाजी राजांनी हडपल्याचा कांगावा केला. शंभूराजांना या आरोपाचे उत्तर देण्यासाठी दरबारात पाचारण केले गेले. शंभूराजांनी दरबारात ते हार माझ्याकडे नसून सरकारी रत्नशाळेत जमा केल्याची पावतीच सर्वांना दाखविली व त्यांच्याबरचे आरोप निराधार असल्याचे सिद्ध झाले. पण आरोप करणारे दरबारातून बाहेर पडले ते राजपूत्राला कोंडीत पकडण्याचे ठरवूनच!

दुसऱ्या दिवशी आण्णाजीच्या वाड्यात खलबत झाले. आण्णाजी, सोमाजी, राहूजी व इतर भ्रष्ट कारभाऱ्यांची एकत्र येऊन शंभूराजांचा काहीतरी इलाज करायचे एकमताने ठरविले आणि त्याचप्रमाणे पुढे मिळेल ती कारणे पुढे करुन शिवपुत्राला बदनाम करण्याचा ठराव एकमुखाने मंजूर झाला. शंभूराजांनी स्वराज्याला तिजोरीला लागलेली छिद्रे ओळखली होती व कारभाऱ्यांचे भारी कारभार माहित झाले होते म्हणून त्यांच्या बंदोबस्त करणे, त्यांना आपल्या स्वार्थाच्या मार्गातून दूर करणे, अगत्य वाटणं कारभाऱ्यांसाठी आवश्यकच होते, अन्यथा बिचारे उघडे पडले असते.

याच भ्रष्ट कारभाऱ्याची मुलगी हंसा हिचे संभाजी राजांवर एकतर्फी प्रेम होते. संभाजी राजे दिसायला शिवाजी राजांपेक्षाही उजवे होते हे सांगायला नको. अशा देखण्या, राजबिंड्या, पराक्रमी पुरुषाबद्दल आकर्षण असणे स्वाभाविकच असते. पण शंभूराजे मात्र आपल्या मर्यादा सोडत नव्हते. हंसाच्या प्रेमाला प्रतिसाद देत नव्हते. स्वराज्याची प्रथा, चाकोरी मोडण्याचा त्यांचा इरादा नव्हता.

आण्णाजींना आपल्या मुलीची तळमळ कळली होती व संभाव्य परिणामांची कल्पना आली होती. त्यांनी आपल्या मुलीचे हात जखडण्याच्या प्रयत्न केला व घाईघाईने तीचे लग्न लावून दिले. आण्णाजींनी सुटकेचा निश्वास सोडला. परंतू हंसाचे ज्याच्याशी घाई घाईने लग्न लावून दिले होते तो अगदीच नेभळट होता असे हंसाचे मत होते. लग्न होऊन तीन वर्षे झाली तरी हंसाला काही मुलबाळ नव्हते . यावरुन आपणास कल्पना येते की हंसाच्या दाव्यात तथ्य होते. हंसा अतृप्त होती. वैवाहिक जीवनात उदास होती. एकीकडे शंभूराजांवर असलेले एकतर्फी प्रेम व नवरा असा नेभळट. हंसाची घालमेल संपत नव्हती. पण काहीतरी मार्ग काढणे आवश्यक होते.

तीन वर्षांनंतर आता हंसा वसंत पंचमीच्या सणासाठी माहेरी पाचाडला आली होती. मनाशी पक्का निश्चय करुनच! एकतर शंभूराजाला आपण स्विकार करायला लावायचा अन्यथा हे जीवन संपविण्याचा! शंभूराजे आपणाला स्विकारत नाही व आपला

नवरा आपल्या योग्यतेच्या नाही अशा दुहेरी कात्रीत हंसा सापडली होती.

शंभूराजे आपल्या महालात लेखनकाव्य करण्यात मग्न होते. कोणालाही आत न सोडण्याचा पहारेकऱ्यांना हुकूम होता. परंतू शंभूराजांनीच आपल्याला बोलावले आहे असे भासवून हंसा महालात आली. तीने शंभूराजांकडे आपले मत व्यक्त केले. शंभूराजांनी तीला नाना प्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला, "तु आण्णाजी काकांची मुलगी आहेस. विवाहीत सासुरवासीण आहेस. अशा प्रकारे वागणे योग्य नाही" वगैरे वगैरे. पण ती काही ऐकण्याच्या तयारीत नव्हती. तीने शंभूराजांचा मुका घेण्याचा प्रयत्न केला.

तेव्हा राजांनी थाडकन तिच्या थोबाडात मारली. तरीही ती मागे हटायला तयार नव्हती. शंभूराजांना अलिंगन देण्याचा प्रयत्न करत होती. आपले प्रेम स्विकार करण्याचा प्रयत्न करत होती. शंभूराजांनी तिला दूर लोटले तरी हटत नव्हती. शेवटी शंभूराजांनी सटासट अशा एकामागून एक अशा तीन-चार कानाशिलात लगावल्या. पण हंसा काही भानावर येत नव्हती. प्रेमाने ती आंधळी झाली होती. आपल्या मर्यादा तोडून प्रेमाच्या लाटेवर स्वार होऊ पाहत होती. हंसा खूपच निराश झाली. जाता जाता शंभूराजांना सांगून गेली, राजा तीनच दिवस तुझ्या होकाराची वाट पाहीन, तुझे उत्तर नाही आले तर तुला माझा मेलेला मुडदा पाहायला मिळेल.

शंभूराजे युवराज होते. शिवाजी राजाचे पुत्र होते. अशा आंधळ्या बेमुवर्त मागणीला होकार देणे शक्यच नव्हते. ठरविल्याप्रमाणे हंसाने तीन दिवस राजांच्या होकाराची वाट पाहीली पण कसलेच उत्तर आले नाही. निराश, वैफल्यग्रस्त होऊन प्रेमाच्या आंधळेपणात बेहोष होऊन हसांने हौदात उडी मारुन आत्महत्या केली.

हंसा असे काही अघटीत करेल असे शंभूराजांना वाटत नव्हते आणि तीची मागणी मान्य करणे शंभूराजांना शक्य नव्हते. घडला प्रकार कोणाला सांगणेही योग्य नव्हता. काय सांगायचे आणि कसे सांगायचे म्हणून राजे गप्प बसले. परंतू कारभाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे आत्महत्येची हत्या व एकतर्फी प्रेमाला दुतर्फी प्रेमाचा रंग भरला व शंभूराजांवर आळ घेतला.

प्रेमाच्या वेहोषीत मेली होती ती हंसा, पण हत्या झाली होती ती शंभूराजांच्या चरित्राची! हंसाच्या आत्महत्येचे भांडवल म्हणजे कारभाऱ्यांना खजानाच होता. तोच खजाना आमच्या इतिहासकारांनी आतापर्यंत पुरवून पुरवून वापरला व शंभूराजांना पूरते बदनाम करून ठेवले. वास्तविक पाहता राजांना अनेक लग्न करण्याची त्याकाळी परवानगी होती,प्रथा होती. शंभूराजांच्या मनात असते, ते त्या वृत्तीचे असते तर त्यांनीही मुघलाप्रमाणे जनानखाना बनविला असता. परंतू ते शहजादे होते स्वराज्याचे,

मोगलाईचे नव्हे. आया-बहीणींचा इज्जत करण्याची, स्त्रीयांचा मानसन्मान राखण्याची रीत त्यांच्या आजी जिजाऊ साहेबांनीच शिकविली हाती.

आया-बहिणींचा मानमरातब, इज्जत सांभाळण्यासाठीच स्वराज्याची निर्मिती झाली होती. याच स्वराज्याच्या युवराजाकडून अशी आगळीक शक्य नव्हती. कदापिही शक्य नव्हते पण इतिहासकांरानी आपल्या लेखनाद्वारे शक्य केले. तलवारीच्या बहादूरी, पराक्रम, लेखणी बादशाहांसमोर निष्प्रभ ठरल्या. शंभूराजांना नाहक बदनाम केले गेले. जन्मजन्मासाठी विशिष्ट लोकांच्या जन्मजन्माच्या पोटापाण्यासाठी,नाटककारांसाठी, चित्रपट निर्मात्यांच्या उदारनिर्वाहासाठी!

शंभूराजांवर आण्णाजी दत्तोंचा राग असण्याचे आणखाही एक कारण होते. आण्णाजी दत्तो शेतकऱ्यांकडून सारा वसूल करताना त्यांच्या मागे लागलेले पोट, दुष्काळ वगैरे काही पाहत नसत. आण्णा कारभारात एकदम कडक असल्याचे दाखवत. गरीब शेतकऱ्यांना विशिष्ट प्रसंगीही सारामाफीचा निर्णय घेत नसत, कोणाला घेऊ देत नसत.

अण्णाजीकडे राजांनी कोकणचा, दाभोळ,राजापूर, कूडाळपासून फोंडयापर्यंतचा कारभार दिला होता. याच प्रदेशातून येणाऱ्या महसूलात अण्णाजी अनेकदा तूट दाखवत व तेच द्रव्य गोवा व फोंडयातील सावकरांकडे दामदुप्पटी व्याजी लावत. याकामी त्यांना मदत व्हावी व सगळे काम निर्धास्तपणे व्हावे यासाठी त्यांनी आपल्या मर्जीतील खास माणसेच कारकून, सरकारकडून म्हणून ठेवली होती. खरे तर स्वराज्याशी चाललेली ही बेईमानी थोडीबहूत राजांच्या कानावर होतीच. परंतू आण्णाजींनी स्वराज्यासाठी केलेली मेहनत चांगली हाती म्हणून राजे याकडे जाणीवपूर्वक थोडे दुर्लक्ष करीत. जसे तळे राखी तो पाणी चाखी या नात्याने पण शंभूराजांच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नव्हती.


स्वराज्याच्या तिजोरीला लागलेली गाळण त्याच्या लक्षात होती आणि त्यामुळेच त्यांनी अण्णाजी व इतरांच्या अनेक चोऱ्या पकडल्या होत्या. त्यामुळे हे कारकुन, कारभारी आतून दुखावले होते. शंभूराजांचा काटा काढण्याची मोहीम राबवत होते. राजांनी शंभूराजांना दक्षिणेच्या मोहिमेत नेऊ नये असा शहाणजोगा सल्ला यांचाच. शंभूराजांच्या सावत्र माता सोयराबाई यांचे कान फुंकले व राजांनी शंभूराजांना दक्षिण माहिमेत नेले तर युवराज पराक्रम गाजवतील व राजांच्या गळ्यातील ताईत बनतील मग तुमच्या राजारामांना आणि तुम्हांला वनवास, बाकी काय? सोयराबाई त्यांच्या जाळ्यात अडकल्या व त्यांनी कैकयीने जसा दशरथाकडे दोन मागण्या करुन पेचप्रसंग निर्माण केला त्याची पुनरावृत्ती केली.

शंभूराजांना मोहिमेवर नेऊ नये अन्यथा स्वराज्याचे दोन भाग करुन वाटून दयावेत अन्यथा आम्ही देहत्याग करु, अन्नपाणी वर्ज्य करु. सर्वसामान्यांच्या रक्ताने, घामाने उभे राहीलेल्या स्वराज्यांचे तुकडे करणे शक्य नव्हते आणि म्हणूनच शंभूराजांना दक्षिण मोहिमेवर न नेण्याचा निर्णय महाराजांना पटत नसतानाही घ्यावा लागला. तरुण राजपुत्राला रणांगणावर मर्दुमकी गाजवायची संधी दयाची नाही तर काय त्यांना कोंबडीसारखे महालात कोंडून ठेवायचे हे राजांच्या मनाला पटत नव्हते. पण पेचप्रसंग दांडगा व गृहकलहाला आमंत्रण देणारा होता. शिवाय महाराजांच्या गैरहजेरीत शंभू राजांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही महाराजांसमोर होता आणि रायगडावरील परिस्थिती विश्वास ठेवण्या योग्यतेची नव्हती.

म्हणून राजांनी निर्णय घेतला पण शंभूराजांना रायगडापासून दूर पाच हजार फौज मदतीला देऊन शृंगारपूरात ठेवण्याचा. शिवाय ऐनवेळी अचानक काही बिकट प्रसंग उद्भवलाच तर संभाजी राजांची तातडीने मदत करता यावी यासाठी हक्काची असणारी माणसे थोड्याच अंतरावर होती.

संभाजी राजांचे सासरे पिलाजी शिर्के १० हजार ठाणबंद फौजेसह याच प्रदेशात कायम वास्तव्याला होते. त्यामुळे हेच ठिकाण संभाजी राजांसाठी सुरक्षित आणि स्वराज्याची उपराजधानी किल्ले पन्हाळ्यापासून जवळच होते. कटकऱ्यांपासून युवराजांच्या जीवाला धोका होता हे राजांना माहित होते. म्हणून महाराजांनी एवढी खबरदारी घेतली. परंतु कटकारस्थानी कारभाऱ्यांनी पुन्हा एकदा शंभूराजांची कोंडी केली होती हे मात्र खरे!

- - - - - - - - - - -



मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी

राजे कर्नाटकाच्या मोहिमेवर निघताना शंभूराजांबरोबर बाहेर पडले. युवराजांशी अनेक विषयावर चर्चा करत शास्त्रीनदीपर्यंत प्रवास केला. रायगड युवराजांसाठी सुरक्षित नसल्याचा व युवराजांनी स्वराज्यातील माणसे ओळखण्याचा, वेचण्याचा उल्लेख करुन राजांनी शंभूराजांची समजूत घातली व मार्गस्थ झाले. पराक्रम करण्यासाठी पुढे सरसावलेले हात पुन्हा एकदा तोडले गेले. परंतू शंभूराजे शृंगारपुरात गप्प बसले नव्हते. युवराजांच्या जबाबदारीने ते वागत होते. राजांच्या गैरहजेरीत राजकारणाचे धडे स्वबळावर गिरवत होते. स्वराज्याची बांधणी मजबूत करत होते.

शिवरायांनी उभारलेल्या स्वराज्य मंदिराच्या कळसाला रुप देण्याचे कार्य ते करत होते. शंभूराजांनी कवी कलशांशी चर्चा करुन व्यायामासाठी पाच मोठे आखाडे बांधले. प्रभावळ व आसपासच्या प्रदेशातील तरुण पोरे गोळा केली. त्यांना तालिमबाजीचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. चेऊल, दाभोळ, राजापूर बंदरातून मजबूत घोडी विकत घेतली व नवीन अश्वदळ उभारण्याच्या कार्यास प्रारंभ केला. बारा बलुतेदार, अठरा पगड जातीतील सारे वीर गोळा केले. शृगांरपूरी अश्वदळ तयार केले. युवराजाचा हा कार्यक्रमही कारभाऱ्यांना आवडला नाही. शंभूराजांना पराक्रमाची संधीच मिळू द्यायची नाही व जर ती त्यांनी निर्माण केली तर हिसकावून घ्यायची असा बेतच त्यांनी ठरविलेला. रायगडावरुन कटकारस्थानी कारभाऱ्यांचा खलिता पोहोचला.

"थोरले महाराज कर्नाटकात असताना रायगडाच्या फडाची परवानगी न घेता फौज काय म्हणून बांधता?" स्वराज्यासाठी फौज महाराजांनी, युवराजांनी नाही बांधायची तर कोणी मुघलांनी बांधायची? स्वराज्य संवर्धनासाठी राज्याच्या भावी वारसाला फौज बांधण्यासाठी परवानगी घ्यावी लागणार! तीही कारकुनाची! या महाराष्ट्रात हो, हो, या महाराष्ट्रात. कारण कारकुनांची लेखणी वीरांच्या तलवारीपेक्षा प्रभावी, आगलावी असते म्हणून ! शंभूराजांनी खलित्यांचे उत्तर दिले. राज्याच्या हिताचा विचार युवराजांनी नाही करायचा तर कोणी करायचा? कारभाऱ्यांना उत्तर अनपेक्षित नव्हते. त्यांनी तिखटमीठ लावून ही गोष्ट राजांना कर्नाटकाला कळविली. शंभू राजे परवानगी न घेता फौज बांधीत आहे, ते रायगडावर आक्रमण करण्यासाठी!

आपल्या गैरहजेरीत खोट्या तक्रारी करुन कान भरण्याचे उद्योग महाराज कर्नाटकवरुन परत येईपर्यंत सातत्याने चालू होते.

शृंगारपूरात मुक्कामी असतानाच शंभूराजांनी "बुधभूषणम" नावाचा संस्कृत ग्रंथ लिहीला आणि याच ठिकाणी एके दिवशी दिलेरखानाचे शंभूराजांना दोस्ती करण्याच्या आमंत्रणाचे पत्र येते. पत्राचा मजकूर असा होता.

"राजाधिराज, शेर समशेर, संभाजीराजे भोसले एखादा मनुष्य जेव्हा यारी दोस्तीखातर आपला हात पुढं करतो, तेव्हा त्याच्या मनातील दुश्मनीची जळमटे जळून खाक होतात, हे आपल्यासारख्या शायर असलेल्या मराठ्यांच्या शहजाद्याला आम्ही अलाहीदा काय सांगावे? मात्र आपण याचाही पक्का खयाल ठेवा की, कमळाची टपोरी फुले फक्त तालावातच फुलतात. शेरचा बछडा अरण्यातच खुलून दिसतो. त्याच हिसाबानं आम्ही आपणास सवाल करु चाहतो की, मराठ्यांच्या राज्याचे नेक शहजादे असताना आपण शृंगारपुरच्या त्या अंधाऱ्या गुफेत स्वतःला कोंडून काय करता आहात?

आपण आपल्या हक्काच्या रायगडाला महरुम झाला आहात. शेर शिवाजीसारख्या वालीद मिळूनही आपण मायेला यतीम झाला आहात. तुमच्या दिलाची धडकन आम्ही जाणून आहोत. आजवर आपण फक्त मोगलांच्या दुश्मनीबद्दल ऐकले असेल, दोस्तीबद्दल नाही. आमचं दिल साफ नसतं तर राजपुताच्या तीन तीन पिढ्या आमच्याशी दोस्ताना कशाला ठेवला असता? म्हणूनच तुम्हांस खुल्या दिलाने अर्ज करतो की, मनामध्ये आंदेशा ठेवू नका. आमची दोस्तीची पेशकश ठोकरु नका, आपणास कोणतीही मुसिबत आल्यास आमच्याकडे तातडीने हरकारे पाठवा, आम्हाला अर्ध्या रात्री उठवा. उमरकी और तजुरवेकी पर्वा किये बैगेर ये बंदा आपकी खिदमतमें हाजीर हो जायेगा."

युवराजांनी हे पत्र वाचले व त्याचे त्यांना हसू आले. दोन दिवसांनी त्यांनी दिलेरखानाला पत्राचे उत्तर पाठविले, त्यांचा आशय खालील प्रमाणे होता.

"आपण पढतमूर्ख आहात, म्हणूनच पेडगावला राहता ते फारच चांगलं! वळचणीचं पाणी पुन्हा आढ्यावर चढणं अशक्य, सरितेने सागर कवेत घ्यायचा सोडून पुन्हा सर्पासारखा आपल्या उगमाकडे उलटा वळसा घेणं जसं अशक्य, तशीच मोगली सुभेदारानं शिवाजीच्या पुत्राशी दोस्ती करायची अभिलाषा बाळगणं, हे मूर्खाचं नव्हे तर शतमूर्खाचं लक्षण आहे!"

शंभू राजे शृंगारपूरात ज्या ठिकाणी राहत होते, त्या महालाच्या मागे अनेकदा

हळदीकुंकु लावलेले लिंबु, सुया टोचलेले बिब्बे, काळ्या बाहुल्या अशा अशुभ वस्तू नेहमी कोणीतरी जाणवपूर्वक ठेवत होते. यावरुन कोणीतरी करणी करत असल्याची राजाची खात्री झाली. शिवाय एकदा राजे घोड्यावरुन रपेट मारत असताना चालता घोडा अडखळून पडला व जागेवरच मृत्यूच्या दाढेत गेला. बदफैलीचे खोटे आरोप, कारकुनांची कारस्थाने, त्यामुळे होणारी मनाची कोंडी या सर्वापासून मुक्ती मिळावी म्हणून राजांनी कलशाभिषेक केला. पण कारकुनांनी अफवा उठवून दिली राजांना गादीवर बसण्याची घाई झाली म्हणून त्यांनी कलशाभिषेक केला, नाहीतर राजा जिवंत असताना शंभूराजांनी कलाशाभिषेक कशासाठी केला? महाराजांच्या मृत्यूसाठी शंभूराजांनी अभिषेक करुन घेतला असा कांगावा करत तशा आशयाची पत्रेसुद्धा थोरल्या महाराजांना कारभाऱ्यांनी पाठवून दिली. राजांच्या व जनतेच्या मनातून शंभूराजांना उतरविण्यांचा डाव खेळला जात होता. शंभूराजांना मानसिकष्ट्या खचविले जात होते. आता तर राजांना या सर्व गोष्टीची उबग येऊ लागली होती. दररोज काहीना काही तक्रारी राजांकडे जात होत्या. ज्या चुका शंभूराजांनी केल्याच नव्हत्या, त्या चुकांचे खलीते एकामागे एक राजांकडे जात होते.

एके दिवशी संगमेश्वरात राजांची काही शेतकऱ्यांनी भेट झाली. बिचारे खूप खंगले होते. पीक पिकत नव्हते व रायगडावरुन शेतसारा भरणा करण्याचे फर्मान आले होते. गरीब शेतकऱ्यांना ते शक्य नव्हते. शंभूराजांनी त्यांचा शेतसारा माफ केला व तसे फडावर कळविले. परंतू काही दिवसांनी रायगडावरुन एक पथक त्या शेतसारा माफ केलेल्या शेतकऱ्यांच्या घरावरुन गेले व जप्त्या केल्या. युवराजांचा निर्णय फिरवला गेला. गरीब जनतेच्या पाठीत कारभाऱ्यांनी खंजीर खूपसला. शंभूराजांनी कवीराजांना ताबडतोब एक हजार स्वार दिले व जप्ती करण्याऱ्या राहुजी सोमनाथाच्या कारभाऱ्याला धरुन आणून चांगले चार-पाच दिवस उपाशी ठेवून, गरीब शेतकऱ्याचे पोट आणि त्याची अडचण काय असते ते दाखवून दिले.

शिवरायांच्या स्वराज्यात गोरगरीबांची जप्ती करणाऱ्यांना धडा शिकवणारा कोणीतरी आहे याचा गरीब जनतेला अनुभव आला व त्यांनी स्वराज्याचा योग्य वारसदाराचा आपल्या मनात राज्याभिषेक केला तो कायमचाच. आनंदाच्या अश्रूंनी व उपकारीतेच्या फुलांनी !

काही दिवसांनी पुन्हा दिलेरखानाचे शंभूराजांना पत्र आले. राजांच्या दोस्तीला खान खूप आतूर झालेला दिसत होता. पत्राच्या मजकूर असा होता,

"रुस्तम-ए-दख्खन संभाजीराजे!

मेहेरबानी करा. आमच्या शिबिरामध्ये दाखल व्हा. पातशहा औरंगजेब गाझी आहे. त्याला सह्याद्रीसह पुरा दख्खन जिंकायचा आहे. गुस्ताखी माफ, आपल्या शाही खानदानाच्या मामल्यामध्ये आम्हांला नाक खुपसण्याचा अधिकार नाही. पण तरीही आम्ही आपल्या दिलाचा दर्द जाणतो. तुमच्या पित्याची खरी मोहब्बत सोयराबाई आणि राजाराम यांच्यावर आहे. फडावरचे सारे कारकून, दरकदार तुमच्यासारख्या मर्द छाव्याला दुश्मनीच्या निगाहाने देखतात. म्हणूनच तुमच्या त्या लंगोटाएवढ्या रियासतीचा शहजादा म्हणून अपमानीत मनानं मिरवण्याऐवजी आलमगीरांकडे या. आमच्या दोस्तीचा हात पकडा. आज ना उद्या आलमगीर-साहेबांची स्वारी दक्षिणेत येईल. तुमची आणि आमची किस्मत एकदम रोशन होऊन जाईल."

शंभूराजांनी पत्र गंभीरतेने वाचून काढले व ताबडतोब त्याचे अस्सल मराठी बाण्याचे उत्तर पाठवून दिले.

"खानसाहेब, आम्हांस आपलं मानून आपण सातत्यानं आमच्याविषयी जी चिंता प्रकट करता त्याबद्दल खरं तर अल्लाचेच आभार मानायला हवेत. आमचा राजपरिवार गृहभेदाने दुभंगल्याबाबत जी आपणास खबर प्राप्त झाली आहे, ती सत्यच आहे. मात्र त्यामुळे आपण अधिक आनंदित व्हायचं काहीच कारण नाही. आमचे आबासाहेब केवढ्या भरवशानं परमुलाखत निघून गेले आहेत. त्यांच्या माघारा त्यांच्याशी गद्दारी करुन ही दौलत आपल्या झग्यामध्ये टाकू म्हणता? असं गैरकाही आमच्या हातून घडणं म्हणजे मेरे प्यारे दिलेरभाई, रावणाची मदत घेऊन श्रीरामानेच दशरथाविरुद्ध बगावत करणं! खानसाहेब शिवरायांसारखा पिता दैवी कृपेमुळं लाभला असताना, त्या वटवृक्षाची थंडगार सावली सोडून तुमची सोन्याची लंका आम्हांला हो काय करायची?"

– – – – – – – – – –

दिलेर खानाच्या छावणीत

मग शेवटी करायचे तरी काय? निणर्य झाला आता स्वस्थ बसणे शक्य नव्हते. नदीचा प्रवाह एका जागीच थांबला तर पाण्यात किडे पडतात. शिवाय ती समुद्राला मिळण्यापासुन वंचित राहते. तिच्या पात्राला मर्याद पडतात. पराक्रमी पुरुषाच्या बाबतीतही हेच संभवते आणि म्हणुनच इथे पराक्रमाची शर्त करण्याची संधी मिळत नसेल तर दुसरीकडे शोधायला काय हरकत? सरळ मोघलांच्या पोटात घुसू. पराक्रम गाजवु तिही लोकात झेंडा उभारु आणि गनीमाचे पोट फाडुन बाहेर येऊनच भव्य दिव्य पराक्रम करुन जगाला शिवपुत्राची ओळख पटवुन देऊ. निर्णय झाला.

शंभु राजे दिलेर खानाला जाऊन सामिल झाले. दिनांक ३ डिसेंबर १६७८ शिवाजी महाराजांच्या रणनितीप्रमाणे संभाजी राजांची वाटचाल सुरु होती. शत्रुला शत्रुशी भिडवुन स्वराज्य वाढते ठेवावे हीच ती रणनिती.

पुरंदरच्या तहाच्या वेळी कलम तय झाले होते. त्याप्रमाणे शंभु राजांनी मोघलाईत चाकरी करायची त्यानुसार त्यांना वयाच्या ८ व्या वर्षी पंचहजारी मनसबदार बनविले गेले. सोबत नेताजी पालकांसारखी जबाबदार माणसेही होती. शिवाजी राजांनी आठ वर्षाच्या शंभु बाळाला मोघलाईत जाऊन काय करायचे याचे संपूर्ण दिग्दर्शन देऊन ठेवले होते. तेथेच मोघलाईत जाऊन औरंगजेबाचा शहजादा शहा आलम याच्याशी चांगली घट्ट मैत्री करुन वेळ पडल्यास त्यालाच स्वराज्यात सामिल करुन घ्यायचे अन्यथा बादशहा विरुध्द बंड करायला बळ देऊन मोघलाईत फुट पाडायची.

शहाआलमच्या साथीने सरळ दिल्लीच्या तक्तावरच घाव घालायचा असा तो डाव परंतु शंभु राजे त्यावेळी खुपच लहान असल्याने हे कार्य तडीस गेले नव्हते. आता तोच शहाजादा शहाआलम पुन्हा संभाजी राजांच्या संर्पकात येत होता. अभयदान देत होता. हाच धागा पकडुन संभाजी राजांनी पुर्वीचा अर्धवट राहीलेला डाव पुढे खेळायचा निर्णय घेतला. या सर्व बाबतीत शिवाजी महाराजांचा विरोध होता असे त्या दरम्यान कुठेही आढळून येत नाही. म्हणुन या सर्व योजनेला शिवाजी महाराजांचे पाठबळ नव्हते असे म्हणणे या ठिकाणी थोडेसे धारीष्ठ्याचे वाटते.

कारभारी आणि युवराज यांच्यात संघर्षाची ठिणगी पडू नये असा महाराजांचा बेत असावा आणि त्याचवेळी मोघलाई फोडण्याचा गुप्त हेतुही असावा असे वाटते. अन्यथा संभाजी राजांच्या या हालचाली शिवाजी राजांना न कळण्या इतपत त्यांचे हेरखाते बेसावध होते असे म्हणायला वाव मिळतो. परंतु बर्हिजी नाईकांच्या नेतृत्वामध्ये असलेले हेर खाते एवढे ढिसाळ असल्याची शक्यता नाही. किंबहूना हे सर्व जाणिवपुर्वक केले जात असावे. मोघलांच्या मनात संभाजी राजांविषयी आपुलकी, विश्वास निर्माण व्हावा अशी कदाचित यामागची भूमिका असावी आणि म्हणुनच कर्नाटकाहुन परत आल्यावरही कदाचित सहा सात महिने शिवाजी राजांनी शंभु राजांना प्रत्यक्ष भेट मिळणार नाही किंवा भेटावयास बोलावीले जाणार नाही असे चित्र निर्माण केले गेले. शत्रूला पुर्ण गाफिल ठेवले गेले. सर्व पत्रव्यवहार अगदी गुपचूप झाला असावा.

आपण पन्हाळ्याकडे येण्याऐवजी सज्जनगडावर जावे व रामदास स्वामी यांचे सोबत थोडे दिवस घालवावेत असा महाराजांनी पत्राच्या शेवटी दिलेला संदेश नक्कीच गोंधळ निर्माण करतो. कारभाऱ्यांना गाफिल ठेवण्याचा तो भाग असु शकतो. अन्यथा पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे शंभु राजे सज्जन गडावर जातात परंतु अनेक दिवस (जवळपास एक महिना) वाट पाहुनही रामदास स्वामींची भेट का होवु शकली नाही? का राजांना समर्थकांचा पत्ता माहित नव्हता, किंवा त्यांच्या शिष्यांनाही याबबत माहिती नसावी असे कसे होऊ शकेल. कदाचित या ठिकाणी महाराजांनी आणि शंभु राजांनी गुप्तपणे सर्व काही ठरविल्याप्रमाणे वाटते.

अन्यथा दिल्लीत, आदिलशाहीत, कुतुबशाहीत, गोव्यात, मुंबईत काय घडते याची पुरेपुर खबर ठेवणाऱ्या जाणत्या राजाला आपल्या युवराजाच्या हालचाली, दुःख कळत नव्हते असे म्हणणे योग्य होवु शकत नाही आणि म्हणुनच शिवाजी राजांच्या सल्यानेच शंभु राजे दिलेर खानाला जाऊन सामिल झाले असावेत अशा तर्कापर्यंत येऊन पोहोचावे लागते. कारण याच शंभु राजांच्या जिवाला मोघलाईत (दिलेर खानाच्या छावणीत) धोका निर्माण झाल्याचे महाराजांना ताबडतोब कसे कळले होते?

त्याचप्रमाणे राजांनी या संपूर्ण गोष्टींची योग्य वेळेत माहिती विजापुरकरांनाही दिली होती व संभाजी राजांना गरज पडल्यास तिकडच्या अंगाने तशी मदत मिळावी अशीही व्यवस्था केली होती. शिवाय सेनापती हंबीरराव मोहिते, ज्योत्याजी केसरकर, रायप्पा व इतर जिवलगांचे संभाजी राजांच्या हालचालीवर सतत नजर ठेवणे व त्यांना पुढे येणारे धोके यांची सुचना या सर्वांकडे येणे येथुन ती संभाजी राजांना व्यवस्थीतपणे

अचुक वेळी पोहोचणे या सर्व गोष्टी या तर्काला पुष्टीच देतात. अन्यथा मराठ्यांचा छावा मोघलाईत शामिल होणे शक्यच नाही. वाघाचा बछडा भेड बकरीमध्ये शोभुन दिसेल का? मोठी शिकार करण्याचाच तो बेत असावा.

पुढे संभाजी राजांनी शहजादा शहाआलम, दिलेर खान तसेच पोलाद खान यांच्याशी कायम संबंध ठेवल्याचे उघड झाल्यानेच औरंगजेब बादशहाने आपला पुत्र शहा आलम याला दक्षिणेच्या मोहिमेवरुन बरखास्त केले. तर दिलेरखानाबाबतचा संशय अगदी पक्का झाल्यावर आणि आपले बींग फुटणार हे निश्चित झाल्यावर दिलेर खान व पोलाद खानाने केलेली आत्महत्या या सर्व गोष्टी संभाजी राजे शिवाजी महाराजांच्या योजनेनुसार मोघलाई मध्येच फुट पाडत होते या तर्काला पुष्टी देतात. कारण शिवाजी महाराजांना आग्र्याहुन निसटून जाण्यासाठी पोलाद खानानेच मदत केल्याचा बादशहाचा संशय होता.

या सर्व गोष्टी शिवाजी महाराजांनी मोघलाईतील काही सरदार आपल्याला सामिल करुन घेतले होते व त्यामुळेच शिवाजी महाराजांना अनेकवेळा औरंगजेबावर मात करण्यात आली. त्याचीच पुर्नरावृत्ती करण्याचे काम संभाजी राजांनी केले. अन्यथा जवळपास अकरा महिने संभाजी राजे दिलेर खानाच्या छावणीत असुनही ना दिलेर खानाने संभाजी राजांना दगा फटका केला ना संभाजी राजांना औरंगजेबाच्या ताब्यात दिले. त्यामुळे संभाजी राजे काही दिलेरखानाच्या मेजवाण्या झोडण्यासाठी गेले नव्हते किंवा संभाजी राजे दिलेर खानाचे पाहुणेही नव्हते.

शिवाय अकरा महिन्यात दिलेर खानाने किंवा मोघलांनी एकदाही स्वराज्यावर हल्ला केला नाही. अपवाद फक्त भुपाळ गडचा. तोही मराठ्यांनी फक्त पंधरा दिवसातच परत घेतला. शिवाय मोघलांची ही टोळधाड शिवाजी महाराज कर्नाटक मोहीमेवरुन परत येईपर्यंत संभाजी राजांनी रोखुन धरली आणि त्याचवेळी त्यांनी आदिलशाही मुलखावर दिलेरखानाच्या नेतृत्वामध्ये आघाडी उघडली.

शिवाजी राजे त्यावेळी भागा नगरच्या दौऱ्यावर व दक्षिण दिग्वीजयाच्या मोहिमेवर होते. जवळपास सव्वा दोन वर्षे शिवाजी महाराज स्वराज्याबाहेर होते आणि अशा प्रसंगी संभाजी राजांनी शिवाजी महाराज परत स्वराज्यात दाखल होईपर्यंत मोघलांना रोखुन धरले. हाच तो पुरावा आणि यावरुनच आपणास असे म्हणता येईल की संभाजी राजे मोघलांना जाऊन मिळाले होते ते स्वराज्य वाचण्यासाठी बुडविण्यासाठी नव्हे! आणि शिवाजी महाराजांवर नाराज होऊन तर कदापि नाही.

- - - - - - - - - - -

...आणि बेत फसला

ठरल्याप्रमाणे शंभु राजे मोघलाईत जाऊन सामिल तर झाले परंतु ज्या उद्देशाने हे धाडस केले ते कार्य मात्र पुर्णपणे सिद्धीस जात नव्हते. दिलेर खान खुपच सावध आणि हुशार होता. त्याने संभाजी राजांच्या अवतीभोवती गुप्तहेर पेरुन ठेवले होते. शिवाय राजे कधी फिरण्याच्या बहाण्याने बाहेर पडले तर तो संरक्षणाच्या नावाखाली शेकडो स्वार राजांच्या मागे पुढे ठेवायचा.

संभाजी राजे काहीतरी गडबड करतील अशी त्यास खास भिती वाटत असावी. संभाजी राजांना या सर्व गोष्टींची अपेक्षा नसावी म्हणुन ते वैतागुन बोलले, "खान साहेब आम्ही आपले मेहमान आहोत कि बंदीवान?" यावर दिलेर खानाने अत्यंत सावध उत्तर दिले "राजे आपण शहजादे आहात सामान्य पाहुणे नाहीत. आपल्या सुरक्षेची काळजी घेणं आमच कर्तव्यच समजतो आम्ही." संभाजी राजांसारखे हाताला लागले रत्न गमावीणे म्हणजे मुर्खपणा ठरला असता याची दिलेर खानाला जाणिव होती. म्हणुच तो अत्यंत चौकस व सावध होता.

संभाजी राजांना त्यांनी बहादुर गडा सारख्या अभेद्य किल्यावर आश्रयाला ठेवले. गड विस्तीर्ण जवळपास सहाशे एकरात पसरलेला व मजबुत होता. शिवाय दुरपर्यंत सपाट मुलुख. मराठ्यांचा गनिमी कावा हे हमखास हत्यार या ठिकाणी चालण्याची शक्यता कमीच म्हणुन त्याने संभाजी राजांच्या पाहुणचारासाठी बहादुर गड निवडला. ३५ हजार पाहुणे मंडळी सोबतीला ठेऊनच. एका शंभु राजांसाठी एवढे पाहुणे गोळा केलेले. किती जागसुद होता दिलेर खान संभाजी राजांबाबत ते यावरुन दिसुन येते.

परंतु औरंगजेब शिवाजी महाराजांच्या रणनितीचा अभ्यासक असल्याने त्याने ती रणनिती उलटविण्याचा बेत आखला. दिलेर खानास पत्र पाठवुन सख्त आदेश दिला. "संभाजी राजे आपल्या सोबत आहेत त्यांना आघाडीवर ढालीप्रमाणे वापरा. मराठ्यांच्या, विजापुरकरांच्या, गोवळकोंड्याच्या प्रदेशावर हमला करावा. मुलुखगिरी करण्यासाठी संभाजी राजांना सोबत घ्या व गनिमांचे जास्तीत जास्त नुकसान करा."

बादशहाच्या या आदेशामुळेच स्वस्थ बसलेल्या दिलेरखानाने जवळचाच मराठयांचा किल्ला निवडला भुपाळगड. किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आणि संभाजी राजांना आघाडीवर ठेऊन जिंकायचा असा बेत दिलेर खानाने आखला. मराठ्यांच्या मुलखावर हल्ला आणि तोही संभाजी राजांच्या नेतृत्त्वामुळे हे शक्य नव्हते. संभाजी राजांनी दिलेर खानाला स्पष्ट सांगितले तिकडे (मराठ्यांच्या मुलखाकडे) फिरकायची आमची इच्छा नाही.

शिवाजी महाराजांची बदनामी करणे व मराठ्यांच्या राजपुत्राचा वापर करुन मोघलाईचा लाभ करुन घेणे अशी दुहेरी योजना स्वतः बादशहाने दिलेर खानाला दिली होती. त्यामुळेच दिलेर खान आपली भूमिका बदलायला तयार नव्हता. जबरदस्तीने शंभु राजांच्या मना विरुध्द तो संभाजी राजांना बादशहाच्या हुकुमानुसार भूपाळ गडाच्या मोहीमेवर घेऊन गेला. परंतु साप्रंद प्रसंगी दिलेर खानापुढे दुसरा पर्यायही नव्हता. भुपाळ गडाचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा खुप शुरपणे लढला. चाकणसारखा वीतभर भुईकोट किल्ला शाहिस्तेखानाला जिंकण्यासाठी तब्बल ५६ दिवस झुंजविणारा हाच तो फिरंगोजी नरसाळा. संभाजी राजांच्या गुप्त आदेशानुसार त्याने किल्ला लढविण्याचा बनाव इमाने इतबारे रचला.

संभाजी राजे खरोखरच लढत असल्याचे चित्र निर्माण केले गेले. पुढे मोघलांच्या अव्वल तोफ खान्यापुढे किल्ला जास्त वेळ टिकाव धरु शकला नाही. शेवटी किल्ला पडला व सातशे मराठे कैद झाले. कैद झालेल्या त्या सातशे मराठ्यांनी समोरुन जाताना युवराजांना लवुन मुजरा केला होता. कदाचित शंभु राजांची अडचण त्यांच्या मनाला माहित असावी शंभु राजांनी दिलेर खानाला ताबडतोब बजावले या मराठ्यांना बंदीवासाशिवाय अन्य कोणतीही शिक्षा होता कामा नये.

परंतु दिलेर खानाने ऐकले नाही राजांना गाफिल ठेवुन त्याने मराठी बंदींचे एक एक हात व पाय तोडले. जनावरापेक्षाही जास्त विटंबना केली होती खानाने मराठ्यांची. लोकांना वाटावे शंभु राजांच्या देखत सगळे झाले असा दाखविण्याचा तो प्रयत्न होता. पण राजांना याची कसलही भणक लागु न देता शिक्षेची अंमलबजावणी झाली होती. शंभु राजांना दिलेर खानाचा खुप राग आला होता. दिलेर खानाने असा काही प्रकार केल्याचे कळल्यावर तडख तसेच ते घोड्यावर स्वार झाले व दिलेर खानाच्या गोटावर जाऊन आदळले. गर्जना केली, "हराम खोर दिलेर खान बाहेर ये." बाहेर दोन हजार शिपायांचा बंदोबस्त असुनही दिलेर खान बाहेर येण्यास घाबरत होता. यावरुनच दिलेर खानाने संभाजी राजांच्या गैरहजेरीत माणुसकीला काळीमा फासणारा तो शिक्षेचा

कार्यक्रम राबविला होता हे सिद्ध होते.

सिंहाने लांडग्याला ललकारल्यावर लांडगा जसे बिळात लपुन बसतो तशी खानाची अवस्था झाली होती. खवळलेल्या सिंहाला सामोरे जाण्याची त्याची हिंमत होत नव्हती. संभाजी राजांच्या उपस्थितीत मराठ्यांचे अशा प्रकारे हाल पाहुन संभाजी राजे दिलेर खानाच्या नरडीचा घोट घेण्यास तयार झाले होते. संभाजी राजे जर खरोखरच दिलेर खानाला सामिल झाले असते तर मराठ्यांच्याबाबत झालेल्या प्रकाराने ते एवढे पेटून उठणे शक्य नव्हते. संभाजी राजे मराठ्यांच्या हिताबाबत जागसुद होते यावरुन हे सिद्ध होते. परंतु ही घटना राजांच्या मनाला खुपच लागली. राजे खुप निराश झाले. औरंगजेबाच्या ऐनवेळीच्या हस्तक्षेपामुळे दैवाचे फासे उलटे पडत होते. राजे अनेकवेळा एकांतात रडत होते. ज्या ठिकाणी हे घडले त्या ठिकाणी धसमसुन कित्येक वेळा रडले होते.

इकडे दिलेर खान बादशहाला पुन्हा पुन्हा अर्ज पाठवित होता. "जहांपनाह मेहरबानी करा संभाला मराठयांचा शहंशहा घोषित करा बाप बेटयात बेबनाव निर्माण करा. मराठ्यांच्या सल्तनतचे तुकडे करा. संभाजीला चाहणारे त्याच्या पाठीशी उभे राहणारे भरपुर मराठे शिवाजींच्या फौजेत आहेत. त्यांना फुस देण्यासाठी दुही निर्माण करण्यासाठी संभाजीला मराठ्यांचा शहंशाह घोषित करा." कदाचित दिलेर खानाला शिवाजी महाराजांची योजना माहीत पडली होती असे वाटते. त्यामुळेच नेमकी तीच रणनिती वापरुन संभाजी राजांना स्वराज्याच्या विरोधात उभे करण्याचे प्रयत्न दिलेर खान करु पाहत होता.

स्वराज्यात फुट पडल्याचे भासवून गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न दिलेर खान जाणिवपुर्वक करीत होता. शिवाजी महाराजांच्या मुत्सदेगिरीला तशाच मुत्सद्देगिरीने मात देण्याचा दिलेर खान प्रयत्न करीत होता. अर्थात या सर्व गोष्टी स्वत: औरंगजेबाने दिलेरखानाच्या लक्षात आणुन दिल्या नंतर. अन्यथा एवढे महिने तो संभाजी राजांसोबत एवढया आपुलकीने व विश्वासाने राहीला नसता.

- - - - - - - - - - -

स्वराज्याकडे

भुपाळ गडच्या प्रसंगाने संभाजी राजे खुपच दुःखी झाले होते आणि आता तर औरंगजेबाने दिलेर खान संभाजीच्या बाबतीत कडक भुमिका घेत नाही हे लक्षात घेऊन औरंगबादवरुन खास ५ हजाराची फौज संभाजी राजांना कैद करण्यासाठी दिलेर खानाच्या छावणीकडे पाठवुन दिली. दिलेर खान स्वतः संभाजी राजांना कैद करीत नव्हता ही गोष्ट खुपच संशय निर्माण करणारी आहे.

परंतु आज ना उद्या औरंगजेबाच्या दबावामुळे संभाजी राजांना कैद व्हावे लागणार होते आणि संभाजी राजांच्या जिवीत रक्षणासाठी कायम सावध असलेल्या शिवाजी महाराजांना याची वेळेत खबर मिळाली व त्यांनी ती खबर ताबडतोब संभाजी राजांना पोहोचवली. त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची जाणिव करुन दिली. आता दिलेर खानाच्या छावणीतुन बाहेर पडण्याची योग्य वेळ आल्याचे संकेत दिले.

आपल्या पुढील हालचालीची चाहुल संभाजी राजाला लागली असावी अशी राहून राहून दिलेर खानाला शंका येत होती. आणि त्यामुळेच त्याने तशी व्युह रचना करुन भरारी घेण्याच्या तयारीत असणाऱ्या गरुडाचे पंख कापण्याचा प्रयत्न सुरु केला होता. संभाजी राजांसोबत आलेल्या दानेशे मराठ्यांची फारकत केली होती. त्यांच्या जवळची घोडी काढून घेवुन जप्त केली होती व त्यांना बंदीवान बनवीले गेले होते. संभाजी राजांच्या पलायनास मदत करु शकणारे सारे वीर बंदीस्त केले गेले.

दिलेर खानाच्या या हालचालींचा एव्हाना शिवाजी राजांना अंदाज आला होता. त्यामुळे एक गुप्तहेर रायगडावरुन लपतछपत नाना सोंगे घेत ताबडतोब संभाजी राजांना भेटुन आला. राजांचे पत्र युवराजांच्या स्वाधीन केले. युवराजांच्या जिवाला धोका असल्याचे व त्यांनी लवकरात लवकर माघारी यावे असा त्यात उल्लेख होता. शिवाय हे काम थोडे अवघड होते हे शिवाजी महाराज जाणुन असल्याने त्यांनी तसे विजापुरकरांनाही सावध करुन संभाजी राजांना वेळ पडल्यास मदत करण्याचे कळवीले होते. शिवाय हंबीरराव मोहीतेही संभाजी राजांच्या मदतीसाठी अथनी व जवळपासच्या जंगलात गुप्तपणे सैनिक पाठवुन तयारीत होते. कोणत्याही प्रकारे आता

दैवाचे उलट पडलेले फासे सरळ करायचे होते. राजपुत्राला मगरीच्या जबड्यातुन सुरक्षित बाहेर काढायचे होते.

आणि पक्की खबर मिळाली कवि कलश व ज्योत्याजी केसरकरांचा गुप्त खलिता राजांना पोहोचला. राजांच्या जिवाला धोका असल्याची वार्ता मिरज व रहीमतपुरच्या ठाण्यावर पोहोचली होती. "आपणास केव्हाही कैद होऊ शकते म्हणुन तातडी करा, भरारी घ्या." पुढे दोन तीन रोजांनी बहादुर गडावरुन एका विश्वासू मनुष्याचा गुप्त खलिता राजांना पोहोचला. खान मिया खान याने पाठविला होता तो खलिता.

"आपणास कैद करण्याचा बादशहाने आदेश सोडला आहे व त्याप्रमाणे आपणास येत्या दोन चार दिवसात कैद करण्यसाठी औरंगाबादहुन पाच हजारांचे शाही पथक रवाना होत आहे. तरी ताबडतोब दिलेरखानाच्या तावडीतुन निसटण्याचा बेत आखावा." एवढ्या सगळ्या जणांचे खलीते संभाजी राजांना पोहोचले याचाच अर्थ असा होता की संभाजी राजांवर स्वत: शिवाजी महाराज व त्यांचे अनेक यार दोस्त मंडळींचे लक्ष होते. त्यांच्याबाबतीत ते जागरुक होते. त्यामुळे कोणालाही न कळविता संभाजी राजे मोघलांना सामिल झाले असे म्हणावयास वाव मिळणे अवघड जाते. महाराजांची ती योजनाबद्ध रणनिती असावी असेच या सर्व लोकांनी एकाच वेळी पाठविलेल्या पत्रांवरुन वाटते.

आता येथुन फरार होण्याची वेळ आली होती. आग्र्यात जशा बादशहाच्या हातावर तुरी दिल्या होत्या. त्याचप्रमाणे आता दिलेर खानालाही चकवायचे होते. संभाजी राजे संधी शोधत होते. उशीर करणे परवाडणारे नव्हते. येत्या दोन चार दिवसात हालचाली करणे आवश्यक होते. अन्यथा मगरीच्या पोटातच शिवपुत्राचा अंत होणार होता. स्वराज्याच्या मंदिराचा कळस हरवणार होता. म्हणुनच सर्वांनी चहुबाजूंनी नेटाने प्रयत्न चालविले होते. प्रयत्न शेवटच्या टप्प्यात आले होते. फक्त अंमलबजावणीचीच काय ती देर होती.

- - - - - - - - - - -

मुनासिब चाचा

दिलेर खानाने आता आपला मोर्चा पन्हाळ्याकडे वळवीला होता. संभाजी राजांना तो कायम आपल्या नजरे समोर ठेवत होता. थोडीशीही हलगर्जीपणाची शक्यता तो शिल्लक ठेवत नव्हता. कारण दोन दिवसात संभाजी राजांना कैद करणारे औरंगजेबाचे शाही पथक येऊन पोहोचणार होते तो पर्यंत वेळ मारुन न्यावयाची होती.

प्रवासात एके ठिकाणी संभाजी राजांना एका तळ्याकाठी जुने शिव मंदीर दिसले तेंव्हा येथे थांबुन थोडे देवाचे दर्शन घेऊन थोडी पुजा अर्चा करावयाची असल्याने आपण तेवढी परवानगी दयावी अशी दिलेर खानास विनंती केली. खानालाही दुपारच्या विसाव्यासाठी थांबावयाचे होते त्याने तशी परवानगी दिली. संभाजी राजे आपले खासगी सेवक घेऊन तळ्याकडे गेले देवाला नमस्कार करुन तलावात आंघोळीसाठी उतरले आपल्या सेवकांनाही तसाच आग्रह केला.

खानाची गस्तीची पथके आजुबाजूला कडा पहारा देत होती. त्याच तळयात पाच गोसावी स्नान करीत होते व ते जय शंभु! जय शंभु!! असा मोठ्याने उच्चार करीत होते. दबक्या आवाजात शिवा का शंभु! शिवा का शंभु!! म्हणत होते. राजांनी सहज तिकडे लक्ष दिले आणि अंगात विजच चमकली. त्या पाच गोसाव्या मध्ये एक ज्योत्याजी तर दुसरा रायप्पा होता. दोघेही जीवलग मित्र राजांसाठी वेशांतर करुन तयारीत होते आपल्या मित्राला घेवुन फरार होण्यासाठी. मंदीरामागे पाच घोडी व टेकडीमागे फक्त पन्नास वेगवान घोडी तयार ठेवली होती. एवढ्यावरच जोखिम घेऊन बेत तडीस न्यावा लागणार होता. राजांनी बराच वेळ पाण्यात मोठ-मोठ्या डुबक्या लावल्या व गायब झाले अगदी क्षणाचीही उसंत न घेता.

इकडे खानाच्या गोटावर शोककळा पसरली सगळा गोंधळ उडाला. तेवढ्यात खानाच्या आदेशाची वाट न बघता बालेखान हा विजापुरी सरदार आपल्या सोबतच्या पाच हजार स्वारासह राजांच्या पाठलागासाठी जंगलात घुसला. त्याचा मुनासिब चाचा मात्र निर्धास्त होता व बिनधास्तपणे हसत होता. खानाला याचा राग आला आणि का हासता म्हणुन विचारले तर मुनासिब चाचा सांगतात "तो संभा बावळट आहे फक्त पाच घोडेस्वार त्याच्या मदतीला आहेत त्याच्या बळावर फरार होण्याचा प्रयत्न करणे म्हणजे बेवखुफी नाही तर काय म्हणावे?"

मुनासिब चाचाने घोडयाला टाच मारली व तो आपला पुतण्या बालेखानाकडे

धावला. ज्या अंगाने संभाजी राजे फरार झाले होते त्याच बाजुला. बराच वेळ पाठलाग करुनही बालेखानाला व त्याच्या सहकाऱ्यांना संभाजी राजे सापडत नव्हते. दुपारी सुरु झालेला पाठशिवणीचा खेळ सायंकाळ पर्यंत चालु होता. परंतु बालेखान पाठलाग काही सोडत नव्हता. शेवटी राजांसोबत असलेले पंचावन्न सोबती व बालेखानाचे पथक यांच्यात चकमक उडालीच. संभाजी राजांचे अर्धे अधिक सोबती गतप्राण झाले.

संभाजी राजांचीही काही लोकांशी प्रत्यक्ष चकमक उडाली. राजेही अनेक ठिकाणी जखमी झाले सर्व अंग रक्ताने माखले गेले आणि अखेरीस शत्रुचा जोर आणि लोंढा एवढा जबरदस्त झाला की राजांना कैद झाली. ते बालेखानाच्या तावडीत जिवंत सापडले. बालेखानांनी त्यांना करकच्चुन बांधले व तो राजांच्या थोबाडीत मारु लागला शिव्या देऊ लागला जोराने भांडू लागला.

तेवढ्यात मुनासिब चाचा तेथे पोहोचला व घोड्यावरुन उडी घेतच बालेखानाला थांब थांब असे ओरडून सांगु लागला. निसरडा कडा भाल्याच्या आधाराने उतरत उतरत तो बालेखनाला थांबण्याचा इशारा करीत होता. परंतु बालेखान संभाजी राजांना शिव्या शाप देत त्यांची दाढी जोरात ओढत होता. म्हणुन संभाजी राजे त्याच्या तोंडावर थुंकले तसा त्याला जबरदस्त राग आला व त्याने राजांच्या डोक्यात घालण्यासाठी तलवार उपसली आणि पुढील क्षणात तो संभाजी राजांवर वार करणार तेवढ्यात पाठीमागुन वेगाने एक भाला आला आाणि रापकन बालेखानाच्या पाठीत घुसला. सारे मुगल सैनिक बुचकळ्यात पडले.

भाला फेकुन मारणारा दुसरा तिसरा कोणी नव्हता तर तो मुनासिब चाचा होता. बालेखानाचा सख्खा चुलता. मुनासिब चाचाला बालेखानाबद्दल खुप प्रेम होते. त्याने त्याचा देह पोटाशी कवटाळला परंतु बालेखान पहिल्याच झटक्यात यमसदनास गेला होता. आता मुनासिब चाचा धाय मोकलुन रडत होता. परंतु त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप मात्र नव्हता.

मुनासिब चाचाचे सर्व साथिदार गोंधळात पडले व हा काय प्रकार आहे शंभु राजांना वाचविण्यासाठी चाचाने आपल्या एक मात्र वारसाला का मारले असावे हे कोडे त्यांना उमगत नव्हते. त्या सर्व साथिदारांना मुनासिब चाचांचा खुप राग आला. न राहवुन एकाने धाडस करुन रागाने विचारले, "चाचा आपण एका काफरासाठी आपल्या पुतण्याला मारले ?"

रडत रडत चाचा बोलले, "दोस्तांनो जे झालं ते खुप वाईट झालं. बालेखान माझा एकमात्र वारीस होता. पण काय करणार एक बालेखान मेलेला पाहुन तुम्हाला वाईट वाटतं. तर मित्रांनो जबाब द्या मला जेव्हा अथणी आणि तिकोटयाला हा बदमाश दिलेर खान भर चौकात इस्लामी आया बहिणींची इज्जत लुटत होता, झाडांना लटकवुन फासी देत होता तेव्हा का वाईट वाटलं नाही तुम्हाला. तेव्हा कुठे गेली होती

तुमची हमदर्दी आणि मर्दुमकी. पण तो अत्याचार बघुन फक्त एकच जवा मर्द दिलेरखानाला जाब विचारण्यासाठी हातात तलवार घेवुन धावला होता. इस्लामी आया बहिणींची अब्रु वाचविण्यासाठी अन्यायाविरोधात तलवार उचलणारा कोण होता तो? तो फक्त शिवपुत्र संभाजी." चाचांच्या या बोलण्यावर तर सगळे पार गोंधळुनच गेले. चाचा आखिर क्या कहना चाहते हो असे विचारु लागले.

"बस एवढेच! आज औरंग्याचा एक सरदार दक्षिणेत येऊन आपल्या इस्लामी आया बहिणींवर इतके अत्याचार करतो मग स्वतः औरंगजेब आल्यावर काय होईल?" बिलकुल! चाचा समोरील काही स्वार बोलले.

"मी खुदाची कसम खाऊन सांगतो आम्हा शिया पंथीय दख्खनी मुसलमानांसाठी आलम दुनियेतील सर्वात मोठा काफर जर कोण असेल तर तो औरंगजेब बादशहा होय. हा मराठ्यांच्या राज्याचा अंत केल्यावर आपल्या विजापुरच्या आणि गोवळकोंड्याच्या सलतनती एक दिवसही जिवंत ठेवणार नाही. आपण हे कसे विसरुन गेला कि गेल्यावर्षी त्या शिवाजीने दुष्काळग्रस्त विजापुरकरांच्या मदतीला दहा हजार बैलांच्या पाठीवरुन धान्य पाठवीले होते. औरंगजेबाने नव्हे.म्हणुन दोस्तांनो औरंगजेबाच्या जाचातुन आम्हाला दख्खनी मुसलमानांना मुक्ती मिळवीण्यासाठी शिवाजीचे राज्य टिकले पाहीजे आणि त्याचा वारस संभाजी हा जगला पाहिजे. तोच या औरंगजेबाचा खात्मा करेन आणि आपणाला अभय मिळेल."

मुनासीब चाचाने कमरेची कटयार बाहेर काढली व शंभु राजांना बांधलेले दोर पटापट कापुन टाकले. आपल्या सोबतच्या सहकाऱ्याची चांगली मजबुत आणि ताजी घोडी राजांना व त्यांच्या वाचलेल्या साथिदारांना दिली. शंभु राजांच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवुन तो आपल्या सहकाऱ्यांना बोलला, "त्या शिवावर उपकार करण्यासाठी नसेल पण आम्हा दख्खनींच्या इफाजतीसाठी शिवाजीचा हा पोर शाबुत राहीला पाहीजे." जा शंभू बेटे बेशक निकल जा!

रक्ताने माखलेल्या शंभु राजांनी मुनासिब चाचाला मिठी मारली आणि सर्व विजापुरकरांचा निरोप घेतला. ज्या शिवाजी महाराजांनी विजापुरकरांचे अफजलखान आणि इतर अनेक सरदार यमसदनास पाठवीले, त्यांचे अनेक किल्ले बळकावले, अनेक प्रदेश स्वराज्यात सामिल करुन घेतले. तेच हो तेच विजापुरकर शिवाजीच्या पोराच्या मदतीला कसे धावले असा आपणास नक्कीच प्रश्न पडला असेल. परंतु याला दुरदर्शी राजकारण म्हणतात. शिवाजी राजे यात तरबेज होते ते काही सांगायला नको. अलिकडे मोगलांवर दबाव पाडण्यासाठी दख्खनचा एक दबाव गट निर्माण करण्यात राजांनीच पुढाकार घेतला होता व त्यामुळेच आता सध्या कुतूबशाही व आदिलशाहीशी मराठ्यांचे चांगलेच सख्य जमले होते.

- - - - - - - - - - -

कविकलश-धर्माजी नागनाथ सरसुबेदार व कारकून सुभा प्रा फोंडे.

हजरत पीर अबदुलाखान कोट फोंडा, बहुत जागृत स्थल. फिरंगियांनी गनिमाई करून कोटास वेढा घातला, कोट बहुत जेर केला, तेव्हां कोट मजकूरच्या हवालदार, सर नोबत, शबनिबीस, नाईकवाडी, लोकीं प्रार्थना केली कीं, गनिमाचा पराभव करणे. रा. छत्र. स्वामी विनंती करून ऊर्जा चाले-सारखी पोख्ती सरंजाम करुन घेऊन. सा. स्वामीची फत्तेबाजी होऊं देणे म्हणोन नियत केला. त्यावरी रा. स्वामीचे स्वारी कोट मजकुरी होउनु फिरंगी गनीम मारून काहडले. रा. स्वामी जये आले फते जाहाली. ऐसी पिराची करामती. म्हणौनु तुम्ही व काटकरी यांही छत्र. स्वामीस विनंती केली. त्यावरून नियत केला धर्मादाये देविला. दर साल नव होन ५० रास ऊदफूल दिवा देखिल उरूस येकून नव होन २६ मुा मुजावर नफर सालिना होन नव २४ येणे प्रो सुबे मजकुरी ऐवज देविला.

किल्ले पन्हाळा

शंभु राजे दिलेर खानाच्या तावडीतुन सुटले ते थेट पन्हाळ्यावरच पोहोचले. लवकरच शिवाजी महाराजांनी स्वत: पन्हाळयावर येऊन शंभु राजांची भेट घेतली. राजे कर्नाटकच्या मोहीमेवर असताना शंभु राजांनी घेतलेल्या कास्तकरांच्या साऱ्यात सुट देण्याच्या निर्णयाबद्दल शिवाजी महाराजांनी शाबासकी दिली. आपला पुत्र स्वराज्याचे हे राज मंदिर टिकवीताना गोर गरीब जनतेला विसरु शकणार नाही याची राजांना खात्रीच झालेली होती. शंभु राजांना आशिर्वाद देवुन प्रजा हितदक्ष वारसदार म्हणुन नेमायचे नक्की केले.

पुढे औरंगजेबाचे दक्षिणेवर येणाऱ्या आक्रमणाबाबतची चिंताजनक खबरींचीही सांगोपांग चर्चा केली. आपल्या उमद्या राजपुत्राचे त्यावरील मत आणि विचार जाणुन घेतले. संभाजी राजांवर जबाबदारी सोपवायचे नक्की झाले. संभाजी राजांना महाराजांनी अनेक हितगुज करणाऱ्या गोष्टी सांगितल्या. स्वार्थी मराठा व ब्राह्मण वतनदारांपासुन सावध रहाण्याचा इशारा दिला "राज्य कारभार करताना गरीब जनतेवर श्रध्दा ठेवुन त्यांना बळ द्या, त्यांना शिलेदार बनवा कारण तेच स्वराज्याशी एकनिष्ठ राहतात. सरंजामदार, वतनदार ही मंडळी वतनासाठी भुकेलेली असतात. स्वत: च्या खासगी स्वार्थासाठी ते राज्य बुडवीण्यासही मागे पुढे पहात नाहीत." आपल्या लाडक्या पुत्राला आयुष्यभर पुरेल असे मार्गदर्शन करुन राजे रायगडावर परतले.

शिवाजी महाराजांनी या प्रसंगी संभाजी राजांसमोर मांडलेला स्वराज्याचा ताळेबंद अशा प्रकारचा होता. पाचशे रती हिरे, दोनशे रती माणके, एक हजार तोळे मोती, नऊ कोट रुपये किंमतीची चलनी नाणी, त्यात पाच लक्ष रुपयांचे केवळ सोन्याचे होन, अनघड सोने नऊ खंडी, चांदी अडीच खंडी, तीस हजार एक धारी तेगी, पन्नास हजार दुधारी, चाळीस हजार भाले, साठ हजार ढाली, चाळीस हजार धनुष्य आणि अठरा लक्ष बाण, भातकोठीत सतरा हजार खंडी दास्तान, जीरे दोन हजार खंडी, डाळी, कडधान्य, साखर, तंबाखु याचे प्रत्येकी एक कोठार, आसवाब खान्यात जालना

अहमदाबादी एक लक्ष तागे कापड, चार हजार पांढरी व एक हजार बुऱ्हानपुरी ठाणे, तीन हजार तागे सादिलवार आणि चार हजार तागे पैठणी कापड, गंजीखान्यात चार हत्ती. ही सर्व यादी आहे राजधानी रायगडावर त्यावेळी असलेल्या वस्तु, पैसे, शस्त्रे, कापड आणि धान्याची.

हा सगळा हिसाब किताब दाखवुन महाराजांनी संभाजी राजांवर शंभर टक्के विश्वास होता हेच सिद्ध केले. आणि जाणत्या युवराजाला मोगली आक्रमणाच्या भावी काळात येणाऱ्या वादळाला सामोरे जाण्यासाठी सिद्ध होण्यास सांगितले. त्यामुळे संभाजी राजे दिलेर खानाला जावुन मिळाले अशी बोबाबोंब करणाऱ्या महाराजांचे राजकारण कळत नसावे किंवा संभाजी राजांची बदनामी करणे हाच त्यांचा जाणिवपूर्वक हेतु असावा असे वाटते. कारण पुढील सर्व आयुष्यभर संभाजी राजे मोगलाविरुद्ध प्राण पणाने लढले आयुष्यात कोठेही तह केला नाही की माघार घेतली नाही. संभाजी राजे मोगलांना सामिल होणारे असते तर औरंगजेबाच्या झोळीत संपूर्ण राज्य टाकुन केंव्हाच मोकळे झाले असते परंतु संभाजी राजांनी आपले प्राण दिले परंतु माघार घेतली नाही हाच त्यांच्या स्वराज्य निष्ठेचा सर्वात मोठा पुरावा आहे.

दिलेरखान प्रकरणासंदर्भात प्रबोधनकार ठाकरे यांचे मत असे आहे : "शिवाजी हयात असतानाच घरगुति कलहाला व सापत्न मातेच्या मत्सराला कंटाळून संभाजी घराबाहेर पडला व मोगलाईत दिलेरखानास मिळाला. यांत स्वराज्यद्रोह झाला, असे उथल विचार करणारे वाटेल तर म्हणोत. खरी वस्तुस्थिती अशी की तारूण्याने फुरफुरलेल्या या मर्द मराठ्याला, शिवसिंहाच्या या सवाई पराक्रमी छाव्याला राजवाड्यातल्या निष्क्रीय आयुष्यापेक्षा, मोगलाईतच का होईना, कर्तबगारीला काहीतरी वाव मिळाला पाहिजे होता. पुढे लवकरच तो परत येऊन पन्हाळ्यास शिवाजीस भेटला."

पुढे तीन चार महिन्यानंतर युवराजांना गुप्त जासुसांकडुन रायगडावरुन खबर आली. महाराज आजारी आहेत व कारभाऱ्यांनी नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे. गडावर नक्की काय चालले आहे ते कळायला मार्ग नव्हता. आपण तिकडे जावे तर आपल्या बरोबरचे सैन्यही येणार आणि आपली कोणी वाट आडवु पाहील तर दंगल पेटणार, संघर्ष उभा रहाणार, स्वराज्याचे आपणच नुकसान केले असे जग म्हणणार असा विचार करुन संभाजी राजांनी पन्हाळयावरच थांबायचे ठरवीले. परंतु रायगडावरची वरचे वर खबर मिळवत संभाजी राजे सावध होते. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी महाराजांचे निधन झाल्याची बातमी घेऊन महाडचे दोन खास जासुस पन्हाळयावर

पोहोचले.

महाराजांच्या निधनाचे नक्की कारण मात्र कळत नव्हते. निधनाच्या कारणात एक वाक्यता येत नव्हती. पण खबर मात्र पक्की आणि खरी होती. हिंदवी स्वराज्याचा तेजोनिधी मावळला होता. खरे तर ही बातमी अधिकृत रित्या संभाजी राजांना कळवावयास हवी होती. परंतु संभाजी राजे रायगडावर येवु नयेत असाच सर्व कारभाऱ्यांचा डाव होता. शंभु राजांना आपल्या पित्याच्या अग्नी संस्काराला ही बोलावले गेले नाही आणि दशक्रियेला सुध्दा नाही. ताबडतोब राजाराम साहेबांना मंचकावर बसवुन राजा घोषित करण्याचा व सगळा कारभार आपल्या हाती घेण्याचा पक्का डावच अण्णाजी दत्तो व इतर कारभाऱ्यांनी आखला होता.

थोरला जाणता शिवपुत्र जिवंत असतानाही. कारण शंभु राजे गादीवर बसले तर या सर्व लोकांची डाळ शिजणार तर नव्हतीच उलट यांनी केलेले गैरकारभार आणि बेहिशोबी संपत्ती उघडी पडणार होती. संभाजी राजे गोर गरीब जनतेच्या पाठी उभा रहाणारा जाणता युवराज. शिवाय त्यांना कारभाऱ्यांच्या सर्व आतबट्याच्या व्यवहाराची माहिती.

त्यामुळे स्वराज्याच्या पवित्र मंदिरात चोरुन बाजार करणाऱ्या गरीबांना लुटून स्वतःचा तुंबडी भरणारांना शंभु राजे शिवरायांचे उत्तराधीकारी होऊ नयेत असेच मनापासुन वाटत होते आणि कोणताही जाणता कारभारी अशा राजाची अपेक्षा ठेवत नाही जो त्याच्या हाताला लगाम घालील. म्हणुन आणि म्हणुनच बालके राजारामाला गादीवर बसवुन सगळा कारभार स्वतःच्या ताब्यात घेण्याचा आणि स्वराज्यच बुडविण्याचा कारभाऱ्यांचा प्रयत्न होता. शिवाय सोयराबाई साहेबांनाही खोटी भिती दाखवुन आपल्या गटात सामिल केले होते.

खरे तर स्वराज्य हे सामान्य जनतेचे होते आणि सामान्य जनता संभाजी राजांवर खुप प्रेम करीत होती. शिवाजी महाराजांच्या लष्करातील बहुतेक शिपाई संभाजी राजांच्या बद्दल अभिमान बाळगणारे व त्यांच्यासाठी जीव देणारे होते. शंभू राजे लहानपणापासुनच सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात हिंडत होते. गोर गरीब जनतेच्या सुख दुःखात सामिल होत होते. एखाद्या गावातील लग्नाच्या वरातीत सुध्दा शंभु राजे नाचायचे त्यांच्यात खेळायचे, बागडायचे. महार, मांग, कोळी अशा सर्व जातीच्या लोकांना त्यांनी आपुलकीची वागणुक दिली होती.

संभाजी राजे अशा प्रकारे हलक्या जातीच्या लोकांत मिसळतात त्यांच्यासोबत जेवण करतात याबाबतही अनेकदा कारभाऱ्यांनी तक्रार केल्या होत्या. महाराजांच्या अष्टप्रधानात बहुसंख्य हे विशीष्ट वर्णाचे होते व त्यांना वर्ण व्यवस्थेचा खुप दांडगा

अभिमान पण राजांना नव्हता आणि संभाजी राजे त्याच मार्गाने जात होते. जाती पेक्षा माती आणि वर्णापेक्षा इमानाला मानणारे सवंगडी जोडत होते आणि त्यामुळेच शंभु राजांना सर्व सामान्य जनतेच्या लष्कराच्या मनात आदराचे स्थान होते.

याचीच कारभाऱ्यांना सतत भिती होती आणि म्हणुन शंभु राजांना डावलुन कारभार स्वत:च्या हातात घेवुन राजाराम साहेबांना नाममात्र राजे बनवुन स्वराज्याचे मालक व्हायचे होते. स्वराज्यात मालकी नव्हे तर मुलकी भावना शिवाजी महाराजांनी जनतेत निर्माण केली होती आणि त्यामुळेच सर्व डाव फसणार होता आणि पुढे तसेच झाले.

रायगडाच्या पायथ्याला हजारोंच्या संख्येने जनता जमा होऊ लागली होती. सर्वांची एकच आणि जोरदार मागणी उचल घेत होती शंभु राजांनाच सिंहासनावर बसवा. परंतु कारभारी याकडे जाणीवपुर्वक डोळे झाक करीत होते. उलट संभाजी राजांचा काटा कसा काढायचा याचाच विचार चालु होता आणि मग काय अष्टप्रधानांच्या मंत्रिमंडळाने तसा आदेशच काढला. शंभु राजांना पन्हाळ्यावरच कैद करायचे अथवा जिवंत मारायचे. तसा आदेशच अण्णाजी दत्तोंनी मोरोपंत पिंगळेंना दिला. ते हे विसरले होते वाटते की स्वराज्याचे चिटणीस बाळाजी आवजी हे होते आणि त्यांच्या सही शिवाय आदेशाची अंमलबजावणी शक्य नव्हती. आणि बाळाजी आवजी यांना संभाजी राजांबद्दल खुपच आपुलकी होती.

त्यामुळे काम खुप अवघड होणार होते अण्णाजी पंतांनी महाराणी सोयराबाई यांचेमार्फत बाळाजी आवजींना धमकी वजा इशाऱ्यातच तसा आदेश देवुन टाकला पण बाळाजी आवजी तसे आदेश द्यायाला सही करायला अजिबात तयार नव्हते. अगदी जीव गेला तरी बेहत्तर पण शिवाजी महाराजांनी विश्वासपुर्वक जागरुक हातामध्ये सोपवलेली चिटणीसांची लेखणी स्वराज्याशी बेईमानी करण्यास तयार नव्हती. शेवटी महाराणी सोयराबाईंनी विनंती करुन पाहीली पण ते शक्य नव्हते. मी स्वराज्याचे मीठ खाल्ले आहे.

धन्याशी बेईमानी करणार नाही या मतावर बाळाजी आवजी ठाम होते तुमची भाकरी आमच्या पायापाशी आहे अशी धमकी देवुनही बाळाजींना वळवीण्याचा महाराणी सोयराबाईंनी प्रयत्न करुन पाहिला. आता मात्र दबावतंत्र वापरणे भाग होते शेवटी तुम्हालाच कैद करु व सर्व संपत्ती जप्त करु अशी धमकी देण्यात आली. दहशत आणि लालच हे मार्ग चालत नव्हते मग मध्य मार्ग काढण्यात आला व बाळाजी आवजींच्या चिरंजीवाच्या हस्ते तसा खलिता लिहीण्याची तडजोड करण्यात आली पण

बाळाजी आवजी मात्र संभाजी राजांचा विश्वास घात करण्यास शेवटपर्यंत तयार झाले नाहीत.

इकडे पन्हाळ्यावर संभाजी राजे आपल्या पित्याच्या आठवणीने व्याकुळ होत होते. मन उदासवाणे झाले होते म्हणुन सहज दौड करण्यास बाहेर पडले वाघ दरवाजाच्या दिशेने जाऊन एका शिळेवर खिन्न मनाने नुकतेच बसले होते. तेवढ्यात दुरवरुन आड मार्गाने येणाऱ्या दोन व्यक्ति दिसल्या. त्या वर आल्यावर राजांनी त्यांना ओळखले. ते जासुस होते व काही तरी बातमी घेऊन आले होते खास. पण ती शंभु राजांसाठी नव्हती.

तेव्हा शंभु राजांनी दटावुन त्यांना माहिती विचारली. माहिती किरकोळ आणि नेहमीची असल्याची दोघांनी बतावणी केली. परंतु शंभु राजांच्या नजरेतुन त्यांच्या चेहऱ्यावरचे अपराधी भाव सुटले नव्हते. शंभु राजांनी आपली करडी नजर त्यांच्यावर रोखली व कमरेला काय आहे म्हणताच त्या बिचाऱ्यांना घाम सुटला. संशय अधिकच गडद झाला. राजांनी आपल्या सहकाऱ्यांना त्या जासुसांची झडती घ्यायाला सांगितली. दोघांकडे दोन खलिते होते. एक किल्लेदार विठ्ठल त्रिंबकांच्या नावे तर दुसरा हवालदार बहिर्जी नाईक यांच्या नावे. सदर खलित्याचा मजकुर साधारण पणे असा होता -

"इकडे परिस्थिती फारच चिंतेची आहे. जैसा बंदोबस्त घडेल तैसे कळवत जाऊ. मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये संभाजी महाराजांना किल्ला उतरु देवु नका. युवराजांना कैद करुन बहुत सावधाने रहावे. महाराजांचे इकडील वर्तमान तिकडे फुटु न देणे. यथावकाश पुढचे आदेश येतीलच"

राजांनी खलित्यावर नजर टाकली व दटावुन विचारले खरे सांगा कोण कोण आहेत या कटाचे सुत्रधार अण्णाजी दत्तो की आमच्या मातोश्री महाराणी सोयराबाई आणि महाराजांची तब्येत कशी आहे ते खरे सांगावे. घाबरलेल्या जासुसांची आता हयगय नव्हती. राजांनी त्यांना ताबडतोब जेरबंद केले.

ताबडतोब किल्लेदार व हवालदार यांच्यासह गडावरील सर्व जाणत्यांना बोलाविण्यात आले सर्वांसमोर त्याखलित्याचे वाचन करण्यात आले. शंभु राजे जनतेच्या व लष्करी अधिकाऱ्यांच्या किती विश्वासपात्र असावेत हे यावरुन कळते. वस्तुतः ते खलिते संभाजी राजांना गुप्त ठेवता आले असते, विश्वासघाताने राज्य जिंकता येतात पण रयतेचे मन मात्र नाही हे संभाजी राजांना माहित होते आणि स्वराज्य हे तर रयतेचे मंदिर होते विश्वास हाच त्याचा पाया होता. आणि गोर गरीबांना न्याय ही त्यातील मुर्ती होती आणि संभाजी राजे या मंदिराचे पुजारी होते. किल्लेदार स्वतः कारभारी गटाला सामिल होता म्हणुन त्याच्यावर एवढ्या विश्वासाने आदेशाची अंमलबजावणी करण्याची

जबाबदारी टाकण्यात आली होती.

परंतु बेत फसला होता आणि गाठ स्वराज्याच्या भावी राजाबरोबर होती. त्यामुळे किल्लेदाराने पुढे बेईमानी करण्याचा विचार सोडलेला होता. संभाजी राजांच्या अखंड सावधानतेचा हा एक नमुना होता. अखंड आयुष्यभर संभाजी राजे अशाच प्रकारे सावध होते. परंतु इतिहास लिहीणारे बखरकार मात्र ते बेसावध असल्यामुळे पकडले गेले असा जो खोटा अपप्रचार करतात तो त्यांचा हा फसलेला बेत आणि अशी अनेक कट कारस्थाने उघड झाल्यामुळेच.

संभाजी राजांनी हाती असलेली पाच हजाराची फौज व पन्हाळयावरील फौज घेवुन रायगडाकडे कुच करणे अशक्य नव्हते आणि लष्कराचाही चांगला पाठींबा शंभु राजांना होता. पण राजे अविचारी नव्हते. एक तर थोरल्या महाराजांच्या आकस्मिक निधनाचा डोंगर राजांवर कोसळला होता आणि प्रकरण एकदम गंभीर होते. हळुवारपणे संयमाने आणि चार्तुयाने या प्रसंगाला सामोरे जाणे क्रमप्राप्त होते. थोरा मोठ्याचां सल्ला घेऊनच वाटचाल करणे योग्य ठरणार होते. आपले म्हणावे असे पाठीमागे कोणीतरी हवे होते, पण तरीही आत्मविश्वासपुर्वक त्यांनी पत्र लिहीले आपल्या सावत्र मामाला व स्वराज्याच्या सेनापती हंबीरराव मोहित्यांना पत्रातल मजकुर सर्वसाधारण असा होता

''क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शंभु छत्रपती प्रती

राजेश्री हंबीरराव मोहिते सरलष्कर तिर्थरुप आबासाहेबांचे महानिर्वाण झाले. आमुच्या मस्तकावर आस्मानच फुटले. ऐशा कालकोपामध्ये एकच गोष्ट चांगली म्हणायची. तीन मासामागे पन्हाळगडी तिर्थरुप आबासाहेबांची दिर्घ भेट घडोनी आली. त्यांच्या सहवासे सलग चार पाच रोज बहुत मसलती जाहल्या. मोघलाविरुध्द नव्या आघाडीची कामगिरीही त्यांनी सांगितली. तिर्थरुपांचे अवचित जाण्याची जखम खुप दांडगी. आठवाने अजुनही डोळे गळतात. या उपरही श्रीकृपेकरोनी पुन्हा कंबर कसुन खडे राहण्याचा आमचा मनसुबा पक्का आहे.

परंतु काही दुष्ट कारभाऱ्यांच्या आणि स्वार्थी मंत्र्यांच्या चाली तिरक्या आहेत. दिला मध्ये खोट. बालके राजारामांना गादीवर बसविण्याचा घातकी विचार ते मातोश्री सोयराबाईच्या डोक्यात भरवतात स्वार्थापोटी राजघराण्यात बखेडा करु बघतात. मामासाहेब राजारामाप्रमाणे आम्ही आपले सख्खे भाचे नसु, पण हिंदवी स्वराज्य निर्माणकर्त्या शिवाजीचे बाळ आहोत. त्या पापी औरंगजेबाचा एक दिवस काळ ठरु. आज राज्यापुढच्या वाटा निसरड्या. पल्ला दांडगा गाठायचा मनसुबा आहेच. ऐशा

वक्तास आपलाही हात द्याल तर संकटाचा दर्या सहज पार करु. हातुन गलती घडल्यास आवश्य कान पीळायला आपुला अधिकार.

औरंगजेब पातशहा खुप माजला आहे. जिझिया कराचे हत्यार आमुच्या मस्तकी मारु चाहतो. राजेश्री आबासाहेबांचे जे संकल्पित होते, ते चालवावे हेच आम्ही अगत्य जाणोन कारभार करीतो. आशिर्वाद असु द्यावे." जाणिजे लेखनालंकार. या पत्रानंतर संभाजी राजांनी हंबीरराव मोहिते यांना काही दिवसांनीच आणखी एक पत्र लिहीले त्याचा सर्वसाधारण मजुकर असा होता -

''क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शंभु छत्रपति प्रती

सरनोबत, सरलष्कर हंबीरराव मोहिते दंडवत उपरी,

मामा साहेब नात्याने आम्हीही आपले भाचे आहोत. भोसले आणि मोहिते घराण्याची सोयरीक तर गेल्या तीन पिढयांची. आबासाहेबांनी सेनापती पदाचा मंदिल तुमच्या मस्तकावर काय म्हणुन ठेवला ? सोयराबाई साहेबांचे बंधु म्हणुन नव्हे, तर महाराजांना महाप्रतापी प्रतापराव गुजरांची जागा भरुन काढायला एका रत्नाची आवश्यकता होती. आता थोरले महाराज गेले, आम्ही सारे पोरके जाहलो! योग्य तो निर्णय घेण्याइतके आपण सुज्ञ आहात, मामा साहेब उपरी अधिक काय लिहावं ? अंतर न पडु द्यावे ही प्रार्थना''

इकडे कारभारी मंडळीही सेनापतींना येवुन भिडली होती. कारण स्वराज्याचे सेनापती ज्यांच्या बाजुने त्यांचे पारडे जड होणार होते आणि हंबीरराव हे तर सोयराबाईचे सख्खे भाऊ व ज्यांना छत्रपति करायचे त्या राजारामांचे सख्खे मामा. त्यामुळे त्यांच्याकडुन सोयराबाईंचीच बाजु घेतली जाईल अशी सहज अपेक्षा कारभाऱ्यांना होती.

ते बिचारे विसरले असावेत की शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात पदे ही नातेवाईक म्हणुन कोणाला दिली गेलेली नव्हती, ती दिली होती स्वराज्य निष्ठा आणि योग्यता बघुनच. कारभाऱ्यांनी हंबीररावांना नानाविध प्रकारे समजावुन पाहीले. सख्खा भाचा राजाराम रायगडचा राजा होणे त्यांच्या फायद्याचे कशा प्रकारे आहे हे समजावुन पाहिले पण हंबीरराव आपल्या मतावर खंबीर होते. स्वराज्याचे वारसदार संभाजी राजेच आहेत आणि ते सर्व प्रकारे स्वराज्याचे राजे होण्याच्या योग्यतेचे आहेत. त्यामुळे त्यांच्या ऐवजी अल्पवयीन राजाराम किंवा इतर कोणालाही गादीवर बसवीण्याचा प्रश्नच नाही या ठाम मताचे ते होते.

राहीला प्रश्न राजारामांच्या भविष्याचा त्याचे उत्तर येणारा काळच देईल.

आमच्या भाचेसाहेबांना राजा बनविण्याचे आपण तकलीफ देण्याची गरज नाही हे ही सुनावले कारभाऱ्यांना हंबीररावांकडून असली काही अपेक्षा नव्हती आणि बिचाऱ्यांनी रागाच्या भरात सेनापती हंबीररावांनाच कैद करण्याचा हुकूम लष्करी दिवाणास देवुन टाकला. पण कोणीही हंबीर रावाला हात लावण्यास धजेना.

स्वराज्याच्या इमानी लष्कराची परंपरा नव्हती असली सैनिकांनीच सेनापतीला कैद करण्याची आणि तीही बेईमानांच्या आदेशाने. मग हंबीररावांनीच आदेश देवुन अण्णाजी दत्तो व मोरोपंतांना अटक केली. रुपाजी आणि आनंदराव या त्यांच्या सहकाऱ्यांनी जबाबदारी पार पाडली. दोघांना कैद करुन संभाजी राजांसमोर पन्हाळयावर हजर करण्यास फर्मावले. बिचारे कारभारी मंडळी येताना मनात लाडु फोडत आली होती पण आता त्यांच्या हातात बेडया पडलेल्या होत्या. स्वराज्याच्या राजाशी बेईमानी करणाऱ्यांना अशा प्रकारचा घरचा आहेर देवुन सेनापतींनी पाहुणचाराची जबाबदारी पार पाडली होती आणि आता ते स्वतः पन्हाळयावर हजर होणार होते.

दुसऱ्याच दिवशी हंबीरराव मोहिते ससैन्य पन्हाळयावर हजर झाले. संभाजी राजांनी त्यांच्या सन्मानार्थ छोटेखानी दरबार भरवीला. शंभु राजांना स्वराज्याचा खरा वारसदार माननारे सर्व लष्करी शिपाई, स्वार, राऊत व जनता मोठया संख्येने पन्हाळ्याकडे वेगाने जमा होत होते. रायगडावर कारभारी मंडळींनी भले राजारामांना का होईना राजे बनविण्याचा प्रयत्न केला होता.

परंतु जनतेच्या मनात एक आणि एकच रायगडचा राजा होता आणि तो म्हणजे संभाजी महाराज. त्याच दरबारात तात्काळ हंबीररावांना सेनापती पती पदाची धुरा नव्याने सोपविण्यात आली. शिवाय स्वराज्यात आता जुणे जाणते व तरुण कर्तबगार मंडळी खांद्याला खांदा लावुन काम करुन स्वराज्याचा चौखुर उधळणारा रथ हाकणार होते. सर्वांना सोबत घेवुनच राज्य चालवीण्याचा मनसुबा शंभु राजांनी दरबारात व्यक्त केला. जाणत्यांचा पुर्वानुभव, पुण्याई व तरुणांची बहाहुरी याचा अनोखा संगम भावी वाटचालीस शंभु राजे घालत होते.

त्याच दिवशी दुपारी कट कारस्थान करणाऱ्या अष्टप्रधानांना राजा समोर पेश केले गेले. अपराध केलेला असतानाही कारभाऱ्यांच्या चेहऱ्यावर अजिबात अपराधीपणाचा भाव नव्हता. उलट शंभु राजांनी त्यांना कैद करुन त्यांनीच अपराध केल्याचे उर्मट विधान अण्णाजी दत्तो करीत होते. कारभाऱ्यांची पुर्व पुण्याई व त्यांनी स्वराज्याच्या बांधणीसाठी घेतलेली मेहनत लक्षात घेऊन राजे त्यांना माफ करणारच होते पण

नाईलाजास्तव अपराध्यांच्या अरेरावीने त्यांना शिक्षा देणे भाग पडले.

मोरोपंताच्या वार्धक्यामुळे त्यांना फक्त कच्च्या कैदखान्यात ठेवले तर कटाचे मुख्य सुत्रधार अण्णाजी दत्तो यांना अंधार कोठडीची शिक्षा फर्मावण्यात आली. त्याच रात्री राजांनी ताबडतोब बैठक घेतली त्यात सेनापती हंबीरराव, म्हाळजी घोरपडे, कृष्णाजी कंक, प्रल्हाद मिराजी हे उपस्थित होते. स्वराज्यावर पुढे औरंगजेबाचे होणारे आक्रमण या विषयावरही राजांनी सर्वांशी सखोल चर्चा करुन त्या दिशेने ताबडतोब पाऊल उचलले. युध्दाच्या दृष्टींने प्रत्येक किल्यावर पुरेसा दारुगोळा अन्नधान्य व रसद असणे अत्यंत महत्वाचे होते आणि म्हणुनच राज्याभिषेका अगोदरच पासुनच संभाजी राजांनी जाणत्या राजाचे कर्तव्य पार पाडायला सुरुवात केली.

जाणत्या राजाच्या पुत्राला शोभेल अशीच कार्यपद्धती राजांनी अंमलात आणण्यास सुरुवात केली. आधी लग्न कोंडाण्याचे मग रायबाचे याच इतिहासाची पुर्नरावृत्ती होती ती. आधी कल्याण स्वराज्याचे, आधी सुरक्षा स्वराज्याची, मग राज्याभिषेक शंभु रायाचा. राजांनी सहकार्यांना तीन अति महत्वाच्या सुचना दिल्या. १)गडावरचा दारुगोळा पेटणार नाही. २)गडावरचे पाणी आटणार नाही आणि तिसरे महत्वाचे धान्य बारुदाची कोठेही कमतरता रहाणर नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

तसेच प्रत्येक किल्याचे गडकरी, सबनीस, कारखानीस, नाईक, कोण कोण आहेत त्या सर्वांची यादी बनवीण्याचा आदेश दिला. जेणेकरुन स्वराज्यद्रोही व स्वराज्य निष्ठ लोकांची ओळख करुन घेता येईल कारण गडदुर्ग हे एक निष्ठ लोकांच्या मातीशी इमान असणाऱ्या लोंकांच्या ताब्यात सुरक्षीत असतात. निर्जीव दगड आणि बुरुजही आपले काम प्रामाणिकपणे करतात पण माणसे बेईमान निघाली तर अपाय घडतो याबाबत राजे खुप सावध होते. आणि म्हणूनच पुढे आठ वर्षात स्वराज्याचा एकही किल्ला शत्रुच्या ताब्यात जाऊ शकला नाही.

औरंगजेबाच्या भावी आक्रमणास तोंड देण्याची व्यवस्था करुनच संभाजी राजांनी रायगडाकडे जाण्याचे ठरवीले तोपर्यत इकडे रायगडावर जनतेने आपली कामगिरी पार पाडली होती. शंभु राजांचा विरोध करणारे स्वतःच्या स्वार्थासाठी स्वराज्य बुडवायला निघालेल्या कारभाऱ्या मंडळींचे वाडे रयतेने जाळले, लुटले, कटकऱ्यांना ताब्यात घेतले व राजांनी लवकरात लवकर रायगडाकडे प्रस्थान् करावे असे निरोप धाडले. रयतेचा किती प्रचंड विश्वास संपादन केला होता संभाजी राजांनी हे यावरुन सर्वांच्या लक्षात येते.

पराक्रमी पुरुषाची महाराष्ट्रातील जनता कदापि उपेक्षा करीत नव्हती त्यांना

त्यांची पारख होती हे नक्की. पण ही सर्व सामान्य जनता शिवाजी महाराजांच्या धोरणाची शिलेदार होती आणि म्हणुनच त्यांना संभाजी राजेच दुसरे छत्रपती म्हणुन पसंत होते. आणि मग दोन महिन्यानंतर संभाजी राजांनी आपला मोहरा रायगडाकडे वळविला. सर्व बांधाबांध व्यवस्थित झाल्याची खात्री झाल्यावरच राजा निवडण्याची भूमिका रयतेने लोकशाही पद्धतीने पार पाडल्यानंतर लोकांचा संपूर्ण पाठिंबा घेवुनच संभाजी राजांनी रायगडावर राज्याभिषेक केला. त्यांच्याजागी दुसरा कोणी असता तर राज्याभिषेकासाठी दोन महिने थांबला नसता.


- - - - - - - - - - -

श्री

सियादत-पनाह शुजाअत-दस्तगाह फिद्वी लायक-उल-इल्तिफात व अल-इहसान मुख्तारकानं बहनायत पादशाही उम्मीदवार बूदह बिदानद कह चूं दरी वला अझ रुए वाकअह बअर्ज़ अक्दस अअला रसीद कह बिजयसिन्ध बाजमई दरजन्ग काल्वी नाहल बकार आमदह लिहाज़ा हुक्म जहां-मताअ गीती-मत्बअ शर्फ सुदूर मी पैवन्दद कह आं सियादत-पनाह बराए तन्बियह व तादीब आं मक्हूर शकावत-शिआर अज़ आं सिम्पत अझ आब नर्बदह गुजिश्तह खूदरा व आंजा बरसानद व अझीं तर्फ काकरखान कह बजहत तमशिय्यत ई कार अझ हुज़ूर पुर-नूर मुअय्यन शुदह मीरसद बायद कह बदत्तिफाक ऊ दकीकह अझ दकायक इस्तीसाल व इस्ति-हिलाक आं मर्दूद फरू गुजाश्त न नुमायद व पर्वतसिन्ध झमीनादर अवासरा कह नझ्द आं शहमात-दस्तगाह आमदह रवानंह बार्गाह अज़्मत व जाह कुनद कह बखियत व मन्सब सर-अफराझी याफ्तह मुरख्खस रव्वाहद शुद वरीं बाब अझ पेशगाह खिलाफत अज़्मा निहायत कदगन शनासद बीस्त व नुहूम सफर साल बीस्त व पन्जुम अझ जुलूस वाला नविश्तह शुद हू-अल-गालिब हस्ब-उल-हुक्म-अल-मताअ मल नुमायद ताकीद दानद

सारांश

मुख्तारखान यांनीं जाणावें की, सांप्रत बातमी आली की, विजय-सिंग आपल्या जमातीसह 'काल्वी नाहल'च्या लढाईत कामास आला. म्हणून हुकूम होतो कीं, तुम्ही त्या दुष्टास तंबी व शिक्षा देण्यासाठी त्या बाजूहुन निघून नर्मदा उतरून त्या ठिकाणीं पोहोंचा. हें काम चालूं ठेवण्यासाठी येथून काकरखान नेमणूक होऊन तेथें येईल. तरी त्याच्यासह क्षणोक्षणी त्या निर्वासित मनुष्यास मारण्यास चुकूं नये. आपल्या जवळ आलेला अवास येथील जमीदार पर्वतसिंघ यास दरबाराकडे पाठवून द्यावें म्हणजे त्यास चाकरी व मन्सब मिळून परत जाण्याची परवानगी मिळेल. या बाबतींत खूप ताकीद जाणावी. ता. २९ सफूर जुलूस २५.



नितीवान राजा

छत्रपती संभाजी महाराज नितीमत्तेच्या बाबतीत छत्रपति शिवाजी महाराजांप्रमाणेच होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी घडलेल्या काही घटना व संभाजी राजांनी घेतलेले काही निर्णयावरुन संभाजी राजे अत्यंत नितीवान उदार मतवादी परंतु त्याचवेळी स्वराज्याशी इमान राखणाऱ्या लोकांची कदर करणारे होते. हे स्पष्ट करण्यासाठी काही निवडक प्रसंग खाली नमुद करीत आहोत.

मोरोपंत पिंगळेंच्या निधनामुळे रिक्त झालेली जागा त्यांच्या ज्येष्ठ पुत्रास निळोपंतास देवुन पेशवे पदाची वस्त्रे दिली. आण्णाजी दत्तोंनी राजद्रोहाचा कट केला होता. परंतु त्याची पुर्वीची कामगिरी योगदान लक्षात घेऊन संभाजी राजांनी त्यांना माफ केले. शिवाय त्यांना अष्टप्रधानात समाविष्ट केले. एके दिवशी राजे सभा मंडपाकडे जात असताना प्रवेश द्वाराजवळ पंधरा वीस मुसलमानांचा जथ्था उभा असलेला त्यांना दिसला. परंतु उशीर झाला होता म्हणुन राजे वेगाने पुढे जात होते तेव्हा त्यांच्या कानी शनि मंत्राचा जप पडला.

अशा मंगलप्रसंगी शनिचा धावा कोण करीत असेल असा प्रश्न पडला. राजे जागेवरच थांबले पहातात तर एक तरुण मुसलमान पोरगा तो मंत्र जाप करीत होता. राजांना मोठा प्रश्न पडला मुसलमान आणि शनि मंत्राचा जप हे कसे शक्य होईल? तेव्हा राजांनी त्या तरुणाची विचारपुस केली. आणि कळाले कि तो तरुण आणि त्याच्या बरोबरचे पंधरा वीस मुसलमान हे सर्व जातीचे ब्राह्मण होते व त्या सर्वांना जंजिरेकर सिध्दींनी जुलमाने बाटवीले होते. धर्मांतरीत केले होते. तो तरुण म्हणजे हरसुळचा गंगाधर कुलकर्णी होय व बाकीचे ते पंधरा मुसलमान हे श्रीबागचे कोल्हटकर होत.

त्या सर्वांनी राजांना आपणास स्वधर्मात घ्यावे ही विनंती केली. राजांनी क्षणाचाही विलंब न करता चिटणीस बाळाजी पंतांना त्यांच्या शुध्दीकरणाची व हिंदु धर्मात पुन्हा घेण्याची आज्ञा दिली. परंतु बाळाजी आवजी राज्याभिषेकाच्या कार्यात व्यस्त असल्याने सोमाजी दत्तोने ती जबाबदारी आपणावर सोपवावी अशी विनंती केल्याने ती जबाबदारी सोमाजीकडे देण्यात आली.

सर्व कटवाल्यांची राज्याभिषेकाच्या मंगलदिनी नजरकैदेतुन मुक्तता करण्यात

आली. त्यांची पुर्व पुण्याई त्यांच्या मदतीला धावली होती. एकनिष्ठा आणि सेवाभावी वृत्ती लक्षात घेऊन बाळाजी आवजींना चिटणीस पद दिले. तसेच हंबीरराव मोहित्यांची त्यांच्या पूर्वीच्याच जागी म्हणजेच सेनापती पदी पुर्ननियुक्ती केली. प्रल्हाद निराजींना न्यायधिशांची वस्त्रे दिली, जर्नादन पंत डबीर झाले, तर दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितराव, आबाजी सोनदेवाकडे सुरनवीशी दिली तर दत्ताजी पंतास वाकेनवीस पद दिले गेले. आण्णाजी दत्तोंना मुजुमदारी देण्यात आली. परंतु त्यांना त्यांचा कपट कारस्थानी स्वभाव लक्षात घेऊन त्यांची सुरनवीशी काढून घेतली. उदारता दाखवितानाही राज्यकर्त्याला अखंड सावधानता कशी बाळगावी लागते याचे हे उदाहरण होय.

सावत्र माता व कटाच्या सुत्रधार महाराणी सोयराबाई यांचाही सन्मान केला. तसेच दुधआई धाराऊंचा सन्मान केला. बालमित्र रायाप्पा महाराचाही सत्कार केला. जात प्रमाण नव्हती निष्ठा प्रमाण होती याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे शंभु राजांनी भर दरबारात रायाप्पा महाराचा केलेला सत्कार होय. दर्या सारंग आणि दौलत खान, मायनाक भंडारी यांचेकडे आरामाराची जबाबदारी नव्याने सन्मानपुर्वक देण्यात आली.

शिवाय अष्ट प्रधान मंडळात एका कर्तृत्वान स्त्रीची मुलकी कारभारसाठी नियुक्ती केली गेली. ती स्त्री म्हणजे महाराणी येसुबाई. कारण बऱ्याचवेळा अष्टप्रधान मंडळातील बऱ्याच जणांना दुहेरी जबाबदारी स्विकारत रणांगणावरही जावे लागत असे. कवी कलशांची निष्ठा लक्षात घेवुन त्यांना छंदोगामात्य हा किताब देऊन त्यांचाही अष्टप्रधान मंडळात समावेश केला गेला. एका उत्तर प्रदेशातील कर्तुत्ववान निष्ठावान व्यक्तिला स्वराज्यात मानाचे पद दिले.

परंतु त्यामुळे भुमिपुत्रांवर अन्याय झाला अशी बोंब मात्र कोणी केली नाही. कारण कवी कलशा एवढी निष्ठा एखाद दुसऱ्या व्यक्तिकडेच असु शकते. आणि पुढे त्यांनी ते आयुष्यभर सिध्दही केले. मोहोळजी घोरपडेंकडे पायदळाचे सेनापती पद देण्यात आले. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील आठ पैकी सहा जणांचा नव्याने प्रधान मंडळात समावेश करुन त्या सर्वांच्या सेवा जेष्ठतेचा संभाजी राजांनी मान राखला होता. त्याचबरोबर महाराणी येसुबाई व कवी कलश अशा तरूण रक्तालाही अष्टप्रधान मंडळात जागा देऊनही कर्तुत्वाला संधी निर्माण करुन दिली होती. जुण्या जाणत्यांचा अनुभव, नव्याची तडफ यांचा अनोखा संगम अष्टप्रधान मंडळात करण्यात आला होता.

- - - - - - - - - -

राज्याभिषकाचे तोरण

१६ जानेवारी १६८१ हा दिवस संभाजी राजांच्या राज्याभिषेकासाठी निश्चित करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर ६ वर्षांनी व राजांच्या महापरिनिर्वाणानंतर (३ एप्रिल १६८०) नंतर जवळपास ९ महिन्यानंतर संभाजी राजांचा राज्याभिषेक झाला. मधला संपूर्ण काळ हा स्वराज्याची विस्कटलेली घडी बसविणे, भावी युध्दाची तजवीज करणे व रयतेच्या कल्याणाच्या योजना बनविण्यात गेला. यावरुन हे नक्कीच स्पष्ट होते की संभाजी राजांना छत्रपति होण्याची बिल्कुल घाई नव्हती. परंतु राजाची रयतेबाबतची जी कर्तव्य असतात ती मात्र नेटाने पार पाडावयास राजांनी अगोदरच सरुवात केली होती.

राज्याचा वारसदार म्हणुन आपली योग्यता सिध्द करुनच पुढची वाटचाल करण्याची धमक त्यांच्यात होती आणि ते तसे वागले. उदा. चराईचा कर रद्द करणे. जे लोक किल्यावर संरक्षणासाठी राहावयाचे त्यांची गुरे गड पायथ्याला चरत त्यामुळे त्या लोकांच्या उत्पन्नात थोडीशी भर पडे. शिवाजी राजांची प्रथा शंभु राजांनी कायम केली.

तसेच तुकाराम महाराजांचे चिरंजीव महादजी बाबांना वर्षासनाची मोईन (वार्षिक अनुदान) करुन दिली. शिवाजी महाराजांनी सज्जनगड व चाफळसाठी दिलेली वर्षासने चालु ठेवली. चाफळच्या उत्सवात मुसलमान लोक अनेकदा गोंधळ घालुन यात्रेकरुंना त्रास देत असत, त्या उत्सवास संरक्षण पुरवीले. चिंचवडचे मोरश्वर गोसावी यांना काही गुंडांकडून त्रास होई त्यांनाही संरक्षण दिले, केळशीचे अवलिया फकीर बाबांचे वर्षासन कायम केले. या सर्व गोष्टींवरुन हे अगदी स्पष्ट होऊन जाते की शिवाजी महाराजांचे धारेण संभाजी राजे अगदी टाकोटाक पालन करीत होते. कुठेही संभाजी राजांनी आपल्या कर्तव्यात मग ते लष्करी असो वा मुलकी कमतरता ठेवली नव्हती.

राज्याभिषेकाचा दिवस निश्चित झाल्यावर राजांनी पुरोहीत म्हणुन गागाभट्टांची निवड केली होती. तसेही महाराष्ट्रात कोणी ब्राह्मण राज्याभिषेकाच्या सोहळ्याचे पुरोहित्य घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे दुर काशी क्षेत्री राहणाऱ्या गागाभट्टांवरच

अवलंबुन रहावे लागणार होते. शिवाय सहा वर्षापूर्वीच गागाभट्टांच्या हस्ते थोरल्या महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. म्हणुन गागाभट्टांना निमंत्रीत करण्यासाठी खंडो बल्लाळ या तरुण कुशाग्र बुध्दीच्या सहकाऱ्याला राजांनी काशीला पाठवले.

परंतु खंडो बल्लाळ काशीला पोहोचुन राज्याभिषेकाचे आमंत्रण देण्याअगोदरच येथील नतद्रष्ट तेथे पोहोचले होते व त्यांनी आपल्या जातभाई गागाभट्टांचे कान फुंकले होते. ज्यांचा तुम्ही राज्याभिषेक करायचा तो शिवाजी राजांचा पुत्र न्यायी नाही. धर्माला अनुसरुन वागत नाही अशा कागाळ्या त्यांनी उठविल्या होत्या. त्यामुळे संभ्रमीत गागाभट्टांनी आजारपणाचे कारण दाखवत येण्यास असमर्थता दाखविली. गागा भट्टांनी येण्यास असमर्थता दाखविल्याने संभाजी राजांना खुप दुःख झाले परंतु मुहूर्त निश्चित करण्यात आला होता. त्यामुळे ठरल्याप्रमाणे सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत तो मंगलमय सोहळा पार पाडण्यात आला.

आणि त्याच रात्री संभाजी राजांनी स्वराज्याचे नवीन तोरण बांधण्याचा संकल्प आपल्या विश्वासू सहकारी व सेनापती यांच्या समोर मांडला. राज्याभिषेकाची आठवण म्हणुन शिलंगण करण्याचे व सोने लुटण्याचा पक्का मनसुबा जाहीर केला. राजांच्या सूचनेनुसार हंबीरराव मोहित्यांनी (सरसेनापती) लुटवयाचे शीलंगणाचे सोने म्हणुन सुरतेची निवड केली होती. आणि राजांचा आदेश येण्याअगोदर पासुनच तशी त्याची जय्यत तैयारी करुन ठेवली होती.

जाणत्या राजाचे जाणते सेनापती होते हंबीरराव. परंतु चार चौघात हा मनसूबा हंबीर रावांनी प्रगट केला तो निव्वळ रणनितीचा भाग म्हणुन. शत्रूला गाफील ठेवण्यासाठी त्यांनी सुरतेची अवय उठवून दिली. तशी या पूर्वीही शिवाजी महाराजांनी दोनदा सुरतेवर छापा टाकल्याने आता तिथे पुरेशी शिबंदी मोघलांकडून ठेवण्यात येई. शिवाय उंच आणि मजबूत तटबंदी सुरत शहराभोवती बांधण्यात आली होती. याचीही हंबीररावांना पुर्ण कल्पाना होती. शत्रुचे लक्ष एका ठिकाणी केंद्रीत करुन दुसऱ्या ठिकाणी छापा घालण्याची योजना होती. खरा निशाणा होता तो वैभव संपन्न बुऱ्हानपुरवर.

तापी नदीच्या काठावर वसलेली बुऱ्हानपुर (मध्यप्रदेश) ही मोघलांची वैभवशाली नगरी असल्याने तेथील सुभेदारी औरंगजेब बादशाह आपल्याच एखाद्या जवळच्या नातेवाईकास देत असे. त्या नियमाप्रमाणे त्यावेळी बहादुरखान कोकलताश नावाचा औरंगजेबाचा दूधभाऊ त्या ठिकाणी सुभेदार होता. एक आठवड्यापूर्वीच बहादुर खान आपल्या पुतण्याच्या लग्नाला हैदराबादला निघुन गेला होता. परंतु इवाही कोणी साधा सुधा न्हवता तर तो हैदराबादच्या नवाबाचा भाऊ होता.

म्हणुन तोलामोलाची शानशौकत असलेली बारात घेऊन जावी या उद्देशाने त्याने

बुऱ्हानपुरची ठाणबंद असलेली आठ हजार सैन्यापैकी ३ हजारांची फौज आपल्या सोबत घेवून गेला व बुऱ्हानपुरची जवाबदारी नायक सुभेदार काकरखान याच्याकडे दिली. ३० जानेवारी १६८१ च्या सायंकाळी दोन हरकारे धावत आले व त्यांनी काही दिवसापासून सुरतेच्या आसपासच्या जंगलात मराठे घोडेस्वार पाहिल्याची खबर दिली.

त्यामुळे सुरतेवर कोणत्याही क्षणी हल्ला होऊ शकतो अशी अटकळ येथील जनता व्यापारी व वखारवाल्यांनी व्यक्त केली. कारण त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी असा अनूभव या पुर्वी २० वर्षा अगोदर पहिल्यांदा व १२ वर्षापूर्वी दुसऱ्यांदा शिवाजी राजांचा काळात घेतला होता. त्यामुळे सुरतेच्या सुभेदाराने तात्काळ हरकारे पाठवुन बुऱ्हानपुरमधील जमेल तेवढी फौज सुरतेच्या मदतीला पाठविण्यासाठी काकरखानाकडे रवाना केला. प्रसंग मोठा अवघड होता. बहादुर खान स्वत: हैदराबादकडे शिवाय ८ हजारातील ३ हजार फौज बरोबर घेवून गेलेला. बुऱ्हानपुरच्या संरक्षणाकरिता शिलकी फौज फक्त ५ हजार आणि त्यात सुरतेवरुन अशी खबर आणि फौज पाठविण्याची विनंती. काय करावे तरी काय?

इकडे आड आणि तिकडे विहिर अशी अवस्था. शेवटी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन फक्त एक हजाराची फौज बुऱ्हानपुरच्या संरक्षणासाठी ठेवून बाकीची ४ हजार फौज व दारुगोळा काकरखानाने ताबडतोब त्यांच सायंकाळी सुरतेकडे रवाना केली. थोड्याच वेळानंतर दुसरे काही हरकारे येवुन थडकले आणि पक्की खबर आली मराठे बुऱ्हानपुरवर चालुन येत आहेत. काकरखानला या बातमीवर विश्वास बसणे शक्यच नव्हते. त्याने ताबडतोब त्या जासुदास खुलासेवार विचारुन सेनापती कोण आहे याची महिती घेतली तर संभाजी राजे बुऱ्हानपुरवर जातीने चालुन आले होते.

गोष्ट विश्वास ठेवण्याजोगी बिल्कूल नव्हती. कारण पंधरा दिवसापूर्वीच संभाजी राजे रायगडवर होते आणि त्यांचा राज्याभिषेक होत होता. एवढ्या लांब पल्ल्याचे अंतर एवढ्या कमी वेळात धावत्या घोड्यावरुन सुध्दा कापणे शक्य नव्हते मग विश्वास कोण आणि कसा ठेवणार? तेवढ्यात दूसरे तीन जासूद येवून त्यांनी तीन कोसांवर मराठ्यांची सेनापती हंबीरराव मोहित्यांची नेतृत्त्वाखाली पंधरा हजाराची फौज लपत छपत येवून दबा धरुन बसल्याची खबर आणली.

मराठ्यांनी आपल्याला चक्क फसवीले असून आता एका बाजूने छत्रपती संभाजी स्वत: तर दूसऱ्या बाजूने सेनापती हंबीररावांची फौज. त्यापुढे आपल्या १ हजार फौजेचा काय टिकाव लागणार अशा विवंचनेत काकरखान पडला. परंतु तो धाडसी नायक होता. त्याने व्यापाऱ्यांकडे, वखारवाल्यांकडे असणारे सारे खाजगी रखवालदार मोठ्या हिंमतीने गोळा करुन थोडी फौज बांधली व निश्चय केला. सूर्योदयापुर्वी मराठे आपल्यावर चालुन येण्याअगोदर आपणच मध्यरात्री मराठ्यांवर चालुन जाऊ व जे

होईल ते पाहुन घेऊ. परंतु मराठ्यांना नगरीत प्रवेश मिळू देणे परवडणारे नव्हते. म्हणुन ते सगळे दीड हजार लोक मरायला उदार झाले. अर्धे अधिक मराठे झोपेतच कापण्याचा डाव मांडला गेला. त्यानुसार मध्यरात्री बुऱ्हानपुरचा मुख्य दरवाजा हळूच उघडला गेला आणि हजारभर घोडा आणि दिड हजार बाजारबुणगा मोठ्या हिंमतीने दरवाजातुन बाहेर पडला.

सलामीला स्वत: काकरखान होता. अर्धे अधीक घोडेस्वार दरवाजातुन बाहेर पडत होते आणि तेवढ्यात बाजुच्या निकामी खंदकात दबुन बसलेली मराठी घोडी खिंकाळत बाहेर पडली. हर हर महादेव! शिवाजी महाराज की जय!! संभाजी महाराज की जय!!! जागच्या जागी कापाकापीला सुरवात झाली. असा अनपेक्षित हल्ला काकरखानाला त्याच्या फौजेला अजिबात अपेक्षित नव्हता. स्वत: संभाजी राजे सर्वात पुढे घोडा फेकत हाणा मारा तोडा असे गर्जत आपल्या हातातील भवानी तलवार गरगर फिरवत होते. ज्वारी बाजारीची कणसे कापावीत तसे सणासण मोघलाईच्या मुंड्या कापत होते.

राजांचे साथीदारही मोठ्या उत्साहाने मोघलांवर तुटून पडले होते. काकरखान कसा बसा कुसाऱ्याच्या आत पळून जाण्यास यशस्वी ठरला. त्याने कुसाचे द्वार आतुन महत् प्रयासाने बंद करण्यास यश मिळविले आणि संभाजी राजांना हेच अपेक्षीत होते. कारण संभाजी राजांचे ध्येय बुऱ्हानपुरमधील संपत्ती हे होते. निरपराध माणसे व सैनिकांशी त्यांचे काही वैर नव्हते. लढाईचे नाटक चालु ठेवण्यासाठी दरवाजावर फक्त दोनशे तिनशे सैनिक ठेऊन राजे सरळ बहादुरपुऱ्याकडे वळले.

बुऱ्हानपुरमध्ये असलेल्या अनेक पुऱ्यापैकी बहादुरपुरा हा द्रव्याच्याबाबतीत खुपच भारदस्त होता. तिजोऱ्या आणि खचाखच भरलेल्या संदूका इकडेच होत्या. रात्रीचेच दुकाने फोडायाला सुरुवात केली. तीनच कोसाच्या अंतरावर जंगलात तळ ठोकलेल्या हंबीररावांना त्यांच्या जासूसांनी खबर दिली संभाजी राजे स्वत: बुऱ्हाणपुरात घुसले आहेत. खबर खरी आणि पक्की होती. परंतु रायगडावरुन बुऱ्हाणपुर हे अंतर एवढ्या कमी वेळात कापले जाईल यावर मात्र विश्वास ठेवणे अवघड होते. परंतु शंभु राजे पाच दिवस व पाच रात्रीची अविश्रांत धौडदौड करीत फक्त चार हजार फौज घेऊन बुऱ्हाणपुरावर चालून आले होते.

आपल्या सेनापतीच्या सोबतीला स्वराज्याला निधी उपलब्ध करण्याच्या मोहिमेचा श्रीगणेशा करण्याला. दुसऱ्याच क्षणात हंबीररावांची पंधरा हजाराची फौज राजाच्या मदतीला धावून आली. रात्रीच्याच फौजेला फौजा मिळाल्या. बहादुरपुरा लुटायला सुरुवात झाली. राजांनी आणि सेनापतींनी सपूंर्ण परिसराची नाकेबंदी करुन कोणत्याही प्रकारे बातमी बाहेर फुटणार नाही याचा बंदोबस्त केला. बाजूलाच शिखांचा कर्णपुरा

होता. त्याला वेढा घातला व शिखांना नि: शस्त्र केले गेले.

तिजोऱ्या, संदुका त्याचबरोबर तळघरे यांची तपासणी केली गेली. धरतीच्या पोटातील लक्ष्मी उकरली जात होती, हिऱ्यामोत्यांनी खोगीरे भरली गेली. मोठ मोठी गाठोडी गाढवांच्या, खेचरांच्या, तटांच्या पाठीवर चढवली गेली. संपूर्ण दोन दिवस लूट चालू होती. जवळपास १ करोड होनांची दौलत प्राप्त झाली होती. स्वराज्याचे तोरण बांधले गेले.

- - - - - - - - - - - -

सौदागर उस्मान

राज्याभिषेक झाल्यावर पंधरा दिवसातच संभाजी राजांनी बुऱ्हाणपुर या मोघलांच्या वैभवशाली नगरीवर छापा टाकला. बुऱ्हाणपुर ही औरंगजेबाची आणि मोघलांची दक्षिणेतील पारंपारिक आर्थिक राजधानी. अगदी सुरत आणि औरंगाबाद पेक्षाही समृध्द असलेली नगरी. या बुऱ्हाणपुरच्या मोहीमेवर असतानाच गुप्तहेरांनी एक नामी खबर आणली की जवळच्याच प्रदेशात अरबी घोडे विकण्यासाठी अरबस्थानवरुन एक सौदागर आलेला आहे. त्याच्याकडे जवळपास ४ हजार उमदी घोडे आहेत. खरे तर सौदागर उस्मान आपले अस्सल अरबी घोडे बुऱ्हाणपुरचे सरदार बहादुर खानाला विकायला आणली होती. परंतु बहादुर खान आपल्या पुतण्याच्या लग्न कार्यासाठी हैदराबादला गेल्यामुळे तो परत येईपर्यंत सौदागर उस्मान त्याची वाट पहात थांबला होता.

सौदागर उस्मानच्या बेहडयात अरबी जातीची चांगली तयार केलेली रुंदाड पाठीची सुंदर अशी जवळपास ४ हजार घोडे होती. संभाजी राजांना ही बातमी कळताच ते ताबडतोब तिकडे धावलो व एवढी जबरदस्त अश्वदौलत पाहुन ते प्रचंड खुश झाले. त्याचक्षणी त्यांनी ती अश्व दौलत विकत घेण्याचा निर्णय घेतला.

राजांनी एका उमद्या जनावरावर जीन सामानाशिवाय मांड ठोकली व एक रपेट करुन या घोड्यांच्या क्षमतेची खात्री करुन घेतली आणि मग सौदागर उस्मानला त्या घोडयांची किंमत विचारली. तेव्हा घाबऱ्या घुबऱ्या झालेल्या जीव मुठीत धरुन उभा असलेला सौदागर उस्मान अगदी अजीजीने म्हणाला महाराज किंमत कसली करता फुकटच घेवुन जा की! पण मला माझ्या लोकांना तेवढे जीवंत सोडा बाकी काही नाही. तेंव्हा राजे म्हणाले अरे तुझी असेल ती किंमत सांग! पुर्ण रोखीने पैसे देण्याची माझी तयारी आहे. तु काळजी करु नकोस भरवसा ठेव निश्चिंत हो! तेंव्हा राजांच्या या शब्दांमुळे जिवात जीव आल्यावर सौदागर उस्मान उपरोधीक पणे म्हणतो राजे आमची मस्करी करता का काय?

इथे बाजुलाच बुऱ्हानपुरवर तुम्ही पहारी कुदळी फावडे, टिकाव लावुन आख्खी नगरी लुटून काढताय आणि मला मात्र घोडयांची किंमत काय असे विचारताय. तेव्हा

संभाजी राजे म्हणाले. अरे दुसऱ्याने मेहनतीने तयार केलेली वस्तु लुटून नेण्याची रीत मोगलांची असु शकते शिव प्रभुंच्या मराठा लश्कराची नाही. जनतेच्या वस्तु फुकट आणि जबरदस्तीने उचलुन नेण्याची स्वराज्याची रीत केव्हाच असुच शकत नाही. तु ज्या मेहनतीने कष्टाने ही अश्व दौलत जोपासली वाढवीली आणि तु ती विकण्यासाठी एवढ्या लांब आलेला आहेस तेव्हा काहीतरी नफा मिळविण्यासाठीच ना! तुझ्या त्या मेहनतीचे चीज व्हायला पाहीजे व तुला तुझा नफा हा मिळालाच पाहीजे तेव्हा तु या चार हजार घोड्यांची किंमत सांग. आख्खा तांडाच आम्ही विकत घेऊ. तेव्हा धीर धरून सौदागर उस्मान ने घोड्यांची असलेली किंमत सांगितली. राजांनी त्याची जेवढी किंमत होती तेवढी लगेचच रोखीने अदा केली. शिवाय जे पैसे दिले तेही रायगडावरुन येताना सोबत आणलेले होते त्यातुन दिले. यावरुन संभाजी राजांची एखाद्याच्या कष्टाचे चीज करण्याची त्याच्या गुणांची कदर करण्याचा गुण समोर येतो.

एरवी मराठे छापा मारायचे लुट करायचे असा अर्थ लावणाऱ्यांसाठी अशा घटना म्हणजे मार्गदर्शकच ठरतील. शिवाजी महाराजांच्या काळात राज्याला मिळणारे महसूल हे शेतसारा, लुट, चौथाई व खंडणी अशा माध्यमातुनच येत असे. त्यामुळे राज्य चालविण्यासाठी लागणारा निधी उभारताना एखाद्या वैभव संपन्न नगरीवर छापा घालणे त्यावेळच्या परिस्थिती नुसार क्रम प्राप्त होते.

परंतु अशा प्रसंगीही मराठा लष्कर विनाकारण कोणाचा जीव घेत नव्हते किंवा त्या ठिकाणच्या आया-बहिणींच्या इज्जतीला हात लावत नव्हते. अन्यथा सौदागर उस्मानची घोडी जरी मराठा लष्कराने त्यावेळी पळवुन आणली असती तरी त्याचा कोणी जाब विचारला नसता. असे असतानाही संभाजी राजांनी तो सर्व व्यवहार रोखीने केला यातच त्यांची निती स्पष्ट होते व स्वराज्याचे मानदंड ते पाळत होते हे लक्षात येते. अशा प्रसंगामुळे मराठी लष्कर व संभाजी राजांची युध्द विषयक नितिमत्ता यावर प्रकाश पडतो. अन्यथा मोघल सैन्यात तर लुटालुट हा शिरस्ता असायचा.

हिंदवी स्वराज्यासाठी लढणाऱ्या लष्करात मात्र काही नियम होते व ते उल्लंघन करणाऱ्याला कडक शिक्षा होई. अगदी तो छत्रपती असला तरी आणि म्हणुनच कदाचित संभाजी राजांनी त्या नियमाप्रमाणेच सौदागर उस्मानकडुन रोखीने सर्व घोडी खरेदी केली.

रयतेच्या भाजीच्या देठालाही लष्कराने हात लावयचा नाही आणि गरज पडेल ती वस्तु रोखीने विकत घ्यावी परंतु जोर जबरदस्ती करून ती घेऊ नये हाच तो शिवप्रभुंचा शिरस्ता आणि त्याचे पालन करणारे छत्रपती संभाजी.

– – – – – – – – – – –

शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ

बुऱ्हानपुरवर छापा घालुन जवळपास १ कोटी होणांची दौलत स्वराज्याला प्राप्त झाली होती. परंतु ही दौलत रायगडापर्यंत सुरक्षितपणे कशी पोहोचवायची हा मोठा प्रश्न होता? कारण मराठा लष्कर जवळपास तीन चार दिवस बुऱ्हानपुर मध्येच होते व थोडयाच काळात बहादुर खान मराठ्यांचा प्रतिकार करण्यासाठी हैदराबादवरुन ससैन्य निघाल्याच्या बातम्या हेरांनी दिल्या होत्या आणि आता ताबडतोब बुऱ्हानपुर मधुन बाहेर पडणे आवश्यक होते.

बुऱ्हानपुरातुन स्वराज्याकडे जाण्यासाठी सोईची वाट होती ती म्हणजे धरणगाव चोपडा अशी एकमेव वाट होती. बहादुर खानाला मराठ्यांच्या परतीचा सोईस्कर मार्ग ठाऊक होता व त्यामुळे त्यांने तशी व्यवस्था करुन तो चोपड्यापासुन १० कोसावर दबा धरुन बसला होता. संभाजी राजांच्या वेगवान हालचाली करणाऱ्या हेरांची नजर बहादुर खानाच्या प्रत्येक हालचालींवर होतीच आणि त्यांनी ही बातमी लगेचच राजांकडे पोहोचविली होती. त्यामुळे आता समोरासमोर लढुन काही हासिल होणार नव्हते. पदरात आलेली लक्ष्मी अशा प्रकारे पुन्हा शत्रुच्या घशात जाणे योग्य नव्हते.

त्यामुळे अशा ठिकाणी शक्ती कामाला येणार नव्हती तर युक्तीनेच काम करावे लागणार होते. त्यामुळे शत्रुशी उघड संघर्ष करण्यापेक्षा शत्रुला चकमा देणेच सोईस्कर होते. त्यानुसार एक योजना बनविली गेली व ज्योत्याजी केसरकर व मुल्ला काजी हैदर यांच्यावर यातुन मार्ग काढण्याची व बहादुर खानाला कात्रजचा घाट दाखविण्याची जवाबदारी सोपविण्यात आली. ५०० घोडेस्वार घेवुन ज्योत्याजी व काजी साहेब नेमके बहादुर खानाच्या वाटेवर दबा धरुन बसला होता त्याच वाटेने योजनेत ठरल्या प्रमाणे प्रवास करीत असताना बहादुर खानाने या सर्वांना टप्यात येताच वेढा घालुन ताब्यात घेतले. तेव्हा यांनी ओरडून ओरडून सांगितले कि आम्हाला का धरता आम्ही तर वकील आहोत व आम्ही भागा नगरला कुतुबशहाकडे संभाजी राजांचे पत्र घेवुन चाललो आहे.

पुरावा म्हणुन त्यांनी संभाजी राजांच्या अस्सल अक्षरातील पत्रच काढुन बहादुर खानाला दाखवीले. बहादुर खानाची याबाबत खात्रीच पटली. परंतु संभाजी राजे या

वाटेशिवाय दुसऱ्या वाटेने जाणे शक्य नसल्याचे त्याला मनोमन वाटत होते. म्हणुन संभाजी राजे नक्की कोणत्या वाटेने गेले याची त्याने जबरदस्ती करून माहिती काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शंभु राजे या मार्गाने अजिबात येण्याची शक्यता नसल्याचे कारण सांगताना आपण या ठिकाणी दबा धरुन बसले असल्याची संभाजी राजांना खबर असल्याची पुडी सोडून दिली. त्यामुळे ते जळगाव किंवा औरंगाबाद या दिशेने जाण्याची शक्यता या दोघांनी वर्तवीली.

परंतु आपण या मार्गावर असल्याचे व मराठा लष्कराच्या मागावर असल्याचे संभाजी राजांना माहित असल्याने या वाटेने ते फिरकणार नाहीत हे मात्र पुन्हा एकदा निक्षुन सांगितले. लुटला गेलेला खजिना ताब्यात घेण्यासाठी व बादशहाच्या कोपापासुन वाचण्यासाठी बेधुंद झालेल्या बहाद्दुर खानाने लगेचच आपली दिशा बदलण्याचा निर्णय घेतला व त्या प्रमाणे आपल्या फौजेसह त्या ठिकाणाहुन पुढे निघुन गेला. तेव्हा त्याच दिवशी अंधार पडल्यावर त्याच मार्गे मराठा लष्कराचे ३ हजाराचे पथक जवळच्याच ठिकाणाहुन पुढे जात असताना बहाद्दुर खानाला दिसले.

परंतु तो पहातो तो काय ते सर्व घोडेस्वार मोकळेच होते एकाकडेही साधे गाठोडेही नव्हते. तेव्हा बहाद्दुर खानाला खात्रीच पटली की संभाजी राजे या मार्गाने नाही तर दुसऱ्याच मार्गाने गेले असणार. परंतु संभाजी राजांनी अगदी चाणाक्षपणे आपल्या सैन्याचे पाच भाग केले होते व ज्यांच्याकडे अजिबात माल नव्हता अशी एक तुकडी पुढे पाठवीली गेली होती. नंतर खान त्याच मार्गावरुन जेव्हा एदलाबाद कडे वळाल्याची खात्री पटल्यावर अवघ्या तीन ते चार तासातच मराठ्यांची लुटीचा माल खचाखच भरलेली फौज येथुन पुढे गेली. व लुटीचा माल गटा गटाने टप्पा टप्प्याने त्याच चोपडा धरणगाव मार्गे साल्हेरच्या मजबुत किल्ल्यावर सुरक्षितपणे पोहोचविला गेला.

शिवाजी महाराजांनी शहिस्तेखानाच्या फौजेला जसा कात्रजचा घाट दाखवीला होता त्याचीच पुनरावृत्ती संभाजी राजांनी या ठिकाणी केल्याचे दिसून येते.

- - - - - - - - - -

अखंड सावधानता

बुऱ्हाणपुरकडे जाताना संभाजी राजांनी वाटेवरील सप्तश्रृंगीच्या देवीला साकडे घातले होते आणि बुऱ्हाणपुरचा छापा यशस्वी ठरला होता. आता परतीच्या मार्गावरुन जाताना मध्ये मार्कंडा किल्ला व त्याच्या बाजुला सप्तश्रृंगीचा डोंगर. राजांनी आपला नवस फेडायचा व सप्तश्रृंगी मातेचे दर्शन घेण्याचा निर्णय घेतला.

सोबत असलेल्या पाच हजार घोडेस्वरापैकी फक्त हजारभर लोक आपल्या सोबत ठेवुन बाकीच्या लोकांना माल घेऊन पुढे जाण्यास सांगितले. बहाद्दुर खान पाठलाग करण्याची पुर्ण शक्यता होती. प्रसंगी प्राणही धोक्यात येऊ शकतील असे बाकीचे सहकारी परोपरीने सांगत होते. परंतु राजांची देवीवर खुप श्रध्दा व नितांत विश्वास. त्यामुळे पुढील लढाईसाठी देवीचा आशिर्वाद घेऊनच पुढे जायचे ठरले. रात्रीचाच डोंगर चढुन राजे वर आले.

राजे भाविक व श्रध्दावान असल्याने येताना किंवा जाताना परंतु देवीच्या दर्शनाला नक्की येतील अशी अटकळ बांधुनच आजुबाजुचे भिकारी भिक्षा मागण्यासाठी व गोर गरीबांची मदत मिळावी म्हणुन गर्दी झालेली होती. त्यातच चार पाच फकीरही सामिल झाले होते. राजे सर्वांना थाळीत ओंजळी भरभरुन मोहरा टाकत होते. तेवढयात अखंड सावधान असणाऱ्या राजांच्या कानावर अल्लाह! अल्लाह! दीन! दीन! मारो मारो असा आवाज ऐकु आला. ताबडतोब फकीराच्या वेशात असलेले पठाण त्यांच्याकडे लपविलेल्या छोट्या तलवारीनिशी राजांवर तुटून पडले. ते अंगावर येण्यापुर्वीच सावध पवित्रा घेत राजांनी आपली भवानी तलवार उपसलेली होती. एकावेळी ते सर्वजण संभाजी राजांवर चोहोबाजुने धावले.


राजांची भवानी तलवार दांड पट्यासारखी गर गर फिरत होती. त्यातील दोघांचे वार सरळ राजांच्या खांद्यावर येवुन पडले. परंतु सद-याच्या आत चिलखत घालण्यास राजे विसरले नव्हते. शिवाय डोक्यावरचा टोपही परिधान केलेलाच होता. त्यामुळे राजांचा बचाव झाला. माता सप्तश्रृंगी मदतीला धावली होती. सप्तंश्रृंगी मातेच्या साक्षीने संभाजी राजे पठाणांच्या रक्ताचा अभिषेक देवीला घालत होते.

शंभु राजे त्या पठाणावर तुटून पडले होते. राजांनी त्यातील तिघांना पहिल्या झटक्यातच गारद केले होते. चौथ्या पठाणाला तर असा जोरदार तडाखा दिला होता की त्याचा बावटाच तुटून पडला. तेवढ्यात बाजुला सावध पवित्र्यात असलेला पाचवा पठाण जवळच्या झाडावर चढला व त्याने वरुन राजांच्या अंगावर उडी घेतली. त्यांच्या अंगावर बसुन तो त्यांच्या अंगाची दामटी करु पाहत होता. दुसरा अफजलखानच तो. त्याने संभाजी राजांना घट्ट पकडुन ठेवले होते. राजांना खाली पाडुन तो दाबुन धरत होता.

आता ताकदीने प्रतिकार करणे अवघड होते कारण तो पठाण खुपच बलदंड व प्रचंड वजनाचा होता. तेंव्हा राजांनी युक्तीपुर्वक एका बगलेवर कलंडुन आपले हात मोकळे करण्याचे योजिले. त्याप्रमाणे राजे एका बगलेवर कलंडले व उजवा हात मोकळा झाल्याबरोबर त्यांनी कंबरेचा जांबिया काढला व त्या पठाणाच्या पोटात घुसवला. त्या पठाणाचा कोथळाच बाहेर काढत तो जांबिया शेवटी त्याच्या गळ्याजवळून बाहेर पडला. त्या हल्लेखोर पठाणाची जागेवर चीरफाड करण्यास राजे यशस्वी झाले.

कदाचित देवीला स्वत: संभाजी राजांचा पराक्रम पाहण्याची व रक्ताचा अभिषेक स्विकार करुन आशिर्वाद द्यायची इच्छा झाली असावी. राजांचा पराक्रम पाहुन व अखंड सावधानता पाहुन सप्तश्रृंगी देवीला मनोमन हर्ष झालाअसावा हे नक्की. देवीने संभाजी राजांना भरभरुन आशिर्वाद दिल्यानेच पुढे जवळपास आठ वर्ष संभाजी राजांना मोघला विरुध्द लढताना अपयशाचे तोंड पाहाण्याची वेळ आली नाही आणि मोघलांना सलग आठ वर्षात एकही विजय मिळवीता आला नाही. यावरुनच सप्तश्रृंगी मातेने संभाजी राजांना वीरभुषण होण्याचा आशिर्वाद नक्कीच दिला होता हे सिध्द होते.

- - - - - - - - - - -



प्रगतीचा दृष्टीकोन

एके दिवशी दाभोळचे ठाणेदार मल्हार रंगनाथ आपल्या सोबत संगमेश्वर सुभ्यातील काही शेतकरी घेवुन राजांच्या भेटीला आले. त्यांचे राजांकडे काय स्वरुपाचे काम आहे हे कळल्यावर जो तो मल्हार रंगनाथ यांची चेष्टा करु लागला. परंतु मल्हार रंगनाथ आपल्या प्रस्तावावर ठाम होते व तो राजांपुढे मांडण्याचा त्यांचा पक्का निश्चय होता. म्हणुनच त्यांनी राजांची कशी का होईना भेट घेतलीच व शेतकऱ्यांचा प्रस्ताव राजांपुढे मांडला.

प्रस्ताव असा होता कि ओढ्याला बांध घालून पाण्याचा प्रवाह डोंगरातुन दुसरीकडे वळवायचा व आजुबाजूच्या दोन-तीन गावातील कायम स्वरुपी दुष्काळ कायमचा दुर करायचा. त्यासाठी गरज होती ती फक्त चौदशे हात लांबीचा चर खोदण्याची. जागेचा सर्वे स्वत: ठाणेदार मल्हार रंगनाथ यांनी केल्यावरच ते शेतकऱ्यांचा प्रस्ताव घेऊन आले होते ते एका अडचणीमुळे आणि ती अडचण म्हणजे या प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी.

छत्रपती संभाजी राजांनी शेतकऱ्यांचे व मल्हार रंगरावांचे म्हणणे शांतपणे ऐकुन घेतले. हे काम शक्य होईल का? असे विचारणा करुन या प्रकल्पातील लोकांचा सहभाग व निष्ठा यांची थोडीशी परिक्षा घेतली. आलेल्या लोकांची या प्रकल्पातील सचोटी व प्रामाणिकपणा लक्षात घेऊन त्यांना ताबडतोब एक हजार होणांची सरकारातुन उचल देण्याची आज्ञा निळोपंत पेशव्यांना दिली. शिवाय या प्रकल्पाचे कामकाज पहाण्यासाठी स्वत: जातीने हजर राहू असे सांगितले. फक्त निधी उपलब्ध करुन स्वस्थ बसणारा राजा काय कामाचा.

आपण दिलेल्या निधीचा विनीयोग कशा प्रकारे होतो हे पाहाण्याचीही जबाबदारी राज्यकर्त्यांची असते. अन्यथा गैरकारभारांना उत येत असतो व सर्व व्यवस्था कोलमडुन पडत असते. त्याबाबत राज्यकर्त्यांनी सावध असणे केंव्हाही बरें. छत्रपति संभाजी महाराजांनी शेतकऱ्यांना धरण बांधण्यासाठी ताबडतोब निधी उपलब्ध करुन तर दिलाच. परंतु त्याच वेळी त्या निधीचा कोठेही अपहार होणार नाही याची दक्षता घेतली.

यावरुन संभाजी राजांची शेतकऱ्यांबद्दल असलेली आपुलकी आणि त्याचवेळी प्रशासनावरील पकड या दोन्ही गोष्टी सहज आपल्या लक्षात येवु शकतात आणि राज्याच्या विकासासाठी जर कोणी काही नवीन कल्पना मांडत असेल तर त्याला ताबडतोब प्रोत्साहनही देण्याची संभाजी राजांची वृत्ती यावरुन स्पष्ट होते.

- - - - - - - - - - -

श्री

छत्रपति स्वामी यांनी राजश्री धर्माजी नागनाथ मुद्राधारी प्रा कुडाल व माहालानिहाय प्रांत मामले फोंडा वासि आज्ञा केली ऐसा जें राजश्री नागोजी नाइक प्रतापराउ सरदेसाई यांही विनंति केली जे आपण मामले मजकूरचे सरदेशमुख वडील घराणेत वडील परंपरा देसकत चालत आली आहे ते प्रमाणे प्रवर चालवावा आदलखानी कारकीरकीस हकवतन इनाम जिरायत व बागायत व मुकासो गांव बिल- कसूर चालत होते हाली मख्ता खंड दूर सालीना होन निशांणी ५०० पाचसें देतात तेणेकरोन अवकात चालत नाही म्हाराज स्वामी कृपाल होऊन पूर्ववतप्रमाणे वृंति दुमाला करुन चालवावें म्हणून विज्ञापना केली व येविसीं राजश्री मल्हार नरजू हरी व राजश्री नागोजी इंगले हवलदार किले भीमगड याहीं विनंतिपत्रें लिहिली जें देसाई मशारनिले स्वामीसेवाठाई बहुत तात्पर्य धरितात सांप्रत किले मजकूरचे तनखेच्या खेडेयासि तांबाकडील स्वारी येऊन धोसो लागले ते समई देसाई मशार निले आपले जमावनसी राहोन व दुसरे देसमुखाकडील जमाव मिलऊन घेउन मार्ग धरुन मर्दानगी करून गनीमांस नतीजा*

"गोसावी कुशल असतील तो ठेवीत जाणे."


पाटगाव प्रांत कुडाळ येथे शिवकालात मौनीबुवा नावाचे थोर सत्पुरुष होऊन गेले. शिवप्रभूंनी त्यांचा आशीर्वाद घेऊन त्यास गुरुस्थानी मानले होते. त्यांच्या पालखीस भोई-वाजंत्र्यांची कायमची व्यवस्था लावून देणारे संभाजी महाराजांचे कुडाळच्या सुभेदारास आज्ञा पत्र -

श्री
[illegible]
[illegible] ।।
[illegible]
[illegible]

स्वस्तिश्री राज्याभिषक शक ७ रौद्र नाम संवत्सरे अश्विन शु ।। प्रतिपदा इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी राजश्री गनोराम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ यांसी आज्ञा केली असी जे - तुम्ही हुजूर येऊन स्वामीस विनंति केली की राजश्री मौनी गोसावी पाटगावी रहातात. बहुत थोर ईश्वर पुरुष आहे. त्यास पालखी आहे. परंतु नेहमी भोई नाहीत. तरी नेहमी भोई व वाजंत्री नेहमी करून देविले पाहिजे. यावरून वरशास भोयास व वाजंत्रियास मोईन होन निशाणी १२५ सवासे करून दिले आहेती. यात भोई व वाजंत्री ठेवून देणे. ते सेवा करितील. तुम्ही सदर्हू पैके तुळजागिरी शिष्य गोसावियांचा आहे त्याजवळ पावीत जाणे. ते भोयास व वाजंत्रियास हक पावितील. सदर्हू मोईन ६ ।। सालमजकुरापासोन केली असे. यासी वाजंत्री तुम्ही ठेविले आहे. भोई ठेऊन देणे आहे. वैसीयासि वाजंत्री ज्या दिवसापासून सालमा । ठेविले असाल ते दिवसापासून वाजंत्रियास वरशास पंचवीस होनप्रमाणे पाववणे. उरले शंभर होन. यासी भोई ज्या दिवसापासून ठेवाल ते दिवसापासून सालमा ।चे हक पाववणे. पुढे सदर्हू शंभर होन भोयास व पंचवीस वाजंत्रियास याप्रमाणे साल दर साल पावीत जाणे. आणि धर्मार्थ म्हणून गोसावीयांचे नावे खर्च लिहीत जाणे. ताजा सनदेचा उजूर करीत नच जाणे. गोसावी कुशल असतील तो ठेवीत जाणे. असल गोसावीयाच्या शिष्यापासी देऊन तालीक सुभा लिहून लावणे. सदरहू सवासे होन नियत देविले आहे, तियासी दखावाटाव माफ असे. लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरनिवीस
रा । छ. १६ माहे रमजान
छ. २९ शाबान माहे शाबान
सुरु सूद बार बार
श्रीशंकर पौ । छ. २९ रमजान



रामशेज

जवळपास पंचवीस वर्षापूर्वी औरंगजेब महाराष्ट्रात आपल्या पित्याच्या वतीने दक्षिणेचा सुभेदार म्हणुन काही वर्ष राहीला होता. त्यामुळे दख्खनची त्याला चांगलीच ओळख होती त्यामुळे मराठ्यांशी लढताना कदाचित दिल्ली धोक्यात येऊन गहजब होऊ नये यासाठी बादशहा कमालीचा सतर्क होता. कारण बुऱ्हानपुरवरुन येणारी वाट खानदेश, नाशिक, कल्याण अशी थेट रायगडाकडे जाते आणि जर पुढे भविष्यात कधी यदाकदाचित मराठे अकबराच्या पाठीशी उभे राहिले तर संभाजी राजे अकबर व दुर्गादास सरळ याच रस्त्याने पुढे दिल्लीकडे धावले आणि उत्तरेकडील अकबराचे चाहते, राजपुतान्यातील राजपुत हे सर्व एकत्र दिल्लीच्या तख्तावर जाऊन आदळतील आणि तसे झाले तर सर्व सत्यानाश अशी भिती बादशहाला सातत्याने वाटत होती. त्यामुळे नाशिक ते ठाणे परिसरातील दिल्लीच्या वाटेवरचे सर्व किल्ले आणि ठाणी ताब्यात असणे खुपच आवश्यक होते.

दुसरे म्हणजे राम शेज किल्ला मोकळ्या मैदानावर होता व आजुबाजूला मोठे डोंगर किंवा घनदाट जंगल, झाडी असे काही नव्हते. सात कोसापेक्षा जवळ त्र्यंबक गडाशिवाय इतर दुसरा कोणताही किल्ला नव्हता. त्यामुळे छुपे हल्ले होण्याची शक्यता कमीच होती. शिवाय सपाटीचा प्रदेश असल्याने मराठ्यांना किल्ल्यावर चोरी छुपे रसद पुरवणेही बऱ्यापैकी अवघड होते. त्यामुळे ताबडतोब रामशेज गिळता येईल व सलामीलाच विजय मिळाल्याने आपल्या फौजा चेकाळतील, त्यांना आत्मविश्वास लाभेल असे बादशहाला मनोमन वाटत होते.

तिसरे म्हणजे पुर्वी बादशहा जेंव्हा दक्षिणेवर सुभेदार म्हणुन आला होता त्यावेळी त्याने पहीला हल्ला राम शेजवरच चढविला होता. राजशेज झटकन त्याच्या ओंझळीत पडून त्याला दक्षिण मोहीमेचा चांगला शुभ शकुन लाभला होता. त्यामुळेच रामशेज हा भावनिक दृष्टया, फौजेच्या आत्मबल दृष्ट्या व लष्करी हालचालीवरील नियंत्रण दृष्ट्या बादशहाला महत्वाचा वाटत होता आणि म्हणुन त्याने आताही रामशेज पासुनच आघाडी उघडण्याचे पक्के केले. मराठ्यांचे गंडस्थळ म्हणजे किल्ले. त्यामुळे एवढ्या

फौजेनिशी सहज दोन दोन दिवसात एक एक किल्ला जिंकुन अवघ्या सहा सात महिन्यात संपूर्ण दख्खन जिंकु असा बादशहाचा कयास होता.

त्यामुळे रामशेजचा शुभारंभ करण्यासाठी कडवा योध्दा शहाबुद्दीन फिरोज जंगला त्याने तसा आदेश दिला. सोबत पसतीस चाळीस हजार फौज, प्रचंड तोफखाना व बक्कळ दारुगोळा दिला. आणि ताबडतोब रामशेजला वेढा पडला. शहाबुद्दीनच्या जोडीला इतर अनेक नामचीन सरदार दिले. कासिम खान, शुभकर्ण बुंदेला, पीर गुलाम मोहम्मद खलील, राव दलपत बुंदेला, हे त्यातले काही निवडक बीनीचे सरदार. मोहीमेला किती वेळ लागेल असे विचारणा केल्यावर शहाबुद्दीनने बादशहाला उत्तर दिले.

'सकाळच्या नमाजानंतर बारुद डागायला सुरुवात करतो, किल्ला फतेह करुन दुपारच्या नमाजाची चादर किल्यावर अंथरतो' खरोखरच एवढी मोठी फौज, तोफखाना, दारुगोळा बरोबर असल्यावर एक दिवसात किल्ला पाडतो असे शहाबुद्दीन ने म्हटले तर चुकीचे नव्हते. कारण रामशेज किल्ला एकदम छोटा होता. शिवाय उंचीही भरपुर नव्हती आणि किल्ल्यावर मराठ्यांची शिबंदीही हजार पेक्षा कमी होती. किल्यावर म्हणाव्या तशा लांब पल्ल्याच्या तोफाही नव्हत्या. पण तरीही रामशेज मोघलांना जवळपास सहा वर्ष आपल्या ताब्यात घेता आला नाही. मराठ्यांनी पराक्रमाची शर्थ करुन हा छोटासा टेकडीवजा किल्ला सहा वर्ष झुंजवला. राम शेजचा किल्लेदार कोणी सामान्य शिलेदार नव्हता.

तानाजी मालुसरे सोबत कोंढाण्याची लढाई खेळलेला जुना जाणता अनुभवी सरदार सुर्याजी जेधे हा होता. (काही ठिकाणी राम शेजचा किल्लेदार रंभाजी पवार असल्याचा उल्लेख सापडतो. परंतु सुर्याजी जेधे हेच त्यावेळी किल्याचे किल्लेदार असल्याचे जास्त सप्रमाण वाटते. तरी कोणत्याही परिस्थितीत मराठ्यांच्या पराक्रमांवर दुमत करता येणार नाही. नक्की किल्लेदार कोण होता हा वाद तेवढा महत्वाचा होऊ शकत नाही.) पराक्रमाची शर्थ करणारा दुसरा तानाजी मालुसरेच तो. कोणत्याही बाजूने तो मुघलांच्या सैन्याला वर शिरकु देत नव्हता.

मुघल थोडेसेच पुढे सरकले की लगेच किल्ल्यावरुन गोफण गुंड्यामधुन सटासट धोंडे मारले जात. एक एक दगड एवढा वेगाने येऊन आदळत असे की दगड लागल्यावर माणुस जागीच जायबंदी होवुन मरणासन्न व्हावा. शिवाय सुर्याजी जेधे यानी अजुन एक नवी शक्कल लढवीली. गडावर सापडेल तेवढे बैलाचे, रेडयाचे चांबडे गोळा केले. सागाच्या लाकडाचे ओंडके आतुन पोकळ करुन लांब पल्याच्या तोफा

बनवील्या आणि त्यातुन डागण्यासाठीचे गोळे सुध्दा पल्लेदार बनवीले. संभाजी राजांनी प्रत्येक किल्यावर पुरेसा दारुगोळा उपलब्ध ठेवला होता आणि त्यामुळेच रामशेजच्या लढाईत कमी वेळात अशा प्रकारचे अनेक गोळे बनवीता आले.

जवळपास साडे तीन हजार मुघल नुसत्या गोफण गुंड्याच्या दगड गोटयांच्या माऱ्यांनी खल्लास केले. दिवसा मोघलांचा तोफखाना आग ओतायचा किल्ल्याचा एखादा तटबंदीचा थोडाफार टवका उडायचा. दुसऱ्या दिवशी पुर्ण तटबंदी ढासळवुन आपण आत घुसू असे वाटणाऱ्या मोघलांना रोज पश्चाताप व्हायचा. कारण जेवढी म्हणुन तटबंदीची ढासळण व्हायची तेवढी रातोरात किल्यावरील मराठे बांधुन काढायचे. अगदी अंधाऱ्या रात्रीत हे सर्व काम अगदी सराईत पणे चालायचे. किल्ला दुसऱ्या दिवशी पुन्हा जैसे थे असायचा. गडावरील तुटपुंज्या मराठ्यांचा तो पराक्रम मोघलांना अविश्वसनीय वाटायचा. मराठ्यांना जादुटोणा, चेटुक वगैरे करता येते असे पुन्हा पुन्हा वाटायचे. खरे तर ती जादु स्वराज्याबद्दल निष्ठा असणाऱ्या निष्ठावंत माणसांची त्यांच्या हातांची आणि पराक्रमाची असायची.

रामशेज स्वराज्याच्या सीमेवर असल्याने बादशहाला तेथेच झुंजवत ठेवुन आत घुसण्यास अडथळा निर्माण करायचा या हेतुने रामशेज सतत झुंजत ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे संभाजी राजे स्वत: रामशेज बद्दल लक्ष घालत होते. हंबीरराव मोहितेसुध्दा रामशेजसाठी सावध होते. किल्याला वेढा घालुन बसलेल्या त्या पसतीस चाळीस हजार मोघल सैन्यांवर वेळोवेळी अवेळी रात्री अपरात्री अनेक छापे पडत होते.

मराठे त्यांना सळो की पळो करुन सोडायचे. रामशेजचा किल्लेदार वर सरकु देत नव्हता तर हंबीरराव व इतर सरदार किल्याच्या पायथ्यालाही थांबु देत नव्हते. मोघलांच्या फौजेची अवस्था अक्षरश: जीवघेणी झाली होती. इकडे आड आणि तिकडे विहीर. किल्ला तर हाती येत नव्हता व मराठे त्यांना स्वस्त झोपु देत नव्हते आणि दिवसा त्यांना जागरण करावे लागत असे.

मे १६८२ मध्ये शरीफ खान नावाचा मोघली सरदार रसदेचे पाचशे हत्ती व एक हजार बैल घेऊन जाणार असल्याची मराठ्यांना खबर लागली. दिवसा ढवळ्या त्या रसदेवर मराठ्यांनी अचानक छापा टाकुन शेकडो मोगल कापुन काढले. अनेक नामचीन मोगली सरदार प्राणास मुकले. परंतु हा छापा पडल्याचे मुघली तळाला कळताच किल्याच्या पायथ्याला असलेले मोघल धावुन आले. घमासान लढाई झाली. सुमारे सहाशे मराठे कामी आले. शिवाय दोन हजार भर मराठे जखमी झाले. परंतु त्यांनी मोघलांची, त्यांच्या रसदेची भरपुर हानी केली.

मोघलांचा वाढता लोंढा पाहुन संध्याकाळी मराठ्यांनी तात्पुरती माघार घेतली. परंतु या छाप्यामुळे मोघलांना प्रचंड दहशत बसली. अनेक महिने असा आगीचा खेळ अधून मधून चालुच होता. शहाबुद्दीनने मराठ्यांच्या नव्या रसदेचे सर्व मार्ग कापुन काढले होते. तरीही मराठे मागे हटत नव्हते. जमिनीवरुन तोफा चालवुन म्हणावे तसे परिणाम मिळत नव्हते म्हणुन त्याने मोठ मोठाले वृक्ष तोडुन पाचशे सैनिक एका वेळी उभे राहुन मारा करु शकतील असे भले मोठे लाकडी बुरुज बांधले. त्यावरुन तो तोफांचा भडीमार करु लागला. आता तोफगोळे समांतर रेषेत उडत होते.

पण रामशेजची तटबंदी कातीव, काळ्या पौलादी पत्थरांची होती. रामशेज अजिंक्यच रहात होता. आता पुरेपर दीड वर्ष झाले होते. परंतु रामशेज हाती येत नव्हता. हे पाहून बादशहा खुपच संतापला. त्यातच संभाजी राजे रामशेजकडे नवी कुमक पाठवीत असल्याची खबर मिळाली. तसे त्याने आपला दुध भाऊ बहाहुर खान कोकलताश याला बोलावुन घेतले व ताबडतोब रामशेजकडे पाठवुन दिले. त्याचवेळी इकडे संभाजी राजांनी रुपाजी, मानाजी, यांना आठ हजार फौजेनिशी रामशेजच्या मदतीला धावायचा आदेश दिला.

बहाहुर खानाची पंधरा हजाराची फौज रामशेजला पोहोचण्यापुर्वीच छापा टाकणे क्रमप्राप्त होते. दोन्ही कडव्या फौजांची गणेश गावाजवळच चकमक उडाली, अटीतटीची लढाई झाली. मराठ्यांची हानी होत असल्याचा पाहुन मानाजी, रुपाजीने तात्पुरती माघार घेतली. परंतु सावध पवित्रा घेत ते तेथेच रामशेजच्या आजुबाजूला वावरत असत. रामशेज असा सहजासहजी हाती येत नाही हे पाहुन याने एक वेगळी युक्ती लढवीली. मराठ्यांना गाफील ठेवून रात्रीचाच मागच्या बाजुने निवडक कडव्या योध्यांच्या सहाय्याने हल्ला चढवुन रामशेज ताब्यात घ्यायचा.

त्यानुसार त्याने किल्ल्याच्या समोरच्या बाजुला रात्रभर तोफ गोळ्यांची सरबत्ती चालु ठेवली. त्याचवेळी दुसऱ्या अंगाने तो दिड हजार मोघलांच्या सहाय्याने किल्यावर चढणार होता. मराठे बेसावध असतील असा मोघलांचा कयास होता. परंतु अशा फसवाफसवीच्या मराठे कसे पटाईत असतात याचा त्यांना चांगलाच परिचय मिळाला. किल्याच्या दुसऱ्या अंगाला स्वतः किल्लेदार सुर्याजी जेधे आपल्या दोनशे वीरांसह दबा धरुन बसला होता. मोघलांनी फक्त तटबंदी चढायचीच ते वाट पहात होते.

बिचारे मोघल झाडाझुडपांना पकडत, दोराला लटकत कसेबसे तटबंदी पर्यंत पोहचले. दोघे चौघे वर तटबंदीवर पोहोचलेही. तेवढ्यात वरुन गोफणींचे रबर लांबले. तसेच मोठ-मोठ्या दगडांचा धोंडयांचा मोघलांवर वर्षाव होऊ लागला. दगडांचे सटासट असे जोरदार तडाखे पडत होते. धडाधड मोघल खाली कोसळत होते.

शिवाय बुरुजावरुन मोठमोठे दगड तेलात भिजवलेली पेटती तरटी खाली पडू लागली. काही जण आगीने तर काही जण दगडाच्या तडाख्याने जागीच यमसदनास पोहोचले.

चढाई करण्यास तटबंदीजवळ पोहोचलेल्या चारशे मोगलांपैकी मोजुन पाच पंचवीस बचावले बाकीचे सारे जागेवरच गारद झाले होते. शहाबुद्दीन खानाला पराभव खुपच वर्मी लागला. आता रामशेजच्या मोहीमेवर थांबण्याची त्याची अजिबात इच्छा नव्हती. रामशेज त्यांना दाद देत नव्हता. जाता जाता त्याने बांधलेला तो भलामोठा लाकडी बुरुजही जाळून टाकला. जो बांधायला हजारो सैनिक तीन महिने राब राबले होते.

आता रामशेजची संपूर्ण मोहीम बहाद्दुर खानाच्या हाती आली होती. त्याने व्युव रचना केली. मराठ्यांच्या छुप्या रसदेचा शोध घेऊन जवळच्याच त्र्यंबक गडावरुन येणाऱ्या रसदेची वाट रोखुन रामशेजचा गळा आवळला. रामशेजची रसद पुर्ण बंद झाली होती. गडावरील शिबंदीला वाईट दिवस आले होते. मराठ्यांची रसद आणि बारुदाची व्यवस्था करणारे घोडे स्वार तयारीत होते. पण किल्ल्याच्या भुयारी वाटा सुध्दा पुरत्या बंद झाल्या होत्या. रामशेजच्या परिसरात रामशेजसाठी धडपड करणारे रुपाजी भोसले, मानाजी मोरे घोर चिंतेत सापडले. गडावरील शिबंदी अन्नपाण्यासाठी मरु देणे मराठ्यांच्या इतिहासात कधी घडले नव्हते आणि ते शोभणारेही नव्हते. परंतु गडाभोवतीचा वेढा खुपच सक्त होता. आता दोन चार रोजात किल्ला पडेल अशी नाजुक परिस्थिती निर्माण झाली होती.

त्याचवेळी निसर्गराजा मदतीला धावला. रामशेजकडे अवेळी दोन दिवस पाऊस पडला. रामशेजचा परिसर धुक्यात हरवु लागला. पडलेल्या पावसाने मेलेली जनावरे व सैनिक यांच्या कुजक्या वासाने दुर्गंधी पसरली. माणसे व जनावरे भडाभडा ओकु लागली. त्यामुळे नाईलाजास्तव बहाद्दुरखानाने एका रात्रीसाठी पहारे ढीले केले. तेवढया वेळेत संभाजी राजांचे तयारीत असलेले वीर रसद व बारुद घेऊन नव्या कुमकेसह गडावर जाऊन दाखल झाले.

गडावरचा दुष्काळ तात्पुरता का होईना हटला. शिवाय नव्या दमाचे साथीदार रामशेजच्या मदतीला मिळाले. किल्ला पुन्हा ताजातवाना झाला. अजुन काही महिने झुंजण्यासाठी. बहादुरखानही रामशेज ताब्यात घेण्यासाठी ऐनकेन प्रकारे प्रयत्न करीत होता. कधी शक्ती तर कधी युक्ती असे अनेक प्रयोग त्याने आजमावुन पाहिले.

एकदा तर त्याने चक्क एका मांत्रिकाचीही या कामी मदत घेण्याचे ठरवीले. मराठ्यांना भुते वश असतात असा त्याचा आणि मोगल सैन्याचा समज होता म्हणुन त्याने तसा उपाय योजिला. बहाद्दुरखानाला असा सल्ला देणारा मांत्रिकही कोणी

बिलंदर मराठाच असावा असा संशय येतो. त्या नकली मांत्रिकाने बहादुर खानाला शंभर तोळयाचा साप बनवुन द्यावयास सांगितले व आपल्या मागोमाग यायचे. किल्याचे दरवाजे मंत्राने आपोआप उघडतील असे ठामपणे सांगितले. त्याप्रमाणे ठरलेल्या दिवशी ठरलेल्या मुहूर्तावर बहादुरखान स्वत: व त्याचे स्वार शिपाई मांत्रिकाच्या मागोमाग किल्याच्या दिशेने चालु लागले.

अगदी किल्ल्याच्या तळापर्यंत जाईपर्यंत मांत्रिकाची जादु चालल्याचे दिसत होते. आता हा सगळा जमाव तटबंदीच्या दिशेने मोठया हर्ष उल्हासाने पोहोचतो तेवढ्यात वरुन गोफण गोंडे आपला चमत्कार दाखवु लागले त्यामुळे मोघलांना दिवसाच तारे दिसु लागले. सटासट दगड येऊन अंगावर डोक्यावर कपाळावर आदळू लागले. सगळी पळापळ झाली. मोघल इकडे तिकडे सैरावैरा धावु लागले. आपला जीव वाचवु लागले.

तेवढ्यात हा मांत्रिक बाबा आपल्या सोन्याच्या सापासह कोठे तटबंदीत कसा गायब झाला हे कोणाला कळायला कोणी शिल्लकच राहीले नव्हते. अशा प्रकारे रामशेजसारखा हा टेकडीवजा किल्ला छत्रपती संभाजी महाराजांनी जवळपास साडेसहा वर्ष लढवीला. त्यामुळे माझ्या स्वराज्यातील एक एक किल्ला किमान एक एक वर्ष झुंजवीन अशी प्रतिज्ञा शिवाजी महाराजांनी पुर्वी केली होती ती संभाजी महाराजांनी आपल्या कर्तुत्वाने सिध्द केली.

राजगढ, पुरंदर, सिंहगड, पन्हाळा, रायगड, हे किल्ले तर अगदी दहा दहा वर्षे झुंजले असते. तरी मोघलांना ते पदरात पाडता आले नसते. एवढी भक्कम संरक्षण व्यवस्था छत्रपति संभाजी महाराजांनी तयार केली होती. आणि त्यामुळेच औरंगजेबाचा या महाराष्ट्रातच शेवट झाला. परंतु आलम दुनिया जिंकणाऱ्या मोघलांना संपुर्ण महाराष्ट्र जिंकता आला नाही.

- - - - - - - - - - -

आरमार बांधणी

जो सागरावर वर्चस्व गाजवेल त्याच्या सीमा दिल्ली यमुनेला भीडतात असे थोरले राजे नेहमी म्हणायचे आणि त्यासाठीच सुरते पासुन खाली कारवारपर्यंत अंमल बसवीणे आवश्यक व त्यासाठी सुसज्ज आरमार पदरी असणे महत्वाचे हे महाराजांचे बोल संभाजी महाराजांच्या स्मरणात होते. स्वराज्याच्या संरक्षण सिध्दतेत समुद्रावरील पकडीची मोठी महत्वाची भूमिका संभाजी राजांनी कायम लक्षात ठेवली होती.

त्यानुसार एके दिवशी त्यांनी आपल्या जहाज बांधणी केंद्रास बाणकोटास भेट देऊन प्रत्यक्ष निरिक्षण करण्याचे योजिले व त्यानुसार भेट दिली. अनेक तारव्यातुन, गुराब्यातुन, शिड्या चढून जाऊन पुरती निरीक्षणे नोंदवीली. तोफा कशा प्रकारे ठेवाव्यात याचे मार्गदर्शन केले. अनेक नवी जहाजे बांधली जात होती. एका एका वर्षात दहा ते पंधरा मोठ मोठी नवीन जहाजे बांधण्यासाठी फर्मान सोडले गेले. महाड, कल्याण, जैतापुर, राजापुर अशा अनेक ठिकाणी जहाज बांधणीचे काम आहोरात्र चालू होते.

चालु घडीला स्वराज्याचे आरमार हे पोर्तुगीज इंग्रज सिध्दी यांच्यपेक्षा लहान होते परंतु गोऱ्या लोकांकडे ज्या प्रकारचा आधुनिक तोफखाना होता तो मात्र स्वराज्यात नव्हता. नेमकी हीच उणीव भरुन काढण्याचे राजांनी आता योजिले होते. लांब पल्ल्याच्या धडाकेबाज तोफा, अव्वल दारुगोळा, व अचुक निशाणेबाजी करणारे प्रशिक्षीत गोलंदाज या सर्व गोष्टींचा बंदोबस्त करणे महत्वाचे होते.


त्यामुळेच राजांनी कुडाळ व डीचोली येथे बारुदाचे नवे कारखाने उभारले होते. आता प्रश्न होता तो फक्त तोफा बनवीणे व गोलंदाजांना प्रशिक्षण देणे. त्यासाठीच राजे बाणकोटला आले होते. त्यांनी या बाबतीत अरबांचा सेनापती जंगेखान याची मदत घेतली होती व त्याची प्रत्यक्ष सुरुवात होणार होती. जंगेखान मराठी दर्यावर्दीना अचुक गोलंदाजी व पाण्यातल्या युध्दाचे प्रशिक्षण देण्यासाठी राजांच्या शब्दाप्रमाणे हजर झाला होता.

शिवाय जंगेखान काही महिने बाणकोटलाच मुक्काम करुन मराठी कारागिरांना

कमी वेळात मोठी जहाजे कशी बांधावयाची याचे प्रशिक्षण देणार होते. त्याचबरोबर अत्यंत महत्वाचे म्हणजे लांब पल्याच्या तोफा जडवीणे आणि उडवीणे याचेही मराठी आरमाराला धडे मिळणार होते आणि त्यासाठीच राजे स्वत: बाणकोटाला येवुन जंगेखान सोबत थांबले. ठरलेल्या कामाचे नियोजन केले संबंधीतांना त्याबाबतचे निर्देश देऊन राजांनी जंगेखानचा निरोप घेतला. स्वराज्याचे आरमार गोऱ्यांच्या तुलनेत आधुनिकतेच्या बाबतीत कोठेही मागे पडणार नाही याची कायम व्यवस्था करण्यासाठी संभाजी राजे सावधान होते.

शिवाजी राजांच्या काळात अपुर्ण राहिलेली कुलाबा किल्याची तटबंदी अवघ्या सहा महिन्यात पुर्ण करुन घेतली व बारुदाचा अव्वल साठा तयार केला. गेला शिवाय अष्टगारातील सागर गडावरही धान्य आणि दारुची कोठारे शीगोशीग भरली गेली. अशा प्रकारे स्वराज्यावर येणाऱ्या भावी प्रसंगांना तोंड देण्यासाठी आरमार सर्व प्रकारे सुसज्ज करण्यात आले.

- - - - - - - - - - -



धार्मिक सहिष्णुता

संभाजी राजे गोव्याच्या मोहिमेवर असताना फोंडा येथे घडलेली घटना संभाजी राजांच्या धार्मिक सहिष्णुतेचा पुरावा म्हणुन उपलब्ध आहे. फोंड्यातील काही हिंदू लोक लेडी वर्जीन माईची मूर्ती फोडू पाहत होते. तर काही लोक चर्चला आग लावायच्या तयारीत होते. राजांना ही बातमी कळताच राजे टापोटाप घटनास्थळी धावले. राजांनी प्रक्षुब्ध जमावाला चर्च जाळण्याच्या कृतीपासुन परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.


परंतु चिडलेले लोक ऐकण्यास तयार नव्हते. तेव्हा आग विझवा नाही तर खांडोळ्या करीन असा हुकूम दिला. त्याचबरोबर राजांचे काही साथिदारही आग विझविण्यासाठी पुढे धावले. कित्येकांचे हात भाजले परंतु थोड्याच वेळात आग आटोक्यात आणली गेली. काही लोकांनी सैनिकांनाही भडकविण्याचा प्रयत्न केला होता. मराठे हे देव देवतांचे, सदाचारांचे, नितीचे पुजारी असुन ते मर्तीभंजक दरोडेखोर कधीही नव्हते असे जमलेल्या लोकांना संभाजी राजांनी समजावीले.

त्याचवेळी साष्टी, बारदेश व गोव्याच्या इतर प्रांतातुनही दंगलीच्या बातम्या येत होत्या. राजांनी फोंड्यावरुनच जागोजागीसाठी फर्माने सोडली. "कोणाच्याही धार्मिक स्थळांचा उपद्रव करु नका" संभाजी राजांच्या या आदेशावरुन नाराज झालेले लोक, भडकलेले लोक राजांच्या भेटीसाठी डिचोलीला आले व त्यांनी तक्रार केली. "हे लोक हातामध्ये दिवट्या घेऊन चर्च जाळायला गेले असता राणोजी मोरे या अंमलदाराने मार दिल्याचे त्यांचे म्हणणे होते.

त्यामुळे भडकलेले लोक राजांना भेटावयास आले होते व ते कोणाचेही ऐकण्यास तयार नव्हते. राजे जमावाला सामोरे गेले त्यांच्यावर ख्रिस्ती पाद्र्यांनी केलेल्या अन्यायाची माहिती घेतली. राजांना वस्तुस्थिती पुर्ण समजुन आली होती. परंतु कोणी गाय मारली म्हणुन आपण वासरू मारायचे नसते. या न्यायाने आपले वागणे कितपत आपल्या धर्माला शोभते असे सांगुन समजुत काढली. राजांनी लोकांना सांगितले कि हिंदुचा एक राजा म्हणुन आमच्याकडे पाहीजे त्या सवलती मागा आम्ही त्या देवूच परंतु केवळ दुसऱ्याच्या द्वेषाच्या पायावर आपली मंदिरे टिकतील का हे लक्षात घ्या.

राजांनी लगेच नवे हुकूम सोडले व त्यानुसार गोव्यात फिरंग्याकडून पाडल्या गेलेल्या हिंदु मंदिरांच्या पुर्नबांधणीसाठी त्यांनी आपल्या खजिन्यातुन मदत देऊ केली. शिवाय स्थानिक प्रतिनीधींनाही धर्म रक्षणाच्या दृष्टीने काही योजना सांगितल्या. जबरदस्तीने आणि फसवणुक करुन धर्मांतर करणाऱ्या लोकांनाही राजांनी चांगलाच धडा शिकवीला व धर्मांतर बंदीचा हुकूमही या मोहिमेच्या निमित्ताने राजांनी लागु केला. राजे दुसऱ्या धर्माबद्दल जरी आदरभाव बाळगुन होते. तरीही स्वधर्माची उपेक्षा त्यांनी कधीही होऊ दिली नाही. त्यामुळेच त्यांनी एकीकडे हिंदु लोकांना चर्च जाळण्यापासुन परावृत्त केले व त्याचवेळी ख्रिस्ती लोकांनी पाडलेल्या मंदिरांची पुर्नबांधणी करण्यासाठी आर्थिक तरतुद केली.

- - - - - - - - - - -



अष्टप्रधानांची लाचखोरी

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिकूल परिस्थितीमुळे मुसलमान झालेल्या बजाजी निंबाळकर (बजाजी निंबाळकरांचे धर्मांतर झाले नव्हते अशी नव्याने माहिती समोर येत आहे) व नेताजी पालकर आणि इतर अनेकांना पुन्हा हिंदु धर्मात घेऊन जुलमाने बाटवलेले गेलेल्या लोकांसाठी स्वधर्मात परत येण्याची वाट तयार केली व आधुनिक सामाजिक क्रांतीची कामगिरी पार पाडली होती.

प्रस्थापितांचा विरोध झुगारुनही महाराजांनी अशा प्रकारचे धार्मिक शुध्दीकरण केलेच. संभाजी राजांच्या काळातही अशाच प्रकारचा प्रसंग घडला. परंतु खुपच कमी लोकांना याबाबतची माहिती असावी. श्री बागचे कोल्हटकर व हरसुळचे गंगाधर कुलकर्णी हे काही कारणास्तव मुसलमान झाले होते व आता त्यांना हिंदु धर्मात परत येण्याची उपरती झाली होती. त्यामुळे साहजिकच हिंदु धर्मात पुनः प्रवेश देणे जुन्या रितीरिवाजानुसार क्रम प्राप्त होते.

शिवाजी महाराजांनी केलेल्या सामाजिक क्रांतीच्या मार्गावरच छत्रपति संभाजी महाराज योग्य रितीने वाटचाल करीत होते. परंतु अष्टप्रधानातील अण्णाजी दत्तो व सोमाजी दत्तो या दोन मंत्र्यांना मुसलमान धर्मातुन कोल्हटकर व कुलकर्णी यांना पुन्हा हिंदु धर्मात घेण्यासाठी लाच हवी होती. त्यामुळे ते कोल्हटकर व कुलकर्णी यांना हिंदु धर्मात प्रवेश देण्यात या ना त्या कारणावरुन टाळाटाळ करीत होते. आण्णाजी सोमाजीला या शुध्दी करणाच्या बदल्यात कोकणातील नारळी फोफळीच्या चार एकर बागा हव्या होत्या व जो पर्यंत त्या मिळत नव्हत्या तो पर्यंत कोल्हटकर व कुलकर्णीचा स्वधर्मातील प्रवेश रोखुन धरण्यात आला होता.

पाप क्षालनाचा विधी लाच घेवुन पुर्ण होणार होता आणि जोपर्यंत लाच दिली जाणार नव्हती तोपर्यंत या दोन्ही व्यक्तींना हिंदु धर्मात प्रवेश मिळणार नव्हता. अनेक दिवस हा गोंधळ असाच चालू असताना ही बातमी कवी कलश यांना मिळाली व संभाजी राजांचे विश्वासु सहकारी या नात्याने त्यांनी स्वतः हस्तक्षेप करुन ही गोष्ट संभाजी राजांच्या कानावर टाकली. संभाजी राजांनी ताबडतोब आदेश देऊन दोघांनाही

सन्मानाने हिंदु धर्मात प्रवेश दिला.

त्यामुळे शिवाजी महाराजांनी चालु केलेली कोणतीही परंपरा आणि सामाजिक क्रांतिची चळवळ संभाजी राजांकडून कोणत्याही प्रकारे खंडित झालेली नव्हती हे सिद्ध झाले. शिवाजी महाराजांचे राज्य चालवीण्याचे उदार धोरण संभाजी राजांनी काटेकोरपणे पाळले याचे हे जीवंत पुरावे होत.

छत्रपति शिवाजी महाराजांच्या विचारधारेला कळस आणि शिखराचे स्थान मिळवुन देण्याचे काम छत्रपति संभाजी महाराजांनी नक्कीच केले. परंतु संभाजी महाराजांच्या या कडक धोरण अंमलबजावणीमुळे अनेक लाचखोर व रयत विरोधी भूमिका असणाऱ्या लोकांना वतनदारांना चांगलीच जरब बसत होती आणि म्हणुन सर्व सामान्य रयतेची बाजु घेणारे स्वराज्य बुडावे अशी अष्टप्रधानातील अनेकांची मनोमन इच्छाच होती आणि पुढे स्वराज्य बुडवुन पेशवाई सुरु झाली व शिवाजी महाराजांनी बहुजन समाजाला दिलेली आदराची वागणुक मान सन्मान याचा जणु पेशवाईच्या काळात बदला घेण्याचा प्रयत्न पेशव्यांनी त्यांच्या अष्टप्रधानातील पुर्वजांच्या मतानुसार केला असे सांप्रद इतिहास स्पष्ट सांगतो.

- - - - - - - - - - -

कट कारस्थानांचा शेवट

संभाजी राजांची प्रशासनावरील पकड दिवसेंदिवस घट्ट होत चालली होती. जनतेच्या कल्याणाचे निर्णय धडाडीने घेतले जात होते. सरकारकुन व इतर अष्टप्रधानांना मात्र हे सगळे पसंती पलीकडचे होते. अष्टप्रधानांचा गैरकारभार व इतर आर्थिक घोटाळे संभाजी राजे आपल्या चिकित्सक बुध्दीने उघड करत होते. त्यातच गोव्याच्या व्हाईसरायचे राजांना कारभाऱ्यांबद्दल तक्रार करणारे पत्र आले व त्याला अष्टप्रधानांची मिलीभगत असणारी महत्त्वाची विश्वासपुर्ण बातमी आली. तसे लेखी पत्र घेवुनच गोव्याहुन पोर्तुगीजांचे दुत रायगडावर हजर झाले होते. पत्राचा मजकुर सर्वसाधारपणे अशा प्रकारचा होता

''प्रिय छत्रपती संभाजी राजे

राजे, याआधी आम्ही आपल्या डिचोलीच्या सुभेदारबाबत अनेक तक्रारी केल्या आहेत. मोरो दादाजी या नावाचा आपला सुभेदार एक हडेल हप्पी रानवट आणि असंस्कृत मनुष्य आहे. तो तुमच्याच प्रजेचा अत्यंत छळ करतो. सार्वजनिक पैशाचा अपहार करुन आपल्याच राज्याचे खुप नुकसान करतो. एवढे संतापुन आपणास स्पष्टपणे कळविण्याचे कारण की याच पाजी मनुष्याने तुमच्या आणि आमच्या मैत्रीमध्ये बीब्बा घातला आहे. मात्र सदर इसमाविरुध्द इतकी रोकठोक तक्रार करुनही त्याच्यावर काही कार्रवाई होईल असे संभवत नाही. कारण याच मोरोदादाजीचे आपल्या दरबारातील एका वरिष्ठ सरकारकुनांशी थेट संबंध आणि गाढ स्नेह आहे. त्यामुळेच हे महोदय प्रजेला, राजाला अगर कोणालाही मोजत नाही." पोर्तुगीजांनी पत्रात उल्लेख केलेले भ्रष्टाचाराला पाठिशी घालणारे वरिष्ठ सरकारकुन म्हणजे अण्णाजी दत्तो हेच होत.

राजांनी तावडतोब बडतर्फीची कारवाई करुन दादजी मोरे या भ्रष्ट अधिकाऱ्याला बडतर्फ केले. शिवाय हरसुळच्या गंगाधर पंत कुलकर्ण्याचा (सैफुद्दीन) कवी कलशांनी विधीपुर्वक हिंदु धर्म प्रवेश संभाजी राजांच्या मान्यतेने तडीस नेला. या दोन निर्णयामुळे अष्टप्रधानातील अण्णाजी दत्तो व सोमाजी दत्तो चिडले व आता आपला

सर्व भ्रष्टाचा बाहेर पडून उघडे पडण्याअगोदरच संभाजी राजांचा काटा काढण्यासाठी सर्व जणांनी एकत्र येऊन कंबर कसली आणि त्या प्रमाणे सर्वांनी संगनमताने शहजादा अकबराला या कटात सामिल करुन घेण्यासाठी त्या संदर्भातले गुप्त पत्र धाडले. त्या पत्रात असे म्हटले होते -

'' पातशहा ए हिन्दुस्तान अकबर साहेब

आपली बहुत किर्ती ऐकली, त्याने आम्ही धन्य जाहलो. याआधी आमचे हिरोजी फर्जदबाबा यांच्या साहेबस्वारींशी धोंडसे मुक्कामी गाठीभेटी झाल्या आहेतच. त्या समयी मशारनिल्हे यांनी आमचा विषय आपणाकडे थोड्याशा आडपडद्याने काढला होता. एकेकाळचे शिवाजीचे आम्ही वफादार सेवक. आज मात्र आम्हांस किड्यामुंगीचे जिणे प्राप्त झाले आहे. सूर्यापोटी जैसा शनैश्वर, तैसा शिवाजीपोटी संभाजी! ह्या तापट, तामसी, बदफैली मनुष्याने आम्हा एकनिष्ठ राज्यसेवकांचे प्राण कंठाशी आणले आहेत. आमुच्या पोरकट स्वामीच्या सावलीस कनोजचा तो पापी कलुशा भट राहतो. त्या शाक्त भोंदू मांत्रिकाने तर आम्हा सर्वांना नरकाच्याच द्वारी लोटले आहे. खाविंद मनात आणतील तर या दोघांचा नष्टावा सहज करतील.

सांप्रत या दुष्ट राजास आपल्या बाहुबलाने आपण जीवे धरावे किंवा मारावे, पण आम्हांस मुक्ती द्यावी! त्याच्या बदली आम्ही आमचे अर्धे राज्य आपल्या टाचेखाली द्यायला तयार आहोत. अगदी शेवटी राजारामबाळ, मातोश्री व आम्हा कारभाऱ्यांस एखादा छोटा परगणा, गरीब ब्राह्मणांना द्यावा. त्यासाठी दिल्लीश्वरांनी आमुच्या संकटात धावुन यावे. संभाजीच्या आणि त्याच्या छंदीफंदी छंदोगामात्याच्या जाचातून आमुचा बचाव करावा. बाकीचे देणे घेणे, उपचार सारे प्रत्यक्ष भेटीतच बोलु."

परंतु संभाजी राजांची मनपुर्वक मदतीची अपेक्षा करणारा शहजादा अकबर मात्र दुर्बुध्द नव्हता तो सुजाण होता. शिवाय प्रामाणिक मताचा. त्याने सरळ तो खलिता आपला विश्वासु माणुस गौरवसिंहाच्या माध्यमातुन संभाजी महाराजांकडे पाठवुन दिला.

त्यावेळी राजे पन्हाळ्यावर होते, राजांनी ताबडतोब कवि कलशांशी याबाबत मसलत केली व दोनदा राजद्रोहाचा गुन्हा करुनही माफ केलेल्या कारभाऱ्यांनी आता तिसऱ्यांदाही तोच गुन्हा करण्याचा कट रचला होता. एकीकडे राजांचे औदार्य तर दुसरीकडे कारभाऱ्यांचा कृतघ्नपणा यांचा ताळमेळ तो कसा बसणार. परंतु असे पुन्हा पुन्हा माफ करणे म्हणजे गुन्ह्याला उत्तेजन देणारे ठरणार होते म्हणुन आता कारवाईशिवाय पर्याय उरला नव्हता अन्यथा कटवाल्यांनी डाव साधला असता व मराठयांचा राजा त्याला बळी पडला असता. स्वतःच्या स्वार्थासाठी स्वराज्य बुडविण्यात धन्यता माननारे व स्वतःचा राजा मारु पाहणारे अन्नदाताच्या अन्नात विष कालवु

पाहणारे ज्याची भाकरी खाल्ली त्याच्याच पाठीत खंजिर खुपसणारे असे महाभाग जगाच्या पाठीवर इतर कोठेही सापडणार नाहीत. पण असे महाभाग महाराष्ट्रात मात्र त्यावेळी होते व आजही आहेत हे महाराष्ट्राचे दुर्दैव नाही तर काय?

कारभारी मंडळी शहजादा अकबराला पालीच्या सुधागडावर जाऊन भेटले होते. हुशार शहजादाने ते पत्र राजाकडे पाठविले व विचार करण्यासाठी वेळ काढत कारभाऱ्यांना तेथेच अडकवुन ठेवले होते. त्वरेने व वेळात खबरदारीची पावले उचलणे आवश्यक होते. त्याच रात्री टाकोटाक राजे आपल्या विश्वासु सहकाऱ्यांसह वेगाची दौड करीत पालीकडे दोन दिवसाचा तडक प्रवास करीत धोंडश्याच्या माळावर येऊन पोहोचले.

राजांनी तेथेच मुक्काम करण्याचे ठरवीले. तेथेच शहजादा अकबरही मुक्कामी होता त्याची भेट घेतली व त्याचे आभार मानले. ताबडतोब राजांनी आपली विश्वासू हत्यारबंद पथके गडावर पाठविली. रातोरात कटवाल्यांचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे होते. परंतु मोठ्या तडफेने गडावर गेलेले पथक त्याच वेगाने गड उतरुन मोकळ्या हाताने परत आले होते. राजे धोंडश्याच्या माळावर आल्याचे कटकऱ्यांना पौर्णिमेच्या चांदण्यात सपाटीमुळे दिसले होते. त्यामुळेच ते पलिकडच्या बाजुने घोरपेच्या नालेवरुन खाली उतरुन रानवाटेने पळून गेले होते.

परंतु कटवाले काही फार लांब जाऊ शकत नव्हते कारण त्यांच्यापैकी अण्णाजी दत्तो वृध्द होते. त्यांना म्हातारपणामुळे घोडयावरुन दौड करणे शक्य नव्हते आणि अण्णाजी दत्तो हेच कटाचे मुख्य सुत्रधार होते व त्यांना मागे सोडुन पळुन जाणे बाकीच्यांना शक्य नव्हते. सहाजिकच त्या सर्वांच्या प्रवासाची गती मंद होणे स्वाभाविकच होते.

राजांनी अचुक तर्क बांधला व आपल्या जिवलग साथिदारांना ज्योत्याजी केसरकर व रुपाजी भोसले यांना कटवाल्यांचा ताबडतोब पाठलाग करण्यास सांगितले. सकाळी सुर्योदयापर्यंत सर्वांना जेरबंद करुन समोर हजर करण्याचा आदेश दिला. दिल्या आदेशाप्रमाणे ज्योत्याजी, रुपाजी यांनी सारा परिसर रातोरात पिंजुन काढला व कटकऱ्यांना जेरबंद करुन एका झाडाच्या बुंध्याला बांधुन ठेवले व पुढील कारवाईचा आदेश घेण्यासाठी ते राजा समोर हजर झाले. राजांनी आपल्या सोबत असलेल्या सर्व सहकाऱ्यांशी याबाबत सल्ला मसलत केली. सर्वांचा एकच निर्णय ठरला आता कठोर कारवाई शिवाय अन्य पर्याय नव्हता.

गद्दारीचा खात्मा करण्याचा निश्चय पक्का झाला. कोणालाही कोणत्याही प्रकारची माफी देण्यासारखे आता कोणाचेही कसलेही पुण्य शिल्लक राहीलेले नव्हते.

कटकऱ्यांचा पापाचा घडा भरला होता शिवाय त्यांच्या कारस्थानाने त्यांची आजवरची पुण्याई ही संपली होती. राजांनी तात्काळ निर्णय घेतला आणि कवी राजांना हुकूमाची तामिली करण्यास सांगितले. हुकूम होता ''जा त्या ओंढ्याच्या माळावर व जाऊन आण्णजी दत्तो, सोमाजी दत्तो, व आवजी चिटणीस या सर्व गद्दारांना हत्तीच्या पायाखाली तुडवा परंतु बाळाजी आवजींना मात्र काही करु नका'' जणुकाही राजांना पुर्ण आणि ठाम विश्वास होता की जरी अकबराला लिहीलेल्या पत्रातील अक्षर बाळाजीचे होते तरी त्यांच्याकडुन ते बळजबरीने किंवा इतर मार्गाने लिहुन घेतले असावे.

कटकऱ्यांनी त्यांना कोंडीत पकडुन ओढले असावे परंतु तरीही संपूर्ण गुन्हा माफ करणे शक्य नव्हते. बाळाजी आवजींना कैद करुन टाकोटाक रायगडाकडे घेवुन जाण्याचा हुकूम दिला गेला. हुकूमाची तामिली केली गेली व कटकऱ्यांना हत्तीच्या पायाखाली चिरडुन ठार मारण्यात आले.

स्वराज्याशी गद्दारी करणाऱ्यांना यापूर्वी दोनदा संभाजी राजाने उदार मनाने माफ केले होते. तरीही तिसऱ्यांदा असा गुन्हा घडल्यावरही जर राजांनी माफ केले असते तर राजाच शिल्लक राहीला नसता व राज्य बुडाले असते हे वेगळे सांगण्याची गरज नाही आणि म्हणुन संभाजी राजांनी कटकऱ्यांना हत्तीच्या पायी तुडवीण्याचा निर्णय खरेतर खुप उशिरा घेतला. तसे पाहीले तर पहिल्याच प्रसंगी संभाजी राजांनी या कटकऱ्यांना टकमट टोकावरुन कडेलोट करणे आवश्यक होते परंतु यातील काही लोकांनी स्वराज्याच्या उभारणीसाठी चांगले काम केले होते हे लक्षात घेवुनच त्यांना दोनवेळा माफ केले होते.

परंतु आता तिसऱ्या वेळी माफ करणे केव्हाही योग्य ठरले नसते आणि राजांनीही तेच केले जे एका जागरुक राजाला करणे आवश्यक होते. पुढे याच लोकांच्या वंशजांनी संभाजी राजांच्या मृत्युनंतर एकशे बावीस वर्षांनी बखर लिहीली आणि आपल्या पूर्वजांना संभाजी राजांनी दिलेल्या शिक्षेचा बदला घेतला.

संभाजी राजांबद्दल खोटा इतिहास लिहुन त्यांच्या चरित्राची बदनामी करुन त्यांच्या पराक्रमावर पांघरुन घातले. परंतु काळाच्या ओघात सत्य बाहेर येतच असते आणि संभाजी राजे त्याला अपवाद असु शकत नाही. म्हणुनच आता संभाजी राजांचे खरे चरित्र लोकांसमोर येऊ लागले आहे आणि लोकांचा जाणिवपुर्वक तयार केलेला गैरसमज हळूहळू दुर होत आहे.

- - - - - - - - - - -

शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे यांनी दिलेल्या संस्कृत दान पत्रातही सोयराबाईसाहेब यांच्याबद्दल चांगले उद्गार काढले आहेत. तसेच आपल्या कुळाचा व शिवाजीराजे व शहाजीराजे यांचा गौरवाने उल्लेख केलेला आहे.

संभाजीराजांचे दानपत्र

खुपराल्यामुळे उसळलेल्या रक्त प्रवाहाने शरीर माखल्याने शिवाजी राजा नृसिंहाप्रमाणे दिसू लागला. सिंहासारख्या (पराक्रमी) अशा (तानाजीने) सिंहगड घेतला, पंचाहत्तर हजार घोडेस्वार बरोबर घेऊन आलेल्या आणि अनेक पराक्रमी राजपुत्रांचे संरक्षण लाभलेल्या औरंगजेबाला ज्याचा अभिमान वाटे, त्या त्याच्या मामाची फजिती करून शिवाजीराजाने जयद्रथाची फजिती करणाऱ्या पार्थाची बरोबरी केली. तारुण्याच्या अगदी प्रारंभीच त्याने म्लेंच्छाचा नाश करण्याची दीक्षा घेतली, अनेक ताम्रांना पराभूत केले. हा राजा म्हणजे दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस करण्यात तत्पर असलेला आणि कृपानुग्रहही करणारा जणू शंकरच होता. दिल्लीपतीचा गर्व नाहीसा करण्यात तो पटाईत होता. विजापूरच्या राजाला कर द्यायला त्याने भाग पाडले होते. भागानगराच्या (हैद्राबाद) अधिपतीनेही याची मदत मागितली होती. शस्त्रधारी हात याने नुसता वर करताच प्रबल पठाणही पळून जात. या राजाने कर्नाटक प्रदेश काबीज केल्याचे ऐकून भयभीत झालेल्या मांडलिक राजांनी यांच्या चरणावर मस्तक ठेविले होते. त्यामुळे त्यांच्या मस्तकांतील पुष्पपरागांनी त्याचे चरण धूसरित झाले होते. क्षत्रिय-कुलाचा अलंकार ठरलेला, भोसले कुलरुपी समुद्राला चंद्रमंडलाप्रमाणे असणारा, भूतलावरील इंद्रच असा होता राजा शिवाजी!

अनेक देवतांची प्रार्थना (नवस) केल्याने ज्याचा (संभाजीचा) जन्म झाला, दिल्लीपतीने दिलेली मल्लयुद्धाची आज्ञा ज्याने मोडली, निरहंकारी व गोड अशा बोलण्याचे ज्याने चक्रवर्ती राजाचे (शिवाजींचे) मन मोहिविले, स्वतः जो चक्रवर्ती लक्षणांनी युक्त आहे, नशीब फिरल्याने ज्याचे मंत्रीही शत्रू बनले, शिवाजीराजाला प्रबल अशा दुष्ट मंत्र्यांनी ज्येष्ठ पुत्राला राज्य न देण्याचा बदसल्ला दिलेला जाणूनही निळ्या, पिवळ्या रंगाच्या फुलांच्या सहवासाने स्फटिक जरी त्या त्या रंगाचे भासले तरी मूळचे ते निर्मळच असते त्याप्रमाणे ज्याचे (संभाजीचे) अंतःकरण निर्मळ होते. सौजन्यमूर्ती असलेल्या पण 'सवतीचे पोर' म्हणून रागावलेल्या राणीवरील प्रेमाने, शिवाजी राजांनी वडील म्हणून दिलेली आज्ञा, केवळ त्यांचा मानस जाणून पितृभक्तीला पारखे होऊ नये व (पुत्र) धर्माचेही पालन व्हावे म्हणून ज्याने मानली व दशरथपुत्र रामाप्रमाणे पित्राज्ञेचे पालन केले, पायाशी आलेले दीड कोटीचे धन, राज्य, अनेक किल्ले हे सर्व सोडून देऊन केवळ थोडेसे घोडेस्वार बरोबर घेऊन जो राहिला.

दान देणे व पुढे त्यांची अंमलबजावणी करणे, यामध्ये दानापेक्षा त्याची अंमलबजावणी अधिक महत्त्वाची होय. दानामुळे स्वर्गप्राप्ती होते तर त्याच्या पालनामुळे (अंमलबजावणीमुळे) अच्युत–पदाची (मोक्षाची) प्राप्ती होते.

जो सुसंस्कृत व विद्यासंपन्न अशा ब्राह्मणश्रेष्ठाला धन आणि जमीन दान करतो, तो शिवलोकात–अनंतकाळपर्यंत मोठेपणाने राहातो.

माझे वंशज किंवा (जेथे राज्य करणारे) अन्य राजांचे वंशज किंवा पुढे होणारे निष्पाप असे राजे ही माझी धर्माज्ञा पाळतील, त्यांना मी प्रणाम करतो.

ही राजाची धर्ममर्यादा कायमची आहे. ती आपण वेळोवेळी पाळावी, अशी हा रामचंद्र (दानपत्र लिहिणारा रघुनाथ नारायण?) पुढे होणाऱ्या सर्व राजश्रेष्ठांना प्रार्थना करतो.

जो निष्पाप व पवित्र पुरूष ही आज्ञा पाळील, तो व त्याचे वंशज भोग व मोक्ष प्राप्त करून आनंदात राहतील.

(शिव) राज्याभिषेकाच्या सातव्या, रौद्र नावाच्या वर्षात भाद्रपद शुद्ध ११, सोमवारी 'संगव' नावाच्या प्रातः कालीन मुहूर्तावर रघुनाथ नारायण अमात्य याने या दानपत्राचे लेखन केले. (६, ७) लेखनालंकार.

चंद्र ११ मास भाद्रपद

समंत आबाजी


उर्फ साबान सन सोनदेऊ

सचीव

इहिदे समानीन अलफ

बार सुद बार शुध बार'

अनुमतं च दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितरायस्य शुभमस्तु छ.' (दानविभाग–प्रमुख मोरेश्वर पंडितराव यास हे मान्य आहे. कल्याण असो.)



रणनिती आणि मुत्सद्देगिरी

संभाजी महाराज समोरासमोर औरंगजेबाच्या सैन्याशी कोणत्याही परिस्थितीत मुकाबला करु शकत नव्हते. परंतु म्हणुन काय ते गप्प बसणार थोडेच होते. औरंगजेबाने अजमेर सोडल्यापासुन संभाजी राजांचे गुप्तहेर त्याच्या सैन्याच्या हालचालीवर पुर्ण लक्ष ठेवुन होते. त्यानुसार औरंगजेबाची प्रत्येक हालचाल टिपली जाऊन त्यापुढे काय करायचे याची संभाजी राजे रणनीती आखुन ठेवायचे आणि त्यानुसार त्यांनी आपल्या सैन्याचे अनेक छोटे मोठे भाग बनविले होते व त्यांच्यावर वेग वेगळया ठिकाणी अचानक छापे टाकुन मुगल सैन्याची लांडगे तोड करण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

त्यानुसार औरंगजेबाचे सैन्य महाराष्ट्राच्या सीमेवर पोहोचण्या अगोदरच या छापेमारी युध्दाला सुरुवात झाली होती. औरंगजेब बुऱ्हानपुरला पोहोचल्याबरोबर दहा दिवसांच्या आतच मराठ्यांनी बेसावध असलेल्या लुतफुल्ला खान कोकाच्या तळावर छापा टाकुन बरीच माणसे ठार मारली व दारुच्या कोठारांना आगी लावुन दिल्या. रसद लुटली. हे सर्व होत असताना औरंगजेब स्वतः या घटनास्थळाच्या फक्त १० कोस अंतरावर होता. औरंगजेबाच्या छावणीतच एवढ्या खोलवर हल्ला करण्याची मराठ्यांची हिंमत पाहुनच औरंगजेब आश्चर्यचकित झाला तर त्याच्या फौजेला याचा जबर धक्काच बसला.

पुढे असे अनेक हल्ले वेळोवेळी होतच राहीले. मराठे कुठुन येत आणि छापा टाकुन कोणत्या दिशेने गायब होत याचे मुगल लष्कर शेवटपर्यंत संशोधनच करत राहीले आणि मराठ्यांना भुताटकी जादुटोना असे काहीतरी करता येत असावे असा त्यांचा समज होवुन दिवसा आणि रात्रीही बिचारे मोघल आपला जीव मुठीत घेवुन सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात कसे बसे तग धरुन असाचे. खरे तर मराठयांची ही युध्दाची रणनीती. हा काही चमत्कार वगैरे नव्हता. तर सर्व सामान्य लोकांची स्वराज्याच्या संरक्षणासाठी असलेली ती एक नावीन्यपुर्ण रणनीति होती. त्यानुसार सर्व सामान्य नागरीक हेच सैन्य होवुन लढत होते आणि त्यामुळे मराठा लष्कर नेहमीच अजिंक्य

राहीले.

विशेष म्हणजे बुऱ्हानपुर हे मध्यप्रदेशात आहे. महाराष्ट्राची सीमा ओलांडली की जवळच बुऱ्हानपुर ही संपन्न नगरी होती. मराठयांचे लष्कर एवढया लांबचा प्रवास करुन एवढ्या अनपेक्षितपणे हल्ला करु शकते याचा अंदाजाही लावणे औरंगजेब व मोगलांना अवघड होते. परंतु संभाजी राजांची फौज असे कारनामे सातत्याने करीत होती. औरंगजेबाने स्वराज्याच्या एखाद्या महत्वाच्या भागावर हल्ला चढविला की मराठी फौज त्यांना उत्तर देण्यात वेळ घालविण्यापेक्षा तेवढ्याच वेगाने मोघलांच्या दुसऱ्या एखादद्या प्रदेशात धुमाकुळ घालायची.

त्यामुळे सहाजिकच त्या संपन्न प्रदेशाच्या मोघल अंमलाखालील प्रदेशाच्या बचावासाठी मोघली फौज हाती घेतलेली मोहिम अर्धवट सोडून मराठ्यांनी धुमाकुळ घातलेल्या प्रदेशाकडे वळायची तेवढयात मराठी फौज पुन्हा या मोघलांना कुठे तरी खिंडीत गाठून चांगलीच झोडपुन काढायची. त्यामुळे शत्रूला विचलीत करुन त्याचे दुहेरी नुकसान करण्याची नवीन रणनीतिच संभाजी महाराजांनी अंमलात आणल्याचे अनेक ठिकाणी दिसुन येते.

तर औरंगजेबाच्या रणनीति नुसार मोघलांचे मोठे सैन्य नाशिकच्या बाजूने कोकणात उतरुन कल्याण भिवंडी मार्गे रायगडाकडे तर सागरी बाजुने जंजिरेकर सिध्दी व दक्षिणेकडून पोर्तुगिज एकाच वेळी रायगडच्या दिशेने आगेकुच करणार होते परंतु संभाजी राजांनी यातील एकही शत्रुला रायगडाच्या वेशीवरही फिरकु दिले नाही हे विशेष. तर रायगडाला वेढा घालणे आणि ताब्यात घेणे या गोष्टी तर मोघलांना शक्यच होणे नव्हते.

याचे रहस्य संभाजी राजांच्या या आधुनिक रणनीति मध्ये दडलेले असल्याचे आपल्याला दिसुन येते आणि त्यामुळेच जवळपास सहा वर्षे मोघलांना स्वतः औरंगजेबाच्या उपस्थितही ५ लाखाच्या लष्कराच्या बळावरही सह्याद्रीच्या अंगाखाद्यावरील एकही किल्ला जिंकता आला नव्हता. हेच या रणनितीचे फलित होते.

- - - - - - - - - -

संभाजी राजे आणि रूपकुंवर

रुप कुंवर नावाची एक तमासगिरीण (तवायफ) होती. तिचा चौलच्या बाजारात दिवाणखाना होता. शहजादा अकबराला ती आणि तिचा नाचगाणा खुपच पसंद होता. म्हणुन तो सारखा तिच्याकडे मुजरा ऐकण्यासाठी जायचा. परंतु बदलत्या घडामोडींमुळे दोन आठवडे शहजाद्याला तिकडे जायला मिळाले नाही. तेव्हा रुप कुंवर स्वत: अकबराच्या भेटीला आली.

संभाजी राजे त्यावेळी जंजिराच्या मोहिमेवर होते व अकबरही जवळच मुरुडला तळ ठोकुन होता. तेव्हा या बाईंनी थेट मुरुडला येऊन माळावरच आपले पाल ठोकले. अकबराची व रुप कुंवरची आता भेट होणारच होती. तेव्हा अकबराने रुप कुंवरचे नृत्य पहायला राजाजी आपण चलावेच असा आग्रह धरल्यावर संभाजी राजे रुप कुंवरचे नृत्य पहाण्यास अकबरासोबत गेले. रुप कुंवर नाचत असताना संभाजी राजांचे लक्ष्य तिच्या गळयात असणाऱ्या अनमोल हाराकडे पुन्हा पुन्हा जात होते. तो हार राजेशाही हार होता व संभाजी राजे तो हार ओळखत होते. कारण तोच हार राजांनी शहजादा अकबराला पहिल्या भेटीत नजराणा म्हणुन दिला होता.

त्यामुळे आपण एका शहजादाला दिलेला मौल्यवाण हार या नायकीणीच्या गळ्यात कसा काय? असा प्रश्न पडुन राजांनी रुप कुंवरला जवळ बोलावुन घेतले व खसकन हार तिच्या गळयातुन खेचुन घेतला. अकबराला याबाबत खडसावुन जाब विचारला. तेव्हा अकबराने एकदा तो हार मला मिळाल्यावर तो कोणाला द्यायचा हा माझा अधिकार आहे असे उत्तर दिले.

अकबराच्या या बेमुरर्वत खोरीवर नाराज होऊन राजे बैठकीतुन उठून थेट बाहेर चालु लागले. तेव्हा आपण माझा कार्यक्रम अर्ध्यात सोडुन गेलात तर माझी बदनामी होईल असे म्हणुन रुप कुंवरने राजाचे पाय पकडले. तेव्हा राजांनी कलेची व कलावंताची कदर कशी करावी याचे उदाहरणच सर्वांना घालुन दिले. राजे अर्ध्या कार्यक्रमातुन गेलेच खरे परंतु जाताना रुप कुंवरला स्वर्ण मोहरांची थैली बिदागी म्हणुन दिली व आपण एका खुप महत्वाच्या मोहीमेवर अचानक निघुन गेल्याचे विचारणा

करणाऱ्यांना सांग असा सल्ला दिला. कलाकाराची बदनामी होणार नाही यासाठी घेतलेली राजांची ही दक्षता होती.

या एकुण प्रकारावरुन संभाजी राजे मुजऱ्याला तमाशाला जात नव्हते. शिवाजी राजांच्या शिस्ती नुसार याला बंदी होतीच हे सिध्द होते. तर जी व्यक्ति भेट म्हणुन दिलेली वस्तु नायकीनीच्या गळयात पाहील्यावर रागावते ती व्यक्ति नक्कीच या तमाशा मंडळाची आसक्त नव्हती हे ही सिध्द होते.

परंतु कार्यक्रमातुन आपण अर्ध्यातुनच निघुन गेल्यावर एखाद्या कलावंताची बदनामी होवु नये यासाठी तोडगा काढुन देणारे व पुढे दहा बारा कार्यक्रमही केल्यावरही एवढे मानधन मिळणार नाही तेवढे मानधन देणारी व्यक्ति लोक कलेची कदर करणारी नक्कीच होती हे ही सिध्द होते. शिवाय असले नाचगाणे पहायला व रमायला राजांना तेवढा वेळही नव्हता. ही गोष्ट काही लोक लक्षात न घेतो एकीव माहितीवर आणि बखरकारांच्या खोट्या कथनावर अवलंबुन राहुन संभाजी राजांच्या अपप्रचाराचे आणि बदनामीचे महाल बांधतात हे महाराष्ट्राचे दुर्दैवच!

- - - - - - - - - -

जंगे खान

संभाजी राजांनी अनेक लोकांशी मैत्री जोडून ठेवली होती. हे इतिहासाला पुरेशा प्रमाणात माहित नाही. शत्रुचा शत्रु तो आपला मित्र असतो या नात्याने संभाजी राजांनी अतिशय जाणीवपूर्वक अरबांचे सेनाधिकारी जंगे खान यांचे सोबत दोस्ताना ठेवला होता.

शिवाजी महाराजांनी भविष्यातील आरमारी लढाया व सागरावरील वर्चस्वाचे महत्व ओळखले होते व त्यानुसार आरमार उभारणी व समुद्रात किल्ले बांधणी केली होती. सागरी किल्यांचे महत्व ओळखुनच शिवाजी महाराजांनी जंजिरा ताब्यात घेण्याचा जवळपास आठ वेळा प्रयत्न केला होता. परंतु यश मात्र मिळत नव्हते. आता तोच जंजिरा जिंकण्यासाठी संभाजी राजांनी ठरवीले होते व त्यानुसार त्यांनी आखणी सुरु केली होती. त्यानुसार नवीन जहाजे गलबते, बनवीणे तोफा बनवीने, चालत्या जहाजावरुन नेम धरुन गोळाबारी करणे अशा अनेक योजना राबवीणे आवश्यक होते.

त्यानुसार त्याकाळी या सर्व बाबतीत नावाजलेला इसम होता तो म्हणजे जंगे खानाने. जंगे खानाकडे स्वत:चे आरमार होते व ते अरबस्थान ते हिंदुस्तान असे नेहमी प्रवास करीत असे. सागरी व्यापाराला संरक्षण देऊन अरबस्थानचे व्यापार हिताचे संरक्षण करण्याची जवाबदारीच तेथील सुल्तान ने जंगे खानाला दिली होती. या जंगे खानाला आपल्या फौजेला प्रशिक्षण देण्यासाठी संभाजी राजांनी अरबस्थानातुन बोलावीले होत व त्यानुसार जंगे खान काही महिने मराठी आरमाराला अचुक गोलंदाजी, पाण्यातील युध्द कला याचे शिक्षण दिले. शिवाय कमीत कमी वेळात जास्त जहाज बांधणी कशी केली जाते, याचे प्रगत शिक्षणही मराठी लोहार सुतारांना जंगे खान व त्याच्या सहकाऱ्यांनी दिले.

शिवाय आरमाराचा कणा म्हणजे जहाजांवरील तोफा या तोफा जडवीणे व त्या कशा चालवायच्या याचे शिक्षणही जंगे खानाकडुन मराठी आरमाराला मिळाले. आपले आरमार आधुनिक असावे त्याच्याकडे योग्य प्रशिक्षण व्यवस्थापन असावे त्याची कार्यकुशलता वाढावी, यासाठी संभाजी राजांनी त्यावेळी अरब प्रदेशातुन माहितीगार माणसे मागवुन आपल्या आरमाराला काळाबरोबर प्रशिक्षित केले. यावरुन संभाजी

राजांची दुरदृष्टी तर आपल्या लक्षात येतेच. परंतु आपले आरमार जगातील अव्वल क्रमांकाचे कसे राहील याची त्यांनी दक्षता घेतली होती हे ही यावरुन स्पष्ट होते.

त्यामुळे सध्या भारत अमेरिका, भारत-ऑस्ट्रोलिया, भारत-जपान, भारत-फ्रान्स इत्यादी देशांच्या नौदलाच्या ज्या संयुक्त कवायती होतात. याची मुहूतमेढ ३५० वर्षापुर्वी संभाजी सारख्या तरुण वयातील छत्रपतींनी घालुन आधुनिक भारताच्या आरमारी सुसज्जतेला एक चालना मिळवुन दिलेली आहे आणि भारतीय आरमार आपली प्रहार क्षमता वेग वेगळया लढाईमध्ये सिध्द करुन कसोटीस खरे उतरले आहे. याच जंगे खानाच्या जहाजावर महाराष्ट्रातील समुद्र किनार पट्टीवरुन जंजीरेकरांनी पळवुन नेलेली व इंग्रजांना विकलेली
गुलामाची काही पोरे होती.

इंग्रज ही पोरे जंजीरेकराकडुन विकत घेऊन आशिया,आफ्रीका व युरोपमध्ये विकत असत. संभाजी महाराजांनी जंगे खानाला हवे तेवढे द्रव्य देऊन त्या सर्व गुलामपोरांची सुटका केली. शिवाय पुढे इंग्रजांना गुलाम म्हणुन पोरे माणसे खरेदी करण्यावर बंदीच घातली. व्यापाराच्या नावावर माणुसकीला काळीमा फासणाऱ्या जिवंत माणसांच्या या स्मगलरीला संभाजी राजांनी संपूर्णपर्ण विरोध केला.

त्यामुळे वेटबीगारी व गुलामगिरी विरुध्द कायदा करण्यात आला. त्यामुळे छत्रपती संभाजी हे बेटबिगारी व गुलागिरी विरुध्द आवाज उठवीणारा माणुसकीच्या शत्रुंसंगे लढा पुकारलेला आधुनिक काळातील पहिला राजा असुनही लोकानं‍ा या बाबतीत काहीच माहित नसावे ही गोष्ट मात्र लाज वाटण्यासारखी आहे.

- - - - - - - - - - -

कवी कलश

संभाजी राजांचे चरित्र एका व्यक्तीशिवाय पुर्णच होऊ शकत नाही आणि ती व्यक्ति म्हणजे कवी कलश. खरे तर कवी कलश यांना बखरकारांनी खुपच बदनाम कलेले दिसते. कवी कलशांना बदनाम करण्यामध्ये त्याच लोकांचा हात आहे ज्यांनी शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावर बहिष्कार टाकला. महाराज्यांच्या अभिषेकासाठी महाराष्ट्रातील एकही भट ब्राह्मण पौरोहित्य करण्यास तयार झाला नाही. तेव्हा राजांनी काशीवरुन गागा भट्टांना आणुन राज्याभिषेक पार पाडला.

सहाजिकच उत्तरेतील ब्राह्मणांबद्दल महाराष्ट्रातील ब्राह्मणांना राग होता व पुढे त्यांनी वेळोवेळी तो व्यक्त करत कवी कलशाचे बलिदान अडगळीत टाकुन त्यांना बदनाम करण्याची मोहिम सातत्याने चालूच ठेवली. अर्थात जे लोक संभाजीला शिव्या देताना मागे पुढे पहात नाहीत. ते कवी कलशाबद्दल अनुद्गार काढायला थोडेच कचरणार आहेत. कवी कलश संभाजी राजांचे खुपच विश्वासु असे मित्र होते. कवी कलश ब्राह्मण असुनही तलवार बाजी करण्यामध्ये खुपच पटाईत होते. कदाचित त्यांना शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची रीत चांगलीच माहित होती देशासाठी शस्त्र घेईन हाती हे शिकुनच आले होते.

कवी कलश यांची बुद्धीमत्ता निष्ठा व शौर्य पाहुनच संभाजी राजांनी कवी कलशांना आपल्या अष्टप्रधान मंडळात सामिल करुन घेतले व त्यांना छंदोगामात्य अशी पदवी दिली. अर्थात कवी कलश जेवढे संभाजी राजांच्या जवळ गेले तेवढे महाराष्ट्रातील नतद्रष्टांच्या डोळ्यात खुपायचे. म्हणुनच अष्टप्रधान मंडळाची भट कंपनी एकत्र येऊन कवी कलशांना कोंडीत पकडण्याचा नेहमी प्रयत्न करायची.

कवी कलश एवढे बुद्धीमान होते की संभाजी राजे बहुतेक निर्णय त्यांच्या सल्लामसलती नंतरच घ्यायचे. परंतु त्यांचा एखादा निर्णय किंवा मोहीम बाहेर फुटली असे कधीच घडले नाही. यावरुन कवी कलशांची विश्वसनीयता स्पष्ट होते आणि म्हणुनच संभाजी राजांनी त्यांना पुढे कुल मुखत्येयार म्हणजे प्रशासनाचे प्रमुख म्हणुनही जबाबदारी दिली होती. कवी कलश शाक्तपंथीय होते त्यानुसार ते शक्ती पुजा करायचे.

तेव्हा येथील सांप्रदयाचे मंडळींनी त्यांच्याबद्दल ते मेलेलेल्या रेड्याच्या कातड्यावर बसुन पुजा करतात बळी वगैरे देतात. असा निखालच खोटा प्रचार करुन त्यांची विश्वसनियता व लोकप्रियता संपविण्याचा प्रयत्न केला. कवी कलशांना अशा अनेकांना अपमानजनक घटनांना सामोरे जावे लागले.

एकदा तर ते महाराष्ट्र सोडुन जाण्याच्या तयारीतच होते परंतु संभाजी राजांनी त्यांची समजुन घालुन तुमच्या एवढा भरवसा आम्ही दुसऱ्या कोणावर ठेवु शकत नाही असे ठणकावुन सांगत आग्रह केल्यामुळेच ते पुढेही येथेच राहीले. परंतु आपल्या कर्तव्यात कोठेही कुचराई येऊ दिली नाही.

याच कवी कलशांनी संभाजी राजांच्या गैर हजेरीत शहाबुद्दीन खानाने रायगडावर केलेले आक्रमण रायगडाच्या वेशीवरच मोडुन काढले. याच कलशावर राजांनी कुडाळ व डीचोलीचे बारुदखाने चालविण्याची जवाबदारी दिली होती. याच कवी कलशांनी जेव्हा गणोजी शिर्केनी प्रल्हाद पंतांसारख्या जुन्या जाणत्या शिलेदाराला पैशाचे आमिष दाखवुन पन्हाळा मुघलांच्या घशात घालण्याचा प्रयत्न केला.

तेव्हा रायगडावरुन विशाळ गड व तेथुन ३ हजाराची फौज मलकापुर येथुन तातडीने पन्हाळ्यावर चढवुन पन्हाळा वाचवीला होता. तोपर्यंत संभाजी राजे पश्चिमेकडुन येऊन किल्ल्यावर थडकले होते. पन्हाळा ही स्वराज्याची उपराजधानीच मुकबर खानाने बळकविण्याचा प्रयत्न कवी कलशांच्या प्रसंगावधानाने हानून पाडता आला.

संभाजी राजांनी औरंगजेबाशी होणाऱ्या अखेरच्या लढाइची योजना बनविण्यासाठी संगमेश्वर येथे जी निवडक लोकांची बैठक घेतली त्यातही कवी कलश जातीने हजर होते. संभाजी राजांबरोबर लढता लढता तेही कैद झाले. औरंगजेबाने त्यांचा प्रचंड छळ करुन पाहीला. त्यांना वेगळे भेटायला बोलावुन जहागिरीचे आमिष दाखविले. परंतु कवी कलश बादशहाच्या आमिषाला न धजता स्वराज्याच्या खाल्या मिठाला जागले.

औरंगजेबाने पुन्हा एकदा कवी कलशाचे मन तपासुन पाहीले. कवी कलशांना अगदी आगतिक होऊन विनंतीच केली. "अरे काय जादु आहे शिवाजीची आणि या संभाजींची इथल्या मुलखावर व लोकावर अरे राजा कैद झाला. सेनापती मारला गेला तरीही हे मराठे शरण येत नाहीत कोणत्या मातीचा स्वाभीमान यांच्या रक्तात भरला आहे. संभाजींची धिंड काढली प्रचंड अपमान केला तरीही मराठे चालुन आले नाहीत कि महाराणी येसुबाई रायगड सोडत नाहीत."

या पेच प्रसंगातुन आपणच मार्ग काढु शकता तेंव्हा तुम्ही संभाजी राजांचे विश्वासु सहकारी आहात छंदोगामात्य आहात तुमच्यावर मराठी फौजेचा आणि स्वतः

येसुबाईचा विश्वास आहे. त्यामुळे "तुम्ही एवढेच करा की संभाजी राजांच्या नावाने कागद तयार करुन सही शिक्यानिशी रायगडावर पाठवा व संभाजी राजांच्या जिवीत रक्षणासाठी सर्व किल्यांच्या चाव्या देवुन सर्व किल्ले आमच्या ताब्यात द्या त्याच्या बदल्यात तुम्हाला हवी तेवढी उत्तरेकडील जहांगिरी देऊ. शिवाय कुराणाची शपथ घेऊन सांगतो कि संभाजीला जिवदान देऊ." बादशहाला वाटले महाराष्ट्रातील काही वतनाला चटावलेले बांडगुळ वतनदार जसे जहागिरीला भाळले तसे कवी कलश भाळतील परंतु बादशहाची अपेक्षा फोल ठरली.

कवी कलशांनी अशा प्रकारच्या धोकेबाजीला ठाम नकार देवुन उलट बादशहाच्या धोकेबाजीचा पाढाच त्यास वाचुन दाखवीला. अशा बेईमान माणसांवर जगातील कोणतीही व्यक्ती विश्वास ठेवु शकत नाही हे ठणकावून सांगितले. तेव्हा राग अनावर होऊन बादशहाने कवी कलशांची जीभच छाटली. पुढे पुढे संभाजी राजांवर जो अमानुष प्रयोग केला जायचा त्याची रंगीत तालीम बादशहा कवी कलशांवर करायचा.

जेणेकरुन कवी कलशांचे हाल पाहून संभाजी राजे तरी गहीवरुन शरण येतील. परंतु जीवलग मित्रांना वेगळे करुन पाहीले, आमिषे दाखविली व शेवटी अनेक अन्वित अत्याचार केले गेले. प्रसंगी जीव दिला परंतु कवी कलशांनी महाराष्ट्राशी व स्वराज्याशी व संभाजी राजांशी इमान राखत आपल्या देहाचे बलिदान याच महाराष्ट्राच्या भुमीवर संभाजी राजांच्या अगोदर दिले. संभाजी राजांबरोबर एवढ्या हाल अपेष्टा भोगणारा प्रत्यक्ष मृत्युलाही सामोरे जाणारा असा योध्दा या महाराष्ट्रातही होऊ शकला नाही.

त्यामुळे कवी कलश आणि त्यांचे वंशज पुर्वज यांचा हा महाराष्ट्र नेहमीच ऋणी राहील. संभाजी राजांबरोवर कवी कलशांचे नावंही इतिहासात अमर राहील. अशा प्रकारचे योगदान महाराष्ट्रातही १६०० किलोमीटरहून आलेल्या कवी कलशाने दिलेले आहे. हे महाराष्ट्रातील जनतेने कदापि विसरु नये.

\- - - - - - - - - -

इंग्रजासोबत करार

तो दिवस होता २६ एप्रिल १६८४. संभाजी राजे त्यावेळी बीरवाडीच्या किल्ल्यामध्ये मुक्कामी होते व इंग्रजांबरोबर करार करण्यासाठी ते तेथे पोहोचले होते. यापूर्वी संभाजी राजांनी इंग्रजांची चांगलीच नाकाबंदी केली होती व त्यामुळेच ते तहाला व मैत्रीपुर्ण करारासाठी उत्सुक होते. अनेक दिवसांपासुन यासाठी ते संभाजी राजांच्या होकाराची वाट पहात होते. तहानुसार इंग्रजांना मराठ्यांच्या मालकीची किनारपट्टी असलेल्या जिंजी व मद्रास प्रांतात वखार बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली.

परंतु त्याचवेळी संभाजी राजांनी धुर्त इंग्रजांची भावी डावपेचाची रणनिती पाहुन त्याचवेळी इंग्रजांना निक्षुन बजावले होते. "आपण येथे फक्त व्यापार आणि व्यापारच करायचा व्यापाराच्या नावाखाली स्थानिक राजकारणात नाक खुपसायचे नाही व वखारीच्या नावाखाली किल्ले बांधायचे नाहीत." अगदी वखारीची लांबी रुंदी आणि उंचीही संभाजी राजांनी निर्धारित करुन दिली. व त्याप्रमाणे वखार बांधावी असे सुचविले.

जेणेकरुन वखारीच्या नावावर इंग्रजांना भुईकोट किल्ला बांधण्यास वाव मिळणार नाही याची दक्षता घेतली गेली. शिवाय आयात निर्यातीवर जकात आकारली आणि त्याचवेळी इंग्रजांना कोणतीही सुट न देण्याची कठोर भूमिका त्यांनी इंग्रजांबाबत राबवीली. त्याचवेळी वखारीत काम करणार त्यांची नावे व पत्ते जवळच्या सुभेदाराकडे किंवा अंमलदारांकडे देणे बंधनकारक केले. वखारीत लोक कामाला ठेवताना ते स्थानिक असावेत व त्यासाठी परवाना घेण्याची सक्त ताकीदही संभाजी राजांनी इंग्रजांना दिली होती.

गुलामाची पोरे विकण्यावर व खरेदी करण्यावर बंदी घातली. इंग्रज या गोष्टीसाठी जवळपास अगोदर असणाऱ्या जकातीच्या सहा ते आठपट जकात देण्यास तयार झाले होते. तरीही जकात मिळणार म्हणुन माणुसकी आणि माणसे विकायला संभाजी राजे थोडेच तयार होणार होते. इतरांची साम्राज्य पैशाच्या बदल्यात माणसे विकत घेऊन वाढली असतील. परंतु स्वराज्याच्या निर्मितीत माणसाला माणुस म्हणुन वागणुक मिळावी हाच उदात्त हेतु होता व संभाजी राजे तो पुर्ण पाळत होते. म्हणुनच त्यांनी गुलामगिरीच्या वेठबिगारीच्या पद्धतीला परवानगी दिली नाही.

उलट "एवढीच गुलामांची गरज असेल तर स्वत:च्या देशातुन गुलाम म्हणुन माणसे आणा म्हणजे माणुसकीची किंमत कळेल." असा इशाराही इंग्रजांना दिला. व्यापार उद्दीमाच्या नावाखाली माणसे खरेदी करण्याचा उद्योग आणि वेठबिगारीची पद्धत मोडीतच काढली. एकुणच काय तर बालकामगार विरोधी कायदा करणारे छत्रपती संभाजी हे आधुनिक काळातील पहीले राजे ठरले. परंतु आपणाला हे कोणी सांगितले नव्हते, तर ते आपण पुढच्या पीढीला कशातुन सांगणार ?

शेवटी आपल्यालाच आपल्या इतिहासाची कदर नसेल तर कपाळ फोडुन काय करणार ? इंग्रजाबरोबरीचे तहाचे शेवटचे कलम होते. "स्वराज्याच्या हद्दितील कोणाही मनुष्य मात्रास गुलाम म्हणुन किंवा धर्मांतर करुन ख्रिस्त करण्यासाठी इंग्रजांना विकत घेण्यावर निर्बंध." धर्मांतर होऊ नये यासाठी आमिषाच्या बळावर किंवा मारुन मुटकून धर्मांतर होऊ नये यासाठी धर्मांतर बंदीचा कायदा करणारा राजा म्हणुनही छत्रपती संभाजी राजांना हिंदुस्तान ने लक्षात ठेवायला हवे होते.

परंतु आपला देश ठरला लोकशाहीवादी अर्थात लोकशाही म्हणजे पुढाऱ्यांना वेगवेगळे सोंगे मिरवण्याची मुक्त परवानगीच त्यामुळेच सांप्रद काळात सगळा बट्ट्याबोळ होऊन बसतो. परंतु संभाजी राजांनी अगदी दुरदर्शीपणे ३५० वर्षापुर्वी अशा प्रकारे गुलामगिरी विरोधात वेठबिगारी विरोधात बालकामगार विरोधात व धर्मांतराबाबतीत कायदे करुन एक आदर्श राजा असल्याचे सिध्द केले. परंतु बखरकारांनी संभाजी राजांची ही रुपे आणि सामाजिक सुधारणा कधीच लोकांसमोर येणार नाहीत याची दक्षता घेतल्यानेच हा इतिहास लपुन राहीला हे ही तेवढेच खरे.

\- - - - - - - - - - - -

श्री

(स्व)स्तिश्री राज्याभिषेक शक ८ दुर्मती सवत्सरे कार्तिक बहुल द्वादसी मद्वासरे क्षत्रियकुलावतंस सिंहा (सना) धीश्वर श्री राजा शंभू छत्रपती

श्री शंभुनर
पति हर्षनिदान मोरे
श्वरसुत नीळकंट
मुख्य प्रधान

स्वामी याणी राजश्री कृष्णाजि कासी यासि आज्ञा केली ऐसी जे विनंतिपत्र आश्विन वद्य सप्तमीचें पाठविलें तें कालीच पावलें तें प्रातीचे वर्तमान राजश्री (हर)जी राजे माहाडीक यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितो म्हणून कितेक ता। लिहिलें तें तुमच्या लिहिल्याप्रमाणें कलों आलें पुढेंहि वर्तमान लिहीत जाणें आणि राजश्री हरजी राजे यांचें आज्ञेत वर्तत जाणें व तुमची वृत पुणेची आहे ते अमानत केली आहे त्यास आपले गोत्रजन हुजूर येऊन गैरवाका सांगोन वृत मोकली करवितील तरी अमानतच असों द्यावी म्हणून लिहिलें तरी तुमची वृत अमानत आहे तैसी आहे पुढे तुमचा कोणीं दाईज हुजूर आला तऱ्हीं त्याचे बोले मोकली करायाची आज्ञा होणार नाहीं अमानतच आहे येविसी तुम्ही आपले समाधान असों देणें जाणिजे मर्या

देबंविज।
यते।

राजा शंभु छत्रपतीं – कृष्णाजी कासी

अश्वीन वद्य ७ चे पत्र काल (१६८१ नव. २५ शुक्रवार) पावलें, हरजीराजे माहाडीक यांचे आज्ञेत वर्तत जाणें. तुमची वृत पुणेची आहे ते अमानत केली आहे. तुमचे गोत्रजन हुजूर येऊन गैर वाका सांगोन वृत मोकली करवितील तरी तैसीच आहे. पुढे तुमचा कोणी दाईज हुजूर आला तऱ्ही त्याचे बोले मोकली करायाची आज्ञा होणार नाही. अमानतच आहे. येविसी तुम्ही आपलें समाधान आसो देणें.

... आणि स्वप्न भंगले

संभाजी राजांच्या काळात त्यांची मोठी परिक्षा पाहीली ती निसर्गानेच. माणसांचा भरवसा तर केव्हाच संपला होता. कानोजी शिर्के, अर्जोजी यादव, नागोजी माने, स्वराज्याचे सरन्यायाधीश मुल्ला काजी हैदर व इतर अनेक नामवंत मंडळी या अगोदरच औरंगजेबाला जाऊन मिळाले होते. त्यांच्या सोबत आणखी इतर सरदार देशमुख मंडळींना स्वराज्य सोडून मोघलांच्या छावणीत यायला प्रेरित करीत होती. त्यांना बादशहाने तसा पगार व कमिशन चालु केले होते. मार्केटींगची जवाबदारी महाराष्ट्रातील अशा बांडगुळांवर औरंगजेबाने अगदी धुर्तपणे टाकली होती. सलग तीन चार वर्ष महाराष्ट्र पठारावर दुष्काळ पडला होता.

१६८६, १६८७ या वर्षी तर भीषण दुष्काळ पडला. सगळी प्रशासन व्यवस्थाच कोलमडुन पडण्याची वेळ आली होती. परंतु संभाजी राजे अत्यंत धीराने या सर्व प्रसंगांना सामोरे जात होते. एकीकडे स्वराज्याशी बेईमानी करणाऱ्यांना रोखण्याचे अवघड काम तर दूसरीकडे दुष्काळामुळे उघड्यावर आलेली प्रजा यांना सांभाळणे अशी अगदी तारेवरची कसरत होती. सातारा पुणे भागात तर अनेक गावेच्या गावे देशोधडीला लागली होती. स्वराज्याचा संपूर्ण खजिना रिकामा होत चालला होता. तरीही संभाजी राजे प्रजेला मदत करतच होते. शेवटी रयतेसाठी खजाना असतो खजान्यासाठी राजा नव्हे.

रयतेला नवीन लावणीसाठी व सिंचनीसाठी राजांनी सरकारी कोठ्यातुन मदत केली. शिवाय पोर्तगीज व गोवेकरांकडूनही धान्य मागविले होते. अर्थात धुर्त टोपीकरांनी पडत्या काळात म्हणावी तशी साथ दिली नाही. स्वराज्याचा सगळयात सधन प्रांत होता जिंजी व तिकडे परिस्थिती चांगली होती. पंरतु तिकडुन म्हणावी तशी मदत मिळत नव्हती. शिवाय म्हैसुरनरेशने जी खंडणी कबुल केली होती तीही पुढे दिली नाही. खंडणीची रक्कम जवळपास १ करोड रुपयांच्या आसपास होती.

अन्नधान्य व रसद मिळविण्यासाठी संभाजी राजांनी परत एकदा दक्षिण मोहिम उघडली. परंतु ५-६ महिने अटीतटीची झुंज देऊनही निर्णायक यश न मिळाल्यामुळे

परत माघारी फिरावे लागले. तरीही कर्नाटकहुन परत येताना राजांनी आपल्या सोबत १० हजार बैलांच्या पाठीवरुन स्वराज्यासाठी येथील उपाशी तापाशी जनतेसाठी धान्य आणले होते. परंतु दुष्काळ एवढा मोठा होता कि तेवढ्या अन्नधान्यांने जास्त काळ तग धरता येऊ शकत नव्हते. राजांना कसेही करुन माणसे व जणावरे जगविणे भाग होते. व त्यासाठी ते सर्वोतोपरी प्रयत्न करीत होते. राजे अष्टागारातील सर्व कोठारे मोकळी करुन रयत जगवत होते. शिवाय कुतुबशहा कडुन पुरेशे धन-धान्य उपलब्ध करुन घेत होते. त्यानेही थोडाकाळ दिलासा मिळाला.

इंग्रजांकडुनही ४,००० मुठे भात विकत घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. इंग्रजांनी तोही देण्यास नकार दिला. तेव्हा किमान भात उसना तरी द्यावा अशी विनंती ही केली होती. जिंजीहुन मदत येत नव्हती. तेव्हा तेथुन पुरेशी रसद चालु व्हावी म्हणुन केसो त्रिमल पिंगळे व संताजी घोरपडे यांना तिकडे पाठवुन पदाच्या मोहाने स्वराज्याशी बेईमान झालेली माणसे व निर्माण झालेली परिस्थिती दुरुस्त करण्यासाठी या दोघांनीही प्रयत्न केला.

पुढे जसे बाकीचे दोन मेहुणे मोघलांना जाऊन मिळाले होते तसेच हरजी राजे नावाचे संभाजी राजांचे सख्खे मेहुणे मोघलांना गुप्तपणे सामिल असल्याचे उघड झाले. त्यामुळेच स्वराज्याला ऐन दुष्काळात योग्य ती मदत व रसद मिळू शकली नाही. तिकडे औरंगजेबाने आपला मोर्चा विजापुर व भागा नगरीकडे वळवीला होता.

मराठे, आदिलशाही व कुतुबशाही यांची दक्षिणेतील युती तोडल्याशिवाय आपल्याला यश येणार नाही हे औरंगजेबाने ओळखले होते. महाराष्ट्रदेशी ६ वर्षे झुंजूनही अपयश आल्याने औरंगजेबाने आपला मोर्चा तिकडे वळवीला होता. परंतु दुष्काळाने महाराष्ट्राच्या पाठीवर दुर्दैवाचे आसुड ओढावयास सुरुवात केली होती व नियती परिस्थितीच्या रेटयापुढे चांगल्या चांगल्यांना वाकायला भाग पाडत होती.

त्यातच कुतुबशहाच्या दोन सरदारांमध्ये मतभेद झाले व कुतुबशाही व गोवळकोंडा अंतर्गत मतभेदाने पोखरला गेला. पुढे औरंगजेबाने कुतुबशहाच्या आईला व पत्निला आपल्या बाजुने वळवुन कुतुबशाहीची दारोमदार असलेल्या पंतप्रधान मादान्ना पंडितांचा भरदिवसा मारेकरी घालुन खुन केला. कारण मादन्ना असेपर्यंत तो संभाजी राजांशी प्रामाणिक होता व तो असेपर्यंत कुतुबशाही पडत नव्हती. हे औरंगजेबाने ओळखले होते.

मादान्नाच्या मृत्युनंतर खुशाल चेंडू कुतुबशहा औरंगजेबाला शरण गेला व त्याने मोगलांना १ कोटी २० लाख रुपये नुकसान भरपाई म्हणुन दिली. दुसरीकडे

विजापुरकरांचाही त्याने कुटील नितीचा वापर करुन आदिलशाही मोडीत काढली. विजापुरकरांची भिस्त ज्यांच्यावर होती ते सर्जा खान व मुकबर खान असे दिग्गज योद्धे फोडून औरंगजेबाने आपल्याला सामिल करुन घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

त्याला आता जवळपास ७ वर्ष दक्षिणेत लढल्यावर आपली फौज निकम्मी असल्याचे व लढाईपेक्षा दक्षिणेतील बाडग्यांचा उपयोग जास्त असल्याचे लक्षात आल्यानेच त्याने येथील माणसे फोडण्याचा त्यांना दौलत जहांगिरी, वतनदारी अशी आमिषे दाखवत प्रयत्न केला आणि लाखो सैनिकांचे रक्त सांडुन जो विजय मिळविण्याची शक्यता नव्हती तो विजय बाडग्यांपुढे अशर्फ्यांच्या थैल्या मोकळया करुन बादशहा विजयाच्या दिशेने दमदार पावले टाकत होता. आता बादशहाला अगदी स्वतःच्या मुलावर विश्वास नव्हता. म्हणुन तो स्वतः १६८६ च्या जुलै मध्ये विजापुरावर चालु गेला.

त्याचवेळी कर्नाटक प्रदेशातही पावसाने जोर धरला व ओला दुष्काळ पडला. अशा कठीण परिस्थितही बादशहा ५ महिने तेथेच तळ ठोकुन होता. औरंगजेबाने विजापूराला हैदराबाद व मराठ्यांकडून येणाऱ्या रसदींचे सर्व मार्ग बंद करुन टाकले होते.

विजापुर किल्याच्या तटाच्या आत अन्नपाण्यावाचुन विजापुर करांचे खुप हाल होवु लागले आणि शेवटी रयत जेव्हा अन्न पाण्यावाचुन तडफडुन मरु लागली तेव्हा २६ सप्टेंबर १६८६ आदिलशहा सिकंदर औरंगजेबाला शरण गेला. आदिलशहाचा शुर सरदार सर्जा खान याला आपल्याकडे ओढुन त्याला मनसबदार बनविला. तर तिकडे हैदराबादचा मुख्य सरदार मुकबर खानाला औरंगजेबाला आपल्या जाळयात ओढले व फंद फितुरी करुन गोवळकोंडा हस्तगत केला.

सप्टेंबर १६८७ या विजयातच बादशहाला जवळपास ७ करोड रुपयांचा खजिना मिळाल्याने त्याला आर्थिक ताकदही मिळाली. पुढे याच मुकबर खानाने संभाजी राजांना कैद करुन या लढाईला अंतिम आणि निर्णायक वळण दिले आणि त्यामुळेच औरंगजेबाला रणभुमीत गाडण्याचे संभाजी राजांचे स्वप्न भंगले.

- - - - - - - - - - -

प्लेग जैविक अस्त्र प्रयोग

सप्टेंबर १६८६ विजापुरचा आदिलशहा सिकंदर औरंगजेबाला शरण गेला. पुढे दुसऱ्याच वर्षी सप्टेंबर १६८७ कुतुबशहाचा गोवळकोंडाही पडला. दक्षिणेतील संभाजी राजे, आदिलशहा कुतुबशहा या तीन राजांची युती होती व युती अभेद्य असेपर्यंत औरंगजेबाला जवळपास ६ वर्ष एकही विजय मिळवता आला नव्हता. कारण औरंगजेब महाराष्ट्राच्या दऱ्या खोऱ्यातच विजय शोधत हिंडत फिरत होता व मराठे त्याला ताकास तुर लागु देत नव्हते. अगदी दुष्काळ पडला असताही मराठे हार गेले नव्हते.

विजापुरकर व गोवळकोंडेकर संभाजी राजांना जमेल तेवढी मदत करीत होते. कुठेही महाराष्ट्रात यश मिळत नाही व पुढे मिळूही शकणार नाही हे लक्षात आल्यावर औरंगजेबाने त्याचा मोर्चा पुर्ण ताकदी निशी विजापुर व गोवळकोंड्याकडे वळवुन आदिलशहा व कुतुबशहा या दोघांना कैद केले. तेव्हा ही दोन राज्य गिळंकृत केल्यानंतर हा अजगर महाराष्ट्राच्या दिशेने मोहरा वळवीणार होता यात काही संशय नव्हता.

औरंगजेबाची शाही छावणी त्यावेळी विजापुरच्या सिमेवर होती. औरंगजेब महाराष्ट्रात घुसतो कुठे तोवर त्याच्या लष्करात साथीच्या रोगाने आपला प्रभाव दाखवीण्यास सुरुवात केली. सैनिकांना सरदारांना शाही परिवारातील लोकांना ताप यायचा. काखेत गाठ तयार व्हायची. गाठ टम्म फुगायची व चार दिवसात फुटायची. गाठ फुटली की त्या मानसाचे जागेवरच रामनाम सत्य होत होते. असा हा भयंकर रोग औरंगजेबाच्या सर्व फौजेवर टोळधाडीप्रमाणे सडकुन पडला होता. हजारो सैनिक रोज अल्लाहला प्यारे होऊ लागले.

बादशहाला आपल्या जागेवरुनं हालताच येणार नाही अशी आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती. औरंगजेबाने सर्व ताकदीनिशी स्वराज्यावर चालुन येण्याच्या वेळीच नेमकी ही साथ कशी पसरली? व ही साथ औरंगजेबाच्या छावणीपुरतीच मर्यादीत कशी राहीली. कदाचित संभाजी राजांसारख्या हुशार राजाने

जैविक अस्त्राचा प्रयोग तर केला नव्हता ना? कारण दूसरे कोणतेही अस्त्र एवढ्या प्रभावीपणे काम करु शकत नव्हते. दीड दोन महिन्यातच औरंगजेबाचे जवळपास ७५ हजार सैनिक तापाने फणानुन जागेवरच गारद झाले होते.

औरंगजेबाचे दोन नातु त्याची औरंगाबादी महल नावाची बेगम तसेच औरंगजेबाचा मुख्य सरहकीम व त्याचा मुलगाही या तापाच्या साथीने कराल काळाच्या दाढीत ओढले गेले होते. चक्क औरंगजेबालाही या तापाने घेरले होते. परंतु अव्वल पैकी अव्वल अशा वनषौधिंचा उपयोग करीत औरंगजेब कसा बसा वाचला होता. परंतु त्याच्या फौजेची मात्र अपरिमीत हानी झालेली होती. अगदी मेलेल्या माणसांचे मुडदे ओढायला आणि कबरी खोदून त्यात मुडदे गाडायला माणसे एकतर बाकी नव्हती आणि जी काही शिल्लक होती त्यांच्यात उठून बसण्याएवढेही अवसान उरले नव्हते.

अनेक प्रयोग करुन तळाची जागा वेळोवेळी बदलुन कसा बसा औरंगजेब उरल्या फौजेनिशी डिसेंबर १६८८ मध्ये प्रवासाला लागला. म्हणजेच विजापूर व गोवळकोंडा पडल्यानंतर ही जवळपास सव्वा वर्ष संभाजी राजांनी औरंगजेबाला स्वराज्याच्या हद्दीवरच ताटकळतच ठेवले होते. तोपर्यंत राजांनी पुढच्या निर्णायक युध्दाची जय्यत तयारी करण्यासाठी उसंत मिळाली होती व त्यांनी तशी सिध्दताही केली. त्यामुळे शत्रुला नामोहरण करण्याच्या नवीन नवीन युक्त्या संभाजी राजांनी आत्मसात केल्याचे व मोघलांच्या ५ लाख फौजेला सळो की पळो केल्याचे असे अनेक पुरावे जागो जागी आपल्याला सापडतात.

त्यानंतर मोघली फौज महाराष्ट्रात वेगाने सरकु नये म्हणुन मोघली फौज ज्या मार्गाने जायची त्या मार्गावरील सर्व जलाशयांमध्ये मराठे विष कालवत असेहीकाही ठिकाणी प्रकार घडल्याचे वाचनात येते.

तर ज्या घाटातुन ज्या प्रदेशातुन मोघली फौज जायची त्या ठिकाणी सैन्य आणि जनावरांची उपासमार व्हावी म्हणुन रानेच्या राने मराठी फौज पेटवुन मोघलांना आणि जनावरांना अन्न पाण्यासाठी त्राही त्राही करीत असत. यावरुन संभाजी राजांनी अल्प फौजेनिशी मोघलांच्या अफाट सागराला कसा तुंबा घातला होता हे ही लक्षात येते आणि त्याचवेळी त्यांच्या युध्द नितीची व मुत्सद्देगिरीची झलकही आपणाला पहावयाला मिळते.

– – – – – – – – – –

बादशहाची तहाची तयारी

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या रणकौशल्याच्या बळावर अगदी तुटपुंज्या फौजेचा अत्यंत चपळाईने उपयोग करीत मोघलांना अगदी सळो की पळो करुन सोडले होते. अगदी सहा महिन्यात मोहिम फत्ते करुन आपण पुन्हा दिल्लीला पोहचू असा बादशहाचा सर्व मनसुबा ठार उधळून गेला होता. जवळपास सहा वर्ष कडवी झुंज देऊन सह्याद्रीच्या राना वनात अनाथ कुत्र्यासारखे रात्रं दिवस भटकुनही लाखोंची फौज प्रचंड दारुगोळा अमाप पैसा असनुही विजयाची सुरुवातही होत नव्हती.

तेव्हा आता एक तर संभाजीशी तह करणे किंवा मोकळया हाताने आल्या मार्गे पुन्हा यमुना पार होणे एवढे दोनच पर्याय औरंगजेबापुऐ शिल्लक होते. सहा सहा वर्ष आपल्या कुटूंबियांपासुन दुर राहिलेले फौजी आता मनाने खचले होते व मराठ्यांच्या अचानक धाड टाकुन सपासप कापाकापीच्या मोहिमेचीही मोघल सैनिकांनी पुरती धास्ती घेतली होती हे बादशहाला चांगलेच लक्षात आले होते. तेंव्हा बादशहाने संभाजी राजांबरोबर तहाची तयारी दाखवीली होती. परंतु तहाची बोलणी फिस्कटली तर खचलेल्या फौजेचा आणखीन धीर सुटण्याची नामुष्की येवु नये म्हणुन अगदी गुप्तपणे तहाचा प्रस्ताव गोवळकोंडयाच्या कुतुबशहाच्या माध्यमातुन देण्यात आला.

सहयाद्री जिंकणे आपल्या बापजाद्यानांही शक्य नसल्याची बादशहाची अगदी खात्री झाली होती असे यावरुन नक्कीच म्हणता येईल. तहाच्या कलमात औरंगजेबाने संभाजी राजासमोर मांडलेला प्रस्ताव खूपच हास्यास्पद परंतु त्याचवेळी बादशहाची अगतिकता प्रगट करणारा होता. संभाजीने सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर असलेले सर्व दुर्गम किल्ले बादशहाला द्यावेत व त्या बदल्यात उत्तरेकडे मैदानी प्रदेशातील हवी तेवढी जहागीर वतन देण्याची तयारी बादशहाने दर्शवली होती.

एवढी प्रचंड फौज दारुगोळा पैसा सोबत असुनही संभाजी राजाने औरंगजेबाला एवढा हतबल करुन सोडला होता कि अखेर आलमगीराला स्वत: तहासाठी पुढाकार घ्यावा लागला.सह्याद्रीतील किल्ल्यांची ताकद काय आहे हे औरंगजेब ओळखुन होता. म्हणुनच त्याने शिवाजी महारांजासोबत पुरंदरचा तह केला त्यावेळी सर्व डोंगरी

किल्ल्यांचा ताबा मागितला होता. तेव्हा दुर्गम वाटणाऱ्या फक्त २३ किल्ल्यांवरच शिवाजी महाराजांनी बादशहाची बोळवण केली होती.

परंतु आता मात्र स्वराज्याचा अगदी निर्णायक लढाईचा टप्पा असल्याने रामशेज सारखा टेकडीवजा किल्ला सुध्दा औरंगजेबाला सहा सहा वर्ष झुंजवत होता. तेथे सिंहगड, पुरंदर, पन्हाळा आणि रायगड तर खुपच अवघड गोष्टी होत्या. माणसापेक्षा किल्लेच जास्त नेटाने आणि प्राणपणाने ईमानदारीने स्वराज्याच्या हिताचे संरक्षण करताना दिसत होते. शिवाजी राजांनी स्वाभिमानाच्या रक्ताने भिजवलेल्या पत्थरांनीच या किल्लयांचा पाया भरला होता. तेव्हा माणसांप्रमाणे वतनासाठी आपली इमान गहाण ठेवणारे किल्ले थोडेच असणार! आपल्या धन्याची गरज ओळखुन ते बिचारे उन्हा पावसात थंडीत तसेच अभेद्यपणे उभे होते. स्वराज्याचे अंगरक्षक म्हणुन आले काम चोख बजावत होते.

तहाचा संदेश घेऊन आलेल्या वकीलाला संभाजी राजांनी चांगलाच प्रसाद देऊन आल्या मार्गे परत पाठविले. स्वाभिमानाचा सौदा करण्यासाठी आलेल्यांना अशाच प्रकारे मोकळया हाताने परत पाठविणेच चांगले असते. प्रस्ताव अशा प्रकारे फेटाळल्यावर प्रचंड राग येणे स्वाभाविक असते. शिवाय आलमगीर बादशहाचा प्रस्ताव संभाजी सारखा ३० वर्षाचा राजा एवढया बेधडकपणे धुडकावतो याची बादशहाला खुपच बोचण लागुन राहीली.

एके दिवशी मध्य रात्रीच्या सुमारास बादशहा अतिशय चिंताग्रस्त असताना त्याच्या वझीराला विचारतो. "एवढी ५ लाखांची फौज, हजारो अमीर उमराव, करोडोचा खजाना, प्रचंड तोफखाना असतानाही अद्याप विजयाला सुरुवातही होत नाही. अरे कोणत्या मातीचे बनले असतील हे मराठे! आणि यांच्या जाती तरी किती आणि पक्क्या स्वराज्यनिष्ठ, उपाशी मरतील, प्रसंगी जीव देतील परंतु स्वाभीमानाशी, देश स्वातंत्र्याशी तडजोड करायला तयार होत नाहीत.

आलम दुनिया आलमगीराच्या समोर नतमस्तक होत असताना हे मराठे मात्र वाकायला तयार होत नाहीत. स्वाभीमान आणि देशप्रेम हेच त्यांचे बळ." तेव्हा यातील काही हाताला लागतील असे वतनदारीला चटावलेले बांडगुळ हाताशी धरावे लागतील तेंव्हा कुठे आशेचा किरण दिसु लागेल. मला तर वाटते या मराठ्यांच्या लोक जसे बोलतात तसे ९६ जाती नसुन फक्त दोनच जाती असु शकतात एक म्हणजे स्वराज्यासाठी देशासाठी प्राणपणाने लढणारे मराठे आणि दुसरे म्हणजे वतनाच्या लाचारीसाठी दुसऱ्यांचे तळवे चाटणारे स्वार्थी आपमतलबी, बांडगुळ मराठे. तो शिवाजी आणि त्याचा पराक्रमी पोरगा संभाजी हे दोनच माझ्या मते तरी खरे मराठे! बाकीचे काय

वतनासाठी याचे त्याचे उंबरठे झिजविणारे लाचार गुलाम मराठे.

बादशहाचे हे बोल खरोखरच शिवाजी महाराजांनी खरे करुन दाखवले. शिवाजी संभाजींची किंमत एका परक्या बादशहाला ओळखता आली आणि तुम्ही आम्ही मात्र त्यांचे मोठेपण न कळण्या इतपत नादान ठरलो. याच्यापेक्षा महाराष्ट्राची दुसरी शोकांतिका ती काय ठरणार? शिवाजी स्वराज्यासाठी झटले, जगले परंतु संभाजी स्वराज्यासाठी मेले हुतात्म पत्करले अमर झाले. सुभाष चंद्रबोस यांनी म्हटल्याप्रमाणे ध्येयासाठी जगणे आणि ध्येयासाठी मरणे हे फक्त देशभक्तच करु शकतात येऱ्या गबाळ्याचे काम नाही.

शिवाजी संभाजीसारखे महाप्रतापी राजे जर युरोपात जन्माला आले असते तर तेथील लोकांनी गावा गावात सोन्याचे पुतळे उभारले असते. घराघरात शिवप्रभु व संभाजींची प्राण प्रतिष्ठा करुन स्वातंत्र्याचा, स्वराज्याचा हा प्रेरणादायी यज्ञ कायम धगधगता ठेवला असता. सातत्याने प्रेरणा घेवुन पुढच्या पीढीची मने मनगटे आणि मेंदु वज्राप्रमाणे बळकट केले असते.

आपण मात्र अभागी, काखेत कळसा आणि गावाला वळसा या म्हणीप्रमाणे. परदेशातील लोक शिव छत्रपतिंच्या युध्द नितींचा अभ्यास करुन गोरील्ला वारफेअरची नवीन संकल्पना अस्तीत्वात आणुन व्हियतनाम सारखे छोटेशे राष्ट्र अमेरीकेसारख्या बलदंड राष्ट्राला झुकवते आणि आम्हाला मात्र बांग्लादेश, पाकिस्तानसारखे किरकोळ देश आव्हान देतात. हे केवढे मोठे आश्चर्य. आपणच आपल्या गौरवशाली पराक्रमी इतिहासाचा अभ्यास केला नाही तर अशी राष्ट्रीय संकटे पुन्हा पुन्हा आली तर आश्चर्य वाटायला नको.

- - - - - - - - - -

फिदायीन पथक

बादशहा सोलापुर सोडुन पुढे येत होता. तेव्हा त्याचा तळ जत परिसरात होता. एके दिवशी बादशहाचा सरदार मन्सूर खान काही संशयित लोकांना अथनी परिसरातुन ताब्यात घेतो. अथनीच्या मंदीरातुन कैद केलेले ते गोसावी होते. परंतु त्या नवजावानांची धडधाकट शरीर यष्टी पाहुन तसे वाटणे शक्य नव्हते. म्हणुनच त्यांच्यावर पाळत ठेऊन मन्सुर खानाने अचानक छापा टाकुन या गोसाव्यांच्या पथकाला कैद केले.

प्रचंड मारहाण आणि शारिरीक छळ केल्यावर ते गोसावी नक्की कोण होते याचा उलगडा होऊ शकला. प्रसंगाचे गांभिर्य ओळखुन मन्सुर खानाने लगेचच त्या गोसाव्यांना बादशहा समोर हजर केले. आपण किती मोठे काम केले आहे हे बादशहाला दाखवुन द्यायचे होते. त्याप्रमाणे त्या सात-आठ गोसाव्यांना मन्सुर खानाने बादशहा समोर हजर केले.

कोण होते हे गोसावी ? काय करत होते ? बादशहाच्या छावनीच्या परिसरात येण्याचा काय होता त्यांचा हेतु ? हे गोसावी दुसरे तिसरे कोणी नसुन संभाजी राजांचे अत्यंत विश्वासु व विशेष जवाबदारी पार पाडणारे निधडया छातीचे स्वराज्याचे निष्ठावंत शिपाई होते. बादशहा जेथे ज्या परिस्थित जसा सापडेल त्याला तिथेच संपवीण्याची जवाबदारी या मर्दांकडे देण्यात आली होती. आणि ऐन केन प्रकारे बादशहाचा मुडदा पाडुन या लढाईला निर्णायक स्थिती पर्यंत आणण्यासाठी तयार केलेले ते फिदायीन अर्थात आत्मघातकी पथक होते. बादशहाने आता सपाटीच्या प्रदेशात तळ ठोकुन सुरक्षीत लढाईला सुरुवात केली होती. त्याचे लष्कर डोंगर कपारीत घुसायला दिवसाही घाबरत होते.

तेव्हा बादशहाला त्याच्या तळावरच इकडे तिकडे एखाद्या बेसावध क्षणी पकडून मारण्याची ती योजना होती व त्यानुसार जवळपास १० ते १२ आत्मघातकी पथके तयार केली गेली होती. ती सर्व पथके बादशहाच्या तळावर इकडे तिकडे वेशांतर करुन गुप्तपणे वावरत होती व संधीची वाट पहात होती. जत, अथनी, पंढरपुर, मंगळवेढा अशा सर्व परिसरात बादशहा जिकडे जाईल तिकडे या पथकांचे बारीक लक्ष असायचे.

स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणारे ते गोसावी आणि इतर सोंगे घेऊन फिरणारे दूसरे तिसरे कोणी नव्हते. ते सरदार नव्हते, ते जहांगिरदार नव्हते, सुभेदार नव्हते, वतनदार तर नक्कीच नव्हते ते होते फक्त शिपाई. भगव्या झेंड्याचे शिपाई.

शिवप्रभुंच्या विचारांचे पाईक आणि स्वराज्याचे ईमानदार सेवक. दुसरीकडे जहांगिरदार वतनदार वतनासाठी मोघलांच्या पायावर लोळण घेत असताना हे स्वार शिपाई मात्र स्वराज्याच्या वेदीवर अग्नीकुंडात आपला बळी देत होते. आपल्या जीवनाची आहुती देत होते.


औरंगजेबाच्या हालचाली टिपण्यासाठी आणि त्या नियंत्रीत ठेवण्यासाठी संभाजी राजांनी जे प्रयोग केले ते अगदी अभिनव व धाडसी स्वरुपाचे होते. मग ते जैविक अस्त्र प्रयोग असो किंवा मोगलांच्या तळाला जेथुन पाणी मिळणार तेथे विष प्रयोग करणे असो किंवा आत्मघातकी पथकाचा प्रयोग करुन थेट मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न असो.

संभाजी राजांच्या या सर्व प्रयत्नांमुळे एकीकडे मराठ्यांना बळ मिळत होते. तर दुसरीकडे मोघलांना जळी स्थळी संभाजी आणि त्यांचे रण बहाद्दर दिसत होते. त्यामुळे मोघलांना रात्री झोप येत नव्हती आणि दिवसा झोपता येत नव्हते. अशी अत्यंत भयप्रद स्थितीत ५ लाख मोघल जीव मुठीत घेवुन सह्याद्रीच्या परिसरात लढण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होते.

संताजी आणि धनाजी ने हा प्रयोग यशस्वीपणे राबविला. ते थेट बादशहाच्या गुलालबारीतच घुसले. परंतु त्यावेळी बादशहा नमाज पठण करीत होता त्यामुळे तो वाचला. नाहीतरी मराठ्यांनी कधी एखाद्याच्या मजबुरीचा फायदा घेतला नाही, किंवा एखाद्याच्या धर्म कार्याच्या आड आले नाहीत. मराठे तसे असते तर औरंगजेबाला त्याच्या तंबुतच संताजी धनाजी ने फासटुन ठार केला असता.

परंतु बादशहाचे नशीब बलवत्तर होते म्हणुन वाचला, परंतु तरीही आपल्या पराक्रमाची निशाण मागे ठेवण्यासाठी संताजी धनाजी ने बादशहाच्या तंबुचे कळसच कापून आणले हे आपण सर्व जाणताच.

- - - - - - - - - -



उदेपुरी बेगम

बादशहाच्या आवडत्या राण्यांपैकी एक म्हणजे उदेपुरी बेगम. उदेपुरीचे लग्न औरंगजेबाच्या मोठ्या भावाशी दाराशी झालेले. औरंगजेब उदेपुरीवर भलताच भाळलेला होता जेव्हा बादशहाने कपटाने दाराचा खुन केला तेव्हा दिल्लीच्या तख्ता सोबत दाराची बायकोही औरंग्याने हिसकावुन आपल्या ताब्यात घेतली. औरंगजेबाचा स्वभाव व कट कारस्थानाची उदेपुरीला अशी चांगलीच ओळख होती. परंतु तरीही हे सर्व सहन करत ती औरंगजेबा बरोबर मुकाट्याने संसार करीत होती.

संभाजी राजांना कैद करुन अनेक दिवस झालेले होते. कैदेत असणाऱ्या दुर्गाबाई राणु अक्का कमळजा यांची भेट घालुन संभाजी राजांना पाझर फोडण्याचा प्रयत्नही झाला. सर्वांचे आतोनात हाल केले गेले अपमानास्पद छळ केला तो भाग वेगळाच. तरीही संभाजी राजे शरण येत नव्हते. म्हणुन मोघलांनी मोगली पद्धत वापरण्याची तयारी केली. कैदेत असणाऱ्या वीरांच्या, युद्धात हरलेल्या योध्यांच्या, रणांगणावर धारातिर्थी पडलेल्या हुतात्म्यांच्या आया – बहिणींचे इज्जत खुले आम लुटणे आणि ही अक्कल हुषारी शोधुन काढली होती शहाबुद्दीन खानाने.

शहाबुद्दीन खानाच्या युक्ती नुसार संभाजी राजांच्या भगीनी आणि पत्नी यांची अब्रु लुटण्याची ती कल्पना मोघलांनी अंमलात आणण्याची जवळ जळ पुर्ण तयारीच केली होती. परंतु या बाबतची सर्वात अगोदर खबर लागली ती उदेपुरी बेगमला व तीच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ती तशीच शहाबुद्दीन खानाला शिव्या शाप देत औरंगजेबाकडे जाऊन थडकली व औरंगजेबाचाही चांगलाच उद्धार करुन बादशहाला ही चांगलेच फैलावर घेतले. "अन्याय अत्याचाराची काही मर्यादा असते की नाही" असा जाब साल तीने बादशाला केला.

नीच गिरीला काही सीमा असते की नाही असे अनेक प्रश्न विचारत उदेपुरीने आकाश पाताळ एक केले व बादशहाला अंर्तमुख करणारा प्रश्न विचारला "त्या शिवाजी बरोबर तुमचे अनेक वर्षे युद्ध झाले. परंतु शिवाजीने मोगलांच्या आया बहिणींच्या अब्रुशी खेळल्याचे एक तरी उदाहरण कोणाला सांगता येईल का ? शिवाजी राजांच्या या नीतिवान पणाचे आपणच अनेकवेळा खुल्या मनाने खाजगीत कबुली दिलीत. गेली ८ वर्षे आपण या

महाराष्ट्रात जनांन खाण्यासह रानावनात फिरत आहोत. अनेक ठिकाणी आपल्या फौजांना नुसत्या कपड्या निशी पळ काढावा लागला आहे. संभाजींचे नुसते नाव घेतल्याबरोबर तुमच्या स्वार शिपाईच काय तर जनावरेही जिवांच्या आकांताने पळून जातात.

परंतु त्या संभाजीने कधी कोणत्या मोगली स्त्रीयांच्या इज्जतीशी खेळल्याची तक्रार कोणी एखाद्या साध्या स्वार शिपायाने तरी आपणाकडे केली असेल तर सांगा आणि तुमचा तो भागुबाई शहाबुद्दीन दुर्गाबाई व राणुअक्काची इज्जत लुटण्याची योजना बनवीतो, अशा प्रकारची भाषा करतो. सांगा आलपनाह दुर्गाबाई व राणुअक्का म्हणजे काय मोघलांच्या जनांन खान्यातील सामान्य स्त्रिया होत का ? का आपल्या आया बहिणींना मोगलांच्या स्वाधीन करुन आपले राज्य वाचविणाऱ्या राजपूत व मराठे यांच्यात काही फरक आहे का नाही ? हा महाराष्ट्र आहे शिवप्रभुंचा महाराष्ट्र.

या मातीत अशा प्रकारचा सौदा होऊ शकत नाही. आयुष्यभर ज्या शिवाजीने महिलांचा मान सन्मान राखला त्याची मुलगी आणि सुन यांच्या इज्जतीला हात घातला तर जग काय म्हणेल ? संभाजी शरण येत नव्हता म्हणुन औरंग्याने पराभुत मानसिकतेने संभाजींच्या पत्निची व बहिणीची अब्रु लुटली ! त्या संभाजींनेही तुम्हाला भरपुर या दऱ्या खोऱ्यात भटकावले परंतु तुमच्या जनांन खाण्यावर मराठा लष्कराने किंवा संभाजीने हल्ला केला आहे का ?" अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती उदेपुरीने बादशहावर केली. तेव्हा उदेपुरीचा वाढता पारा व बाजुलाच असलेल्या झीनत उन्नीसाचे लालबुंद झालेले डोळे पाहुन बादशहाला आपल्या अतिशहाण्या शहाबुद्दीन खानच्या या कल्पनेच्या अश्वाला जागेवरच लगाम घालावा लागला.

शिवाजी महाराज व संभाजी राजांच्या चरित्र्याचा मोगली सैन्यावरच नव्हे तर जनान खान्यावरही असलेला हा प्रभाव इतिहासकारांना कधीच दिसला नाही किंवा त्यांना तो पहावयाचाच नव्हता. जेथे संभाजी राजांच्या चारित्र्याबद्दल मोगली स्त्रिया प्रशस्तीपत्र देतात त्याचवेळी महाराष्ट्रातील अल्पबुध्दी स्वार्थी लोकांनी मात्र संभाजी बदफैली दाखविण्याचा प्रयत्न केला आता उदेपुरी बेगम व जीनत उन्नीसा च्या प्रमाणपत्रापेक्षा मोठे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता उरत नाही.

संभाजी राजे बदफैली नव्हते. अगदी शिवाजी राजा प्राणाने चारित्र्यवान नितीवान होते. यासाठीच वेगळी पुस्तके लिहीली तरी कमी पडतील एवढे पुरावे आता हाती लागत असुन त्यातुन खरा संभाजी लवकरच बाहेर येत आहे. मराठ्यांचा स्वर्णांकीत असलेला परंतु बखरकरांच्या धुराड्यांनी झाकोळलेला इतिहास आता पुन्हा खऱ्या स्वरुपात लोकांसमोर आल्याशिवाय रहाणार नाही. हे मात्र पक्के.

\- - - - - - - - - - -

रायअप्पा महार

शिवाजी महाराजांच्या नावाबरोबर इतिहासात जी अनेक नावे अमर झाली ती आपणा बहुतेकांना माहीतच आहेत. पैकी तानाजी मालुसरे, बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी व इतर हे शिवप्रभूचे बालपणापासूनचे मित्र आणि शेवटपर्यंत राजासाठी स्वराज्यासाठी लढता लढता धारातीर्थी पडलेले नरवीर.

तसेच संभाजी महाराजांबरोबर ज्यांची नावे खरे तर इतिहासात अगदी आदरपूर्वक असायला हवीत असे अनेक मानकरी अजूनही उपेक्षितच आहेत. अंधारात आहेत. त्यामध्ये कोल्हापूरचे ज्योत्याजी केसरकर, कवी कलश, रायप्पा महार यांची नावे आवर्जून घ्यावी लागतील. संभाजीराजे रायगड जवळील सांदोसी (महाड तालुका) येथील जंगलात एकदा वाघाच्या शिकारीसाठी गेले असता वाघाच्या हालचाली टिपत असताना वाघानेच संभाजी राजांवर मागील अंगाने जेव्हा झेप घेऊन संभाजीराजांना फाडून खाण्याचा प्रयत्न करणार तितक्यात विजेच्या चपळाईने एक धाडसी तरुण आपल्या जीवाची पर्वा न करता मध्ये पडला व क्षणार्धात त्या तरुणाने त्याच्याकडे असलेल्या धारदार शस्त्राने त्या वाघाची खांडोळी करुन संभाजी राजांना वाचविले. तो तरुण होता रायप्पा महार. तेव्हा पासूनच रायप्पा संभाजीराजांचा जीवलग मित्र बनला. व राजांसोबत तो नेहमी सावलीप्रमाणे रायगडावर व इतरत्र सगळीकडे हमखास असायचा.

संभाजीराजांना कैद करुन बहादूरगडावर नेण्यात आल्या नंतर स्वराज्यातील फौजेने पुढे नक्की काय पवित्रा घ्यायचा या सल्ल्यासाठी महाराणी येसुबाईचा विशेष संदेश घेऊन चार लाख मोगली फौजेत घुसून खलिता पोहचविण्याचा धाडसी कार्यक्रम याच वीराने पार पाडला होता. बहादूर गडावर आपल्या धन्याची चाललेली विटंबना पाहवली नाही. तेव्हा पाणी पुरविणाऱ्या भिस्त्याच्या वेषात तो तेथपर्यंत पोहचला.


रायप्पाने त्या मिरणुकीतील एका सरदाराची तलवार हिसकावून आजूबाजूचे दोन चार शिपाई जागेवरच कापत आपल्या धन्याकडे धावला. संभाजीराजांना या अपमानास्पद वागणुकीतून कायमचे मुक्त करण्यासाठी. स्वतःच्या हाताने तो ही मोहीम

पार पाडणार होता. अगदी संभाजीराजांचीही अशीच इच्छा होती. परंतु तेवढ्यात शेकडो हशम रायप्पाच्या अंगावर धावले व त्यांनी संभाजीराजांना मुक्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्या रायप्पाचे जागेवरच तुकडे तुकडे केले.

महाराष्ट्रातील सगळे वीर वतनदार जेव्हा थंड होऊन आपल्या माजघरात बसले होते. तेव्हा रायप्पा महारासारखी सर्व सामान्य माणसे आपल्या राजासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देत होते. त्याचे कारणही तसेच होते म्हणा! शिवप्रभूचे स्वराज्य म्हणजे वतनदारी, अन्याय, अत्याचार यांना पायबंद घालणारी व सर्वसामान्य उपेक्षित शोषित माणसाला न्याय मिळवून देणारी अशी व्यवस्था होती व त्यामुळे अनेक शोषितांचा उद्धार झाला होता. अशीच सगळी सर्वसामान्य माणसे रयत राजांच्या पाठीशी होती.

परंतु वतनासाठी चटावलेले वतनदार मात्र स्वराज्य बुडावे यासाठी अगोदर पासूनच देव पाण्यात बुडवून बसलेले व स्वराज्य टिकावे म्हणून रयत नेहमीच आपल्या रक्ताचे शिंपण करण्यासाठी तयार असलेली. रायप्पाच्या बलिदानाने पुन्हा एकदा सिद्ध केले की संभाजीराजांवर सर्वसामान्य जनता अलोट प्रेम करीत होती. व त्याच्यासाठी बलिदान करण्याची तयारी होती.

- - - - - - - - - -



कमळजा

संभाजी राजे एका ठरलेल्या रणनिती नुसार दिलेर खानाला जाऊन मिळाले. अगदी यामध्ये शिवाजी महाराजांचे अशा प्रकारचे काही संकेत होते याचे पुरावेही आता इतिहासाला सापडु लागले आहेत. परंतु दैवाचे फासे उलटे पडले आणि कसेबसे शिताफीने दिलेर खानाच्या तावडीतुन संभाजी राजांना सही सलामत बाहेर पडता आले.

संभाजी राजांना दिलेर खानाच्या तावडीतुन बाहेर काढण्यासाठी स्वतः शिवाजी राजांनी प्रयत्न केलेला दिसतो. परंतु या सर्व गडबडीत संभाजी राजांच्या बरोबर असलेल्या त्यांच्या भगीणी राणु अक्का व पत्नी दुर्गाबाई बहादुर गडावरच अडकुन पडल्या होत्या. संभाजी राजे दिलेरखानाच्या तावडीतुन पसार झाले तेंव्हा दुर्गाबाई गरोदर होत्या.

पुढे त्यांना औरंगजेबाने बंदी म्हणुन अहमदनगरच्या किल्यात ठेवले होते. तेथेच त्यांना एक मुलगी झाली होती व दुर्गाबाईंनी तीचे नाव कमळजा असे ठेवले होते. जगातील सर्वात दुर्दैवी राजकुमारी म्हणुन जर आपण इतिहासाचा धांडोळा घेतला तर राजपुत्री कमळजा एवढी अभागी आपणास कोणी पहावयास मिळणार नाही.

संभाजी राजांना दोन मुली होत्या हे ही इतिहासाला माहित नसावे किंवा ते लोकांसमोर येत नाही याचे आश्चर्य वाटते. एक भवानी बाई व दूसरी कमळजा. भवानी बाई येसु राणीची मुलगी तर कमळजा दुर्गाबाईची मुलगी. कमळजा जन्मापासुन ८ वर्ष बंदी खाण्यातच होती. तिला आयुष्यात एकदाही रायगड पहावयास मिळाला नाही कि आपल्या पित्याचे तोंड पहावयास मिळाला नाही.

संभाजी राजे व सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी अनेकवेळा मोठ मोठ्या फौजा घेऊन नगरच्या किल्याला वेढा घातला परंतु उपयोग झाला नाही. मराठ्यांनी अनेकवेळा नगरच्या किल्याला दिलेली धडक पाहुन धोका वाढल्याची जाणिव होऊन औरंगजेबाने पुढे दुर्गाबाई राणुअक्का, व कमळजा यांना बहादुर गडावर आणुन ठेवले. बहादुर गड खुपच विस्तर्ण व बदलंड असल्यामुळे याठिकाणी कैदी सुरक्षित राहु शकतील याची औरंगजेबाला खात्री होती.

मराठ्यांनी बहादुर गडावरही अनेकदा असाच प्रयोग करुन पाहीला अगदी भुयार खोदुन तटबंदी पार करण्याचा प्रयत्न केला परंतु नियतीलाच कदापि ते मंजुर नसावे आणि त्यामुळे मराठ्यांना दुर्गाबाई राणु अक्का व कमळजा यांना सोडविण्यात अपयश आले. पुढे संभाजी राजांना मुकबर खानाने कैद केल्यावर बहादुर गडावर आणले व तेथेच संभाजी राजांची व कमळजाची पहिली भेट झाली. ८ वर्षान तर कमळजाला आपल्या पित्याला पहायला मिळाले तेही हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपति म्हणुन नाही तर मोगलांचे बंदीवान म्हणुन. आणि कमळजाची भेटही एक राजकुमारी म्हणुन नव्हती तर एका बंदीवानाची बंदीवान मुलगी म्हणुनच झाली. कमळजाची व संभाजी राजांची ही भेट पहिली आणि शेवटचीच ठरली कारण पुढे काही दिवसांनी संभाजी राजांना तुळापुराकडे हलविण्यात आले.

औरंगजेबाने दुर्गाबाई राणुअक्का व कमळजा यांची जाणिवपुर्वक भेट घडवुन आणली होती. जेणेकरुन किमान आपल्या आप्तांच्या हालअपेष्ठा पाहून संभाजी राजे द्रवीत होतील किंवा सगे सोयरे संभाजी राजांना पीघळायला सांगतील या कुटील हेतुनेच त्याने हे सर्व घडवुन आणले होते.

तरी हरकत नाही एकवेळ तरी त्याच्यामुळेच संभाजी राजांची बलीदानापुर्वी कमळजाची भेट होऊ शकली. या भेटीचे वर्णन करताना मन भरुन येते. लेखणी पुढे सरकत नाही आणि म्हणुन त्याबाबतीत जास्त लिहीता येत नाही. परंतु इतिहासाने मात्र कमळजाला थोरातांची कमळा असे नाव देवुन नाटके रचण्याची पोटभरु कलावंतांना लेखकांना, सोय करुन दिली असेच म्हणावेसे वाटते. थोरातांची कमळा हे बालंट नक्की काय आहे यासाठी वेगळया प्रकरणात त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न पुढे करणारच आहोत.

- - - - - - - - - -

सेवक राज्यमंडल

मशारनिलेचा बाप कृष्णाजी येसजी कंक यास हशमाची हजारी होती. त्यावरी फोंडियाच्या कोटास फिरंगियानी लगट केला तेव्हां रा. स्वामी राजापुरीहून स्वार होऊन फोंडियासि गेले, ते वख्ती खाडीवरू गनिमासी गांठी घालून जुंझ बहूतच केले. तेवख्ती जखमा लागोन जंरतुर जाला म्हणोन घरास जावया आज्ञा दिल्ही, घरास आलियावरी जखमा फुटोन मयत झाला. त्याचा लेक मांनिले त्याचें नांव कृष्णाजीच ठेविले आहे. तीन वरसाचा मूळ आहे. त्याच्या नावे सुभा चालवावा आणि लोकाच्या जमावास चाहुजी कंक आहे त्यास कारभारी करून ठेवावा. म्हणोन येसजी कंक याणि विनंती केली. त्यावरून स्वामि कृपाळू होऊन कृष्णाजी कंक स्वामिकार्यावरी पडला याकरिता याच्या लेकास सुभा दिल्हा आणि लोकाचा जमाव करावा, हमेशा चाकरीवरी आसिले पाहिजे, म्हणोन चाहुजी कंक शंभर मावलियांत होता तो माकुल पाहोन कारभार चालवावयासि दिल्हा. वेतन दोघांस मिलोन करार केले. सालिना होन पादशाही निवल ६००-कृष्णाजी, कृष्णाजी कंक याची सुबाची आसामी चालवावी. चाकरील्याख होये तोवरी घरबैठे देणे. सालिना होन २०० यासी चाकरीचा सिरिस्ता नाहीं. घरबैठी तैनाती घ्यावी. पोतदारी मात्र धरावी, नानपरवेशी सुभा-चाहुजी कंक यास वेतन सालिना होन पा। ४०० खासा जातीस २०० चाकर १४ यो - १५० भोई १०, ३० दिवटिये २ यो, २० अफ्तागिऱ्या व नेजदार नफर २ येणे प्रो तैनाती केली असे. यासी वटावाट व दंडक प्रमाणे वजा करून उरल वतन घेत जाणे. चाहुजी कंकास चाकरीची मोई केली आहे. त्याची हजरी पाहोन जमा सुा तील होन मुजरा होणे.

पते की बात

रायगडावर आक्रमण करण्यासाठी बादशहाने शहाबुद्दीन फिरोजजंग याला मोठी फौज देऊन पाठवीले होते परंतु फारसे यश मिळत नसल्याचे दिसत होते. त्यातच शहाबुद्दीन इकडे चकमक उडाली तिकडे जंग झाली फतेह झाली असे वरचेवर बादशहाला कळवत होता. बादशहाला याबाबत थोडा संशय आला. शहाबुद्दीन रायगड परिसरात हा धुमाकुळ घालीत असताना मराठे रायगडावर स्वस्थ कसे बसतील याची त्याला राहून राहून शंका येऊ लागली.

तेव्हा बातमीची शहानिशा करण्यासाठी बादशहाने अबु मोहम्मद नावाच्या मुसाफीर (भटकण्याची आवड असणाऱ्या) पोराला रायगड परिसराकडे पाठविले. तेव्हा चारच दिवसात रात्रंदिवस प्रवास करुन अबु मोहम्मद सर्व माहिती गोळा करुन बादशहा समोर हजर झाला व रायगडाकडे शाही फौजेला यश मिळाले नसल्याची बादशहाची शंका खरी असल्याचे सांगितले. तेव्हा बादशहा रागावीला व त्याने ताबडतोब शहाबुद्दीनला रायगडाच्या मोहीमेवरुन तबादला करण्याचा निर्णय जाहीर केला.

तेव्हा अबु मोहम्मदने बादशहाला सल्ला दिला की शहाबुद्दीनची रायगड जिंकण्याची लायकी नाही हे खरे असले तरी त्याला मोहिमेवरुन माघारी बोलाविले जाऊ नये. बादशहाने याचे कारण विचारल्यावर अबुने अत्यंत नम्रपणे दिलेले उत्तर असे होते कि 'शहाबुद्दीन साहेबांनी चाकण पुण्यापासून अनेक ब्राम्हणांना, मराठा जमीनदार, वतनदार अशा स्वार्थी लोकांना शाही तंबुत बोलाविण्याचा सपाटा लावला असल्याचे व त्यांना आमिष, वतन चिठ्ठ्या, वतनाची गाजरे दाखवुन ते बड्या बड्या मराठ्यांना आपल्या जाळ्यात ओढत आहेत. एकदा का हे फितुर जहांपनाहच्या हाताला लागले की पुढे मराठ्यांच्या किल्ल्यांना सुरुंग लावायला वेळ असा तो कितीसा लागणार?

शिवा-संभाच्या मुलखातले किल्ले आणि जलदुर्ग खुप पोलादी असतील पण इथली सगळीच माणसे बहाद्दुर आहेत असे नाही. काहीजण स्वार्थी, कचदील आणि थोड्याशा लोभासाठी आपला देश आपला स्वाभिमान विकायला तयार होणारे गद्दार

आहेतच की?

बादशहाला अबु मोहम्मद याचा हा सल्ला मनापासुन आवडला व त्याप्रमाणे त्याने पुढे संपूर्ण महाराष्ट्रातच हा खेळ रंगवीला. जातीवंत मराठे जे शस्त्राने वाकत नव्हते, बळापुढे झुकत नव्हते त्यांना अशा प्रकारे मोठ मोठी वचने, आश्वासने, वतनचिठ्ठ्या देण्याचा सपाटाच महाराष्ट्रभर लावला गेला. त्यातुनच महाराष्ट्रातील काही लोक औरंगजेबाच्या गळाला लागले व स्वराज्याच्या लढाईला उतरती कळा येऊ लागली. संभाजी राजांनी हे सर्व थांबविण्यासाठी सर्वोतोपरी काळजी घेतली. खंडोबल्लाळ, रामचंद्र पंत अमात्य, कवि कलश, यांच्या मदतीने मराठा सरदारांची जुन्या वतनदारांची यादी बनवीली. औरंगजेबाकडे जाऊ इच्छिणाऱ्या अनेक लोकांचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

परंतु तरीही काही बाडगे औरंगजेबाच्या आमिषाला बळी पडले. त्यातुनच संभाजी राजांच्या घातपाताचे बीज रोवले गेले आणि ही योजना राबविण्यात औरंगजेबाला दक्षिणेतील बाडग्यांच्या मदतीनेच यश मिळाले. ५ लाख सैन्याला जे जमले नाही ते दक्षिणेतील मुठभर बांडगुळांनी करुन दाखविले. स्वराज्याचा छत्रपती मोघलांना जीवंतपणे ताब्यात देऊन आपल्या मुर्दाडपणाचा आणि वतनाच्या तुकड्यासाठी काही लोक किती लाचार होऊ शकतात याचा पुरावाच दिला.

संभाजी राजांचे चार नामवंत सरदार औरंगजेबाच्या गळाला लागले. कानोजी शिर्के, जगदेव राय, अर्जोजी, अचलोजी. यापैकी कानोजी शिर्के तर गणोजी शिर्के या संभाजी राजांच्या मेहुण्याचा सख्खा चुलत भाऊ. बादशहाने या चार मुर्खांना देशद्रोहयांना लायकी नसताना व नमागताही फितुरीची बक्षिसी लिहून दिली. दोन दोन हजारांच्या मनसबी, खिलतीची वस्त्रे इत्यादी. शिवाय तुमच्या सारखे अन्य कोणी वाट चुकलेले सरदार असतील तर त्यानांही बोलवा सर्वांना पैगाम द्या. ही बादशाही तुमचीच आहे असा संदेश त्या चौघाकरवी बादशहाने आख्या महाराष्ट्रभर पसरवीला. मराठ्यांमध्ये फुट पाडली याच चार बांडगुळांनी आणि आणखी एक नेक माणुस फोडला ज्याला शिवाजी महाराजांनी रायगडावर मशिद बांधुन दिली, ज्याला हिंदवी स्वराज्याचे न्यायाधिश बनवीले तो मुल्ला काजी हैदर.

बादशहाने मुल्ला काजी हैदर यांना सर्वप्रथम प्रश्न केला दुश्मनाची सेवा करणे हीच मोठी ना इन्साफी असताना रायगडावर राहून आपण इतकी वर्षे कोणता इन्साफ करीत होता! काजी साहेबांनी प्रश्नाला दिलेले उत्तरही खुप मार्मिक आणि बोलके होते.

"हुजूर शिवाजी सारखा नेक राजा आम्हाला भेटला त्याच्या सदरेवरुन मी हिंदु आणि मुसलमान दोघांचेही मुकदमे चालवीत होतो." त्यावर बादशहाने दुसरा प्रश्न


विचारला शिवाने - संभाने किती मशिदी पाडल्या? काजी साहेबांचे उत्तर होते एकही नाही! शिवाय शिवाजीने माझ्यासाठी राजाच्या खर्चाने मशिद बांधली! मी येथे येईपर्यंत ती शाबुत होती.

मराठयांच्या नेकीचे गोडवे गाता तर मग आता इकडे कशाला आलात? असे रागावुन बादशहाने विचारणा केली. तेव्हा काजींनी दिलेले उत्तर महाराष्ट्राच्या इतिहासाला लाजवील असेच परंतु सत्य असेच होते.''बादशहा सलामत मला अलिकडे तिथल्या सर कारकुनांची आणि कारभाऱ्यांची खुप भिती वाटु लागली होती. जे लोक आपल्या अन्नदात्या धन्याला दस्तुर खुद्द आपल्या राजाला (छत्रपती संभाजी) जीवे मारण्याची दोन दोन वेळा कोशिश करतात तिथे मी पडलो एक "यवन"!

काजी साहेबांच्या या उत्तरावरुन दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक मराठ्यांच्या राज्यात मुसलमानांचाही योग्य तो सन्मान शिवाजी राजांप्रमाणे संभाजी राजांनीही चालु ठेवला होता. आणि फितुर सरकारकुनांनी व कारभाऱ्यांनी संभाजी राजांना दोन वेळा ठार मारण्याचा कट रचला होता हे काजी साहेबांना माहित होते. त्यामुळेच आपणही संभाजी राजांच्या एकनिष्ठतेमुळे कारभाऱ्यांच्या नजरेत भरल्याने आपलेही बरे वाईट हे कारभारी मंडळी करु शकतात ही भिती खरी होती.

पुढे तसेच घडलेही. कारभाऱ्यांच्या अशा अनेक प्रयोगांना संभाजी राजे सामोरे गेलेच परंतु त्यांचा समाचारही घेतला. काहींना हत्तींच्या पायी दिले तर काहींना चांगलीच अद्दल घडवीली परंतु दुर्दैवाने कारभाऱ्यांच्या कटकारस्थानालाही यश आले विश्वास घाताने आत्मघात केला तो भाग दुर्भाग्याचा होय.

- - - - - - - - - -



अबू मोहम्मद व काजी साहेब

औरंगजेबाला सलग आठ वर्षे या महाराष्ट्रा मध्ये अपयशाशिवाय पदरात काहीही पडत नव्हते. अनेकवेळा बादशहा निराश होऊन दिल्लीच्या दिशेने माघारी निघाला. परंतु अशा प्रसंगी काही लोकांनी त्याला आशेचा किरण दाखविला आणि त्यामुळेच तो या ठिकाणी मरेपर्यंत थांबला. औरंगजेबाला संभाजी राजांना कैद करण्यात यश कशामुळे मिळाले त्यामागचे शिलेदार कोण होते? कशा प्रकारे त्यांनी बादशहाला अपयशाच्या खाईतुन विजयाच्या दिशेने नेले हे समजण्यासाठी या दोन बहाद्दरांची ओळख होणे आवश्यक होय. त्यातील एक होता अबु मोहम्मद व दुसरे होते मुल्ला काजी हैदर.

औरंगजेबाच्या फौजेत एक फौजदार होता. त्याचे नाव बलोच खान. याचा तेवीस वर्षाचा मुलगा म्हणजे हा अबु मोहम्मद. याला पहाड नद्यांची सफर करायची लहानपणापासुन आवड होती. त्यामुळे तो उत्तरेतुन महाराष्ट्रातील पर्वतरांगा बघण्याच्या दृष्टीने सहावर्षे महाराष्ट्राच्या दऱ्या खोऱ्यात फकीरांच्या व गोसाव्यांच्या संगतीने फिरला. इथल्या सर्व डोंगर रांगा फिरुन त्याने संपूर्ण महाराष्ट्राचा अचुक नकाशा बनवीला होता.

त्यामुळे महाराष्ट्रात एकुण किती वाटा, किती घाट याची अचुक मांडणी त्याने केली होती. सह्याद्रीच्या खोऱ्यात निबीड घाट माथे पार करण्यासाठी एकुण तीनशे साठ छोटे रस्ते असल्याचे व त्यापैकी पासष्ट मार्गाने हत्ती ऊंट, असे प्राणी घेऊन प्रवास करता येत असल्याचे व उरलेल्या रानवाटा असल्याचे व त्या खुपच अरुंद व अत्यंत खतरनाक असल्याचे नमुद केले होते. अबु मोहम्मदच्या गोष्टीवरुन आपल्याला आठवेल कि शिवाजी महाराजांनी एकुण तिनशे साठ किल्लेच का बांधले असावेत. राजांचा दुरदर्शीपणा किती मोठा होता हेही कळते प्रत्येक रसत्यावर एक किल्ला जसे सध्या प्रत्येक रस्त्याला कोठे ना कोठे सिग्नल व चेक पोस्ट असतात त्याप्रमाणे.

अबु मोहम्मदने संपूर्ण महाराष्ट्राचा प्रवास करुन एक छानपैकी आणि अचुक असा नकाशाच बनवीला होता. तो नकाशाच अबु मोहम्मदाने बादशहाला पेश केला. अबु

मोहम्मदने दिलेल्या नकाशा प्रमाणे औरंगजेबाने पुढची पावले टाकली व सरदारांना सुचना केली. "याच दिशेने अधिक कोशिश करा. सह्याद्रीच्या उंच कडे कपारीत रहाणारे त्या त्या इलाख्याची माहिती असणारे चांगले वाटाडे शोधा पर्वत झपाटयाने चढु शकणाऱ्या कडव्या जंगली लोकांची फौजेत भरती करा त्यांना मुंहमांगा मुआवजा द्या."

संभाजी राजांना अत्यंत सावध असातानाही संगमेश्वरात पकडण्याची धाडसी घटना घडली त्याला या गोष्टीचीच पार्श्वभुमी होती. अन्यथा मळेघाटच्या निबीड अरण्यातुन मुकबर खानाला वाट मिळणे स्वप्नातही शक्य नव्हते आणि मुकबर खान अचानकपणे अनपेक्षितरित्या संगमेश्वरात येवुन धडकनेही शक्य नव्हते. हे सर्व या अबु मोहम्मदच्या अक्कल हुशारीमुळे शहाण्या झालेल्या मोघलांना करता आले.

दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे मुल्ला काज़ी हैदर. शिवाजी राजांच्या काळात रायगडावर न्यायधिशाचे काम करणारे काजी कारभाऱ्यांच्या कट कारस्थनाची भिती वाटुन औरंगजेबाला जाऊन मिळाले. अर्थात जे लोक आपल्या अन्नदात्या राजाला मारण्याचा पुन्हा पुन्हा कट रचतात जेथे राजाचेही जिवीत धोक्यात येते तेथे बिचाऱ्या मुसलमान असणाऱ्या काजींना आपल्या जिवाची भिती वाटणे स्वाभाविकच होते.

औरंगजेबाने जेव्हा त्याला प्रश्न विचारला की सांगा आमची पाच पाच लाखाची फौज आणि साडे तीन लाख घोडी दख्खनच्या छाताडावर नाचत असताना आमच्या एवढया मोठया फौजेला सर्वत्र दौड करुनही सह्याद्रीचा एकही किल्ला आमच्या ताब्यात का येत नाही किंवा संभाजी का सापडत नाही? याच्या पाठीमागची खरी ताकद कोणती? याचे रहस्य नक्की काय? तेव्हा काजींनी दिलेले उत्तर असे होते.

"संभाजी ज्या बिळात रहातो त्या बिळाला सह्याद्री पर्वत म्हणतात व तिथले दगड इतके कठीण आहेत कि त्यावर धडक मारल्याशिवाय तिथल्या दगड धोंड्याची जात कळणार नाही. सह्याद्री पर्वत पाषाणांचा नव्हे तर पोलादाचा आहे. शिवाय मराठ्यांची आता विजापुरच्या आदिलशाहीशी व हैदराबादच्या कुतूबशाहीशी संबंध चांगले आहेत. पुर्वी त्यांच्यात खुप तंटे बखेडे झाले आहेत परंतु आता दख्खन मधील हे तिघेही (मराठे, आदिलशाही, कुतुबशाही) दिलाने व दिमागाने एक झाले आहेत. या तिघांची जेंव्हा पोलादी बेडी तुटेल किंवा किमान ठिसुळ होईल, दुबळी होईल तेव्हा आणि तेव्हाच तुमची सह्याद्रीवर विजय मिळवीण्याची मुराद पुरी होईल अन्यथा नाही."

काजी साहेबांच्या या सल्यामुळेच औरंगजेबाने सह्याद्रीचा विचार सोडुन आपला मोर्चा विजापुराकडे व गोवळकोंडयाकडे वळविला व त्यांना पराभूत करुन दख्खनची फळी फोडली. विजापुर व गोवळकोंडा औरंगजेबाच्या ताब्यात गेल्यामुळे स्वराज्याला

ऐनवेळी मिळणारी रसद थांबली. शिवाय दुष्काळ, आर्थिक चणचण व विजापुर अणि गोवळकोंड्याचे मुकबर खानासारखे सर्जा खान सारखे काही नामचंद जातीवंत दख्खनी सरदार औरंग्याच्या गळाला लागले व त्यांनीच स्वराज्याचा घात केला. लोहा लोहे को काटता है या म्हणी प्रमाणे दख्खनच्याच लोकांनी दख्खनचे हिंदवी स्वराज्य बुडवीले. मग त्यात काही विजापुरचे, तर काही महाराष्ट्रातील परंतु सर्व या मातीतलेच होते.

– – – – – – – – – – –

शत्रूचा शत्रू तो मित्र

छत्रपती संभाजी राजे गोव्याच्या मोहिमेवर निघताना अनेक गोष्टींचे अडाखे मनात बांधुन होते. गोवेकर आणि मोघल यांची हातमिळवणी होण्याअगोदरच गोवेकरांचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता होती. परंतु त्याचवेळी इतर शत्रुचांही विचार करणे आवश्यक होते. संभाजी राजांनी इंग्रजांकडून मुंबई विकत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु जंजिऱ्याचे सिध्दी आडवे आले व सौदा फसला.

हिंदवी स्वराज्य वाढू द्यायचे नाही यावर सर्व परके एकमताने काम करीत होते. पोर्तुगीज, इंग्रज, सिद्धी असे तीन सागरी शत्रु स्वराज्यावर एका वेळी धावुन येत होते. मोघलांची दहशत या तीन सत्तांना नसायची. परंतु मराठ्यांना मात्र हे सर्वजण दचकुन असायचे म्हणुन या तीनही सत्ता जरी एकमेकांच्या स्पर्धक होत्या तरीपण मराठ्यांचे राज्य वाढू द्यायचे नाही या मुद्यावर प्रसंगी एकमेकाला मदत करीत होत्या. वेळ पडल्यास मोघलांनाही मदत करीत होते आणि मोघलांचीही मदत घेत होते.

संभाजी राजे हे सर्व ओळखुन होते म्हणुनच त्यांनी औरंगजेब पुर्ण ताकदीने महाराष्ट्रात उतरेपर्यंत जंजिऱ्यावर हमला चढवुन सिद्धींना दहशत बसवीली. पुढे गोवेकर मोघलांच्या इशाऱ्याने वागु लागले व मराठयांना धोका निर्माण करु लागले, त्यावेळी गोवेकर टोपीकरांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. परंतु त्याचवेळी इंग्रजांच्या विरोधात न जाता. इंग्रजांना बरोबर घेण्याची कुटनिती खेळणे आवश्यक होते. त्याप्रमाणे संभाजी राजांनी इंग्रजांसाठी त्या प्रकारची व्युव्हरचना केली.

यापुर्वी इंग्रजांनी संभाजी राजांशी अनेकदा तहाची बोलणी करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु राजांनी त्यांना भीक घातली नव्हती. आता मात्र मुत्सदीपणाचा भाग म्हणुन राजांनी इंग्रजांशी तह केला व अनेक दिवसांची प्रलंबीत असलेली मागणी तहाद्वारे इंग्रजांच्या पदरात टाकली. इंग्रजांना जिंजीजवळ व्यापाराचा परवाना हवा होता. तो विनाविलंब ताबडतोब दिला गेला.

एकाच वेळी सर्व टोपीकर अंगावर घेणे शहाणपणाचे ठरणार नाही ही या मागची भूमिका. त्याच्या बदल्यात इंग्रजांकड्डुन अव्वल दर्जाचा दारुगोळा, बंदुका, तोफगोळे,

मराठ्यांना मिळण्याचा या बदल्यात करार करण्यात आला.

पोर्तुगीजांचा चौलचा गव्हर्नर फ्रान्सीस द कोश्त याने तातडीचा खलिता पाठवुन गोवेकरांना कळविले की इंग्रज संभाजीला उघड उघड मदत करु लागले आहेत व आम्हांस दाम दुपटीनेही चिमुटभर दारु मिळत नाही. त्याचवेळी इंग्रज औरंगजेबाला जाऊन मिळू नयेत म्हणुन राजांनी दर्यासारंग, मायनाक भंडारी यांना खांदेरी, उंदेरीच्या आसपास खुप मोठे आरमार देवुन भरपुर जहाजे, बोटी गोळा करुन पेरल्या. शिवाय ठाण्याच्या खाडीतही फौजा पेरल्या.

शीव बंदर ताब्यात घेऊन ठेवले व इंग्रजावर वाढता दबाव ठेवला. मोहीम फत्ते करुन गोव्यावरुन स्वराज्यात दाखल होई पर्यंत इंग्रजांनी कोणतीही आगळीक करु नये म्हणुन अशा प्रकारे एका बाजुला व्यापाराचा परवाना देवुन सलोखा ठेवला तर दुसऱ्या बाजुला लष्करी दबाव.

स्वराज्यावर हल्ला होवु नये किंवा एक शत्रु दुसऱ्या बलाढ्य शत्रुला जाऊन मिळू नये यासाठी रचलेली ही योजना चांगलीच यशस्वी झालेली होती. शंभु राजे गोव्याची मोहीम संपवुन परत येईपर्यंत सिद्धी, इंग्रज किंबहुना मोघलांनीही स्वराज्याच्या बाबतीत कोठेही आगळीकपणा केल्याचे दिसत नाही. यावरुनच संभाजी राजांनी किती दुरदृष्टीने वेग वेगळ्या शत्रुंना एकत्र न येवु देण्याचे व वेळ प्रसंगी त्यांनाच एकमेकांच्या विरोधात उभे करण्याचे किती मुत्सदेशीर प्रयत्न केले असतील हे लक्षात येते.

औरंगजेबाच्या त्या काळात संभाजी राजांची आदिलशाही व कुतुबशाहीशी क्वचित एखादी चकमक उडाली. एरवी स्वराज्याच्या विरोधात असणाऱ्या कुतुबशाही व आदिलशाहीने मोघलांच्या विरुध्दच्या लढाईत शेवटपर्यंत साथ दिली हे ही आश्चर्य नसुन ते संभाजी राजांच्या मुत्सदी धोरणाचाच एक भाग होता आणि म्हणुनच सलग आठ वर्षे मोघल, पोर्तुगीज, सिद्धी, इंग्रज यांच्या विरुध्द संभाजी राजांना यश्स्वीपणे लढा देता आला व स्वराज्य टिकवता आले.

- - - - - - - - - - -

व्हाइसरायच्या हातावर तुरी

औरंगजेब पोर्तुगीजांना संभाजी राजांविरुध्द उठाव करण्यासाठी चिथावणी देत होता. परंतु पोर्तुगीज कमालीचे घाबरले होते. त्यामुळे उघड उघड विरोध करणे शक्य नव्हते म्हणुन युक्तीचा उपयोग करण्याचे ठरले.

संभाजी राजे अनेक वेळा कुडाळ व डिचोलीकडे बारुदाचे कारखाने तपासणीसाठी येत असत. डिचोलीच्या वाड्यात मुक्कामही करत असत. त्यामुळे अशी एखादी संधी मिळण्याची फक्त वाट पाहण्याशिवाय पोर्तुगीजांना पर्याय नव्हता. त्यानुसार त्यांनी संभाजी राजांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवली.

काही दिवसानंतर पोर्तुगीजांना पक्की खबर मिळाली आणि आनंदाची भरती आली. संभाजी राजे गोकुळाष्टमीला नार्वेच्या घाटावर पंचगंगेत स्नान करण्यासाठी येणार होते. दिवस होता १२ ऑगस्ट १६८३. व्हाइसरायने राजाला पकडण्यासाठी मोठी व्यवस्था केली. पंचगंगेच्या दोन्ही काठावर पोर्तुगीजांच्या सैन्याचे अनेक गट दबा धरुन तयारीत होते.

संभाजी राजे तीर्थाच्या ठिकाणी वा देवपूजेला जातांना खुपच कमी सैन्य सोबत ठेवत याची पोर्तुगीजांनी चांगली माहीती काढली होती. त्यामुळे सात आठशे सैनिकांची शिबंदी पुरेशी असे व्हाइसरायला वाटले.

आता दुसऱ्या दिवसाची वाट पाहणे आवश्यक होते. स्वतः व्हाइसराय ने एक फेरफटका मारुन सर्व व्यवस्था चोख असल्याची खात्री करुन घेतली. त्याने आपली शाही नावही बाजूला दुरवर नेवून लपवून ठेवली जेणेकरुन अजिबात संशय येणार नाही. व्हाइसरायने एक मछवाऱ्याची साधी बोट निवडली व त्यात आपल्या आठ शस्त्रधारी सैनिकासह दबा धरुन बसला. त्याच बोटी मध्ये एक पिर बाबाही प्रवास करत होते. त्याच्या सोबत त्यांचे चार तरुण शिष्य होते.

पीर बाबा तोंडाने अल्ला अल्ला म्हणत हातातला मोराच्या पिसाचा जुडगा शिपायांच्या पाठीत मारत होते. पोर्तुगीजांकडे असलेले ते शिपाई हिंदू होते म्हणून मोठ्या भक्ती भावाने पीर बाबांकडे पाहत होते. बाबांच्या पाया पडत होते. खाली थोड्या

अंतरावर नाव थांबली. नार्वेच्या घाटावर तो पीर बाबा आणि त्याचे शिष्य स्नानासाठी खाली उतरले.

नावेतून उतरतांना त्या फकीर बाबाने व्हाइसरायचा हात मोठ्या प्रेमाने हातात घेऊन एक तांब्याची अंगठी त्याच्या बोटात अडकविली. नाव थोडी पुढे गेल्यावर व्हाइसरायला बाबांच्या वेशांतरावरुन थोडीशी शंका आली. तसे त्याने आपल्या सैनिकांना तीर्थकरु बरोबरच बैरागी, गोसावी या सर्वांची झडती घेण्याचे आदेश दिले. खूप कसून तपासणी करण्यात आली. झडती सत्र अखंडपणे चालू राहिली.

संपूर्ण दिवस झडती सत्र सुरु होते. संध्याकाळ झाली तरी व्हाइसरायच्या हाती काही लागले नव्हते. संभाजी राजांना जेर बंद करण्याची योजना फसली होती. अष्टमी नंतर चार दिवसांनी व्हाइसरायने त्याच्या कैदेत असलेला मराठी वकिल ऐसाजी गंभीरराव यांना सल्ला घेण्यासाठी बोलावून घेतले.

चर्चा करत असताना ऐसाजीचे लक्ष पुन्हा पुन्हा व्हाइसरायच्या हातातील अंगठी कडे जात होते कारण ती अंगठी विशिष्ठ प्रकारची होती आणि त्यामुळे ऐसाजीला ती ओळखता येत होती. ऐसाजीने ती अंगठी व्हासराय कडून मागून घेतली व नीट पारखली. अंगठीची ओळख पटली होती.

व्हाइसरायने ऐसाजीला त्यावर काय खुण आहे असे विचारले तेव्हा ऐसाजीने ते व्हाइसरायचा सचिव लुईस याला वाचण्यासाठी सांगितले. त्या अंगठीवर लिहिलेले होते संभाजी! नाव ऐकल्याबरोबर व्हाइसरायला चार दिवसा पुर्वीचा तो फकीर त्याच्या सोबत असलेले चार तरुण शिष्य सर्वकाही एका क्षणात आठवले व आपण फसलो असल्याची त्याला पुरती जाणीव झाली.

अशा प्रकारे राजांना पकडण्यासाठी मोठ्या तयारीने आलेल्या व औरंगजेबाकडून बक्षिस मिळविण्याच्या प्रयत्नात असलेल्या व्हाइसरायच्या हातावर संभाजी राजांनी तुरी दिली होती.

\- - - - - - - - - -

श्री

राजश्री धर्मा नागनाथ सरसुबेदार व कारकून सुभा प्रां फोंडे गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य-स्नेहपूर्वक कविकलश आसीर्वाद सुहूरसन आरबा समानेन व आलफ हज़रत पीर अबदुलाखान कोट फोंडा बहुत जागृत स्थल *फिरंगीयानी गनीमाई करून कोटास वेढा घातला कोट बहुत जेर केळा तेव्हां कोट मजकूरच्या हवालदार व सरनोंबत व शचनिर्वास व नाईकवाडी लोकीं प्रार्थना केली की गनीमाचा पराभव करणे राजश्री छत्रपती स्वामी विनंती करून उर्जा चाले सारखी पोख्ती सरंजाम करून घेऊन राजश्री स्वामींची फतेबाजी होऊ देणे म्हणौनु नीयत केला त्यावरी राजश्री छत्रपती स्वामीचे स्वारी कोट मजकुरी होउनु फिरंगी गनीम मारून काहाडले राजश्री स्वामीस जये आले फते जाहाली ऐसी पिरांची करामती आहे म्हणौनु कितेक तुम्ही व कोटकरी याहीं राजश्री छत्रपती स्वामीसी विनंती केली कीं पिराचा उरूस उर्जा व पिराचा मुजावर सेवक आहे त्यास वेतन नवे ऐसे मख्ता करून साल-व-साल देउनु पीर संतुष्ट होये ते केले पाहिजे म्हणौनु विनंती केली त्यावरून राजश्री छत्रपती स्वामीने दरसालद्यावयाचे नियेत केला तेणे प्रमाणे धर्मादाये देविला असे दर सालिना नव होन ५० पनास होन रास दिल हजरत पीर ऊद फूल दिवा बती देखील मुा मुजावर नफर २ ये सालिना नव उरूस थेकून सालिना नव होन २६ होन, होन २४ याची सुजाहून मनास आणून मोईन करून देणे तेणे प्रमाणे खर्च करतील

येणे प्रमाणे सुभे मजकुरी सदरहु ऐवज देविला अते साल दरसाल देत जाणे सनदेची तालीक लिहून घेउनु असल सनद पिराच्या मुजावरापासी परतून देणे. सदरहू प्रमाणे पिराच्या नावे खर्च लिहिणे मजुरा आसे छ २४ मोहरम पा हुजुर

बार सुद

सुरु बाद



श्री

श्री शंभुनर
पति हर्षनिधान मोरे
श्वसुत नीलकंठ
मुख्य प्रधान

पत्रवतन कृष्णाजी कंक पदाती नायक सेवक राज्यमंडल शके १२ क्रोधन नाम संवत्सरे आषाढ वद्य द्वितीया भोमवासर मानिलेचा बाप कृष्णाजी बिन येसजी कंक यास हशमाची हजारी होती त्यावरी फोंडि याच्या कोटास फिरंगियानी लगट केला तेव्हा राजश्री स्वामि राजापुरीहून स्वार होऊन फोंडियासी(गे)ले ते वखती खाडीवरी गनिमासी गांठी घालून झुंझ बहुतच केले ते वखती जखमा लागोन जरतुर जाला म्हणोन घरास जावया आज्ञा दिल्ही घरास आलियावरी जखमा फुटोन मयत जाला त्याचा लेक मानिल त्याचें नाव कृष्णाजीच ठेविले आहे तीन वरसाचा मूळ आहे त्याच्या नावे सुभा चालवावा आणि लोकीच्या जमावास चाहुजी कंक आहे त्यास कारभारी करून ठेवावा म्हणोन येसजी कंक याणि विनंती केली त्यावरून स्वामि कृपालु होऊन कृष्णाजी कंक स्वामिकार्यावरी पडला याकरितां याच्या लेकास सुभा दिल्हा आणि लोकाचा जमाव/ करावा हमेशा चाकरीवरी आसिले पाहिजे म्हणोन चाहुजी कंक शंभर मापालयांत होता तो माकुल पाहोन कारभार चालवावयासि दिल्हा येतन दोघांस मिलोन करार केले सालिना होन पादशाही निवल ——— बेरीज ६०० ६

येकूण सासे होन पा। रास

कृष्णाजी कंक याच्या पुत्राचे नाव कृष्णाजीच ठेवीले आहे त्याची सुभाची आसामी चालवावी चाकरील्यास होये तोवरी घरबैठे देणे सालाना होन पादशाही बेरिज यासि चाकराचा सिरिस्ता नाही घरबैठी तैनाती घ्यावी पोतदारी मात्र धरावी नाना परवेशी सुभा

चाहुजी कंक सुभाचा कारभार चालवावया हुजरून दिल्हा त्यास वेतन केले सालीना देखील पालखी होन पादशाही

४०० ६ बि॥	चाकर १४ बो
खासा जा	१५० भोई १० बो
तीस होन	३० दिवटीये २ बो
२०० ६	२० अफ्तागिन्या व
	नबदारता २ बो
	———
	२००

येणेप्रमाणे तैनाती केली असे यांसे बजावाट व कंडक प्रमाणे वजा करून उरले वेतन घेत जाणे चाहुजी कंकास चाकराची मोईन केली आहे त्याची हजरी पाहोन जमा सु।तील होन मुजरा होणे कृष्णाजी कंकास दोनीसे होन सालिना केली असेत त्यास चाकराची रवेस नाही खासा जातीस घरबसले द्यावे पोतदारी रवेसी प्रमाणे धरीत जावी लेखनालंकार

मर्या । देयंविश । शते ।
तेरीख ३०
रबिल सु॥ सीत समान+

सुरुसुद बार

युध्द रिती आणि निती

पोर्तुगिज आणि मुगल यांची युती होणे स्वराज्यास घातक होते. औरंगजेबाने पोर्तुगिजांना आपल्या बाजुने ओढण्यास व मराठी राज्याविरुध्द युध्द करण्यास सारखे चेतवीत ठेवण्याची भूमिका घेतली होती. त्यामुळे पोर्तुगिजांना दहशत बसविणे आवश्यक होते. परंतु त्यामध्ये एक अडचण होती ती म्हणजे पोर्तुगीजांकडे असणाऱ्या अव्वल तोफा, त्यांच्याकडे असलेल्या कवायती फौजा व दर्जेदार बारुद आणि वेगवान नौका.

त्यामुळे गोव्यात एकदम घुसून हल्लाबोल करणे थोडेचे धारीष्ट्याचे ठरले असते. त्यामुळे या ठिकाणी काहीतरी युक्ती वापरुन पोर्तुगीजांनाच गोव्याच्या बाहेर काढुन ठेवणे आवश्यक होते. त्यानुसार राजांनी काही दिवस अगोदरपासुन काही गुप्तहेर गोव्यात पाठवीले व त्यांनी सांगितल्याप्रमाणे गोव्यात खबर पसरवायाला सुरुवात केली. फोंड्याच्या किल्ल्यावर चार पाच कोटींचा खजिना संभाजी राजांनी आणुन ठेवला आहे, शिवाय बारुदाचा मोठा साठाही फोंडा या किल्ल्यावर जमा केला आहे आणि पाठीमागुन फौजाही येणार आहेत. खबर व्यवस्थित पसरवीली गेली होती.

शिवाय व्हाईसराय ने आपल्या विश्वासू हेरामार्फत खबरीची खातरजमा करुन घेतली होती. विश्वासु हेरांनीही फोंडयाकडे अशा प्रकारच्या हालचाली होत असल्याची खबर दिली. व्हाईसरायने आपले काही विश्वासु गुप्तचर फोंड्याच्या किल्याकडे पाठविले व किल्ल्यावर किती शिबंदी आहे याची माहिती घेतली. मराठा शिबंदी अगदी तुटपुंजी असल्याची खात्रीलायक माहिती त्याला दिली गेली. ४ ते ५ कोटीचा खजिना, दर्जेदार बारुद शिवाय शिबंदी खुप कमी त्यामुळे आपणास संधी चालुन आल्याचे व्हाईसरायला मनापासुन वाटत होते. शिवाय नार्वेच्या बंदरात पदरी पडलेले अपयशही त्याला पुन्हा पुन्हा डिवचत होते. त्यामुळे कसेही करुन फोंडा किल्ला व त्यावरील खजिना आपण ताब्यात घेऊ असे त्यास राहुन राहुन वाटु लागले.

त्यानुसार त्याने तीन हजार पायदळ जमा केले. त्यात साष्टी महालातील दोन हजार कानडींचाही समावेश होता. ऑक्टोबर १६८३ मध्ये पोर्तुगिजांच्या फौजा पणजीबाहेर पडल्या. त्यांच्यासोबत ३ लांब पल्ल्यांच्या प्रचंड तोफा होत्या. अत्याधुनिक वेगवान बंदुका होत्या तलवारीही होत्या. पणजीतुन बाहेर पडल्यावर फोंडयाच्या वाटेवर

दुर्भाट बंदर लागले. त्या ठिकाणी मराठ्यांचा तळ असायचा व त्या ठिकाणचा सुभेदार दुलबा नाईक आपल्याला आडवा येइल व तेथेच लढाईला सुरुवात होईल असे व्हाइसरायला वाटत होते.

परंतु पोर्तुगिजांची फौज दुर्भाट बंदरावर येताच दुलबा व्हाइयरासयलाच सामिल झाला. हे सगळे संभाजी राजांच्या योजनेप्रमाणे घडत होते. कोणताही अडथळा न आल्याने पोर्तुगिजांच्या फौजा त्याच रात्री फोंडा किल्याच्या पायथ्याशी पोहोचल्या. त्याच रात्री अचानक पणे पाऊस पडला.

परंतु सकाळपर्यंत वाट पहाणे पोर्तुगिजांना मान्य नव्हते. ते मागे हटत नव्हते मध्यरात्रीच त्यांनी तोफा किल्ल्यांसमोरच्या उंच टेकाडावर चढविल्या व मोक्याच्या जागेवरुन अचुक मारा होईल अशा रितीने रात्रीच तोफांचा भडीमार सुरु केला. थोडयाच वेळात मराठयांनीही बुरुजावरुन याला प्रतिउत्तर दिले. रात्रभर दिवसभर गोळा गोळी चालली. दुसरी रात्र आली तरीही तडाखा चालुच होता. त्यामुळे बुरुजावरील तोफा निकामी झाल्या होत्या. शिवाय एका बुरुजाचा वरचा भाग पावसाने भारला त्यामुळे भींत खचली व एक प्रचंड तोफ बुरुजावरुन थेट खाली पडली.

किल्यावरील एक चौकी वजा गढीही कोसळली. तरीही मराठे काही मागे हटायला तयार नव्हते. किल्ला काही केल्या पडत नव्हता. तीन दिवस सतत गोळागोळी चालुच होती. शेवटी पोर्तुगिजांनी टेकडीवरच्या तोफा खाली उतरवुन किल्याच्या एकदम जवळून बुरुजावर डागल्या. बुरुजाला भगदाडे पडली तसा पोर्तुगिजांनी मारा बंद केला. आता आत घुसण्याची ती वेळ होती. आतुन मराठ्यांच्या काही हालचाली दिसत नव्हत्या. कसलेही प्रतिउत्तर येत नव्हते. पोर्तुगिज खुप खुष झाले व त्यांनी तटाला लागुन असलेला मोठा खंदक बुजवीला व पुढे सरकले. तरीही आतुन काही प्रतिसाद येत नव्हता.

त्यामुळे फिरंगी आणखीन पुढे सरकले. तटाला शिड्या लावुन वर चढले. इतक्यात हातात दुधारी तलवार नाचवत येसाजी कंक आपल्या निवडक साथिदारांसह पुढे धावले व एक एक फिरंगी कापु लागले. दुसरीकडे कृष्णाजी कंक पोर्तुगीजांनी तटाला लावलेल्या शिड्या मागे फेकत होते व फिरंगी खंदकात कोसळत होते. तटावरुन एकुण सहाशे मराठे लढत होते. तर बाहेरच्या झाडीतुन दोनशे मराठे गनीमी काव्याने पोर्तुगीजांना चांगलेच हैराण करत होते. पाच दिवस तोफांची सरबत्ती सुरुच राहीली.

गडाला तीन भगदाडे पडली परंतु मराठे काही फिरंग्यांना आत येऊ देत नव्हते. पोर्तुगिजांना सामिल झालेल्या दुलभानाईक ने व्हाइसरायला माघार घेण्याचा सल्ला दिला. परंतु खजिन्याच्या मोहाने वेडा झालेला व्हाइयसराय ऐकायला तयार नव्हता. एके

दिवशी मात्र सात आठ फिरंगी मोठ्या हिंमतीने सपासप तलवारी चालवत भगदाडात घुसले त्यांच्या समोर असलेले मराठा पथक दुबळे पडले. ते पलिकडच्या तटावरच्या कृष्णाजी कंकाने पाहीले. बेहोशीत त्याने तटावरुन उडी ठोकुन धाव घेतली. तो त्या गर्दीत घुसला व गरगर तलवार चालवु लागला.

फिरंगी संख्येने खुपच जास्त जमा झाले होते. कृष्णाजी एकटे पडले. फिरंग्यांनी कृष्णाजींच्या पोटावर पाठीवर सपासप वार केले. परंतु तोपर्यंत कृष्णांजींनी दहा बारा फिरंग्यांना लोळवले होते पण फिरंग्यांची आत येणारी रांग काही तुटत नव्हती संपत नव्हती. हे सर्व येसाजी बाबांनी पाहीले तसेच ते वेगाने धावले. पाठोपाठ शंभर मराठे वीरही धावले. मराठ्यांनी वचपा काढला. फिरंगी गांगरले व त्यांनी माघार घेतली. त्यावेळी तेथे मानाजी मोरे यांनीही आपल्या तलवारीची चमक दाखवीली होती.

दुसऱ्या दिवशी पोर्तुगिजांनी पुन्हा शर्थीचा प्रयत्न सुरु केला. उंच उंच शिड्या गोळा केल्या. कमरेला दोर सामान बांधुन सज्ज झाले. तटावर चढायला सुरुवात केली. तेवढ्यात नदीकडच्या अंगाने नारळी फोकळीच्या उंच बागातुन हर हर महादेवच्या गर्जना कानी येऊ लागल्या. तटावरील सैनिकांना इशारा मिळाला आणि सैनिक जोर जोराने गर्जना करु लागले. आले! आले!! संभाजी राजे आले!!! राजे ठरल्याप्रमाणे फोंडा किल्ल्यावर दाखल झाले. अगदी शिवाजी महाराजांनी पन्हाळ्यावरुन विशाल गडाकडे प्रयाण करताना जो प्रसंग घडला त्याची पुनरावृत्ती करणाराच जणु हा प्रसंग होता.

त्यावेळी शिवाजी महाराजांना विशाल गडावर पोहोचणे महत्त्वाचे होते तर या ठिकाणी संभाजी राजे फोंडा किल्ल्यावर वेळेत पोहोचणे महत्त्वाचे होते. विशालगडाच्या मोहिमेच्या वेळी बाजी प्रभु देशपांडे धारातिर्थी पडले. तर संभाजी राजे फोंडा किल्ल्यावर हजर होईपर्यंत किल्ला लढविण्याचे जबाबदारी कृष्णाजी कंकांनी पार पाडली आणि स्वराज्यासाठी तेही धारातिर्थी पडले. संभाजी राजे ठरलेल्या रणनिती प्रमाणे पोर्तुगिजांना पणजीतुन बाहेर काढण्यात यशस्वी ठरले.

शत्रूला प्रतिकुल असलेल्या ठिकाणी येण्यास भाग पाडणे हीच ती शिवाजी महाराजांची रणनिती संभाजी महाराजांनी या ठिकाणी वापरली आणि पोर्तुगिजांचा रेच मोडला. राजांचा घोडा थेट किल्याच्या दाराशी येऊन भिडला. राजांच्या सोबत आलेल्या निवडक आठशे घोडेस्वारांपैकी सहाशे घोडेस्वार राजांनी किल्ल्याच्या आजुबाजुला पेरले. त्याचवेळीला फिरंग्यांनी भरपुर बंदुका चालविल्या. परंतु मराठ्यांनी त्याला दाद दिली नाही.

तब्बल दहा दिवस पाऊस व मराठ्यांचा तडाखा फिरंगी अनुभवत होते. शेवटी जर्जर झालले फिरंगी पळू लागले. उरले सुरले दुर्भाटच्या दिशेने माघारी गोव्याकडे

पळाले. परंतु तेथेच संभाजी राजांची बाकीची दोनशे व दुर्भाट बंदरावरील इतर शिबंदी दबा धरुन बसली होती. भांबावलेल्या व्हाईसरायने टेकडीवरच्या मराठ्यांना कापुन काढण्याचा सैनिकांना हुकूम दिला. व्हाईसरायला पुढे काय होणार याची बिल्कुल कल्पना नव्हती. मराठयांनी जाणिवपूर्णक माघारी वळाल्याचा बहाणा केला. फिरंग्यांना पुढे येऊ दिले आणि मोहरा वळविला पुन्हा पुढे धाव घेतली. लपाछपी आणि फसवाफसवीला जणु ऊत आला होता. ढालीच्या आडोशाने गोळया चुकवत मराठयांनी फिरंग्याना पार चिरडुन टाकले.

जवळपास तीन वेळा कौंट दी अलव्हेर नशीबाने वाचला. एवढ्या जवळून आणि जोरकस हमला मराठी सैनिकांनी चढवीला की तीन हजार फिरंगी पायदळाचा पार चुराडा झाला होता. फक्त सव्वाशे सैनिक जिवंत राहीले होते. त्यांनी आपला जीव वाचविण्यासाठी मांडवी नदीत उडया ठोकल्या. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी बिचाऱ्यांची अवस्था झाली. त्यातले अनेकजण मांडवी नदीच्या पात्रात बुडुन मेले. ही घटना साधारणपणे दिनांक १५ नोव्हंबर १८८३ ला घडली.

संभाजी राजांनी आपला मोर्चा आता राजधानी पणजीकडे वळविला. २५ नोव्हेंबर १६८३ याच दिवशी पोर्तुगीजांचा विजयी दिवस असायचा. कारण दहावर्षापुर्वी याच दिवशी पोर्तुगिजांनी गोवा जिंकला होता. त्या निमित्ताने गोव्यात मोठा विजयी उत्सव अयोजित केला गेला होता. त्यासाठी पणजीतील सर्व अमीर उमराव, अधिकारी, प्रजा, यांची बैठक बोलावली गेली होती.

यावेळी विषय खुप गंभीर होता. युध्द खर्चासाठी किमान तीन लाख अशर्फीची मदतीसाठी याचना व्हाईसरायने उपस्थितांना केली. हे सगळे द्रव्य सैन्यासाठी शस्त्रासाठी व वस्त्रासाठी खर्ची पडणारअसल्याचे सांगितले गेले. शिवाय गोव्याच्या तुरुंगातील सर्व कैदी मुक्त केले गेले. त्यांच्या हाती शस्त्रे देऊन सैन्य वाढविण्याचा प्रयत्नही फिरंग्यांनी केला. पणजी शहराला संरक्षण देणारी मोठी संरक्षण भिंत होती. शिवाय तिला जागोजागी बळकट बुरुजही होते. मोठा बारुदखाना होता शिवाय पणजीच्या संरक्षणासाठी आगवाद, मूरगाव, काबू रेश द मागोश असे तीन बळकट किल्ले होते.

गोव्याच्या उत्तरेस मांडवी नदीच्या काठावर जुवे बेटावर सात इस्तेहाव नावाचा किल्ला होता. किल्याला उंच आणि बळकट तटबंदी होती. रात्रीच्या ओहोटीचा फायदा घेत कमालीची गुप्तता पाळत चाळीस मराठी घोडी गुपचूप नदीच्या पात्रात घुसली. नदी पार रातोरात वेढा टाकला गेला. अवघड व ऊंच तटबंदीवर मराठ्यांनी शिड्या लावल्या, दोर बांधले व चाळीस मराठे किल्ल्याच्या तटावर चढले. किल्ल्यावर फक्त एक म्हातारा पोर्तुगिज शिलेदार व मोजकी शिबंदी होती.

मराठी तुकडीचे नेतृत्व खंडोबल्लाळाकडे होते. रात्रीच्याच अंधारात सपासप तलवारी चालविल्या गेल्या आणि फक्त अर्ध्या तासात किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. किल्यावरुन संभाजी राजांना तसा तोफांचा इशारा दिला गेला. फक्त चाळीस मराठ्यांनी अर्ध्या तासात बलदंड किल्ला अगदी नाटयमयरित्या हस्तगत केला होता. पन्हाळ्याची पुर्नरावृत्ती बऱ्याच वर्षांनी पहावयास मिळाली होती.

गोव्यात सर्वत्र पळापळ उडाली होती. दुसऱ्याच दिवशी सकाळी व्हाईसरायने किल्यावर हल्ला चढविला व किल्ला पुन्हा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. तेवढयात संभाजी राजांची तुकडी मागच्या अंगाने फिरंग्यावर जाऊन थेट आदळली. पोर्तुगीजांची पुन्हा फोंडयासारखी पळापळ झाली. वाचलेल्या फिरंग्यांनी वाहत्या नदीत उडया ठोकल्या. मराठ्यांचे एक वेगवान पथक व्हाईसरायच्या पाठी लागले.

सुदैवाने व्हाईसराय वाचला व पळाला. नदीला भरती येऊन पाणी वाढत होते तरीही मराठे पाठलाग सोडत नव्हते. अनेक फिरंगी चिखलात फसले, मराठ्यांच्या बाणांचे बळी पडले, बंदुकीचे लक्ष्य ठरले, अनेकांना जलसमाधी मिळाली. व्हाईसरायचे दैव बलवत्तर म्हणुन त्याला नशिबाने एक मचवा मिळाला कसाबसा बिचारा पैलतिरी पोहोचला. राजांनी आता पणजीलाच वेढा घातला. चांगला महिनाभर वेढा चालु राहीला पण किल्ला काही हाती येत नव्हता.

आता मात्र युक्तीने किल्ला ताब्यात घ्यावा लागणार होता. कुसाच्या आत पाचशे सातशे मराठे घुसवुन हुल्लड माजवायची व त्याचवेळी बाहेरुन हल्ला करायचा असा बेत ठरला. आता किल्ला पडणारच होता तेवढयात व्हाईसरायचा वकील तहासाठी येवुन ठेपला. राजांनी त्यास काहीही उत्तर दिले नाही. बिचारा वकील पुन्हा पुन्हा खेटे मारीत होता. परंतु राजे आपल्या निर्धारावर ठाम होते. स्वराज्याशी दगाबाजी करणाऱ्या व मोघलांना मदत करणाऱ्या पोर्तुगीजांना कोणत्याही परिस्थितीत वठणीवर आणण्याची भूमिका राजांना राबवायची होती.

राजांना पोर्तुगीजांकडुन एक महत्वाची अट पुर्ण करुन पाहीजे होती. ती म्हणजे सुरतेहुन वेंर्गुल्याकडे औरंगजेबाकडे पाठविलेली निम्मी रसद मराठ्यांच्या ताब्यात द्यायची मगच वाटाघाटीसाठी यायचे. पोर्तुगीजांनी चांगलीच दहशत खाल्ली होती. राजे वेढा उठवायलाही तयार नव्हते व तह करायलाही तयार नव्हते. घाबरलेल्या फिरंग्यांनी आपली राजधानीच पणजीहुन मार्मा गोव्याला हलविण्याचे नक्की केले. तोपर्यंत राजांनी साष्टी बारदेशातील चारही किल्ले जिंकले. शापोरा जिये-पिये हे किल्लेही ताब्यात घेतले.

बंदीखान्यात कैद असलेले मराठी वकील येसाजी गंभीर राव यांचीही मुक्तता केली गेली. आगवाद, रोश-मागोश, शापुरा हे टेळणीचे छोटे किल्लेही ताब्यात घेतले.

सा-मिगेल,सांत-क्रिस्तोहाव हे किल्लेही हाती लागले. जवळपास बावीस दिवस गोव्यात मराठी सैन्याने धुमाकुळ घातला. पोर्तुगिज साम्राज्याला आता शेवटची घरघर लागली होती.

परंतु तेवढ्यात तातडीची आणि भयंकर बातमी येवुन थडकली. औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम लाखाची फौज घेऊन रामदऱ्याचा घाट वेगाने उतरत असल्याची पक्की खबर आली. जर मुअज्जमची फौज राजे गोव्याच्या वाटेवर असतानाच आडवी आली असती तर मराठेच फिंरगी आणि मोघलांच्या तावडीत सापडले असते.


त्यामुळे मोघल आडवे येण्याआगोदरच किमान सावंतवाडी पार होणे आवश्यक होते. अन्यथा मोठा अनर्थ घडणे टाळता येणार नव्हते. आणि परवडरणारेही नव्हते. नाईलाजास्तव हाता तोंडाशी आलेली मोहिम अर्धवट सोडावी लागणार होती. तत्पुर्वी राजांनी गोवेकरांशी तह करुन वसई, दमण, प्रदेशाची चौथाई व गावखंडी द्यायचा करार केला. शिवाय पोर्तुगीजांच्या प्रदेशातुन मोघलांना धनधान्य दारुगोळा वाहतुकीस मनाई केली.

छत्रपति संभाजी राजांनी अत्यंत कमी फौजेनिशी पोर्तुगीजांशी लढाई करुन पोर्तुगीजांना चांगलाच धडा शिकविला होता. त्यामुळेच पुढे उघड उघड मराठ्यांशी बेईमानी करुन मोघलांशी हातमिळावणी करण्याची पोर्तुगीजांना हिम्मतच झाली नाही. मोहीम अपुरी राहीली होती परंतु मोहिमेचा हेतु सिध्द झाला होता. स्वराज्याच्या विरोधात एकजुट होणाऱ्या सर्व परकीय शत्रुंना वेगळे पाडण्यात संभाजी राजांना या मोहिमेमुळे यश आले.

अशाच प्रकारे त्यांनी मुंबईकर इंग्रज व जंजिरेकर सिध्दी यांनाही आपल्या बिळात कोंडुन धरले व आपली सर्व ताकद मोघलांच्या विरुध्द सुरु असलेल्या लढाईत ओतली. त्यामुळेच मोघलांना सलग आठ वर्षे महाराष्ट्रात अगदी एकही किल्ला जिंकता आला नाही. संभाजी महाराजांचा हा पराक्रम लिहीण्यासाठी कोणी बखरकार जन्मालाच आला नव्हता असे नाही पण संभाजी महाराजांचा पराक्रम लिहिण्याची मानसिकताच बखरकारांची नव्हती आणि जे लिहिले ते अत्यंत विपरीत लिहीले. आणि त्यामुळेच संभाजी राजांची वेगळी प्रतिमा लोकांसमोर मांडण्यात बखरकारांना यश आले.

परंतु आता मात्र हा खोटा इतिहास बदलला जाऊन खरा इतिहास लोकांसमोर येवु लागलेला आहे. हा ही महाराष्ट्राच्या इतिहासासाठी वर्तमानासाठी व भविष्यासाठी सुवर्णयोग ठरेल.

- - - - - - - - - - -



श्री शंभुनर
पति हर्षनिदान मोरे
श्वरसुत नीळकंट
मुख्य प्रधान

श्री

पत्र नियत पारतोषिक मा। येसजी कंक सरनोबत व कृष्णाजी येसजी कंक पदाती नायक शक १२ क्रोधननाम संवत्सरे आषाढ शुद्ध द्वितीया भोमवासर सुा। सीत समानीन अलफ मानिलेचे पुत्र यां दोगानी फोंडांचे स्वारीस फिरंगी यांसि गाठी पडिली तेव्हां बहुत फस्त केली आणि गनीम मारून काढिला ते वख्ती दोघाला हि जखमा लागोन चकचुर जाले. कठीण जखमा राजश्री स्वामींनी दृष्टीने पाहिल्या आणि घरासी जावया आज्ञा दिल्ही त्यावरी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन घरी मयत जाला हाली येसजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले त्यावरून स्वामी कृपाळु होऊन हे कामाचे मर्दाने स्वामीकार्यावरी तत्पर आणि याचा पुत्र हि स्वामिकार्यावरी मयत जाला फोंडांचे बकसीस द्यावयाचे होते ह्मणौन छ मजकुरी पारितोषिकाची मोईन केली होन पादशाही बेरीज २००० एा। दोनी सहस्त्र होन रास खासा येसजी कंक सरनोबत कृष्णाजी कंक मानिलेचे पुत्र हौन १००० स्वामिकार्यावरी पडिले ह्मणौन दिल्हे होन पाा। १०००.

एणेप्रमाणे एक साला ये वर्षी पारितोसिक द्यावयाचा नियत केला असे

लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

तारीख ३० रजब

सुा। सीत सुरु सुद बार

बार

दक्षिण दिग्विजय

औरंगजेबाच्या ५ लाख सैन्यांबरोबर लढताना त्याला या मातीतच गाडण्यासाठी दक्षिणेतील राजांची एकसंध अशी फळी उभी रहाणे गरजेचे होते. त्यामुळे संभाजी राजांनी याबाबत चर्चा करण्यासाठी आपले विश्वासू साथीदार सरदार दादजी काकडे जैताजी काटकर व तुकोजी निंबाळकर यांना म्हैसुरचा राजा चिक्कदेवराय यांच्याकडे पाठविले. चिक्कदेवरायाने संभाजी राजांच्या प्रस्तावावर चर्चा करण्याऐवजी संभाजी राजांनी दुत रुपाने पाठविलेल्या या तीन मराठा सरदारांचा भर दरबारात खून केला व त्यांची छाटलेली मुंडी श्रीरंगपट्टणाच्या वेशीवर टांगली. संभाजी राजांना अशा प्रकारे चर्चेसाठी गेलेल्या लोकांच्या बाबतीत होऊ शकते याची स्वप्नातही कल्पना नव्हती.

राजांना आपल्या हिम्मतबाज सरदारांची चिक्कदेवरायाने केलेली हत्या खुपच मनाला लागली आणि त्या हत्येचा बदला घेतला नाही चिक्कदेवरायाला अद्दल घडविली नाही तर मराठी स्वराज्यासाठी बलिदान झालेल्या आपल्या त्या तीन सरदारांच्या आत्म्याशी गद्दारी करण्यासारखे वाटले. राजांना याबाबतीत खुपच हळहळ वाटत होती. शिवाय पुढे होणाऱ्या महायुध्दात दक्षिणेकडुन तामिळनाडू कर्नाटक प्रांतातुन येणारी रसद ही स्वराज्यासाठी जीवन मरण ठरणार होती. त्यामुळे तीन सरदारांच्या हत्येचा बदला घेणे व दक्षिणेतील रसद रेषा चालु करणे अशा दोन गोष्टींसाठी म्हैसुरवर हल्ला करणे आवश्यकच होते.

तरीही पुन्हा एकदा चर्चा करुन पहायला हरकत नाही असे समजुन राजांनी दुसऱ्यांदा चर्चेसाठी कृष्णाजी कान्हेरे यांना म्हैसुरला पाठविले. उद्दाम चिक्करायाने शिष्टाईसाठी गेलेल्या कान्हेरेता कपडे फाडून दरबारातून हाकलुन देण्यात आले. मराठी वकीलाचा पुन्हा एकदा उघडा उघडी अपमान केला गेला होता. आता मात्र हल्ला करण्याशिवाय कोणताही पर्याय उरला नव्हता. चिक्कदेवरायाला मराठी तलवारीची ओळख आणि मराठा सैन्याचा तडाखा दाखविणे क्रमप्राप्त झाले होते.

ठरल्याप्रमाणे राजांनी आपल्या सोबत निवडक फक्त दहा हजार फौज घेतली. ते तडक चिकमंगळुरच्या इशान्येला बाणावर या ठिकाणी पोहोचले. अगोदरच पाठविलेल्या निरोपानुसार हुक्केरीचा बसप्पा नाईक त्याची पाच हजाराची फौज घेऊन

राजांच्या मदतीला धावला. शिवाय गोवळकोंड्याचे वजीर मादान्ना यांनीही दिलेल्या वचनाप्रमाणे दहा हजाराची फौज वेळेत पाठवुन दिली. तिन्ही फौजा ठरलेल्या वेळात एकमेकाला येवुन सामिल झाल्या. आता दोनच दिवसात त्रिचनापल्लीकडे धावायचे व कावेरी पलिकडे जाऊन चिक्कदेवरायाला दणका द्यायचा असे ठरविण्यात आले.

परंतु संभाजी राजे चिक्कमंगळुरला आल्याचे समजल्यावर त्यांनी त्रिचनापल्लीत घुसण्याची वाट पाहत बसण्याऐवजी पुढे धावत जाऊन हल्ला करणे चिक्कदेवरायाला योग्य वाटले. त्यानुसार चिक्कदेवराय सुसाट वेगाने आपल्या पंधरा हजार फौजेसह संभाजी राजांच्या फौजेवर चालुन आला. म्हैसुरची फौज तगडी व कसलेली होती. शिवाय त्यांच्या फौजा बाणाच्या लढाईत तरबेज.

त्यांनी संभाजी राजे व मित्राच्या फौजांवर बाणांचा वर्षाव केला. कुतुबशाही फौजेची तर पुरती दाणादाण उडाली. तर हैद्राबादी फौजेची तर भारी पळापळ झाली. अचानक झालेल्या या हल्याने संभाजी राजांच्या मित्रांना चांगलीच दहशत बसली. राजांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन तात्पुरती माघार घेतली. त्याच सांयकाळी अगोदर पाठविलेल्या निरोपानुसार तंजावरकडून स्वत: संभाजी राजांचे चुलते व्यंकोजी राजे त्यांच्या पाच हजार फौजेसह येऊन राजांच्या फौजेला भिडले.

सर्वांनी मिळून आता गनीमी काव्याची योजना केली. कारण म्हैसुरकरांकडे बाणांचे शस्त्र होते व ते दुरवरुनच शत्रुला गारद करण्यात पटाईत होते हे सिध्द झाल्याने आता वेगळीच युक्ती लढविणे आवश्यक होते. त्यानुसार संभाजी राजे व मित्रांच्या फौजांनी जंगलातील बांबुच्या झाडांना पोत बांधले मशाली पेटवल्या व रात्रीच्या वेळी मराठे व त्यांच्या मित्रांच्या फौजा आराम करताहेत असा देखावा निर्माण केला. चिक्कदेवरायाच्या डोळ्यात धुळ फेकण्यात आली.

संभाजी राजांची फौज तेथुन हळूहळू लांब सुरक्षित अंतरावर जाऊन थांबली होती. परंतु पराभुत होवुन लढाईत पराजयी मनाने माघारी फिरणे राजांना बिलकुल मंजुर नव्हते. आपल्या लष्कराला विजय मिळवून देऊन उत्साह देण्यासाठीच आपण म्हैसुरकडे आलो आहोत. पराभवाचा काळीमा घेऊन माघारी मायभुमीत जाण्यासाठी नाही याच भुमिकेवर राजे ठाम होते. आणि त्यावर एकच उपाय होता तो म्हणजे कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवीणे आणि त्यासाठी म्हैसुरकरांच्या बाणांना बोथट करणे त्यांच्या हुकुमी हत्यारांना निकामी करणे हे सर्वात महत्त्वाचे होते.

त्यानुसार राजांनी रायाप्पाला आजुबाजुच्या सर्व गावातुन जंगलातुन मिळतील तेवढे चांभार गोळा करुन आणण्यास सांगितले.गोळा करण्यात आलेल्या त्या स्थानिक चांभारांना मिळेल तेवढे कातडे जमा करण्यास सांगितले व त्यापासुन कातडी कमाऊन

चांगली वातड (जॅकेटस्) बणविण्याचा हुकुम दिला.

शिवाय ज्योत्याजी केसरकर आणि कविकलश यांना नदीच्या अल्याड पल्याड जेवढया छोटया मोठया नावा मिळतील त्या एक करण्याचा व त्या नावाडयासह भाड्याने घेण्याचा आदेश दिला. अशा सर्व मिळून जवळपास एक हजार नावा होड्या गोळा केल्या गेल्या. त्याचवेळी राजांनी तीनशे स्वरांचे एक वेगळे पथक तयार केले त्यास तिरंदाजीचे धडे दिले. त्यासाठी वेळुच्या, वेताच्या लवचिक फोकाट्यापासुन कामटे तयार करण्यात आले. चिवलीच्या कांबी पासुन बाण बनविले आणि कावेरीच्या काठावर सकाळ संध्याकाळ असा दोन्ही समयी सराव केला गेला. बाणाईतांना वेगाने आपातकालीन प्रशिक्षण देण्यात आले.

तोपर्यंत मादान्ना व बसप्पा नाईक यांची पाच हजारांची नवी कुमक येऊन पोहोचली. शिवाय तंजावर, जिंजी येथुन आलेली ताज्या दमाची पथके ही मुख्य फौजेला येऊन भिडली आणि त्याच दिवशी भल्या पहाटे सर्व नावा एका रांगेत उभ्या केल्या गेल्या.

नावेच्या आधाराने घोडी पल्याड घालण्याचा बेत होता. शिवाय आजुबाजुच्या जंगलातुन पाचशे पाळीव हत्तीचे पथकही पलिकडे कुच करण्यासाठी सुसज्ज होते. हत्तीच्या पाठीवर जड सामानसुमान लादले होते. इशारद केल्याबरोबर पहाटेच्या अंधारातच सैन्य सखल भागाचा अंदाज घेत पाण्यात उतरले.

सर्वात आघाडीवर हत्तींचे पथक होते. दिवस उजाडेपर्यंत ही सर्व चतुरंग सेना नदीच्या पलिकडे जाऊन किल्ल्याच्या तटाला भिडली. म्हैसुरकरांचा या सर्व गोष्टींवर विश्वास बसणे केवळ अशक्य होते. परंतु ते दृश्य त्यांना स्वत:च्या डोळ्यांनी पहावे लागत होते. ताबडतोब फौजेला फौजा भिडल्या. किल्यावर तटावर एकच गलका उडाला होता.सगळे म्हैसुरकर एदीरी एदीरी दुश्मन दुश्मन असे ओरडत तटबंदीवरुन बाणांचा मारा करीत होते. परंतु शंभु राजे आणि मित्रांच्या फौजा काही केल्या मागे हटत नव्हत्या.

आता खरी युक्तीची लढाई करणे आवश्यक होते. आणि त्यासाठीच तर एवढे दिवस पलीकडच्या तिरावर योजना आणि सराव केला गेला होता. त्याची अंमलबजावणी करण्याची हीच योग्य वेळ होती. त्याप्रमाणे नावेत होड्यात आणि तिरावर चर्मधारी पथक उभे केले होते. राजांनी जाड वातड चामडयाचे झगे आणि डोक्यावर तशाच जाड कातडी टोप्या सैनिकांना त्यांच्या अंगावरच्या चिलखताप्रमाणे परिधान करण्याचा इशारा केला. त्या चामडी कपड्यांना तेल लावले जेणे करुण तटावरुन सु-सु करीत आलेले बाण वातडीत न रुतता तेलकटपणामुळे घसरुन सरळ खाली जावेत.

आणि खरोखरच ही योजना चांगलीच यशस्वी झालेली होती. म्हैसुरकरांनी तटबंदीवरुन सोडलेले बाण कातडीवरुन ओघळुन पडत होते. म्हैसुरकरांचे हुकुमी अस्त्र राजांनी आपल्या युक्तीने निकामी केले होते. चढत्या उन्हाबरोबर मराठयांचा जोश वाढत होता. त्यांनी किल्ल्याच्या कुसाच्या भिंतीना भगदाडे पाडली. हत्ती आणि मराठे सर-सर आत घुसु लागले शिवाय हत्तींनी महादरवाजाला टकरा मारुन मारुन दरवाजेही खिळखिळे करुन सोडले होते. त्यामुळे आता मराठी फौजा कुसाच्या आत घुसण्यास यशस्वी झाल्या. कुसाच्या अंतर्गत भागात रस्तो रस्ती संघर्ष चालु होता चकमकी घडत होत्या.

संध्याकाळपर्यंत त्रिचनापल्ली शहर ताब्यात घेण्यात मराठ्यांना यश मिळाले. किल्याभोवतीचे शहर ताब्यात आले होते. परंतु किल्ला अजूनही ताब्यात येणे बाकी होते. किल्ल्यावर मदुरेकर नायक चोक्कनाथ, स्वत: नेतृत्त्व करत होता. त्याच्या सोबतीला म्हैसुरकरांची तगडी शिबंदी होती. सहा महिने सहज पुरेल एवढा घासदाणा व दारुगोळा किल्ल्यावर उपलब्ध होता. शिवाय शिबंदीचीही काही कमी नव्हती.

परंतु याच दरम्यान एकेदिवशी किल्याचा नरेश चोक्कनाथ नायक याचा अचानक मृत्यु झाला. चोक्कनाथचे पार्थिव राजधानी मदुरेला नेणे आवश्यक होते. त्यासाठी नायकांचा दिवाण राजांच्या भेटीला आला व त्याने तशी विनंती केली. राजांनीही काही आढेवेढे न घेता ताबडतोब तसे करण्यास परवानगी दिली. राजांच्या अनेक सहकाऱ्यांनी या संधीचा फायदा उचलुन किल्यात फौजा घुसविण्याचा सल्ला दिला होता.

युध्द शास्त्राप्रमाणे त्या सर्वांचा सल्ला योग्य होता. परंतु नितिमत्तेला धरुन नसल्याचे राजांचे ठाम मत असल्याने राजांनी तसा संधी साधुपणाचा प्रयोग केला नाही. पराक्रमाशिवाय यश मिळविणे हे मराठी रक्ताला कधीही मानवणारे नव्हते. अशा प्रकारे एखाद्याच्या अडचणीचा गैरफायदा घेण्याची मानसिकताही मराठी लष्कराची कधी नव्हती. चोक्कदेवाच्या मृत्युनंतर आठ दिवसानंतर राजांनी किल्याला वेढा घातला.

दहा हजार फौज किल्ल्याच्या आजुबाजुला पेरली गेली. किल्ला बराच ऊंच, फताडा व कातीव कडयांचा होता. कडयाची ऊंची जवळपास शंभर गज होती. शिवाय या बळकट तटबंदीच्या मध्येच पाण्याचा एक खंदक होता. त्यामुळे सरळ कडयावर सैन्य चढविणे शक्य नव्हते. यासाठी अगोदर पाण्याचा खंदक बुजविणे आवश्यक होते. त्यानुसार मराठी कानडी,बेलदार, कामाठी पुढे धावले कामाला लागले. खंदक बुजविण्यास सुरवात झाली तसा वरुन म्हैसुरकरांनी बाणांचा वर्षाव करायला सुरुवात केली. पुन्हा राजांनी यापुर्वी वापरलेले अस्त्र बाहेर काढले. सर्व कामाठी बेलदार अंगावर

वातड व कातडी टोप्या घालुन बाणांचा मारा चुकवत खंदक बुजवत होते.

जवळपास तीन दिवस अशी हातघाई चालु होती. एकदाचा खंदक बुजवीला गेला. आता मराठे मोठ मोठया शिडया लावुन किल्ल्यात घुसण्याचा प्रयत्न करीत होते. शिवाय हत्ती महादरवाजाला टकरी देऊन देऊन दरवाजा फोडण्याचा प्रयत्न करीत होते. जवळपास तीन दिवस अशी ही तटबंदीजवळची लढाई चालली. काही,केल्या म्हैसुरकर मराठयांना वर सरकु देत नव्हते.

तेव्हा कवी राजांनी प्रशिक्षित केलेल्या तीनशे तिरंदाजांचे पथक समोर उभे केले. बाणांचे उत्तर बाणानेच देण्याचे ठरले. त्यानुसार कवीराजांनी कांबटांच्या बाणांना पोत बांधले ते तेलात भीजवुन पेटवीले व किल्याच्या तटबंदीवरुन आत सोडले. किल्ल्याच्या आतील भागात सर्वत्र आगीचे साम्राज्य पसरले. पेटते बाणावर बाण येऊन किल्यात पडत होते.

किल्याच्या कचेऱ्या गस्तीच्या चौक्या सर्व पेटुन निघाल्या जळून खाक झाल्या. शिवाय लांब पल्याचे काही बाण किल्ल्याच्या आत असलेल्या बारुद खाण्यात जाऊन पडले. त्यामुळे मोठा स्फोट झाला व त्या ठिकाणची तटबंदी कोसळली. कदाचित मराठयांनी गुप्तहेरांकरवी ही माहिती अचुकपणे मिळवील्याने तसे घडले असावे. मोठ्या वेगाने मराठी सैन्य किल्ल्यात शिरले. थोड्याच वेळात श्रीरंग पट्टणच्या पाषाण कोटावर प्रथमच मराठी झेंडा फडकला.

राजे संपुर्ण दक्षिणेच्या द्विवीजयी मोहिमेवर होते. त्यामुळे फक्त पाषणकोट जिंकुन थांबले नाहीत. विजयाची घोडदौड वेगाने करीत राजांनी म्हैसुर, कर्नाटक, तामिळ प्रांतातील एकुण बावीस किल्ले एका पाठोपाठ मराठी स्वराज्याला जोडले.

धर्मपुरी, होसुर, मदुरा, जिंजी, वेल्लुरपर्यंत मराठी घोडी भिडली. अनेक ठिकाणाहुन खंडण्या गोळा होऊ लागल्या. राजांची दहशत एवढी बसली होती कि आक्रमण करण्यापुर्वीच त्या ठिकाणचा राजा शरण येत होता. मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत होता व तो क्रमाक्रमाने रायगडाकडे पाठविला जात होता. परंतु तरीही राजांनी मोहिम चालुच ठेवली. म्हैसुरकरांचा पुरता माज मोडण्याचा इरादा होता. त्यामुळे माघारी फिरण्याची घाई नव्हती. तिलुगा, कोडग, मलायला, अशा अनेक दख्खनी राजांनी म्हैसुरकरांची साथ सोडली व ते शंभु राजांना येऊन मिळाले. राजांनी आणि त्यांच्या सैन्याने दसऱ्याचे सोने त्रिचनापल्लीतच लुटले.

फौजा आजुबाजुला अखंड धावत होत्या व प्रचंड प्रमाणावर खंडणी गोळा करीत होत्या. अगदी दिवाळीपर्यंत हे काम अहोरात्र चालु होते. शेवटी म्हैसुरकर शरण आले व दिवाळी नंतर पाषाण कोटाच्या शंभर खांबी मंडपात तह करण्याचे नक्की झाले. त्यानुसार तह पार पडला व तहाची रक्कम दोन करोड होनांची ठरवीली गेली.

चिक्कदेवराया स्वत: राजांच्या भेटीला येऊ शकला नाही कारण त्याला खुप भिती वाटत होती. त्यासाठी त्याने शिवाजी राजांच्या काळातील अफजलखानाची गोष्ट पुढे केली.

अफजलखानाप्रमाणे आपणही भेटीस जाऊन जीवास मुकू अशी त्यास भिती वाटत होती. शंभु राजांचा असा काही इरादा नव्हता हे वेगळे. चिक्कदेवरायाचा धाकटा भाऊ तहाचे कागद व एक करोड होन घेऊन हजर झाला होता. बाकीची रक्कम नंतर देण्याचा वायदा झाला. औरंगजेब महाराष्ट्राच्या छाताडावर येऊन बसला होता. त्यामुळे दुर कर्नाटक प्रांतात पावसाळ्या नंतर जास्त दिवस थांबणे धोकादायक ठरले असते. म्हणुन वेगाने मराठी फौजा पुन्हा स्वराजाच्या दिशेने धावल्या. अल्पवधीतच राजांनी दक्षिण द्रिविजयाची मोहिम यशस्वी करत स्वराज्याचा आर्थिक डोलारा सावरुन धरण्याचा प्रयत्न केला. काही महिन्यासाठी पुरेल एवढा निधी आता उपलब्ध झाला होता.

- - - - - - - - - -

"माहादोबा गोसावीस वर्षासनाची मोईन"

तुकाराम महाराजांचे पुत्र महादोबा गोसावी यांसी संभाजी महाराजांनी वर्षासनाची नेमणूक करून दिल्याचे पुणे प्रांताच्या सुभेदारास आज्ञा पत्र -

श्री

प्रति स्वस्तिश्री राज्याभिशेक शके ७ रौद्र संवछर भाद्रपद शुद्ध पंचमी गुरुवार क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति याणी राजश्री विनायेक उमाजी देशाधिकारी प्रांत पुणे यांसी आज्ञा केली यैसीजे - माहादोबा गोसावी तुकाबा गोसावी यांचे पुत्र वस्ती मौजे देहू ता। हवेली सुभे मजकूर यासी वर्शासनाची मोईन होन पा। लुगडियाबदल गला जोरी बाज्ले माहाल मापे खंडी येकूण होन पा। येक व गला खंडी येक मोईन आहे. ते सा। मारापासून सुभे मजकुरावरी देविली असे. दर हारसाल आदा करीत जाणे. प्रतिवरसी नवे सनदेचा उजूर न करणे. तुम्ही तालीक लेहून घेऊन असल गोसावीयासी परतोन देणे.

आषाढी वारीला संरक्षण

संभाजी राजे शिवाजी महाराजांप्रमाणे धर्म कार्याबाबत कसे जागरुक होते याचा एक उत्तम दाखला आपणास इतिहासात सापडतो. पित्याच्या पाठी पुत्राने असे कोणतेही लौकिक कार्य करायचे शिल्लक ठेवले नव्हते. असे अनेक उदाहरणावरुन स्पष्ट होते त्यापैकी हे एक. संभाजी राजे त्यावेळी गांगोली या ठिकाणी मुक्कामाला आले होते.

याच ठिकाणी महिनाभरापूर्वी शाहु बाळांचा जन्म झाला होता. व बाल राजास पाहण्यासाठी राजे गांगोलीला आले होते. त्या दरम्यान बाळ राजांना आशिर्वाद देण्यासाठी व संभाजी महाराजांची भेट घेण्यासाठी संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांचे चिरंजीव महादेव महाराज उपस्थित झाले होते.

याच भेटीमध्ये महादेव महाराजांनी वैजनाथाच्या पायरीवर बोलता बोलता देहू ते पंढरपुर अशी तुकाराम महाराजांची पालखी सुरु करावी असे वाटत असल्याची इच्छा प्रकट केली. परंतु मोघलांची जागोजागी असणारी पथके वारकरी मंडळीची, भाविकांची अडवणुक करीत असत तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी हुल्लडबाजी करीत असत.

संभाजी राजांनी कल्पना नामी असुन त्यामुळे एक नवीन पायंडा पडेल असे सांगितले व या चांगल्या कामासाठी पालखीला दरवर्षी लागेल ते द्रव्य सरकारातुन मिळण्याची व पालखीला संरक्षण देण्याची व्यवस्था केली. त्याबाबतचे तसे हुकुमही जागोजागच्या अंमलदारांना रवाना केले गेले. तुकाराम महाराजांचा व शिवाजी महाराजांचा असलेला जिव्हाळा संभाजी राजांच्या व महादेव महाराजांच्या रुपाने पुढे चालु राहील्याचा हा पुरावा होय. शिवाय चांगल्या योजनेला संभाजी राजे कसे प्रोत्साहन देत असत हे ही यावरुन नक्कीच लक्षात येते.

त्यामुळे स्वराज्याच्या स्थापने मध्ये वारकरी सांप्रदायाने प्रबोधनाच्या माध्यमातुन तयार केलेले जनमत शिवाजी महाराजांच्या मदतीला वेळोवेळी हाके सरशी उभे रहात असे. त्यामुळे तुकाराम महाराजांनी महाराष्ट्रातील लोकांचे मेंदु व मने मजबुत करण्याचे काम केले व शिवाजी महाराजांनी या प्रबोधनामुळे तयार झालेल्या मने आणि मेंदुंना सशक्त मनगटांची निर्मिती करुन स्वराज्य निर्माण केले. ही सर्व पार्श्वभुमी लक्षात

ठेऊनच संभाजी महाराजांनी त्यावेळच्या अनेक साधुसंतांचा संपर्क ठेवला होता. त्यामुळेच त्यांनी आषाढीवारीला संपुर्ण संरक्षण तर दिलेच परंतु वारीसाठी लागणारा संपुर्ण खर्चही करण्याची तयारी ठेवली. त्यामुळेच स्वराज्याची ही विचारधारा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सतत पोहोचत राहीली व शेवटपर्यंत स्वराज्य अजिंक्य राहीले.

- - - - - - - - - -

जंजिरा

सलग चोवीस वर्षे प्रयत्न करुन व लहानमोठे असे एकुण आठ हल्ले चढवुनही शिवाजी महाराजांना जंजिरा किल्ला हुलकावणी देत होता. शिवाय जंजिरा किल्ला हा सागरी भागावर वर्चस्व ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा होता. त्याचबरोबर आशिया खंडातील व्यापार उदीमाच्या मार्गावरील ते केंद्र असल्याने व्यापारी दृष्टीकोनातुनही जंजिरा महत्वपुर्ण होता. एका जंजिराच्या बळावर सिध्दी माजले होते व किनारपट्टीच्या भागात हैदोस घालीत होते.

एके दिवशी नागोठणे व रोह्याकडचे शेतकरी संभाजी राजांना भेटावयास आले त्यांनी सिध्दीची क्रुरकर्माची कहाणी राजांना सागितली."राजे हे सिध्दी आमच्या गावातील तरणी ताठी पोर पळवितात व टोपीकर इंग्रजांना भरमसाठ रक्कम घेऊन त्यांना गुलाम म्हणुन विकतात." राजांनी त्या सर्वांचे सात्वंन केले त्यांना आर्थिक मदत केली व त्या शेतकऱ्यांना सिध्दीचा बंदोबस्त करु असा शब्द दिला.

त्याप्रमाणे राजांनी आपला मोर्चा जंजिराकडे वळवीला. नागोठणे आणि रोहयाच्या खाडीत सागरी युध्दासाठी बावीस गलबते तयार केली. शिवाय चार हजार सैन्य कामाला लावले. मोहिमेची सिध्दता केली. अनुभवी योध्दा दादजी देशपांडे यांना मोहिमेची जबाबदारी दिली गेली. यासंपूर्ण रणनीतिचा भाग म्हणुन उंदेरी ताब्यात घेण्याचे ठरले. दादजी देशपांडे मोठया हिंमतीने उंदेरीवर चालुन गेले. परंतु ऐनवेळी इंग्रज हाबश्यांच्या (जंजिरेकर सिध्दी) मदतीला धावले. व त्यांच्या अव्वल तोफगोळयांनी घात केला.

अनेक मराठा वीर कामी आले. दुर्दैवाने दोनेशे मराठे जिवंतपणे शत्रुच्या ताब्यात सापडले. त्यांची हाबश्यांनी डोकी कोयत्यांनी तोडली व धडे किल्यावरुन पाण्यात फेकली. मराठयांची तोडलेली मुंडकी घेऊन हाबशी मुंबईच्या बंदरात आले व तेथे त्यांनी या मराठी वीरांच्या मुंडकी भाले टोचुन शीरांची मिरवणुक काढली.

राजांनी हे सर्व वर्तमान ऐकले व त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला पोहोचली आणि ठरले आता जंजिऱ्यावर भगवे निशाण फडकवील्या शिवाय पर्याय नाही.

जंजिऱ्यावर हमला करण्याचा बेत पक्का झाला. मराठी वीरांच्या मुंडक्यांची अपमानास्पद काढली गेलेली मिरवणुक राजांच्या मनाला खुपच लागली.

राजांनी स्वत: जंजिऱ्यावर चालुन जाण्याचा निर्णय घेतला. वीस हजार फौज व तिनशे गलबते यांनी जंजिऱ्याला वेढा घातला. शक्ति बरोबर राजांनी युक्तीचाही उपयोग करुन घेतला. जंजिऱ्यावरील वीर सिध्दी संबळ याचा मुलगा सिध्दी मेस्त्री याला राजांनी आपल्याकडे खेचुन घेतला. तो आपल्या सोबत दोनशे हाबशी घेऊन राजांना येऊन मिळाला. परंतु तरीही सिध्दी चीवटपणे लढा देतच होते.

किल्ल्याच्या महाद्वारावर कलाल बांगडी, व्याघ्रमुखी व लांडा कासम अशा तीन पंचरशी अजिंक्य तोफा होत्या. शिवाय त्या काळचा अव्वल तोफखाना दारुगोळा होता आणि किल्ल्याची ऊंचीही काही कमी नव्हती. जवळपास पंचवीस गज. जंजिऱ्यावर एकुण आठ बारुदखाने होते व किल्ल्याला एकोणीस बुरुजांचे संरक्षण.

किल्ल्यावरुन मारा केला जाणारा तोफेचा गोळा अव्वल असायचा. शिवाय किल्ल्यावरील शिबंदीही भरपूर पक्की कडवी. अशा सर्व गोष्टींचा समाचार घेण्यासाठी युध्दरिती सुध्दा तेवढी तगडीच लागणार होती. त्याप्रमाणे राजांनी योग्य ते सर्व नियोजन केले होते.

राजांनी आपल्या सर्व सैनिकांना मोहिम पार पाडल्यास प्रत्येकाच्या ओटयात अर्धा शेर सोने ओतु व प्रत्येकाच्या हातामध्ये सोन्याचे कडे घालू अशी घोषणा केली. सैनिकांना दोन महिन्याचा पगार आगाऊ देऊन टाकला. सागरी मार्गाची नाकेबंदी करुन बाहेरुन येणार रसद आडविण्याचा बंदोबस्त केला. जय्यत तयारीनिशी लढाईला सुरुवात झाली.

शंभु राजांनी अगोदर साधा तोफखाना व नंतर अव्वल तोफखाना वापरला. मराठी तोफखान्यातुन उडवीलेला एक एक गोळा जवळपास पावणेचार शेराचा असायचा. मराठी तोफांच्या माऱ्यामुळे किल्ल्यावरील साठ-सत्तर घरांना आगी लागल्या सिध्दींचा प्रसिध्द आयनेमहालाचा तर पार चुराडा झाला.

तटाला असलेल्या कमानी नेस्तनाबुत झाल्या. नगारखान्याची तर पुरती वाताहात होऊन हाबश्यांची अपार हानी झाली. जवळपास अर्धा किल्ला पाण्यात ढासळला गेला. परंतु तरीही हाबशी शरण येत नव्हते. शेवटी किल्ल्यावर सैन्य घुसविणे व किल्ला ताब्यात घेणे हाच पर्याय शिल्लक होता. परंतु किल्ल्याच्या तटबंदीवरील तोफखाना एकही जहाज किल्याच्या विशिष्ट अंतरावर पोहोचण्या आगोदरच उडवून देत होता. तेव्हा सेतु बंद तयार करुन सैन्य पुढे काढायचे योजिले. त्याप्रमाणे गलबते

व त्यावरील तोफखाना यावरील संरक्षणात जवळपास आठशे गज लांबीचा सेतु उसळत्या पाण्यात बांधुन काढण्यात यश आले.

आता दोन ते तीन दिवसातच किल्ला पडणार अशी स्वत: हाबश्यांना खात्रीच झाली व त्यांनी रात्रीचाच पलायनाचा बेत केला. शंभु राजे काही मागे हटायला तयार नव्हते आणि जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात जाऊच नये यासाठी इंग्रज, पोर्तुगीज व मोघल नेहमीच प्रयत्नशील असायचे. म्हणुनच औरंगजेबाने नेमके या मोहिमेच्या ऐनमोक्याच्या वेळीच हसन अली नावाच्या सरदाराला नाशिक मार्गे कोकणात वीस हजार घोडदळ व पंधरा हजार पयदळानिशी घुसविले होते व तो मोठ्या प्रमाणात जाळपोळ व लुटालुट करत कल्याण ताब्यात घेऊन वेगाने पुढे सरकत होता.

पुढे पनवेलमार्गे रायगडाकडे कुच करण्याचा व रायगडाला मोर्चे लावण्याचा त्याला बादशहाने आदेश दिला होता. अशा प्रसंगी रायगड धोक्यात घालुन जंजिऱ्याच्या मोहापायी राजांनी जास्त वेळ थांबणे स्वराज्यासाठी धोकादायक ठरले असते. म्हणुन राजांना नाईलाजास्तव दादजी देशपांडे व दर्या सारंग, मायनाक भंडारी या सर्वांच्या दबावामुळे जंजिऱ्याची मोहिम अर्धवट सोडूनच परत फिरावे लागले होते.

पुन्हा एकदा नवव्या वेळीही जंजिरा ताब्यात येताना दैवगतीने मराठ्यांचा घात केला होता.

- - - - - - - - - - -

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १० रुधिरोद्गारी संवत्सरे पौष बहुल द्वादस गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस सिव्हासनाधीश्वर श्री राजा शुंभु छत्रपती स्वामी याणीं देशमुखानी प्रांत वाई यांसी आज्ञा केली ऐसी जे सुलतान माजम व शायदीखान

श्री शंभुनर
पति हर्षनिदान मोरे
श्वरसुत नीळकंट
मुख्य प्रधान

गनीम दोही कडून कोकणांत उतरला या प्रसंगे हश यांचे बहुतच प्रयोजन आहे याकरिता राजश्री संताजी येमाजी सरमिरा ++ यांला नौ संचणी हशमाचा जमाव करावयाबदल वरघाट प्रांते (पाठ)विले असे हे तुम्हांला हशमाचे जमावाविशी सांगतील तेण्हेप्रमाणें (ह) शम नै संचणी करून पाठऊन देणें हे काम म्हणजे बहुत नाजु(क आहे) या प्रसंगे जरी हशमाचा पोख्त जमाव जाला तरी गनिमाचा काय (गु) मान लागला बुडविलाच जातो येवढें काम जाल्यानें तुमचा बहुतच मजुरा होतों आजीवरी स्वामीने तुचमे चालविले ते सार्थक यां दिवसांत करून आपला मजुरा करून घेणे हशमाविशई संताजी येमाजी तुम्हाला कितेक सांगतील तेण्हेप्रमाणे तुम्ही तलाष तरतूद करून हशम पाठऊन देणें म्हणजे स्वामी तुम्हावरी संतोशी होतील आपलें समाधान असों देणें लि।। प्र।। वर्तणूक करणें लेखनालंकार मर्या । असा तीन ओळींचा मो.)

देयंविज ।
यते ।

शंभु छत्रपती स्वामी–देशमुखानी प्रांत वाई

सुलततान मांजम व शाबदीखान गनीम दोहीकडून कोकणात उतरला, याप्रसंगे हशमांचे बहुत प्रयोजन आहे. करितां रा. संताजी यमाजी सरमिरा+यांला नौसंचणी हशमाचा जमाव करावयाबद्दल वरघाट प्रांते पाठविले असे. ते सांगतील तेण्हेप्रमाणे नौसंचणी करून पाठऊन देणे. हे काम बहुत नाजूक आहे; याप्रसंगी जरी हशमाचा पोख्त जमाव जाला तरी गनिमाचा काय गुमान लागला बुडविलाच जातो. जमाव पाठविणे. स्वामी संतोषी होतील. आजीवरी स्वामीने तुमचे चालविले ते सार्थक ह्या दिवसांत करून आपला मुजरा करून घेणे. तलाश तरतूद करून हशम पाठवून देणे.

श्री

अजरह्खाने मशुरुल अनाम राजश्री मालोजीराय घोरपडे साहेब. दामदौलतहु बजा-नेबु कारकुनानी व देसाईयांनी परगणे केळूर ममदाबाद, सुरूसन इहिदे समानीन अलफ दीरविला. श्रीनिवासभट बिन वेंकटभट दुनारदार साकीन मुद्गल हुजर येऊन मालूम केले जे, आपणास इनाम व

रोजमरा दरसवाद.

कसबे मजकूर वगैरे.

जमीन रेगडी. रोजमरा जकाईत पैकीं रोजीन रुके बारा।

६ १ कसबे होनगुंदे.

६ १ तिमापूर.

६ १ कलदेवनहाल.

६ १ बेवीन मोठी

---

६ ४

यासी दुतर्फा दरवाद कसबे मजकूर.

कार्तिकमास. माघमास.

वैशाखमास.


दरमाहे शेला १ एकूण.

•|=एकूण - प ***६ =सादिलवार -- मि *** भोगवटा.

दरसवाद मौजे रामवाङिगी जमीन कुडो ६ =.

येणें प्रमाणें बहहुकूम खुर्दखतानें था मुकासा ईखानीं कारकीर्दी महाल नख्त याती व बाजे उडबती व पायपोसा व मेजवानीपटी व बेलेकटी व कबुलायती व मोहिमखर्च कुलबाब, कुलकानू भोगवटा तसरुफाती तागाईत सालगुदस्त चालत आहे. हल्ली साहेबास मुकासा अर्जानीं जाला आहे. महालीचे कारकून खुर्दखताचा उजूर कारितात म्हणून मालूम केलें, तरी भोगवटा व तसरुफाती तागाईत सालगुदस्त चालिलें असेल त्याप्रमाणें चालवावें. तालिफ घेऊन अस्सल परतोन दीजे. तारीख २८ महे रमजान.

रुजू सुरनीस.



बाल परवेशी

स्वराज्याच्या उभारणीसाठी व रक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या बाबतीत शिवाजी महाराज कमालीचे जागरुक होते. म्हणुनच त्यांनी जाणिवपुर्वक रायगडावर हत्तीखाण्याजवळच एक मोठे बाल परवेशी गृह बांधले होते.


बालपरवेशी गृह म्हणजे लढाईत जे सैनिक कामी येतात त्यांच्या मुलांसाठी राजाने स्वखर्चाने त्यांच्या पालन पोषण व शिक्षणासाठी केलेली व्यवस्था होय. अशा सर्व मुलांचे संगोपन करुन स्वबळावर उभे करेपर्यंतची सर्व जबाबदारी राजांनी सांभाळायची. पुढे या मुलांना मुलकी अथवा सैन्यात नोकरी देऊन कायमचे पुर्नवसन करायचे. जर अशा मुलांची आई सुध्दा एकटी असेल, त्यांचे जवळचे सांभाळणारे नातेवाईक वगैरे नसतील तर अशा मातेचीही सांभाळ करण्याची व्यवस्था या बालपरेवशी गृहात केली जायची.

स्वराज्याच्या सेवेसाठी लढणाऱ्या सैनिकांच्या मुलाबाळांची त्यांच्या पत्नीची आबाळ होऊ नये यासाठी चालु केलेली परंपरा संभाजी राजांनी त्यांच्याही काळात मोठया नेटाने चालु ठेवली. लोक कल्याणाच्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याचे कसोसीने प्रयत्न केले गेले. जरी स्वराज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली होती तरी कोणत्याही प्रकारची उपेक्षा या युध्दग्रस्त सैनिकांच्या कुटूंबीयांची होणार नाही याची पुरेपुर दक्षता संभाजी राजांनी घेतली होती.

शिवाजी राजांच्या वेळी या बाल परवेशी गृहात एकुण सत्तर बालपरवेशी होते. जंजीऱ्याच्या लढाईत जवळपास चारशे सैनिक कामी आले होते. त्यांच्यातील तीस सैनिकांची एकुण तीस नवीन मुले या बालपरवेशी गृहात दाखल केली गेली होती. अशा प्रकारे संभाजी राजांच्या काळात जवळपास शंभर बालपरवेशी रायगडच्या बालपरवेशी गृहात असल्याची नोंद सापडते.

एकदा दुर्गादास राठोडांना या बद्दल कळले तेंव्हा त्यांनी आपण संपूर्ण हिंदुस्तान पालथा घातला असुन असा प्रजाहित दक्ष राजा कोठे पाहिला नसल्याचे शंभु राजांबद्दल गौरोद्गार काढल्याची पोच पावती इतिहासात मिळते.

- - - - - - - - - -



थोरातांची कमळा

थोरातांची कमळा नावाचे प्रकरण नाटककारांनी अगदी भल्यापैकी रंगवुन संभाजी राजांना या लोकांच्या माड्यांवर बसवुन आपले उखळ पांढरे करण्यासाठी शोधलेले एक नामी पात्र म्हणजे थोरातांची कमळा.

यशवंतराव थोरात नावाचे एक शुर मराठा सरदार होते. ते करवीर कर संभाजी राजे यांचे तर्फे लढताना पन्हाळ्याच्या पायथ्याशी छातीत भाला लागुन मरण पावले. अर्थात हा काळ शाहुंचा. स्वराज्याचे चौथे छत्रपति यांच्या काळातला हा प्रसंग. तेव्हा त्यांची पत्नी गोडाबाई (कमळा) यांनी अग्नी प्रवेश करुन त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती गेल्या. तेव्हा सरदार थोरातांच्या घराण्याने यशवंतराव थोरात यांची व गोडाबाईंची समाधी पन्हाळ्याच्या पायथ्याला आठवण म्हणुन बांधली.

ज्या ठिकाणी समाधी उभारली गेली त्याठिकाणी या बलीदानी पती-पत्नीचे स्मारक म्हणुन एक स्त्री व पुरुषाची दगडी मुर्ती स्थापन केलेली आहे. ही मुर्ती अगदी ढाल तलवार अशा शस्त्रांनी सज्ज असल्याचे दाखवीले गेले आहे. असे असुनही थोरातांच्या या कमळाचा संभाजी राजांशी ऐनकेन प्रकारे संबंध जोडण्याचा बखरकारांचा व नाटक कारांचा हा खोटारडेपणा पन्हाळयाचे इतिहास संशोधक मु.गो. गुळवणी यांनी प्रचंड अभ्यास करुन संशोधन करुन उघडा पाडला. त्यामुळे संभाजी राजांनी या महिलेवर अतिप्रंसग केला. मग तिने कड्यावरुन उडी टाकुन आत्महत्या केली व संभाजी राजांनी या महिलेच्या पतीचा कडेलोट केला वगैरे अशा बाजार गप्पा करण्यात आल्या.

एखाद्या महिलेवर बलात्कार होऊन जर तीचे स्मारक बांधले जात असेल, समाधी बांधली जात असेल तर किती आश्चर्याची गोष्ट म्हणायला हवी. इथे नुसता विनयभंग झाला तरी महिला पोलीसात जायला प्रतिष्ठेमुळे घाबरतात आणि या ठिकाणी तर बलात्कारीत महिलेची समाधीच उभी केली जाते. ती ही तिच्या पतीसह यावरुन या गोष्टीचा खोटारडेपणा नक्कीच सिध्द होतो.

खरे तर संभाजी राजे एवढे लढाई व मुलखी कारभारात मग्न होते तेंव्हा

असल्या गोष्टी करायला त्यांना वेळ तरी कोठून मिळणार होता. परंतु रायगडापेक्षाही जास्त काळ संभाजी राजांचे वास्तव्य पन्हाळा किल्ल्यावर होते. त्यामुळे त्यात ही गोष्ट सहज पचुन जाईल म्हणुन रचली गेली असली पाहीजे.


आणि जर संभाजी राजे तसे असते तर संपूर्ण मराठा लष्कर व सर्व सामान्य जनता शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजी राजांच्या पाठीशी ठामपणे उभी राहीली नसती. शिवाय त्यावेळचे इंग्रज पोर्तुगीज किंवा मोगलांच्या पत्रातही संभाजी राजांच्या असल्या एकाही गोष्टींचा साधा उल्लेखही नाही. हाच पुरावा खुप मोठा मानता येईल.

कारण शत्रुपक्ष नेहमी शत्रुच्या कमजोरी शोधण्यात व्यस्त असतात आणि त्याचा लाभ ऊठवू इच्छितात. मग अशा इंग्रज, पोर्तुगिज, मोगल किंवा त्यावेळचे प्रवासी यापैकी कोणालाही असे काही दिसले नाही त्यांनी तसे काही लिहीले नाही.

परंतु महाराष्ट्रातील बखरकारांनी मात्र अशा प्रकारचा इतिहासाचा विपर्यास करायला मागेपुढे पाहिले नाही. कारण त्यांचे हितसंबंध व छत्रपती शिवाजी महाराजांनी चालू केलेली समाज सुधारणा. बंद केलेली वतनदारी पध्दत यामुळे येथील वतनदार व जहांगिरदाचे संपत चाललेले अस्तित्व व त्यांनी विकत घेतलेले बखरकार यांनी लिहीलेला हा इतिहास खरा असुच शकत नाही. यांनीच जाणिवपुर्वक शिवपुत्र संभाजीला बदनाम करुन स्वराज्याची संकल्पना मोडीत काढण्याचा पडद्याआड्डुन कपट नितीने प्रयत्न केला ते महाराष्ट्रातील जनता ओळखुन आहे.

- - - - - - - - - -

मालोजीराव घोरपडे – कारकून व देसाई परगणे कैलूर ममदाबाद मद्गल येथील श्रीनिवासभट वेंकटभट यांनी जुरूर येऊन सांगितलें कीं, कसबे होनगुंदे, तिमापूर, कलदेवनहाल, बेवीनमोटी येथील जमीन ४ आणि जकातपैकी रोजमुरा बारा रुके, %, वैशाख, कार्तिक माघ मासी शेला १ आणि रामवाडिगी जमीन कुडो = येणें प्रमाणें चालत आहे. शिवाय, इतर सात पट्या साल गुदस्त चालत आहे. हल्ली साहेबास मोकासा अर्जांनी चाला आहे. तरी साल्गुा प्रमाणें चालवावें.



औरंगजेबाचे संभाजी राजांना प्रशस्ती पत्र

एके दिवशी चिंताग्रस्त बादशहा आपल्या वजीराला दु:खी अंतकरणाने सांगत होता की एक दिड वर्षामागेच गोवळकोंडयांचा कुतुबशहा आम्हास शरण आला असता. परंतु संभाजीराजांची आणि कुतुबशहाची मैत्री असेपर्यंत कुतुबशहा शरण येऊ शकत नव्हता. म्हणून औरगंजेबाने एक कुट नितीचा प्रयोग म्हणून या संर्दभात एक पत्र कुतुबशहाच्या मध्यस्थीने संभाजीराजांना पाठवले.

पत्र देताना एका मुसलमान राजाने एका मुसलमान शहनशहाला मदत करण्याची भूमीका म्हणून कुतुबशहाने संभाजी व औरंबजेब यांच्यात तह व्हावा व दक्षिणेतील ही अजाशी मोहिम एकदाची सपंवून आपण एकदाचे यमुनापार जावे असे बादशहाच्या फौजेतील बहुतेकांना वाटत होते. सैनिकांचे मनोर्धेय पूर्णपणे खचले होते.

दक्षिण मोहिम सुरु करुन सहा वर्ष उलटत आली तरी साधा एखादा छोटासा विजय मिळत नव्हता. आणी पुढील अनेक वर्षे या लढाईचा निकाल लागणार नव्हता. म्हणूनच औरंगजेबाच्या फौजा परत आपल्या घराच्या दिशेने परतण्यासाठी आतूर होत्या. त्यामुळे फौज विस्कळीत होऊ नये किंवा फौजेने बंड पुकारण्यापूर्वीच अशा प्रकारचा तह घडून यावा म्हणून बादशहाने असा प्रयोग करायचे ठरवले.

संभाजीराजाला पाठवलेल्या पत्रात बादशहाने असा प्रस्ताव दिला होता की तुमचे सारे डोंगरी किल्ले आमच्या ताब्यात द्या आणि त्याच्या बदली तुम्हाला हवी तेवढी जहागीरी देतो. परंतु ती उत्तेरेकडील मैदानी मुलखातील. बादशहाच्या या वाक्यावरुन आपणास अंदाज येईल की या महाराष्ट्रातील एका एका किल्ल्याबाबत बादशहाला किती दहशत होती. आणि बादशहाची ही भीती नाशिक जवळील टेकडीवजा रामशेज किल्ल्याने खरी करुन दाखवली होती. एवढा छोटाशा किल्ला परंतु त्याने बादशहाला सहा वर्षे झुंजावले होते.

बादशहा पुढे आपल्या पत्रात असे म्हणतो की अशी पाच पाच लाखाची फौज घेवून या म्हातारपणामध्ये अजून किती वर्षे सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात कोठे कोठे भटकायचे. तेही कसल्याही विजयाची शक्यता नसताना या राना वनात अजून किती भटकून पडायचे.

संभाजी राजांनी या पत्रात दिलेले उत्तर अगदी पुरु राजाने जगजेत्या सिकंदराला दिलेल्या उत्तरासारखे बाणेदार होते यात शंका नाही. असल्या फडतुस प्रस्तावाचा संभाजी राजांनी चांगलाच समाचार घेतला. अशा प्रकारचा संदेश घेऊन आलेल्या वकीलाच्या अंगावर ते रागाने एवढ्या जोराने थुंकले म्हणतात की बराच वेळ तो वकील डोळे बंद करुन तसाच उभा राहीला. आता परत डोळा उघडू की नको असेच त्याला झाले. कदाचित तो वकील डोळे बंद करुन बादशहाची कबर या महाराष्ट्रातच खोदली जाणार की काय हे पहात होता आणि म्हणुनच पुन्हा लवकर डोळे उघडण्याची त्याची हिम्मत होऊ शकली नाही.

वकीलाने घडलेला हा सर्व प्रसंग सांगत असताना बादशहाला काय वाटले असेल याची कल्पना केलेली बरी. याच प्रसंगाची जेव्हा पुन्हा एकदा बादशहाला आठवण येते आणि बादशहा वजीराला प्रश्न करतो की अरे या मराठ्यांच्या जाती कसल्या आणि किती रे! ही माणसे कशाची बनलीत लोखंडाची की पोलादाची! काही झाले तरी शरण येत नाहीत! युध्दात हारण्याचा तर प्रसंगच नाही आणि आम्हाला तर विजयाची सुरुवातही होऊ देत नाहीत.


तेव्हा वजीर बादशहाला सांगतो की लोक सांगतात त्याप्रमाणे या मराठ्यांच्या ९६ जाती आहेत. आणि हे सर्व मराठे कट्टर देशभक्त आणि देशासाठी बलिदान होण्याची जीवाचे रान करण्याची तयारी ठेवणारे असतात. तेव्हा मराठ्यांची वजीराकडून होणारी प्रशंसा न पहावल्याने बादशहाने रागाने काढलेले उद्‌गार इतिहासात अजरामर ठरतील असेच आहेत. आणि याची सर्व मराठी माणसांनी नोंद घ्यावीच लागेल.

बादशहा म्हणतो माझ्या मते या महाराष्ट्रातील मराठ्यांच्या फक्त दोनच जाती. आणि त्या म्हणजे माझ्या समोर लढणारे एक मराठे जे देश धर्मासाठी हातात प्राण घेवुन उन्हा पावसात राना वनात स्वाभीमानाने लढणारे मर्द मराठे आणि दूसरे म्हणजे वतनाच्या तुकड्यासासाठी लाचार कुत्र्याप्रमाणे परकीयांच्या पायवर लोळण घेणारे मांडलिक मराठे. ज्यांचा जन्म कोणाची तरी गुलामी करण्यासाठी झालेला आणि कोणी तरी धनी शोधुन आपली वतने आणि संस्थाने टिकवणारे दुसरे गुलाम मराठे. ते शिवाजी आणि संभाजी हे फक्त दोनच माझ्या मते खरे मराठे आणि तेच या देशभक्त मराठयांचे मुकटमणी आहेत. बाकीचे काय नुसते बाजार बुणगे. कमरेला नुसत्या तलवारी बांधुन त्यांचा कधीही उपयोग न करणारे कमजोर मनगटाचे, कचदील मराठे.

संभाजी हाच या मराठ्यांचा महामेरु आणि तोच खरा देशभक्त जो माझ्यासारख्या आलमगिराला या सह्याद्रीच्या कडेकपारीत सहा सहा वर्षे मुंड्या डोक्याने मोकाट कुत्र्याप्रमाणे फिरवीत आहे आणि बाकीचे मराठे वतनाच्या चिंद्यासाठी आपल्या पोराबाळांच्या पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठी भिक मागणारे मराठी आहेत. धन्य तो शिवाजी ज्याने अशा पराक्रमी पोराला जन्म दिला.

मला असलेल्या चार नादान पोरांपैकी एक जरी असा शेर जन्माला आला असता तर या वयात आलमगिराला असे स्वत: युध्द भुमीवर हजर राहण्याचे कारणच नव्हते. धन्य ती माता धन्य तो महाराष्ट्र देश ज्यांनी अशी पराक्रमी माणसे जन्माला घातली आणि देशासाठी लढणे आणि मरणे त्यांच्या पाचवीला पुजले. आईच्या गर्भातच ज्यांना झुंजण्याचे बाळकडू पाजले जाते ते मेल्यानंतरही किर्तीच्या रुपाने देशासाठी झुंजण्याशी पुढील पीढीला प्रेरणा दिल्याशिवाय कसे राहतील आणि असेच तरुण आमच्यासारख्या परक्या साम्राज्यवाद्यांची कबर याच ठिकाणी खोदणारे मराठे. म्हणुनच या राष्ट्राचा इतिहास मोठा आणि या राष्ट्राचे नाव महाराष्ट्र.

- - - - - - - - - -



कल्याणची लढाई

कल्याणचे बंदर म्हणजे जगाच्या आयात निर्यात व्यापाराचे नाक होते. येथुनच इस्तंबुल, पॅरिस, लंडन ते आफ्रिका तसेच जावा सुमात्रा पर्यंत व्यापार चालायचा. त्यामुळे कल्याण हे बंदर सोन्याची लंका होती. शिवाय मराठ्यांचा कोकणातुन नाशिक बागलाणकडे जाणारा रस्ताही कल्याणमधुन जात होता.

त्यामुळे कल्याण शत्रुच्या ताब्यात गेले तर बागलाणकडे जाणारी रसद बंद पडली असती व खानदेशकडचे पंचवीस तीस किल्ले रसदेअभावी शत्रुच्या घशात आपोआपच पडण्याची शक्यता होती. म्हणुन कल्याण ताब्यात ठेवणे अत्यावश्यक होते हे राजांना चांगलेच ठाऊक होते. शिवाय औरंगजेबही हे चांगलेच ओळखुण होता. म्हणुन त्याने दोन तीन महिन्यापुर्वीच रणमस्त खानाला कल्याण ताब्यात घेण्यासाठी मोठया फौजेसह पाठविले होते. परंतु मराठ्यांनी त्याची डाळ शिजु दिली नव्हती.

राजांनी जातीने कल्याणची मोहीम हाती घेतली व कल्याणचा पुरता बंदोबस्त केला. कल्याणच्या खाडीत घुसलेल्या डोंगराच्या टोकाला पारसीक गाव होता. तिथे राजांनी एक नवा किल्ला बांधला. पाण्यापासुन तुटलेल्या पंचवीस फुट उंचीच्या प्रचंड खडकावर किल्ला बांधला गेला. शिवाय समोरच्या सागरात प्रचंड मोठे ओंडके टाकुन त्यावर एक मेढेकोटही बांधला आणि त्यावर अनेक तोफा पेरल्या. तसेच किल्ल्याच्या पाषाणी तटबंदीलाही अनेक गंजा तयार करुन तेथुन बत्या ठासायची व्यवस्था केली.

उद्या जर पोर्तुगिज मोघलांच्या मदतीला धावतील तर त्यांना याच मार्गाने जाणे भाग होते. त्यामुळे त्यांना जाळून काढण्यासाठी किंवा त्यानां थोपवुन धरण्यासाठी ही नामी युक्ती रचली गेली होती. तातडीची अनेक कामे खोळंबली असल्यामुळे कल्याणची व्यवस्था करुन राजे रायगडाकडे परतले. चारच दिवसात पोर्तुगिजांनी बेईमानी करुन मोघलांना रसद पुरवीण्याचे काम सुरु केले.

राजांनी ताबडतोब सेनापती हंबीरराव मोहितेंना कल्याणकडे धावायला सांगितले. पोतुगिज व मोघल एक होण्याअगोदरच्च त्यांना तोडणे आवश्यक होते. हंबीरराव आपल्या वीस हजार घोडदळ व दहा हजार पायदळासह वेगाने कल्याण परिसरात घुसले. कल्याणच्या खाडीत मोठी लढाई जुंपली. मराठे रणमस्त खानाला पुरते मोडीत काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत होते. ठाण्याच्या किल्ल्यावरुन पोर्तुगिज हा सर्व खेळ

पहात होते. मराठ्यांच्या गनीमी काव्याने रणमस्त खान पुरता जेरीस आला होता.

मराठ्यांनी प्रचंड मारा करुन कल्याणचा तट पाडला दुर्गाडी किल्लाही पडु लागला तसा रण मस्तक खान टिटवाळ्याकडे पळाला. टिटवाळयाच्या खिंडीजवळ मोठी हातघाईची लढाई झाली. तोपर्यंत स्वतः शंभु राजे डोंबिवलीपर्यंत येऊन पोहोचले होते. राजांनी आजुबाजूच्या वस्तीतील जंगलातील सर्व भंडारी, कातकरी, आगरी गोळा केले व भल्या पहाटेच पोर्तुगिजांवर हल्ला चढवीला. कित्येक फिरंगी पाण्यात बुडून मेले.

सकाळपर्यंत पोर्तुगिजांनी पळ काढला होता. आता राजांनी कल्याणकडे आपला मोर्चा वळवीणे आवश्यक होते. त्याप्रमाणे ते रणमस्त खानाच्या पळून जाण्याच्या वाटेवर आपल्या वीस हजार फौजेसह दबा धरुन बसले. हंबीरराव मोहीत्यांनी रणमस्त खानाला चांगलाच मार दिला होता. त्याचे अनेक नामवंत सरदार मारले गेले होते. त्यामुळे आता तो टिटवाळयाकडे पळत होता.

रात्री ठरल्याप्रमाणे एकीकडून हंबीर मामा व दुसरीकडुन संभाजी राजे असा दोन्ही बाजुंनी हमला चढवुन रण मस्त खान व रहुल्ला खानाला घाटात अडवीले होते. अडकीत्यात सुपारी अडकावी तसे मोघलांना अडकवीले गेले होते. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत अटीतटीची लढाई झाली.

मोघलांची फौज जीव घेवुन वाटेल त्या दिशेला पळु लागली होती. शेवटी राजांची सरशी झाली. परंतु हंबीरमामांचे मेहुणे रंगोजी युध्दात मारले गेले होते. सेनापतींनाही डाव्या हातावर एक बाण लागुन इजा झाली होती बाकी विजयश्री खेचुन आणण्यात मराठ्यांना यश मिळाले होते मोघलांनी चांगलीच दहशत खाल्ली होती.

- - - - - - - - - - -

मियाँ खान

मियाँ खान हा औरंगजेबाचा दक्षिणेतील अत्यंत विश्वासू सरदार. खरे तर तो आदिलशाहीशी संधान बांधून असायचा व येथील सर्व खबरी इमानेइतबारे तो औरंगजेबाला वेळोवेळी देत असे. मियाँ खान औरंगजेबाचा एकदम विश्वासू होऊ लागल्याने असंतुष्ट लोकांनी बादशाहकडे खोट्यानाट्या तक्रारी करुन बादशहाचा त्याच्यावरील विश्वास चांगलाच डळमळीत केला.

औरंगजेब अगोदरच संशयी स्वभावाचा. त्याने मियाँ खानला कसलीही चौकशी न करता अंधार कोठडीत टाकले. संभाजीराजे दिलेरखानाला जाऊन मिळाल्यावर बहादूरगड येथे ज्या महालात मुक्कामी होते त्याच्या पाठीमागच्या बाजूलाच असलेल्या अंधार कोठडीत गेले कित्येक महिने मियाँ खान बंदीस्त होता. संभाजीराजांना रात्री अपरात्री व शांततेच्या वेळी खोकल्याचे व रडल्याचे आवाज यायचे. त्यामुळे राजांची उत्सुकता ताणली गेली व राजांनी सर्व माहीती गोळा केली.

आपण बंदीखान्यात असल्याचे दु:ख नसुन काही दिवसापुर्वीच माझ्या मुलींची लग्ने ठरवीली होती व त्याच वेळी बादशहाच्या तुरुंगात रवानगी झाल्यामुळे आता मुलींच्या लग्नाची ठरलेली तारीख जवळ आल्याने पित्याच्या गैरहजेरीत मुलींची लग्ने कोणी लावायची? आणि पै पाहुण्यांना काय सांगायचे? अशी ती सर्व अडचण होती. एका पित्याच्या गैरहजेरीमुळे दोन मुलींची लग्ने थांबलेली आणि प्रश्न अत्यंत प्रतिष्ठेचा होता. कारण मियाँ खानाचे कोणी जवळचे नातेवाईक दक्षिणेत नव्हते.

अशा वेळी संभाजी राजांनी मियाँ खानाला मदत करण्याचे धाडस केले. संभाजी राजे एक तर मोघलांचे तात्पुरते पाहुणे आणि मियाँ खान राजबंदी असे असुनही राजांनी जोखिम उचलली. म्हणतात ना! नियत साफ असेल तर माणसाला परिणामांची पर्वा करण्याचे कारण नाही. त्यामुळे आपल्या हातुन जर एक चांगले कार्य होत असेल तर वाट्टेल त्याच्या रोषाला सामोरे जावु अगदी आलमगीर औरंग्याच्या असे निश्चित करुन संभाजी राजांनी मियाँ खानाला त्या बंदीखान्यातुन सोडवीले. आणि त्याच्या ठिकाणी आपला विश्वासु साथीदार जैनुद्दीन याला आत मध्ये नेऊन बसविले.

प्रश्न होता तो फक्त दोनच आठवड्यांचा परंतु कसलाही जामिन न घेता ओळख

पाळख नसतानाही संभाजी राजांनी एका पित्याचे दु:ख लक्षात घेवुन त्याच्या मुलींची लग्ने वेळेत लागावीत म्हणुन केलेले हे धाडस जिवावरही बेतले असते. हुकुमाशिवाय राजबंद्याला फरार करुन त्याच्या जागी दुसऱ्याच कोणाला तरी मियाँ खान म्हणुन बसवीणे हा आणखी एक अपराध होणार होता. परंतु राजांनी त्याची पर्वा केली नाही. अगदी आग्रा येथे जसे शिवाजी राजांच्या जागी फिरोजी फर्जंद व मदारी मेहतर हे लोक सोंग घेऊन शिवाजी राजांच्या भुमिकेत पडुन राहीले तोवर शिवाजी राजे बादशहाच्या हातावर तुरी देऊन पसार झाले होते. विश्वास हाच जामीन देऊन मियाँ खान मुक्त झाला होता. ठरल्याप्रमाणे त्याने नेकी आणि इमानदारी दाखवली व तो वेळेत परत आला.

एका हिंदु राजाने एका मुसलमान बंदीवानाला केलेली मदत व आपल्यामुळेच माझ्या मुलींचे उद्धवस्त होणारे संसार वाचल्यामुळे आपण प्रसंगी प्राणाचे बलीदान देऊ परंतु हे उपकार या जन्मातच काय परंतु पुढच्या सात जन्मीही विसरणार नाही असे आश्वासन कृतज्ञतेपोटी मियाँ खानाने दिले. जातीचा खरोखरच तो मुसलमान होता. दिलेल्या शब्दाला जागणारा प्रामाणिक मुसलमान. केलेल्या उपकाराची जाण विसरणारांपैकी अवलाद मियाँ खान नव्हता. याच मियाँ खानाची पुढे काही दिवसांनी बादशहाने आरोपातुन मुक्तता केली व त्याची रवानगी नगरच्या किल्ल्यावर केली.

याच ठिकाणी मियाँ खानाची व शंभु राजांच्या भगीनी राणु अक्का, पत्नि दुर्गाबाई व कमळजा यांचाही परिचय झाला व त्याने त्यांचीही तेथे जमेल ती सेवा केली. याच ठिकाणी मियाँ खानाला संभाजी राजांच्या जिवीताला औरंगजेबाकडुन धोका असल्याची व संभाजी राजांना दिलेर खानाच्या तावडीतुन कैद करुन ताब्यात घेण्यासाठी औरंगाबादहुन पाच हजाराची विशेष फौज रवाना होणार असल्याची विश्वसनीय बातमी संभाजी महाराजांना योग्य वेळेत पोहोचविली आणि त्यामुळेच अगदी शेवटच्या क्षणाला का होईना परंतु अत्यंत शिताफीने संभाजी राजांना दिलेर खानाच्या तावडीतुन पसार होता आले.

पुढे जवळपास आठ नऊ वर्षानंतर औरंगजेबांने संभाजी राजांना कपट कारस्थानाने पकडल्यानंतर संभाजी राजांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन बहादुर गडावर ठेवण्यात आले. त्यावेळी मियाँ खानाने आपली बदली करुन घेवुन बहादुर गडावर राजांच्या छुप्या सेवेसाठी हजर झाला. तेथे बंदी खान्यात संभाजी राजांना व कवी कलशांना अन्न पाण्याची कसलीही सुविधा नव्हती.

तेव्हा कैद खान्याच्या साफ सफाईच्या व देखभालीच्या नावाखाली मियाँ खान वेळेवेळी राजांना भेट देऊन आधार द्यायचा व राजांना फलाहार व पिण्यासाठी पुरेसे

पाणी उपलब्ध करुन द्यायचा. याच मियाँ खानाने अगदी जीवावर उदार होवुन येसुबाईंनी रायगड़ावरुन पाठवीलेला निरोप संभाजी राजांपर्यंत पोहोचविला. परंतु संभाजी राजे कैदी असल्यामुळे उत्तर पाठविण्यासाठी ना लेखना ना कागद उपलब्ध.

तेव्हा पुढे काय रणनिती असावी हे मार्गदर्शन करणारे पत्र येसुबाईंना पाठविणे अवघड होते. तेव्हा याच मियाँ खानाने विजापुरातील चार तल्लख बुद्धीचे विद्वान वेशांतर करुन सैनिकांच्या रुपात राजांसमोर मध्यरात्री हजर केले.

राजांनी सांगितलेले वाक्य न वाक्य त्या चौघांनी बहादुर गडातुन वेशांतर करत बाहेर निसटून रायगडावर जाऊन येसुबाईंना जसेच्या तसे सांगितले. सांगा मित्रांनो एवढा प्रामाणिक मनाने, एकनिष्ठेने सेवा करणारा मुसलमान मियाँ खान संभाजी राजांसाठी प्रयत्न करतो. परंतु त्याचवेळी आपलेच लोक टीचभर वतनासाठी औरंगजेबाला जाऊन मिळतात आणि संभाजी राजांना कैद करवितात.

महाराष्ट्राच्या भाळी फासला गेलेला हा काळीमा मियाँ खानासारखा मुसलमान आपल्या राजनिष्ठेने पुसुन काढतो. मुसलमान समाजातील किमान काही लोक तर आपल्या स्वराज्याच्या संकल्पनेल मदत करतील असा ठाम विश्वासच शिवाजी महाराजांना असावा आणि म्हणुनच कदाचित त्यांनी त्यासाठीच याची सांप्रद लोकांना ओळख असावी म्हणुन रायगडावर स्वखर्चाने मशीद बांधली व काजी साहेबांना न्यायधीश बनवीले तर दौलत खानाला आरमाराचे प्रमुख केले.

शिवाय राजांचे अंगरक्षकही बहुतेक मुसलमानच असायचे. या देशातील मुसलमान सर्व सामान्य रयतेच्या कल्याणासाठी निर्माण झालेल्या स्वराज्याच्या रक्षणासाठी कायम इमानदार राहील, वफादार राहील हा राजांचा विश्वास खरा ठरला. स्वराज्याची लढाई ही धर्माची लढाई नव्हती तर औरंगजेबासारख्या ह्दयशून्य व अन्यायी सत्ताधिशांचे पारीपात्य करुन सर्व सामान्य रयतेला न्याय देणारी शासन प्रणालीच तयार करण्यासाठीचा तो प्रयत्न होता.

शिव प्रभुच्या पराक्रमांचे पोवाडे गाताना काही लोक जाणिवपुर्वक त्यांना मुसलमानांच्या विरोधात उभे करतात. मुसलमानांचा द्वेष व हिंदु समाजाची फसवणुक अशी दुहेरी प्रचार यंत्रणाच काही लोकांनी आपल्या स्वार्थाकरिता राबविली. शिवाजी महाराजांचे स्वराज्य जर मुसलमानांच्या विरोधात असते तर एकही मुसलमान राजांच्या नेतृत्वाखाली काम करु शकला नसता आणि शिवाजी महाराजांच्या,संभाजी राजांच्या जिवीताला दगाफटका सहज करु शकला असता. परंतु इतिहासात कुठेच असे घडले नाही.

उलट या देशातील या मातीशी इमान असलेला मुसलमान हा नेहमीच

छत्रपतिंच्या व संभाजी राजांच्या सुरक्षेसाठी छातीचा कोट करुन उभे राहीले असल्याचे अनेक प्रसंग सांगता येतील.

संभाजी आपल्या कैदेत असुनही चार लाख फौजेच्या गराडयातुनही संभाजीपर्यंत संदेश जातो व तेथुन पुन्हा रायगडावर उत्तरही पोहोचते याची काही दिवसातच खबर बादशहाच्या जासुदांना मिळाली. औरंगजेबाने पहारे व चौक्या यांची तपासणी करुन संदेश वहनाचे मार्ग बंद करण्याचा जातीने प्रयत्न केला. परंतु तरीही तसे झालेच आणि मग बादशहाचा संशयाचा भाला मियाँ खानाकडे वळाला राजांना कैद होऊन एक महिना झाला होता.

संभाजी राजे औरंगजेबाच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देत नव्हते व तह करायलाही कबुल होत नव्हते. त्यामुळे संभाजी राजांकडून काही अपेक्षा पुर्ण होणार नाही हे बादशहाच्या पुर्ण लक्षात आले. आणि बादशहाने अत्यंत धाडसी व क्रुर प्रयोग करण्याचा निश्चय केला. या प्रयोगाचे किमान दोन परिणाम त्याला अपेक्षित होते. एक संभाजी राजांचे डोळे काढुन संभाजीला मृत्युच्या दारात उभे करणे किंवा जिवीत रक्षणाच्या बदल्यात तह करायला लावणे. ही कामगिरी संभाजीला मदत करणाऱ्या मियाँ खानाच्या शुभ हस्ते करुन मियाँ खानाची सत्व परिक्षा पाहणे व स्वराज्यासाठीची मुसलमान मियाँ खानाची निष्ठा जोखणे.

ठरलेल्या दिवशी सळ्या तापवल्या गेल्या. बादशहाने मियाँ खानालाच आदेश दिला की तुम्ही आमचे विश्वासु व वफादार सेवक आहात तेव्हा तुम्हीच या तापत्या सळ्या संभाजीच्या डोळ्यात खुपसुन ही शाही सेवा करावी. बादशहाचा आदेश शिरसावंद्य मानत मियाँ खान त्या तापलेल्या लालबुंद झालेल्या दोन सळ्या दोन्ही हातात घेतो.

ईमानदारीच्या निखाऱ्यात तापवुन बलिदानासाठी लाल भडक झालेल्या त्या सळ्या संभाजी राजांच्या नेत्रापर्यंत जाण्याअगोदरच खाक होणार होत्या हे औरंगजेबालाच नव्हे तर आलम दरबारालाही माहित नव्हते. त्या तापलेल्या सळया हातात घेवुनच मियाँ खान एक एक पाऊल पुढे टाकतो. त्याच्या एका एका पावलावर संपूर्ण धरतीचे जणु वजन होते. हजारो चंद्रसुर्यांचा प्रकाश मियाँ खानाला संभाजी राजांच्या नेत्रामध्ये दिसत होते. अर्जुनाला श्रीकृष्णाने दाखविलेल्या विश्वरुप दर्शनाचीच ही पुनरावृत्ती होती. स्वधर्मे निधनम श्रेयं. माणसाने आपला स्वधर्म पालन करण्यासाठीच जगावे आणि त्या धर्माचे पालन करता करताच बलिदान व्हावे हाच तो गीतेचा संदेश.

मियाँ खानाला संभाजी राजांनी आपल्यावर केलेल्या उपकाराची राहुन राहुन आठवण येत होती. संभाजी राजांना कैदेतुन पळवुन पसार होण्याचाही त्याचा इरादा

होता. परंतु बहादुर गडापासुन जवळपास शंभर मैलापर्यंत कोणाकडेही बादशहाने घोडा शिल्लक ठेवला नव्हता. शिवाय बहादुर गड सपाटीच्या प्रदेशात असल्यामुळे रानावनांचा, डोंगर दऱ्यांचा फायदा घेऊन निसटता येण्याचीही अजिबात शक्यता नव्हती. आजपर्यंत जमेल तेवढी संभाजी राजांची मियाँ खानाने इमाने इतबारे सेवा केली होती. परंतु आताचा प्रसंग मात्र मोठा बाका होता.

बादशहाच्या आदेशाची अमंलबजावणी न करणे म्हणजे मृत्युशीच सामना करणे तर आपणच आपल्या हातांनी संभाजीचे डोळे काढणे म्हणजे आपणच आपल्या आत्म्याशी गद्दारी करणे होय. दोन्ही बाजु म्हणजे इकडे आड आणि तिकडे विहीर. प्रसंगी मृत्युला सामोरे जावु परंत आपण जिवंत असेपर्यंत संभाजी राजांच्या जिवीताला धोका निर्माण होणे नाही आणि असले राष्ट्रीय पातक आपल्या हातुन घडणे शक्य नाही असेच मियाँ खानाचे मन त्याला समजावत होते. आणि मियाँ खानाने निर्णय घेतला कराल काळाच्या जबडयात हात घालण्याचा.

मियाँ खान तप्त सळया हातात घेऊन जड पावलाने तसाच पुढे गेला राजांच्या नजरेला नजर भिडली.संभाजी राजांचे नेत्र त्याला अत्यंत तेजस्वी भासत होते. यातुन निघणाऱ्या अमृत किरणांचे मियाँ खान वेगाने प्राशन करीत होता आणि आपल्या स्वामी भक्तीने स्वराज्य निष्ठेने मियाँ खान अमर झाला. त्याने त्या तापलेल्या सळया संभाजी राजांच्या डोळ्यात खुपसण्याऐवजी स्वत:च्याच पोटात खुपसुन घेतल्या.

बादशहाचे हशम लगेच पुढे धावले. त्यांनी मियाँ खानाच्या देहाच्या जागीच खांडोळ्या केल्या. मियाँ खानाच्या शरीरातुन गरम रक्ताच्या चिळकांडया संभाजी राजांच्या अंगावर व पायावर पडल्या. कदाचित मियाँ खानाचे रक्त म्हणाले असेल "राजे तुमच्या पराक्रमाच्या, चारित्र्याच्या अंगरख्यावर स्वार्थी बखरकारांनी सुडबुद्धीने विक्षिप्त इतिहास लिहीण्याचा प्रयत्न केला तर तो आमच्या सारख्या ईमानदार सेवकाचे रक्ताचे ते डागच पुसून टाकतील व येणाऱ्या भावी पिढ्यांना स्वराज्यासाठी बलिदान देण्याची प्रेरणा देतील."

संभाजी राजांसाठी मियाँ खानाने आपले बलिदान दिले परंतु त्याला राजांच्या अंगावर कोणी चालुन गेलेले पसंद पडले नाही. आणि इकडे महाराष्ट्रात तर खुद्द छत्रपती शिवप्रभुंच्या डोक्यावर प्रतापगडच्या पायथ्याला वार करणाऱ्या अवलादी जन्माला आल्या. त्यांनीच संभाजी महाराजांचा खरा इतिहास लपवुन आपली काळी कृत्य इन कॅश करण्याचा प्रयत्न केला, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

- - - - - - - - - - - -

जिनत उन्निसा

औरंगजेबाची जिन्नत उन्नीसा ही मुलगी महाराष्ट्राच्या इतिहासात खूपच चर्चेला आली. त्याचे कारण म्हणजे संभाजी राजांशी बखरकाराने तिचा जोडलेला संबंध.

औरंगजेबाने संभाजी महाराजांना कैद केल्यावर, "तु मुसलमान होतोस तर तुला जिवदान देतो." असे म्हटले. तेंव्हा संभाजी राजांनी, "तु मला तुझी मुलगी देतोस तर धर्मांतर करतो." असे बाणेदार उत्तर दिले. असे बांडगुळ इतिहासकारांनी सांगुन आपली जात दाखविली. संभाजी महाराज छत्रपती असताना एखाद्या मोगल मुलीशी लग्न करु शकले नाहीत तेंव्हा तें बंदीवान असताना अशी मागणी कशी करतील ? एवढे सुद्धा बिनडोक इतिहासकारांना कळत नसेल असे नाही. परंतु त्यांचा हेतुच मुळी दिशाभूल करण्याचा होता हे नक्की.

औरंगजेबाने किंवा कोणत्याही मोगल बादशहाने आपल्या मुली हिंदुना दिल्या नाहीत. अगदी राजपूतांसारख्या गुळगुळीत भूमिका घेणाऱ्या सत्ता टिकवून ठेवण्यासाठी, अस्तित्व राखण्यासाठी तडजोड करणाऱ्या समाजातही अकबर आणि जहांगिर यांच्या पत्नी राजपुत हिंदु होत्या. म्हणजेच औरंगजेबाची सख्खी आजी व पंजी हिंदु होत्या तरी औरंगजेब कट्टर भारतवंशाचा द्वेष्टा होता. तो स्वतःला तुर्क वंशीय म्हणुन घेण्यात धन्यता मानत असे. त्याने आपली एकही मुलगी त्याच्या दरबारातील वजनदार पराक्रमी अशा राजपुतांना दिली नाही तर इतरांची काय गोष्ट. आणि औरंगजेब महाराष्ट्रावर चालुन आला होता ते राज्य कारभार म्हणुन स्वराज्य संपविण्यासाठी सोयरीकी जमविण्यासाठी नव्हे.

संभाजी महाराजांच्या बाबतीत घेतले जाणारे जिन्नत उन्नीसाचे नाव आणि तो प्रंसग कसा निराधार आहे चुकीचा आहे हे समजण्यासाठी थोडे आणखी पाठीमागे जावे लागते.

औरंगजेबाला असलेल्या एकुण मुलींची संख्या फक्त पाच. पहिली मुलगी झेबुन्नीसा हिचा जन्म सन १६३८ चा, दुसरी मुलगी जिन्नत उन्नीसा हिचा जन्म ५

ऑक्टोबर १६४३ चा, तर तिसरी बदरुन्निसा, चौथी झुबदउन्नीसा, आणि पाचवी मीहिरउन्नीसा थोरली मुलगी झेबुन्नीसा आणि शहजादा अकबर या बहिण भावंडाचे खुप प्रेम. अकबराला झेबुन्नीसाने बापा विरुद्ध बंड करावयास साथ दिली म्हणुन औरंगजेबाने तिला सलीम गडच्या कोठडीत आजन्म कैदेत ठेवले. तिथेच तिचा १७०२ मध्ये मृत्यु झाला. तिसरी मुलगी बदरुन्नीसा ही सुद्धा खुपच लवकर म्हणजे ९ एप्रिल १६७० रोजी वारली. चौथी आणि पाचवी मुलगी अनुक्रमे झुबदउन्नीसा व महिरउन्नीसा यांचे वयात आल्यावर लग्न होवुन त्या आपापल्या दिल्या घरी सुखाने संसार करीत होत्या.

राहीला प्रश्न फक्त जिन्नत उन्निसाचा! ती चांगली सुशिक्षित होती राज कारभारात हुषार होती. अर्थात शहजादी असल्यामुळे सहाजिकच सौंदर्याचा काही तोटा नसणारच. शिवाय ती मुत्सद्दी आणि प्रसंगावधान राखणारी चाणाक्ष मुलगी होती आणि त्यामुळे साहजिकच ती औरंगजेबाची लाडकी होती. परंतु तिने लग्न केले नव्हते. तिच्या पाठीमागच्या तीनही बहिणींची लग्ने झाली तरी जिन्नत उन्नीसा अविवाहीतच राहीली. अगदी ठरवुन राहीली. तिचे लग्न होवु शकत होते तिच्यात कोणतीही कमी नव्हती. आणि ती म्हणेल त्याच्या बरोबर लग्न लावुन घेण्यास सक्षम होती. औरंगजेबाची सर्वात लाडकी मुलगी असल्यामुळे तिला लग्न करणे आणि आपल्या पसंतीने करणे काहीच अवघड नव्हते. परंतु प्रेमापुढे जग वाळुचा ढिगारा असतो.

अख्खी पातशाही एका बाजुला आणि राजा शिवाजीचा पराक्रम एका बाजुला. ३३ कोटी देवांचे चारित्र्य एका बाजुला आणि छत्रपति शिवाजी महाराजांचे चारित्र्य एका बाजुला. प्रत्यक्ष इंद्र सुद्धा लढाईत उतरला तर त्यालाही हमखास परावृत्त करणारा राजा शिवाजी कोणाला प्रभावित करु शकणार नाही. अर्थात जिन्नत उन्नीसाने महाराजांना १२ मे १६६६ पर्यंत प्रत्यक्ष पाहीलेले नव्हते. (छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा भेट) परंतु महाराजांचे नाव पराक्रम, चारित्र्य यांच्या गोष्टी नेहमीच तिच्या कानावर पडत होत्या. औरंगजेब बहुतेक महत्वाच्या गोष्टी तिच्याशी सल्ला मसलत करीत असे. शत्रू पक्षात होणारी ही सततची चर्चा आणि पराक्रमाची वाढती कमान कोणालाही प्रेरीत करुन टाकल्याशिवाय रहाणार नाही.

"आलम दुनियेला आपल्या समोर वाकविणाऱ्या आपल्या पित्याला पुरुन उरणारा हा कोण राजा शिवाजी आणि तो कसा असेल ?" ही कल्पनाच भूरळ पाडुन जाणारी होती.

अफजल खानाचा वध, पन्हाळयाच्या वेढयातुन सुटका, शायिस्ते खानाची बोटे

तोडणे, सुरतेवर छापा, बहादुर खानाची केलेली फसवणुक, अशा एकापेक्षा एक सरस अशा गोष्टींमुळे जिन्नत उन्नीसा साहजिकच शिवाजी महाराजांच्या प्रेमात पडली तर नवल ते काय आणि त्यात गैर ते काय!

जिन्नत उन्निसाचा जन्म ५ ऑक्टोबर १६४३ चा छत्रपति शिवाजी महाराजांचा जन्म ११ फेब्रुवारी १६३० तर संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७. यावरुन एक गोष्ट लक्षात आली पाहीजे ती म्हणजे जिन्नत उन्निसा छत्रपती महाराजांपेक्षा १३ वर्षांनी लहान तर संभाजी महाराजांपेक्षा १४ वर्षांनी वडिलधारी आहे. संभाजी महाराजांशी जिन्नत उन्निसाशी जोडला जाणारा संबंध कसा दिशाभूल करणारा आहे हे स्पष्ट करण्यासाठी ही आकडेवारी पुरेशी आहे. परंतु तरीही त्याची जी वेगळी कारणे सांगितली जाते त्याचा ही वेध घेवुन एकदाचे निराकरण करुनच टाकु या.

मिर्जा राजे जयसिंग आणि दिलेर खानाच्या प्रचंड वावटळीमुळे तयार झालेल्या प्रसंगामुळे रयतेचे अतोनात हाल होवु नयेत यासाठी महाराजांनी पुरंदरचा तह केला १३ जून, १६६५ व त्यानुसार महाराज १२ मे १६६६ रोजी बादशहाच्या वाढदिवसानिमित्त भरणाऱ्या विशेष दरबारात विशेष निमंत्रित म्हणुन हजर राहण्यासाठी पोहोचले.

शिवाजी महाराजांच्या आग्रा दरबारात पोहोचण्या अगोदरच संपूर्ण आग्रा शहरात महाराजांबद्दल चर्चा चालु होती. महाराज कसे दिसतात, कसे चालतात, कसे बोलतात याबबातची कमालीची उत्सुकता होती. आणि महाराज सुद्धा पक्के बेरके राजकारणी होते.

राजगडावरुन निघाल्यापासुन प्रवासात येणाऱ्या बहुतेक राजांना प्रतिष्ठित मंडळींना भेटून पुढे सरकत होते. प्रसिध्दीचा झोत कायम स्वत:वर ठेवत होते. सगळीकडे महाराजांबद्दल चर्चाच चर्चा होत होती.

"दख्खन का शेर शिवाजी दिल्ली जा रहा है। वहां क्या होगा? क्या नही होगा?" अशी उत्सुकता त्यात महाराजांचे गुप्तहेर खाते खुपच चालु. त्यांनी महाराजांना जादु येते, महाराज गायब होवु शकतात, त्यांना दैवी शक्ती प्राप्त आहे अशा सर्व बातम्या पेरुन आणखीनच कहर केला आणि अर्थातच याला पुरावा म्हणुन एक लाख फौजेच्या गराडयात असणाऱ्या शायिस्तेखानावर अचानक छापा टाकुन बोटे छाटणे आणि गायब होणे, अफजलखाना सारख्या प्रचंड ताकदवान माणसाचा कोथळा बाहेर काढणे, बहादुरखानाच्या बहादुर गडावरील खजाना लंपास करुन महाराजांचे गायब होणे अशा अनेक गोष्टी रंगवुन तेथील लोकांमध्ये पेरल्या गेल्या. अशा सगळया

बातम्या पेरुन महाराजांच्या हेर खात्याने एक वेगळाच कहर केला.

शिवाय महाराज उद्या जिथे पोहोचणार तेथे आदल्या दिवशीच खबर केली जायची त्यामुळे दररोज दिवसभर दुतर्फा महाराजांचे स्वागत करण्यासाठी महाराजांना पाहण्यासाठी लोकांची तुफान गर्दी व्हायची. महाराजांसोबत असणाऱ्या ३ हजार निवडक लोकांपैकी विविध भाषा जाणणारे हरहुन्नरी आणि चपळ असे वाऱ्याच्या वेगाने हालचाल करणारे बातम्या घेणारे आणि बातम्या पसरविणारे असे जवळपास २४०० मावळे महाराजांनी वाटेत पेरले आणि फक्त ६०० मावळे महाराजांसोबत आग्र्यात प्रवेश करते झाले. त्यात पट्टीचे जासुद आणि सर्व प्रकारची हत्यारे चालविण्यात पटाईत लोक सोबत घेवुन महाराज आग्रा शहरात दाखल झाले.

ज्या आग्रा शहरात कधी औरंगजेबाला पहावयास एवढी गर्दी झाली नव्हती तेवढी महाराजांना पहावयास झाली होती. अख्खे आग्रा शहर रस्त्यावर उतरले होते. घरा-दारात छतावर, झाडांवर अशी माणसेच माणसे शिवाजी महाराजांना पाहण्यासाठी तासन् तास ताटकळत उभी होती. आणि महाराज नजरेच्या टप्प्यात आल्यावर महाराजांच्या आंगुलीत निर्देश करत ते लोक एकमेकाला ओळख करुन देत, "वोह देखो सेवाजी आ रहा है ! दख्खन का शेर सेवाजी आ रहा है!" त्यानां शिवाजी सुद्धा ठिक म्हणता येत नव्हते परंतु त्यांचे प्रेम मात्र ओसांडुन वाहत होते. ते आपल्या भरल्या डोळयांच्या नजरा महाराजांवर ओवाळुन टाकीत होते. त्यात महिला, पुरुष, बालक, वृद्ध मंडळी अशी सगळीच सामिल होती.

१२ मे १६६६ च्या दिवशी महाराज आग्र्याच्या दरबारात पोहोचले महाराजांनी आग्र्यात जाऊन तेथील जनतेला प्रभावित केले आणि आता महाराज बादशहाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या शाही कार्यक्रमासाठी भरलेल्या दरबारात दाखल झाले. दिवाण-ए-आम संपुन गेल्यावर महाराज दिवाण- ए -खास मध्ये भरणाऱ्या खास कार्यक्रमात हजर झाले.

वाढदिवसाचा कार्यक्रम असल्यामुळे सर्व पै पाहुणे खास मंडळी हजर होती. जिन्नत उन्निसाही बादशहाच्या बाजुला मखमली पडद्याआड बसलेली होती आणि महाराष्ट्राचा क्रांतीसूर्य औरंगजेबाच्या सल्तनीचा कर्दनकाळ युगपुरुष 'दख्खनचा शेर - राजा शिवाजी' बाबत आजपर्यंत जिन्नत उन्निसाने जे ऐकले होते ते राजा शिवाजी तिच्यापासुन फक्त २० मीटर अंतरावर शंभु राजांसह ताठ मानेने दाखल झालेले.

राजा शिवाजीचे ते अलौकीक सौंदर्य जिन्नत उन्निसा डोळे भरुन पहात होती

आणि ह्रदयात साठवत होती. पराक्रमाबरोबरच सौंदर्याची आणि त्यापेक्षा उज्वल चारित्र्याची जोड असणारा शिवाजी राजाची प्रतिमा ती आपल्या स्मृतीपटलावर कोरत होती आणि तिने आतापर्यंत स्थगित ठेवलेला निर्णय अंमलात आणण्याची खातरजमा केली. ती अजुनही लग्न न करता थांबली होती फक्त शिवाजी राजाची होण्यासाठी आणि आता तिचे मनोरथ पुर्ण होण्याची वेळ आली होती. त्यावेळी जिन्नत उन्निसा होती २३ वर्षाची आणि शिवाजी राजे होते फक्त ३६ वर्षाचे.

त्याच दिवशी संध्याकाळी तिने हा विषय आपल्या बापाकडे काढला. तिने आलमंपनाह शहंशहा औरंगजेबाकडे स्वतःच्या जन्मदात्याकडे दख्खनच्या सिंहासाठी मागणी घातली. अर्थात् स्वतःला कट्टर तुर्की समजणाऱ्या औरंगजेबाला हे मान्य होणे कदापि शक्य नव्हते.

परंतु त्याने "पाहु या" असे म्हणुन वेळ मारुन नेली. आपल्या लाडक्या मुलीला वाढदिवसादिवशी नाराज करण्याचे मुत्सिद्दीपणाने त्याने टाळले आणि राजा शिवाजीवर नजर कैद लागु केली. महाराजांच्या आजुबाजुला गुप्तहेर पेरले गेले.

औरंगजेबाच्या होकारापर्यंत वाट पाहणे जिन्नत उन्निसाला परवडणारे नव्हते आणि तेवढा वेळही तिच्याकडे नव्हता तिने वेशांतर केले आणि ती थेट राजांच्या मुक्काम असलेल्या ठिकाणी येवुन दाखल झाली आणि तिने महाराजांसमोर आपल्या मनातील गोष्ट सांगितली.

आपला जिवीत संकल्प सांगितला "दख्खन के शेर राजा शिवाजी हम आपको मन ही मन अपना शौहर मान चुके है और हम आपसे बाकायदा निकाह करना चाहते है हमारे वालिद बादशहा औरंगजेब जिल्ले सुभानी, जिल्ले इलाही से भी हमने अपनी बात की है। हम आपके फैसले का इंतजार करेंगे और आपने हमें नहीं अपनाया तो भी हम आपको ही अपना शौहर मानेंगे। जिंदगीभर आपके फैसले का इंतजार करेंगे लेकिन किसी और से शादी हर्गीज नहीं करेंगे।"

शहजादी जिन्नत उन्निसाचा हा करारी निर्धार ऐकुण महाराजांपुढे दुसरा काहीही पर्याय नव्हता. महाराजांनी उदार अंतःकरणाने राजकुमारी जिन्नत उन्निसाचा स्वीकार करण्याची तयारी दर्शविली.

महाराजांच्या त्या गुप्त खोलीच्या पहाऱ्यावर असणाऱ्या हिरोजी फर्जदचा तर हा संवाद ऐकुन आपण ऐकतो ते खरे असा विश्वासच बसणेच अवघड होते. परंतु हे सर्व तो आपल्या कानाने ऐकत होता हे सत्य होते. आणि गिधाडासारखी महाराजांच्या

मुक्काम ठिकाणावर नजर ठेवणाऱ्या बादशहाच्या खाजगी हेरांनी ही बातमी औरंगजेबापर्यंत पोहचविली आणि पुढील धोका ओळखुन औरंगजेबाने महाराजांना नजरकैद तर केलेच होते परंतु आता कोणालाही महाराजांना विना परवानगी भेटण्यास प्रतिबंध केला.

परंतु औरंगजेबाच्या आयुष्यातील एक निर्णय गाफिलपणामुळे म्हणा किंवा प्रसंगाचे गांभीर्य नीट न ओळखल्यामुळे थोडा चुकला. त्याने शिवाजी राजांना नजर कैद केले, लोकांना भेटण्यास प्रतिबंध केला. परंतु नऊ वर्षाचे सहा भाषा जाणणारे तल्लख बुद्धीचे संभाषण चतुर संभाजी राजांना मात्र मुक्त परवाना दिला होता. शंभु राजे संपूर्ण आग्रा शहरात औरंगजेबाचे पंचहजारी मनसबदार म्हणुन 'शेर शिवाजीचा छावा' म्हणुन मोठया दिमाखात फिरत होते आणि बादशहा औरंगजेबाच्याही घरी चहापाणासाठी जात येत होते. ओतीव सौंदर्य लाभलेल्या दरबारातील वयाने सर्वात लहान सरदारावर खुद्द औरंगजेब बादशहा आणि त्यांच्या जननखानातील बेगमा राजकुमारी मनापासुन शंभूराजांवर प्रेम करत होत्या. राजकुमारी जिन्नत उन्निसा तर आपल्या मुलाप्रमाणेच वागणुक देत होती आणि याच संधीचा फायदा घेवुन जिन्नत उन्निसाने जवळीक वाढविली. शिवाजी महाराजांपर्यंत निरोप पोहोचवीणे आणि राजांची प्रतिक्रिया पुन्हा घेवुन येणे अगदी बिनबोभाट ही जबाबदारी शंभु राजे व्यवस्थित पार पाडत होते.

शिवाजी महाराजांची मुत्सद्देगिरी रंगात येत होती. महाराज शंभू राजांच्या मदतीने आपले डावपेच तयार करीत होते. सोबत आलेली निवडक ६०० माणसे आग्र्यात कोण कोण हाताला लागतो या मोहीमेवर होती. तर २४०० माणसे राजगड ते आग्रा या मार्गावर वेगवेगळया ठिकाणी तेथील राजांना सरदारांना आपल्या बाजुने वळवत होते.

इकडे दक्षिणेत मिर्जा राजे व दिलेर खान तळ ठोकुन होते तर त्यांना थोपवुन धरण्यासाठी सर सेनापती नेताजी पालकर नाराज असल्याचे दाखवुन विजापुरकरांना सामिल होवुन मोगलांच्या तडाख्यातुन आदिलशाही वाचवत होते. जिजाऊसाहेब स्वराज्याची देखभाल करुन गडकोटांची आणि प्रशासनाची व्यवस्था पाहत होत्या.

तिकडे रामसिंग आणि इतर राजपुतांसोबत महाराज जवळीक वाढवुन आपली चाल पुढे करत होते. बादशहाच्या दरबारातील अनेक सरदारांना नजराणा देवुन महाराजांनी जवळीक साधली होती. एक हिंदु म्हणुन राजपुतांची महाराजांवर सहानुभूती तर होतीच शिवाय महाराज त्यांचे नेते मिर्जा राजे जयसिंग यांच्या शब्दाखातर आग्र्याला आले होते. म्हणुनच महाराजांच्या सुरक्षिततेची सुद्धा त्यांना

काळजी होती. स्वत: रामसिंग महाराजांची देखभाल करण्यासाठी अहोरात्र झटत होता.

महाराजांची पुढील खेळी फक्त आणि फक्त औरंगजेब सारखा चालाख माणुसच ओळखु शकत होता. इतरांच्या स्वप्नातही लक्षात येणार नाही अशी तोडफोड महाराज आग्र्यात जाऊन करत होते. दिल्लीचे तख्त फोडण्याची सगळी तयारीच चालु होती महाराज उत्तरेतील जनतेच्या आशा, आकांक्षेची, आकर्षणाची आणि बादशहाच्या नातेवाईकांची, जवळच्या माणसांची सुद्धा पुरेपर माहिती घेवुन संधीचा उपयोग करत होते.

राजकुमारी जिन्नत उन्निसा तर हक्काची मदतगार माणुस म्हणुन लाभली होतीच आणि बादशहाने आग्र्यात घडणाऱ्या या सर्व गोष्टींचा निष्कर्ष काढला आणि त्याच्या पायाखालची वाळुच सरकली. "माझ्याच राजधानीत येवुन मलाच पाय उतार करण्याचा शिवाजीचा हा मनसुबा उधळुन लावलाच पाहीजे!" या उद्देशाने ५ हजार हत्यारबंद हशमासह पोलाद खानाला महाराजांच्या मुक्काम ठिकाणाला वेढा घालायला सांगितला. महाराजांच्या निवासस्थानाला आता लश्करी छावणीचे स्वरुप आले होते.

आता फक्त पोलाद खान, रामसिंग आणि संभाजी राजे यांचाच फक्त महाराजांपर्यंत वावर होता. जवळपास सर्व जबाबदारी शंभु राजांवर येवुन पडली. क्रोधाने चवताळलेला बादशहा औरंगजेब महाराजांच्या जिवावर उठला आणि या प्रसंगावर महाराजांनी मात केली जिन्नत उन्निसा, पोलाद खान, रामसिंग यांच्या मदतीने संभाजी राजांच्या प्रसंगाधान राखुन काम करण्याच्या चालाखीमुळे. महाराज शंभु राजे आणि सर्व मावळयांसह आग्र्यातुन सुखरुप बाहेर पडले.

पहा काय विशेष असेल ते! महाराजांसोबत गेलेल्या ३ हजार मावळयापैकी एकाचाही बळी न देता महाराज बाळ राजांसह शिताफीने औरंगजेबाच्या हातावर तुरी देवुन निसटले अर्थात जिन्नत उन्निसा आणि बादशहाच्या काही बेगमा यांचे अनमोल सहकार्य लाभले ते कामी आले.

महाराजावरील प्रेमापोटी जिन्नत उन्निसाने प्रत्यक्ष आपल्या पित्याच्या नापाक मनसुब्यावरच पाणी फिरविले तिने महाराजांना दिलेला शब्द शेवटपर्यंत पाळला आणि आयुष्यभर अविवाहीत राहीली. मुलगी म्हणुन शरीराने कायम पित्यासोबत राहीली तर पत्नी म्हणुन मनोमन शिवाजी सोबत राहिली. तिला महाराजांशी लग्न करण्याची संधी मिळाली नाही तरी तिने शेवटपर्यंत महाराजांना आणि फक्त महाराजांना आपले पती

मानुन हयातभर महाराजांचे यश चिंतीत एकांकी संसार केला. सासर आणि माहेर यांचा तोल सांभाळण्याची तारेवरची कसरत आयुष्यभर केली.

दरम्यान औरंगजेब तिकडे अफगाण टोळीवाल्यांचा बंदोबस्त करण्यात गुंतला तर महाराज इकडे स्वराज्य विस्तार करण्याच्या कामी व्यस्त झाले आणि ३ एप्रिल १६८० म्हणजे महाराजांच्या आग्रा भेटीनंतर बरोबर १४ वर्षांनी महाराजांचे विष प्रयोगामुळे राजधानी रायगडावर वयाच्या फक्त ५० व्या वर्षी निधन झाले.

शिवाजी महाराजांच्या नंतर छत्रपती पदावर आलेल्या शंभु राजां महाराजांपेक्षा १० पट पराक्रमी असल्याचीं नोंद औरंगजेबाच्या चरित्रकार खाफी खानाने केली. त्याचे भान ठेवुन बादशहा औरंगजेब स्वत: ८ सप्टेंबर १६८१ रोजी अजमेर वरुन ५ लाख फौजेसह महाराष्ट्राकडे निघाला.

शहाजी राजांच्या स्वराज्याचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या जिजाऊ साहेबांची आदिलशाही आणि स्वराज्य यातील ताळमेळ साधताना जी कसरत लागत होती ती म्हणजे पती आदिलशाही आणि मुलगा स्वराज्यात . तिकडे भाळीचे कुंकुम आणि इकडे स्वराज्य विचाराचा अंकुर. जवळपास ३० वर्षे मॉंसाहेबांनी ही कसरत केली.

सन १६४२ साली जिजाऊ साहेब बाल शिवाजीसह बंगळुरहुन पुण्याला आल्या. तेंव्हापासुन ही कसरत सुरु झाली आणि १६६४ मध्ये स्वराज्य संकल्प शहाजी राजांचे आकस्मिक निधन झाले. म्हणजेच सलग २२ वर्षे मांसाहेबांना अशी तारेवरची जिवघेणी कसरत करावी लागली. आणि शहाजी राजांच्या निधनानंतरी व्यंकोजी राजांमुळे ती कसरत पुढे चालुच ठेवावी लागली.

दुर तंजावर मध्ये शिवाजी राजांचे सावत्र बंधु यांच्या रक्षणासाठी आणि मराठ्यांच्या स्वराज्याच्या संवर्धनासाठी मॉंसाहेबांनी शेवटच्या श्वासापर्यंत ही कसरत पार पाडली. संपूर्ण भारतावर मराठयांचा एकछत्री अंमल तयार व्हावा यासाठी वेगवेगळया प्रदेशातुन सत्तेची समिकरणे तयार केली जात होती.

शिवाजी राजे पुण्यात संभाजी राजे बंगळुरला शहाजी राजे कर्नाटकात तर व्योंकोजी राजे तंजावरला असा संपूर्ण दक्षिण ताब्यात घेण्याच्या हालचाली नंतर मराठयांची घोडी उत्तरेकडे वळणार होती आणि त्यासाठीच जिजाऊ साहेबांनी आपल्या नातवाला संपूर्ण प्रशिक्षण देवुन तयार केले होते.

शंभु रांजांना वयाच्या ८ व्या वर्षीच राजकारणात आणणे आणि ९व्या वर्षात दिल्ली दाखविणे हा त्याच रणनितीचा भाग होता. आणि यासाठी औरंगजेबाच्या घरातील काही माणसे हाताशी असणे आवश्यकच होते.

महाराज आग्र्यातुन निसटल्यानंतर १६८० पर्यंत (महापरिनिर्वाण) जिन्नत उन्निसाबरोबर झालेला पत्र व्यवहार हा खुपच गुप्त असला पाहीजे त्याचा पुरावा मिळणे कठीण आहे परंतु ज्याअर्थी औरंगजेब स्वराज्यावर चालुन आला त्यावेळी बादशहाकडे अगदी आग्रह करत जेंव्हा जिन्नत उन्निसा सुद्धा महाराष्ट्रात आली तेंव्हा नक्कीच महाराजांचा व तिचा कायम संवाद होता असे म्हणावयास पुष्टी मिळते.

जिन्नत उन्निसा अविवाहीत असताना तिने एवढया लांब दगदग सहन करुन महाराष्ट्राच्या दिल्लीवाल्यांना सहसा न मानवणाऱ्या हवामानात फिरण्याची सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात रहाण्याची काहीच गरज नव्हती. परंतु तरीही महाराजांवरील प्रेमापोटी त्यांना दिलेल्या शब्दापोटी जिन्नत उन्निसा महाराष्ट्रात फक्त आली असे नाही तर शेवटपर्यंत थांबली. मराठी दौलतीचे शक्य होईल तेवढे कल्याण केले आणि मगच जगाचा निरोप घेतला.

१३ नोव्हेंबर १६८१ रोजी औरंगजेब बुऱ्हानपुरला पोहोचला. महाराष्ट्राच्या वेशीवर त्याचा तळ पडला आणि संघर्षाला सुरुवात झाली. दहाव्याच दिवशी मराठयांनी औरंगजेबाच्या तळावर छापा टाकुन मोठी धांदल उडवुन दिली.

संभाजी महाराजांबद्दल खाफी खानाने काढलेले अनुमान अचूक निघाले आणि औरंगजेबाला आणि त्याच्या फौजेला १० व्या दिवशी जोरदार तडाखा देवुन संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाची आणि रणनीतिची चमक दाखविली. औरंगजेबाच्या उपस्थितीत लुतपुल्ला खानाचा तळ दिवसा ढवळ्या लुटीला घातला. दररोजची लढाई हाणामारी, छापामारी, पळापळी अशी परिस्थिती १ फेब्रुवारी १६८९ पर्यंत म्हणजेच संभाजी महाराजांना पकडेपर्यंत महाराष्ट्रभर चालु होती.

जिन्नत उन्निसा या काळात घडणाऱ्या सर्व घटनांना साक्षीदार आहे. कारण बादशहा औरंगजेबाची ती लाडकी शहजादी व राजकीय सल्लागार सुद्धा होती. आणि मग तो निर्णायक प्रसंग आलाच की ज्याने जिन्नत उन्निसाची निष्ठा जोखली गेली. जसे शहाजी राजांना आदिलशहाने कैद केल्यावर पुत्र की सौभाग्य अशा कात्रीत जिजाऊ साहेब सापडल्या त्याचप्रमाणे आता जिन्नत उन्निसा पिता औरंगजेब की पुत्रा समान संभाजी राजे या कात्रीत सापडली. संभाजी राजे मुक्त केले तर आपला बाप संपणार

आणि संभाजी राजांना औरंगजेबाने ठार मारले तर आपली शिवाजी महाराजांबद्दल असणारी निष्ठा संपणार असा जिवघेणा प्रसंग तिच्या समोर उभा राहीला. आणि मोठया मुत्सद्देगिरीने तिने त्यावर मात करायचे ठरविले.

बादशहा औरंगजेबापुढे प्रस्ताव मांडला संभाजी राजांना जिवदान आणि उत्तरेकडील मैदानी प्रदेशातील जहांगिरी. मराठयांना पराभुत करणे हे एकच शेवटचे स्वप्न बादशहाच्या उरी असल्याचे त्यांना माहित होते आणि संभाजी राजांना महाराष्ट्राबाहेर काढुन ती औरंगजेबाचे आपल्या पित्याचे स्वप्न पुर्ण करणे आणि त्याचवेळी संभाजी राजांना जिवदान देणे या दोन्ही गोष्टी साध्य करण्यासाठी प्रयत्न करीत होती.

औरंगजेबाने संभाजी महाराजांसमोर जिन्नत उन्निसाने दिलेला प्रस्ताव मांडुन उत्तरेकडील जहांगिरी देण्याची तयारी सुद्धा दर्शविली परंतु त्याच्या बदल्यात त्याने सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरील सर्व किल्ल्यांच्या बिनशर्त चाव्या मागितल्या. शिवाय मोगली फौजेतील संभाजी महाराजांना मदत करणाऱ्या फितुरांची यादी मागितली. या दोन अटींची पूर्तता होण्यासाठी जवळपास महिनाभराचा वेळ गेला परंतु स्वाभिमानी संभाजी महाराज आपल्या भूमिकेवर ठाम राहीले. किल्ल्यांच्या चाव्या तर दिल्या नाहीच परंतु स्वराज्याला सहकार्य करणाऱ्या दिलेर खान, फिरोज जंग, आणि शहजादा शहा आलम यांची नावे मात्र फोडली नाहीत. आणि उत्तरेकडील जहांगिरी स्विकारण्याचे साफ फेटाळुन लावले. या प्रसंगातुन वाट काढता काढता जिन्नत उन्निसाची काय दमछाक झाली असेल याची कल्पना करुनच मन सुन्न होते मती गुंग होते.

मग संभाजी महाराजांकडुन आपल्या अटी मंजूर करुन घेण्यासाठी बादशहा औरंगजेबाने नविन चाल खेळली, शहाबुद्दीन कुतूबखानाने ती शक्कल लढविलेली. अन्य मार्गाने अजिबात यश नसल्यामुळे बादशहाने सुद्धा तो प्रयोग करावयास संमती दिली आणि तो प्रयोग म्हणजे बादशहाच्या कैदेत गेले ११ वर्षापासुन असणाऱ्या शिवाजी महाराजांची लेक राणुअक्का आणि सुन दुर्गाबाई यांची फौजेसमोर अब्रु घेणे. जिन्नत उन्निसा बादशहाच्या या हालचालींवर नजर ठेवुन होतीच तीने ताबडतोब ही गोष्ट आपल्या आईला म्हणजे उदेपुरी बेगमेला सांगुन बादशहाला या प्रकारापासुन परावृत्त करण्याची जबाबदारी सांगितली. कारण उदेपुरी बेगमेचा शब्द औरंगजेब सहसा मोडत नसे.

बादशहाच्या आवडत्या राण्यांपैकी एक म्हणजे उदेपुरी बेगम. उदेपुरीचे लग्न

औरंगजेबाच्या मोठ्या भावाशी दाराशी झालेले. औरंगजेब उदेपुरीवर भलताच भाळलेला होता तेंव्हा बादशहाने कपटाने जेंव्हा दाराचा खुन केला तेंव्हा दिल्लीच्या तख्ता सोबत दाराची बायकोही औरंग्याने हिस्कावुन आपल्या ताब्यात घेतली. औरंगजेबाचा स्वभाव व कट कारस्थानाची उदेपुरीला अशी चांगलीच ओळख होती परंतु तरीही हे सर्व सहन करत ती औरंगजेबा बरोबर मुकाटयाने संसार करीत होती.

संभाजी राजांना कैद करुन अनेक दिवस झालेले होते. कैदेत असणाऱ्या दुर्गाबाई राणु अक्का कमळजा यांची भेट घालुन संभाजी राजांना पाझर फोडण्याचा प्रयत्नही झाला. सर्वांचे आतोनात हाल केले गेले अपमानास्पद छळ केला तो भाग वेगळाच. तरीही संभाजी राजे शरण येत नव्हते. म्हणुन मोगलांनी मोगली पद्धत वापरण्याची तयारी केली कैदेत असणाऱ्या वीरांच्या युद्धात हरलेल्या योध्यांच्या रणांगणावर धारातिर्थी पडलेल्या हुतात्म्यांच्या आया - बहिणींचे इज्जत खुले आम लुटणे. आणि ही अक्कल हुषारी शोधुन काढली होती शहाबुद्दीन खानाने.

शहाबुद्दीन खानाच्या युक्ती नुसार संभाजी राजांच्या भगिनी आणि पत्नी यांची अब्रु लुटण्याची ती कल्पना मोगलांनी अंमलात आणण्याची जवळजवळ पुर्ण तयारीच केली होती. परंतु या बाबतची सर्वात अगोदर खबर लागली ती उदेपुरी बेगमला व तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली ती तशीच शहाबुद्दीन खानाला शिव्या शाप देत औरंगजेबाकडे जाऊन थडकली व औरंगजेबाचाही चांगलाच उद्धार करुन बादशहाला ही चांगलेच फैलावर घेतले.

"अन्याय अत्याचाराची काही मर्यादा असते की नाही?" असा जाब साल तीने बादशाला केला. "नीच गिरीला काही सीमा असते की नाही?" असे अनेक प्रश्न विचारत उदेपुरीने आकाश पाताळ एक केले व बादशहाला अंर्तमुख करणारा प्रश्न विचारला, "त्या शिवाजी बरोबर तुमचे अनेक वर्षे युद्ध झाले परंतु शिवाजीने मोगलांच्या आया बहिणींच्या अब्रुशी खेळल्याचे एक तरी उदाहण कोणाला सांगता येईल का?"

"शिवाजी राजांच्या या नीतीवानपणाचे आपणच अनेकवेळा खुल्या मनाने खाजगीत कबुली दिलीत. गेली ८ वर्षे आपण या महाराष्ट्रात जनांनखान्यासह रानावनात फिरत आहोत. अनेक ठिकाणी आपल्या फौजांना नुसत्या कपड्या निशी पळ काढावा लागला आहे. संभाजींचे नुसते नाव घेतल्याबरोबर तुमच्या स्वार शिपाईच काय तर जनावरेही जिवांच्या आकांताने पळुन जातात.

परंतु त्या संभाजीने कधी कोणत्या मोगली स्त्रियांच्या इज्जतीशी खेळल्याची

तक्रार कोणी एखाद्या साध्या स्वार शिपायाने तरी आपणाकडे केली असेल तर सांगा आणि तुमचा तो भागुबाई शहाबुद्दीन दुर्गाबाई व राणुअक्काची इज्जत लुटण्याची योजना बनवितो, अशा प्रकारची भाषा करतो.

सांगा आलपनाह! दुर्गाबाई व राणुअक्का म्हणजे काय मोघलांच्या जनांनखान्यातील सामान्य स्त्रिया होत का? का आपल्या आया बहिणींना मोगलांच्या स्वाधीन करुन आपले राज्य वाचविणाऱ्या राजपूत व मराठे यांच्यात काही फरक आहे का नाही? हा महाराष्ट्र आहे शिवप्रभुंचा महाराष्ट्र.

या मातीत अशा प्रकारचा सौदा होवु शकत नाही. आयुष्यभर ज्या शिवाजीने महिलांचा मान सन्मान राखला त्याची मुलगी आणि सुन यांच्या इज्जतीला हात घातला तर जग काय म्हणेल? संभाजी शरण येत नव्हता म्हणुन औरंग्याने पराभुत मानसिकतेने संभाजींच्या पत्निची व बहिणीची अब्रु लुटली! त्या संभाजींनेही तुम्हाला भरपुर या दऱ्या खोऱ्यात भटकावले परंतु तुमच्या जनांनखान्यावर मराठा लष्कराने किंवा संभाजीने हल्ला केला आहे का?" अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती उद्पुरीने बादशहावर केली. तेंव्हा उद्पुरीचा वाढता पारा व बाजुलाच असलेल्या जिन्नत उन्नीसाचे लालबुंद झालेले डोळे पाहुन बादशहाला आपल्या अतिशहाण्या शहाबुद्दी खानाच्या या कल्पनेच्या अश्वाला जागेवरच लगाम घालावा लागला.

शिवाजी महाराज व संभाजी राजांच्या चरित्र्याचा मोगली सैन्यावरच नव्हे तर जनान खान्यावरही असलेला हा प्रभाव इतिहासकारांना कधीच दिसला नाही किंवा त्यांना तो पहावयाचाच नव्हता. जेथे संभाजी राजांच्या चारित्र्याबद्दल मोगली स्त्रिया प्रशस्तीपत्र देतात त्याचवेळी महाराष्ट्रातील अल्पबुध्दी स्वार्थी लोकांनी मात्र संभाजी बदफैली दाखविण्याचा प्रयत्न केला आता उद्पुरी बेगम व जिन्नत उन्नीसाच्या प्रमाणपत्रापेक्षा मोठे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता उरत नाही.

उद्पुरी बेगमेने आपली जबाबदारी पुर्ण केली.. संभाजी महाराज काही केल्या तह करावयास तयार होत नव्हते. तेंव्हा जिन्नत उन्निसाने संभाजी महाराजांच्या प्राण रक्षणासाठी आणि सन्मानजनक तोडगा निघावा यासाठी आणखीन एक योजना बनविली ती बादशहा बऱ्यापैकी आवडली......

औरंगजेबाची सर्वात लाडकी आणि धाकटी मुलगी म्हणजे जिन्नत उन्निसा. जिन्नत उन्निसा औरंगजेबाची लाडकी असण्याची काही कारणे होती. आणि त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे ती संभाषण चतुर व मुत्सद्दी धोरणाची होती. त्यामुळे बादशहाच्या

राजकीय विषयात कुणीही महिलेने ढवळाढवळ केलेली बादशाहाला अजिबात पसंत नसले तरी काही बिकट प्रसंगी बादशाह जिन्नत उन्निसाचा सल्ला घायचा.

संभाजीराजाला पकडल्यावर एक किंवा दोन दिवसात त्यांचा शिरच्छेद केला जाईल अशी अटकळ सर्वांनी बांधली होती परंतु संभाजी राजांना ओलीस ठेवुन मराठ्यांना शरण आणण्याचा औरंगजेबाचा विचार होता व त्यानुसारच औरंगजेबाने बहाद्दुर गडावर राजांची जाणुनबुजन धिंड काढली. जेणे करुन मराठे पेटुन उठावेत व सपाटीच्या लढाईत समोरासमोर यावेत. परंतु आयुष्यभर गनीमी कावा खेळणाऱ्या मराठ्यांना बादशहाचा हा उसना कावा माहित असणारच. म्हणुनच मनात प्रचंड रोष आणि औरंग्याला मातीत मिळविण्याची धग असतानाही मराठ्यांनी मुत्सदेगिरी दाखवीली व औरंगजेबाच्या अपेक्षेवर पाणी पाडले.

तेंव्हा महाराणी येसुबाई शरण येत नाहीत व मराठे प्रतिहल्लाही करीत नाहीत त्यामुळे लढाई अर्ध्यावर थांबली होती. जणु काही मध्यांतर व्हावा. त्यामुळे नक्की यातुन काय तोडगा काढता येऊ शकतो? यावर बादशहाने आपल्या आवडत्या बेगमा व जिन्नत उन्नीसाला सल्ला विचारला. कारण एरवी असे असायचे कि, सेनापती मारला गेला किंवा राजाच जिवंतपणे शत्रुच्या ताब्यात आला तर युध्दाचा जागच्या जागी एकतर्फी निकाल लागायचा परंतु जगाच्या पाठीवरील ही पहीली लढाई असु शकते की जेथे सेनापती मारला गेला, राजा कैद झाला. परंतु युध्दाचा शेवट झाला नाही उलट प्रचंड देशाभिमानाची लाट उसळुन पुढे औरंगज़ेबाला या मातीतच गाडुन हे युध्द संपले. तेंव्हा संभाजी राजांचे प्रचंड हाल करण्याची कल्पना पुढे आली.

अनेक दिवस संभाजी राजे व कवी कलश यांचे शारीरिक हाल हाल करुनही ते दाद देईनात. तेंव्हा आता युक्तीचा उपयोगच करावा लागेल याची बादशहाला नेमकी जाणीव झाली. कारण 'मरके भी नहीं हटा वह मराठा' अशी हट्टी जात असते मराठ्यांची.

तेंव्हा जिन्नत उन्निसा बादशहाला युक्ती सांगते युक्ती नामी होती व त्यामुळे बादशहाला बऱ्यापैकी आवडली. जिन्नत उन्निसाने बादशहाच्या एक गोष्ट लक्षात आणुन दिली ती ही की, जवळपास १० ते ११ वर्षापूर्वी संभाजी राजे दिलेर खानाला जाऊन मिळाले होते तेंव्हा त्यांचेबरोबर पत्नि दुर्गाबाई व बहिण राणु अक्का होत्या. योग्य वेळी संभाजी राजे तर दिलेर खानाच्या तावडीतुन पसार झाले. परंतु त्या सर्व भागदौडीत दुर्गाबाई व राणुअक्का बहाद्दुर गडावर अडकल्या होत्या पुढे बादशहाने दुर्गाबाई व

राणुअक्कांना अहमद नगरच्या किल्यात राजबंदी म्हणुन ठेवले होते.

दुर्गाबाई त्यावेळी गर्भवती होत्या व त्यांना नगरच्या किल्यातच एक मुलगी झाली होती. तिचे नाव होते कमळजा. दुर्गाबाई राणुअक्का व कमळजाला सोडविण्यासाठी संभाजी राजे व मराठी फौज अनेक वेळा नगरच्या भुईकोटाला भिडले परंतु यश हाती आले नाही. तेंव्हा मराठ्यांचा वाढता रेटा पाहुन सावधगिरीचा उपाय पाहुन बादशहाने या सर्वांना बहादुर गडावर आणुन ठेवले होते व आता संभाजी राजेही बहादुर गडावरच कैद होते. तेंव्हा १० वर्षापुर्वी पत्नी बहिण व मुलीचा झालेला वियोग अशा कष्टमय प्रसंगी मायेचा पाझर फोडु शकतो. व संभाजी राजे वाकले नाहीत तर त्यांचे हाल बघुन किमान दुर्गाबाई व राणु अक्का तहाला तयार होतील व आपले काम सोपे होवुन जाईल व दिल्लीकडे जाण्याचा आपला मार्गही मोकळा होईल अशी सुचना जिन्नत उन्निसाने बादशहाला केली. बादशहाने तो प्रयोग करुन पाहीला.

परंतु याचा उलटाच परिणाम झाला समोर मृत्यु पाहुन शरण जाणारा तो मराठा असूच शकत नाही. 'मरा पण ऊठा, लढा' मरेपर्यंत लढा ही तर मराठ्यांची प्राण संजीवनी आणि स्वराज्य धोक्यात टाकुन संभाजी राजांच्या प्राणांची भीक मराठी आया बहिणी मागतील हे शक्यच नव्हते.

हजारो मावळ्यांच्या बलिदानाने तयार झालेले स्वराज्य एखाद्या व्यक्तिच्या प्राणासाठी अगदी तो छत्रपति असला तरीही शत्रुच्या पायावर ओतायला ती काही राजेशाही नव्हती किंवा कोणाची जहांगिरी नव्हती.

स्वराज्य हे सर्व सामान्य रयतेचे होते आणि म्हणुन शेवटचा मराठी माणुस जिवंत असे पर्यंत हे युध्द संपणारे नव्हते तर शरण जाण्याचा प्रश्न येतोच कुठे? मग ते छत्रपति असले म्हणुन काय झाले, छत्रपति हे राज्याचे वारस नसतात ते तर रयतेचे अपेक्षांचे विश्वस्त असतात. आणि त्यामुळे राजा पकडला गेला किंवा सेनापती मारला गेला तरी मराठे अविरत झुंजत राहीले. ते याच न्यायाने व निष्ठेने संभाजी राजांना जिवदान मिळावे. ते त्यांच्या कुटूंबीयांत सुखी रहावेत व आपल्या बापालाही या मरणप्राय युध्दातुन मुक्तता लाभावी व परत दिल्लीला जाता यावे एवढाच हेतु जिनत उन्निसाचा होता.

परंतु पुढे बखरकारांनी जिन्नत उन्निसाचे संभाजी राजांवर प्रेम होते बादशहाने तिचा हात देवु केला वगैरे कल्पनांच्या माळ्या बांधल्या परंतु जिन्नत उन्निसाने संभाजी राजांना किंवा संभाजी राजांनी जिन्नत उन्निसाला उभ्या आयुष्यात कधीच पाहीले नव्हते

(आग्रा भेट सोडून त्यावेळी संभाजी राजे फक्त ९ वर्षाचे होते.) ही एक गोष्ट व संभाजी राजांच्या पेक्षा किमान १४ वर्षे जिन्नत उन्निसा मोठी होती ही दुसरी गोष्ट शिवाय युध्दात हरले तरी मुगलांनी आपल्या पोरी विजेत्या राजाला दिलेल्या आठवत नाहीत.

इथे तर संभाजी राजे जिवंतपणे पकडले गेले होते व कैदी म्हणुन त्यांच्या ताब्यात असताना जगावर राज्य करणाऱ्या आलमगीराने एका पराभूताला तीही एका हिंदुला आपली सर्वात लाडकी लेक देण्याचा प्रश्न येतोच कुठे? नाहीतरी मराठ्यांनीही मोगलांशी सोयरीक केल्याचे एकही उदाहरण नसताना बादशहाने अशा प्रकारचा प्रस्ताव मांडला होता असे म्हणणे म्हणजे बादशहाला क्रांतिकारक व समाजप्रबोधन करणारा समाजसुधारक महात्मा म्हणायचेच बखरकरांनी बाकी ठेवले आहे.

तडजोडीचे सर्व उपाय संपुष्टात आले. बादशहा औरंगजेबाने ११ मार्च १६८९या दिवशी संभाजी महाराजांना तुळापुर या ठिकाणी अत्यंत क्रुरपणे ठार मारले. जिन्नत उन्निसा आणि उदेपुरी बेगम छावणीत असताना अशा क्रुरपणे संभाजी महाराजांचा शेवट शक्य नव्हता परंतु येथील वर्णव्यवस्थेच्या पुढारी मंडळींनी आणि मनुस्मृतिच्या ठेकेदारांनी हे दुष्कृत्य घडवुन आणले. संभाजी महाराज कराल काळाला सामोरे गेले परंतु तह केला नाही. तहाच्या बदल्यात उत्तरेकडील मागेल तेवढी मैदानी प्रदेशातील जहांगिरी आणि जीवदान यांना नाकारुन महाराज अत्यंत वेदनादायी मृत्युला सामोरे गेले. महाराजांच्या अशा बलिदानाने महाराष्ट्र पेटुन उठला आणि पुढे २७ वर्ष अहोरात्र झुंजला. संभाजी महाराजांचे स्वाभिमानी बलिदान व्यर्थ जाऊ दिले नाही.

संभाजी महाराजांच्या मृत्युनंतरही जिन्नत उन्निसाची जबाबदारी संपली नाही. थोडयाच दिवसात शहाबुद्दीन कुतुब खानाने रायगड ताब्यात घेतला महाराणी येसूबाई आणि बाळ शाहु कैदेत सापडले. औरंगजेबाच्या हातात आता संपूर्ण राजपरिवार होता राणुअक्का (संभाजी महाराजांची थोरली बहीण), दुर्गाबाई, ८ वर्षाची कमळजा (संभाजी महाराजांची आणि दुर्गाबाईची मुलगी) आणि आता महाराणी येसुबाई आणि बाळ शाहु. यासर्व मंडळींना कैदेत असुनही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची पुरेपुर दक्षता जिन्नत उन्निसा आणि उदेपुरी बेगम यांनी घेतली.


औरंगजेब मरेपर्यंत म्हणजे ७ फेब्रुवारी १७०७ पर्यंत हा सगळा राज परिवार औरंगजेबाच्या कैदेत असताना बाळ शाहुंना औरंगजेबाच्या कट कारस्थानातुन वाचविण्याचे आणि मराठा स्त्रियांच्या अब्रु रक्षणाची जबाबदारी जिन्नत उन्निसाने घेतली. अहोरात्र डोळयात तेल घालुन तिने ती जबाबदारी पार पाडली. औरंगजेबाच्या मृत्युनंतर

बाळ शाहू आणि संपूर्ण राज परिवाराची मोगलांच्या तावडीतुन मुक्तता केल्यानंतरच जिन्नत उन्निसा जड अंतकरणाने दिल्लीला परत गेली.

इतिहासाला आजपर्यंत अनभिज्ञ असणाऱ्या जिन्नत उन्निसा या महा सतीबद्दल सर्वात प्रथम उल्लेख केला आहे तो वीर उत्तमराव मोहीते यांनी १९७८ साली प्रकाशित केलेल्या "मराठयांचा सांस्कृतिक इतिहास" या पुस्तकात वीर उत्तमराव मोहीते यांनी जिन्नत उन्निसाबद्दल व्यक्त केलेली भावना त्यांच्याच शब्दात सांगावयाची म्हटल्यास, "मोगल सम्राटाच्या छावणीत छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई आणि बालराजे शाहु महाराज यांचे आगमन झाले. शिवप्रभूंला मागणी घालणारी राजकुंवर मोगलकन्या जिवंतच होती. त्या सतीनं आमरण कोणाही सरदाराशी निका लावला नाही. ती खरोखरच सती होती. शिवरायांच्या चिंतनात तिने सारा जन्म घालविला. मानवतेच्या पवित्र साम्राज्यात कोठली जात पात? देवधर्माची कृत्रिम बंधनं भिक्षुकशाहीनं निर्माण करून अनेक प्रतिभाशाली चरित्रे मातीत मिळविली. काळानं बळी दिलेली ही साध्वी निश्चितच सती होती. मनोभंग झालेल्या या मंगल देवतेला संपूर्ण मराठा जमात वंदन करील इतकी ती पवित्र होती. अशी नवरत्ने मानवजातीत विरळच निपजतात. महासती झिब-उन्-निसा हिने बाळ शाहूराजांना स्वत:च्या पोटच्या गोळ्याप्रमाणे वागविते. त्याला लहानाचं मोठं करते. शंभूराजाच्या बाबतीत घडलेली चूक ती मोंगल बादशहाच्या हातून होऊ देत नाही."

स्वराज्याचा शेवटचा अंकुर बाल शाहु यांना जिवदान देवुन जिन्नत उन्निसाने मराठयांच्या स्वराज्याचा वारस जिवंत ठेवण्याचे महान काम केले. शिवाजी महाराजांना शेवटपर्यंत पती मानणाऱ्या, संभाजी राजांना मातृवत प्रेम करणाऱ्या, बाळ शाहूंना नातु समजुन जिवदान देणाऱ्या आणि मोगलांच्या छावणीत दोन दशकाहुन अधिक काळ कैदेत असणाऱ्या शिवाजी महाराजांच्या लेकी सुनांची अब्रु आणि मानमरातब राखणाऱ्या या साध्वीला शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र कसा विसरु शकेल?

यापुढे जेंव्हा जेंव्हा छत्रपति महाराज आणि जिजाऊ साहेब यांचे नाव घेतले जाईल तेथे आवर्जन जिन्नत उन्निसा या साध्वीचा पतिव्रतेचा सन्मानपूर्वक उल्लेख केला गेला पाहीजे. अन्यथा आपण मराठी माणसांनी कृतघ्न झाल्यासारखे होईल. महाराजांच्या विचारापासुन फारकत घेतल्यासारखे होईल ते न घडु देणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे."



जनाबाई

भीमा आणि इंद्रायणीच्या संगमावर छत्रपती संभाजी राजांना औरंगजेबांने अत्यंत क्रुरपणे ठार मारले. राजांच्या देहाचे अक्षरश: तुकडे तुकडे करुन नदी काठावर व पाण्यात फेकुन देण्यात आले. खरे तर इतर वेळी दुनियाभरातील पापे करणारी पापी मंडळी आपले पाप प्रक्षालन करण्यासाठी अशा पवित्र नद्यांच्या संगमावर येतात. परंतु त्या नद्याच आज संभाजी राजांच्या देहाच्या मासाच्या फेकल्या गेलेल्या तुकड्यांनी रक्तांच्या अमृतबिंदूंनी पावन झाल्या होत्या. आख्या महाराष्ट्राला पावन करणाऱ्या या नद्यांनाच पावन करण्याची संधी या बलीदानाच्या निमित्ताने संभाजी राजांना जीवनाच्या शेवटच्या क्षणी मिळाली. तेही महाराष्ट्राचे एक प्रकारचे भाग्यच होय.

पुण्याच्या बारा मावळ मधुन झालेली स्वराज्याची सुरुवात संभाजी राजांना पुण्याच्या परिसरात मारुन आपण शेवट करु असा गैरसमज असणाऱ्या बादशहाला पुढे आयुष्यभर कळून चुकले की आपण जेवढे संभाजी राजांचे हाल हाल केले तेवढा हा महाराष्ट्र देश पेटून उठला. भीमा इंद्रायणीच्या पात्रात साक्षात सामिल झालेले शंभु राजांचे रक्त घराघरात लोकांना एक प्रेरणा देऊन गेले.

देशासाठी जगायचे तर शिवबासारखे आणि मरायचे तर संभाजी सारखे हाच तो संदेश आणि हाच तो महाराष्ट्राच्या मुक्तीचा मंत्र. संभाजी राजांच्या देहाचे तुकडे तुकडे करुन नदी काठावर फेकल्याचे सर्वात पहिले जर कोणाला कळले असेल तर ते जना परटीणीला. कारण नदीवर कपडे धुण्याकरीता ती गेली होती. बिचारी कपडे तसेच घेऊन धावत धावत पळत आली. गावच्या पाटलासह सर्व मंडळींना एका धनगराने सांगितलेली सर्व हकिकत सांगितली परंतु कोणीही पुरुष बादशहाच्या फर्मानामुळे पुढे येण्यास धजत नव्हता.

अख्खा महाराष्ट्र जणु षंड झाला होता. तेव्हा याच जना परटीणीने आपली मालकीण राधाबाई व इतर महिलांना गोळा करुन संभाजी राजांच्या देहाचे तुकडे गोळा करुन अंतिम संस्कार करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणे अंधाऱ्या रात्रीत धडपडत धडपत जाऊन त्या सर्व महिलांनी संभाजी राजांच्या देहाचे विखुरलेले तुकडे गोळा

करुन गावात आणले. कारण नदी किनारी आग पेटवली असती तर बादशहाच्या सैनिकांना कळले असते. आणि बादशहाने तर फतवाच काढलेला शंभु राजाच्या देहाला कोणी हात लावायचा नाही.

अहो पण मृत्युच्या भीतीने आपल्या राजाच्या देहाला शिवायला महाराष्ट्रातील वतनदार जरी घाबरले असतील तरी राष्ट्रमाता जिजाऊ साहेबांनी बाळकडु पाजून घडवीलेली स्त्री शक्ति मात्र आजुनही शाबुत होती. आणि त्यांच्या मनगटांनीच ते आव्हान पेलले व शंभु राजांच्या देहाला अग्नि देण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला. आणि महाराष्ट्राच्या समस्त रयतेची अग्नी परिक्षा ठरु शकणाऱ्या या अत्यंत अवघड आणि मोलाच्या कामगिरीला त्यांनी अंजाम दिला.

ज्या संभाजीच्या चारित्र्यावर बखरकारांनी अनेक प्रकारचे शिंतोडे उडवीले त्या मुर्खांना जेव्हा हे कळेल की शंभू राजाच्या चितेला अग्नि देण्यासाठी जेव्हा अख्खा महाराष्ट्र षंड झाला होता तेव्हा हीच स्त्री शक्ती या राजाच्या अग्निसंस्कारासाठी कामी आली. मध्यानीच्या सुर्यावर थंकणाराची थुंकी त्याच्याच तोंडावरती पडत असते याचा अनुभव बखरकरांना येईल. एखाद्या दुर्व्यसनी बदफैली व्यक्तिसाठी स्त्री वर्गाची एवढी अपार सहानुभूती असुच शकत नाही.

शेवटी शंभु राजांच्या चितेला अग्नि देण्याची मातृशक्तिने तयारी दाखवीली. तरीही महाराष्ट्रातील वतनदार जमीनदार खानदानी लोक चितेसाठी जागा देण्यास तयार नव्हते. तेव्हा गाव कोसाबाहेर रहाणाऱ्या महार समाजाने शंभु राजेच्या चितेला अग्नी देण्यासाठी आपली जागा उपलब्ध करुन दिली.

शिवाजी महाराजांनी महार समाजावर टाकलेला विश्वास किती सार्थ ठरला. जे साथ देतील अशी अपेक्षा शिवाजी राजांना होती. ते सर्व बेईमान आणि वतनाच्या तुकड्यासाठी दुसऱ्याच्या दारात कुत्र्यासारखे उभे रहाणारे नालायक सिध्द झाले. शिवाजी राजांच्या पालखीला भोई म्हणुन आयुष्यभर खांदा देणाऱ्या महार समाजानेच शेवटी संभाजी राजांच्या चितेसाठी जागा देऊन आपण वतनाशी नाही तर महाराष्ट्राशी आणि स्वराज्याशी इमान राखणारे असल्याचे आपल्या कृतीतून सिध्द केले. पुढे याच पुण्याईचा परिणाम म्हणुन की काय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही याच समाजात जन्म घेऊन पुन्हा एकदा या महाराष्ट्रावर व देशावर स्वाभिमानाची व राष्ट्रभक्तीची ज्योत लावली.

संभाजी राजांवर तर या महार समाजाचे प्रचंड उपकार, रायप्पा महार जीवलग सोबती दुसरा भाऊ जिवाप्पा शेवटच्या काळात संदेशवहन करण्याच्या कामी आला तर

तिसऱ्या भावाने राजाच्या देहासाठी जागा दिली. धन्य आहात तुम्ही तिघे बंधु ज्यांनी या महाराष्ट्रावर अपार उपकार करुन हा महाराष्ट्र सदैव तुमचा ऋणी करुन टाकला आहात. ज्यांना ज्यांना संभाजी राजांच्या देहाला स्पर्श करण्याचे पुण्य लाभले त्या सर्व लोकांना पुढे 'शिवले' असे आडनाव मिळाले असावे. यात कोणी धनगर होते तर कोणी वारकरी होते, तर कोणी महार होते तर कोणी परीट समाजाचे, तर कोणी पाटील होते.

परंतु सर्वात मोठा वाटा होता तो स्त्री शक्तीचा. त्यामुळे जेव्हा जेव्हा संभाजी राजांच्या चरित्राचा उच्चार केला जाईल तेव्हा तेव्हा या मातृशक्तीचे महाराष्ट्र देशावर आणि स्वराज्यावर असलेले उपकार स्मरण केले जातील हे मात्र नक्की.

ज्या छत्रपती संभाजींना बखरकारांनी स्त्रीयांचे नाव जोडुन बदनाम केले ते कदाचित नियतीला मंजुर नव्हते आणि सत्य बाहेर येणे काळाची गरज होती. म्हणुनच कदाचित संभाजी महाराजांच्या चितेला अग्नी देण्यासाठी स्त्री शक्तीला पुढाकार घेण्याची संधी मिळाली आणि स्त्री शक्तीने हे ऐतिहासिक कार्य पार पाडुन संभाजी राजांच्या चितेला अग्नी देऊन त्यांच्या बद्दल बखरकारांनी तयार केलेले खोटे नाटे प्रसंग यांनाही अग्नी दिला.

जगाच्या पाठीवर कोणत्याही राजाच्या संदर्भात अशा प्रकारची घटना आपणाला पहावयास मिळणार नाही ती संभाजी राजांच्या बाबतीत मात्र पहायला मिळाली आणि बखरकारांनी लिहीलेला खोटा इतिहास त्याच ठिकाणी राखही होत आहे हे विशेष आणि याची सुरवातही तुळापुर येथुनच होत आहे हे विशेष.

- - - - - - - - - - -

संदर्भसूची

१) श्रीछत्रपती संभाजी महाराज	श्री. वा सी बेंद्रे
२) शिवपुत्र संभाजी	डॉ. कमल गोखले
३) छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ	डॉ. जयसिंगराव पवार
४) शंभूराजे	प्रा.सु.ग. शेवडे
५) विद्रोही तुकाराम	डॉ.आ.ह. सांळुंखे
६) छत्रपती संभाजी आणि कविकलश	डॉ. वसंतराव शं. कदम
७) संभाजी : बादशहास ताजीम न देणारा राजा	ईश्वरदास नागर
८) युवराज शंभू राजे आणि छत्रपती संभाजी महाराज	प्रा. वसंत कानेटकर
९) धर्मवीर छ. संभाजी महाराज एक डोळस ललित दृष्टिक्षेप	शिवाजी सावंत
१०)संभाजी आणि रायगड	शां.वि. आवळसकर
११) श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा	वा.सी. बेंद्रे
१२) संभाजी राजांची गोव्यावरील स्वारी	डॉ. पां. स. पिसुर्लेकर
१३) छत्रपती संभाजी महाराज आणि थोरतांची कमळा	मु.गो. गुळवणी
१४) शिवाजीपेक्षा दहापटीने अधिक तापदायक राजा	महंमत हाशिम खाफीखान
१५) शूरवीर छत्रपती संभाजी महाराज	म.म.दत्तोवामन पोतदार
१६) पुरोहितवर्ग वर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास	डॉ. सुमंत मुरंजन
१७) संभाजी राजांचे दिलेरखानाकडे जाणे छत्रपतींची राजकीय खेळी	ॲड. अनंत वि. दारवटकर

१८) युवराज संभाजी	डॉ. कमल गोखले
१९) संभाजी	विश्वास पाटील
२०) छत्रपती श्रीसंभाजी महाराज जयंती उत्सव सन २००३ - स्मरणिका विशेषांक यांचा लेख	ॲड. अनंत वि. दारवटकर

- - - - - - - - - -



प्रा. नामदेवराव जाधव

(संभाजी या विषयाचे अभ्यासक आणि चरित्रकार)

प्राध्यापक नामदेवराव जाधव यांनी एमकॉमपर्यंत शिक्षण घेऊन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी पत्करली. परंतु आपण फक्त एक शिक्षक म्हणून समाजाचे प्रबोधन करण्यास मर्यादा येत असतात. हे लक्षात आल्यामुळे नोकरी वगैरे न करता स्वतंत्रपणे समाजप्रबोधन करण्यासाठी पूर्ण वेळ देता यावा यासाठी विकास केसरी नावाचे साप्ताहिक वर्तमानपत्र चालू केले. व त्या माध्यमातून जमेल तेवढे सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान एमबीए विषयातून परिक्षा दिली व त्यातही फर्स्ट क्लास मिळाला.

चांगल्या पगाराची आर्थिक सुबत्तेची चांगली संधी चालून आली होती. परंतु तरीही त्या गोष्टीला प्राधान्य न देता या मार्गाकडे वळाले. अगदी लहानपणापासूनच इतिहास या विषयाची प्रचंड आवड होती. शिवाय जन्म ज्या गावी झाला ते काळदरी हे गाव पुरंदर किल्ल्याच्या अगदी पायथ्याला असल्यामुळे दररोज किल्ले पुरंदर दर्शन व्हायचे. इयत्ता पाचवीत असतानाच पुरंदर किल्ल्यावर जाण्याचा योग आला.

त्यावेळी वाहने नसल्यामुळे अगदी पायथ्यापासून चालत हा प्रवास मुरारबाजीचा पुतळा, कल्याण दरवाजा आणि शेवटी केदारेश्वर मंदिर असा व्हायचा. त्यानंतर मात्र जवळपास पंधरा वर्षे पुरंदर किल्ल्यावर जाण्याचा योग आला नाही. कारण त्यानंतर शिक्षणासाठी मुंबई येथे स्थायिक व्हावे लागले. परंतु किल्ले, दुर्ग व गडकोटांचे आकर्षण कायम राहिले. त्यामुळे जेव्हा जेव्हा सहलीला जाण्याचा प्रसंग आला तेव्हा किल्ल्यांची ठिकाणे निवडली. कर्नाळा किल्ला, वसईचा किल्ला, जंजिरा, असे किल्ले पाहण्याचा योग आला. जवळपास एक दशक भर स्वप्नामध्ये भव्य आणि दिव्य असे किल्ले पाहण्यास मिळायचे.

त्यातील कोणताही किल्ला या जन्मात पाहिलेला नाही. परंतु स्वप्नात आलेला पहिला किल्ला हा राजगडाच्या वर्णनाशी मिळता जुळता असून बाकीच्या किल्ल्यांचाही शोध घेण्याचा प्रयत्न आहे. दरम्यान कर्नाटक मध्ये जाऊन विजापूरचा किल्ला तसेच दिल्ली येथे लाल किल्ला पाहून घेतला.

परंतु स्वप्नात दिसणारा कोणताही किल्ला वाचलेल्या ऐकलेल्या पाहिलेल्या किल्ल्यांशी जुळत नसल्याने नक्की ते किल्ले कोणते आहेत याचा शोध घेण्याचे काम चालू आहे. त्यातूनच पुढे ज्या पुरंदर किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला त्या किल्ल्याचा इतिहास वाचताना पुरंदर किल्ला सतरा लाख पन्नास हजार वर्षापूर्वीचा असल्याचा संदर्भ वाचण्यात आला.

त्यामुळे दरवर्षी पुरंदर किल्ल्याला किमान दोन वेळ प्रदक्षिणा घालण्याचा प्रत्येक बुरुज फिरण्याचा बालेकिल्ला सर करण्याचा प्रयत्न गेले अनेक वर्ष सातत्याने करत असताना संभाजी महाराजांबद्दल जे ऐकले ते खूपच दुर्देवी होते. आणि मग शिवप्रभूंच्या पोटी जन्माला आलेल्या जिजाऊ साहेबांसारख्या थोर साध्वीने संगोपन केलेल्या संभाजी राजांचे चरित्र असे विचित्र असूच शकणार नाही, असे मनापासून वाटले. शिवाय राष्ट्रमाता जिजाऊ साहेबांच्या घराण्यात ज़न्म झाला असल्यामुळे या बाबतीत प्रचंड वाचन केले.

अनेक इतिहास तज्ञांची व्याख्याने आवर्जून ऐकली. आणि पुढे निश्चय केला की आपण संपूर्ण आयुष्य एका छत्रपती संभाजी राजासारख्या थोर युगपुरुषाच्या चरित्राचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी खर्ची घालायचे. त्यानुसार संभाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी वेगवेगळी आठ पुस्तके लिहिण्याचे काम सुरु आहे. त्याचवेळी व्याख्यानमालेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत आहे.

महाविद्यालयीन जीवनात अनेक निबंध स्पर्धा जिंकल्या. तसेच वक्तृत्व स्पर्धेत ज्या ज्या ठिकाणी गेलो त्या त्या ठिकाणाहून बक्षीसे मिळवत आलो. आणि त्याचवेळी प्राध्यापक वर्गाने मला एकमुखाने तु वकील हो, शिक्षक हो परंतु एक चांगला वक्ता हो असा सहज दिलेला आर्शिवाद संभाजी महाराजांचे चरित्र सांगताना बराच कामी येतो. ज्या ज्या ठिकाणी व्याख्यानासाठी गेलो त्या त्या ठिकाणाहून पुन्हा पुन्हा निमंत्रणे येतात. यातच सर्व यश सामावले आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र घराघरात पोहचवणे हेच माझे जीवित संकल्प आहे व हीच माझी या जीवनातील अपेक्षा आहे.

\- - - - - - - - - - -

★ प्रकाशित साहित्य ★

- **पानिपतचा विजय (दोन महिन्यात दुसरी आवृत्ती)**
  विदेशी आक्रमकांना कायमचा धडा शिकविणाऱ्या महायुद्धाचा खरा वेध
  किंमत : रु. २५०/-

- **गनिमी कावा भाग - १ (३ महिन्यात तीन आवृत्ती)**
  जागतिक किर्तीच्या मराठा युद्धतंत्राचा खरा वेध
  किंमत : रु. ३९९/-

- **शिवराय भाग - १ (दीड वर्षात सहावी आवृत्ती)**
  छत्रपती महाराजांचा लढायांव्यतिरिक्त खरा इतिहास
  किंमत रु. ४५०/-


- **शिवराय भाग - २ (एका वर्षात सहावी आवृत्ती)**
  छत्रपतींचा वैज्ञानिक, आर्थिक, प्रशासकीय खरा इतिहास
  किंमत : रु. २२०/-

- **Chatrapati Shivaji Maharaj**
  Visionary Secular Great King of India
  (2nd edition) Price : 225/-

- **शिवजयंती (दुसरी आवृत्ती)**
  छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा खरा इतिहास
  किंमत रू. १००/-

- **खरा संभाजी (व्ही.सीडी) किंमत : ७० रु.**

- **आग्र्याहून सुटका (डि. व्हीडी) किंमत : १०० रु.**



★ आगामी ★

- एक संन्याशी ज्याने लाखो लोकांचा संसार केला
- शिवबा राजे (चित्रमय बाल शिवचरित्र)
- उद्योजक शिवाजी महाराज
- मॅनेजमेंट गुरु छत्रपती शिवाजी महाराज
- छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी)
- पानिपत का विजय (हिंदी)
- Victory Of Panipath 1761
- श्रीमंत व्हायचे असेल तर आजच शाळा सोडा
- योध्दा संभाजी
- मुत्सदी संभाजी
- विजेता संभाजी
- नितीवान संभाजी
- युवराज संभाजी
- प्रिन्स संभाजी फादर ऑफ मॉडर्न मॅनेजमेंट
- छत्रपति शिवाजी ते छत्रपति संभाजी
- महामंत्र राजकीय यशाचा
- सिद्धार्थ गौतम ते छत्रपती संभाजी
- पुरंदर वैभव

Prof. Namvdevrao Jadhav has till date delivered more than 1000 speeches,lectures on following subject across the Globe. Please have a look at it –

Lectures Topics

1. Chatrapati Shivaji Maharaj (King of King)
2. Science & technology of Shivaji Maharaj.
3. Rainwater harvesting & water conservation policies of Shivaji Maharaj.
4. Commuñication techniques of Shivaji Maharaj.
5. Recruitment, Training , Placement, promotion & transfer policies of Shivaji Maharaj.
6. Principles for effective administration of Shivaji Maharaj
7. Human resource management of Shivaji maharaj.
8. Construction technologies of Shivaji Maharaj.
9. Ganimi kava (Guerrilla warfare) tactics of Shivaji Maharaj.
10. Monitory policies & taxation policies of Shivaji Maharaj.
11. Foreign trade policies of Shivaji Maharaj.
12. Recession & overcoming programmers' of Shivaji Maharaj .
13. Strategically management of Shivaji Maharaj.
14. Military management of Shivaji Maharaj.
15. Janta Raja (Uncommon king of common people)
16. Diplomatic policies of Shivaji Maharaj.
17. How to compete MNC's - vision of Shivaji Maharaj.
18. Entrepreneurship – Effective development.
19. Management by objectives Shivaji Maharaj.
20. Team spirit & motivational program. Of Shivaji Maharaj.
21. Alexander, Napoleon & Shivaji Maharaj.
22. How to tackle terrorism.
23. Socialization & scientific approach of Shivaji Maharaj.
24. Management by objectives & Total quality management of Shivaji Maharaj.

लेखकाचा परिचय



web :www.erajashivchatrapati.com
email : namdevraojadhav@gmail.com

प्रा. नामदेवराव जाधव

राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांचे वंशज

जन्म : ९ जून १९७८

जन्मगाव : बांदलवाडी, मु. पो. काळदरी, ता. पुरंदर जि. पुणे

शिक्षण : एम. कॉम, पत्रकारिता, एम. बी. ए. ★

नोकरी : ५ वर्षे वरिष्ट महाविद्यालयात प्राध्यापक

अध्यक्ष : राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान

सल्लागार : राजा शिवछत्रपती मालिका स्ट्रार प्रवाह वाहिनी

तज्ञसल्लागार : शिवधनुष्य मालिका स्ट्रार प्रवाह वाहिनी

पुरस्कार : छत्रपती संभाजी राजे गौरव पुरस्कार, शिवक्रांती पुरस्कार, मराठा भूषण पुरस्कार

छंद : इतिहास संशोधन, दुर्गभ्रमण

ध्येय : छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राचा प्रचार आणि प्रसार
मराठ्यांच्या इतिहासाची पुर्नमांडणी

साधने : १० हजार व्याख्याने, १०० व्हीडीओसीडी, छत्रपती संभाजी महाराजांवर चित्रपट, मालिका

पत्ता : आंबेवाडी नं. १, हिंदुस्थान कंपनी समोर, एल. बी. एस मार्ग, विक्रोळी (प) मुं. ४०० ०८३.

मोबाईल नं. : ९८६९६४९७३७/९२७२१२४६५५

वाचकांना शिवप्रेमींना जाहीर आवाहन

शिवचरित्राबाबत आपण आपल्या सूचना आणि भावना नक्की कळवाव्यात.
छत्रपती शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन
जगासमोर आणताना आपल्याला जे जे विषय सुचतील
ते आपण कळवावेत. त्यावर नक्की
पुस्तक लिहिले जाईल.

राजमाता प्रकाशन

आम्ही फक्त शिवचरित्रावर काम करतो.

शिवचरित्रावरील

उद्‌बोधक अशा ५६ विषयांवरील
जाहीर व्याख्यानासाठी आताच संपर्क साधा

We are the first in the world to bring Real Shiv Charitra in English and Hindi.

web : www.erajashivchatrapati.com

राजमाता प्रकाशन

: शिवप्रेमींसाठी खास योजना :

इतिहासप्रेमी वाचकांना घरपोच सही सोबत त्याच किंमतीत संपूण भारतभर मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषेत पुस्तक उपलब्ध करुन देणारे पहिले प्रकाशन!

पुस्तकासाठी संपर्क

९८६९६४९७३७/९२७२१२४६५५

web : www.erajashivchatrapati.com
email : namdevraojadhav@gmail.com

आपला एक फोन, एस एम एस, ईमेल आपल्याला राजमाता प्रकाशनची प्रकाशित झालेली पुस्तके याबाबतची माहिती आणि पुस्तक उपलब्ध करुन देईल.



रक्ताच्या शाईने [illegible] रणांगणावर लिहिली, रुद्रभैरवी शब्दशारदा बनुनी प्रसन्न झाली
वीरश्रीला विद्वत्तेचा [illegible] दाखविला पंथ, लिहिते झाले संस्कृतमधुनी 'बुधभूषण' ग्रंथ।।



जगातील पहिले बुलेट प्रुफ जॅकेट
युद्ध भुमीवरील गरज लक्षात घेऊन फक्त
एका महिन्यात तयार करणारा
जगातील पहिला तरंगता तोफखाना तयार करणारा
जंजिरा जिंकण्यासाठी उसळत्या सागरात
आठशे मीटरचा सेतु बांधणारा
आदिलशाही, कुतुबशाहीची एकजुट करणारा
आणि त्याचवेळी सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रजांना
त्यांच्या बिळात कोंडुन ठेवणारा
त्याच वेळी मोघलांचा कर्दनकाळ ठरलेला
दुष्काळ ग्रस्त गावांना कायमस्वरुपी
पाणी मिळावे म्हणुन डोंगर पोखरुन
जल नियोजन करणारा.
उत्तर प्रदेशापासुन दुर तामिळनाडु
कर्नाटक आणि राजस्थान प्रांतातील लोकांनाही
स्वराज्यासाठी एकत्र करणारा
इतर धर्मांचा मान सन्मान राखणारा
आणि धर्मांतरावर कायदेशीर बंदी घालणारा
बाल मजुरी व वेठबिगारी विरुध्द कायदा करणारा
शिवप्रभुंची इच्छा पुर्ण करण्यासाठी राज्याभिषेक
झाल्यावर पंधराव्या दिवशीच दुर मध्यप्रदेशातील
बुऱ्हाणपुरवर छापा घालणारा
स्वराज्याला आर्थिक संपन्न ठेवणारा
देहु ते पंढरपुर आषाढीवारीला संरक्षण
व अर्थ पुरवठा करणारा
दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना शेतीसाठी
पीक कर्ज योजना राबविणारा
सैनिकांच्या उत्पन्नाला इतर मार्गाने हातभार लागावा
म्हणुन चराईची सवलत कायम ठेवणारा
आपले आरमार सुसज्ज करण्यासाठी परदेशातुन
तंत्रज्ञान व प्रशिक्षित लोकांचे सहकार्य घेणारा
स्वत:चे आधुनिक बारुदखाने तयार करुन
स्वदेशीचा महामंत्र देणारा

खरा संभाजी

ISBN : 978-81-910980-3-7